نَضَّرَ اللّٰهُ اِمْرَأً سَمِعَ مِنَّا شَيْئًا فَبَلَّغَهُ كَمَا سَمِعَهُ (حدیث ترمذی)

अर्थात: अल्लाह त्या माणसाला प्रफुल्लित ठेवो,ज्याने आमच्या कडून एखादी गोष्ट ऐकली, आणि जसे ऐकले तसेच (दुसऱ्यपर्यंत) पोहचविले । (हदीस तिरमिज़ी)

# पैग़म्बर मुहम्मद ( स. )

यांची

# दिव्य वचनें

**(तन्वीरूल हदीस मराठी अनुवाद)**

تنویرالحدیث


संकलन व स्पष्टीकरण:

**शम्स पीरज़ादा** (रह.)

मराठी अनुवाद : **मो.शफ़ी अन्सारी**



प्राकाशक:

**इदारा दअ्वतुल क़ुरआन**

**५९, मुहम्मद अली रोड मुंबई ४०००० ३**

**फोन: २३४६५००५**

---- **पहिली आवृत्ती - मार्च २०१०** **किंमत रु. ७०/-**

---- **प्रती -२०००**

بِسمِهٖ تَعَالیٰ

अर्थात - सर्वश्रेष्ठ अल्लाह च्या नावाने

# प्रकाशकाचे निवेदन

'' **इदारा दअवतुल कुरआन** '' या संस्थेने ज्या गोष्टीला प्राधान्य दिले आहे; ती म्हणजे पवित्र कुरआनचे सोपे भाषांतर आणि सर्वसामान्य लोकानां समजू शकेल असे सरळ व सोपे कुरआनचे स्पष्टीकरण हे होय. ज्याच्या प्रकाशनाची सेवा ते अनेक वर्षांपासून पार पाडीत आहे. जेणे करून लोकांमध्ये कुरआन वाचनाची रूचि निर्माण व्हावी; आणि त्याच प्रमाणे मुसलमानानी कुरआनच्या छत्र-छाये खाली आपले जीवन व्यतीत करावे. त्याच प्रमाणे संस्थेने निवडक सत्य पैगंबरीय प्रवचनांचे भाषांतर आणि स्पष्टीकरण सादर करण्याची देखील व्यवस्था केली आहे. ज्यामुळे मुसलमान लोक सातत्याने पवित्र कुरआन आणि पैगंबरीय प्रवचनांशी नियमितपणे संपर्कात राहतील. आणि पैगंबरीय प्रवचनांच्या या विखुरलेल्या मोत्यानी आपल्या ज्ञानसंपत्तीत भर टाकीत राहतील.

संस्थेने आजपर्यंत पैगंबरीय प्रवचनांचे दोन खंड ''जवाहिरूल-हदीस'' आणि ''तनवीरूल हदीस''च्या नावाने प्रकाशीत केले आहेत. ते दोन्ही खंड आमचे परममित्र व स्नेही मौलाना शम्स पीरजादा यांनी संपादित केले होते. त्यांचे सन १९९९ मध्ये अल्पशा आजाराने निधन झाले. اِنَّا لِلّٰہِ وَ اِنَّا اِلَیۡہِ رَاجِعُوۡنَ

''सर्व श्रेष्ट अल्लाह त्यांच्या कबरीला विस्तूत ठेवो.''(आमीन)

हदीस अर्थात पैगंबरीय प्रवचनाच्या संदर्भात त्यांचा दृष्टीकोन नेहमीच संशोधन वृत्तीचा राहिला आहे. म्हणून हदीस च्या निवडी बाबत तिच्या योग्यतेकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आहे. कमजोर हदीस आणि मनाने घडवलेल्या हदीसच्या प्रभावाने सत्य आणि खऱ्या हदीस च्या अस्तित्वावर पडदा टाकून दिलेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, केवळ खऱ्या व सत्य हदीसच मान्यता प्राप्त असतात; आणि केवळ त्यांचे पालन करणाराच पैगंबर सल्लल्लाहु अलैही वसल्लम यांचा खरा अनुयायी बनू शकतो.

सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कृपेने ''जवाहिरूल हदीस'' च्या उर्दू , मराठी, गुजराती आणि इंग्रजी च्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. अल्लाह च्या कृपेने ''तनवीरूल-हदीस'' च्या आवृत्तीचे हे मराठी भाषांतर प्रकाशित करण्याची सुवर्ण संधी आम्हास प्राप्त झाली आहे. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर देखील प्रकाशित करण्यात आले आहे.





आशा आहे की दानशूर लोक या ग्रंथाच्या प्रसारणाचा जास्तीत जास्त प्रयत्न करतील. सर्वश्रेष्ठ अल्लाह आम्हा सर्वानां त्याच्या धर्माची खऱ्या अर्थाने सेवा करण्याची आणि आपल्या रसूल सल्लल्लाहु अलैहि व सल्लम च्या सत्य मार्गाचे अनुकरण करण्याचे सामर्थ्य प्रदान करो ! आमीन.

२६, रबीउल अव्वल, १४३१ हि.
१३ मार्च २०१०

**मुहम्मद सिद्दीक क़ुरैशी**
सचिव,
**इदारा दअवतुल कुरआन,**
मुबंई- ४०० ००३.

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

अर्थात:- **परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने**

# प्रस्तावना

या पूर्वी सत्य पैगंबरीय वचनांचे एक ग्रंथ ''जवाहिरूल हदीस'' या नावाने प्रकाशित झालेले आहे. हे ग्रंथ मुस्लिमेतर वाचकांकरिता लिहिण्यात आले होते. अलहम्दुलिल्लाह या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या. शिवाय इंग्रजी आणि अन्य भाषांमध्ये देखील या ग्रंथाचे भाषांतर प्रकाशित झाले.

आता हदीस चा दुसरा संग्रह ''तन्वीरूल हदीस '' या नावाने प्रकाशित करण्यात येत आहे. हे संग्रह मुसलमानानां दृष्टीसमोर ठेवून संघटित करण्यात आले आहे. आणि वचनाची (हदीसची) निवड करताना मुसलमानांची वैचारिक व आचरण विषयक सुधारणा, धर्मात सखोल विचार चिंतन, ज्ञान व दूरदृष्टी, उच्च चारित्र्यशीलता आणि प्रशिक्षण व आत्मशुध्दी सारख्या पैलूंचा विचार केलेला आहे. शिवाय ही बाब देखील दृष्टी समोर ठेवली आहे की धर्माबद्दल त्यांची कल्पना देखील दुरुस्त असायला हवी. आणि त्यानां धर्माचा खरा आत्मा (Spirit) देखील मिळायला हवा. पैगंबरीय वचनांचे स्पष्टीकरण करतानां प्रेषितांच्या कथनांचा अर्थ स्पष्ट व्हावा आणि सद्यस्थितीत मुसलमानानां त्यापासून त्याना मार्गदर्शन प्राप्त व्हावे, या गोष्टीचा प्रयत्न केला गेला आहे.

पैगंबरीय वचनांची ही निवड खऱ्या व सत्य हदीसांवर आधारित आहे. प्रमाण व पुराव्या च्या दृष्टीकोनातून देखील या हदीसांवर टीका टिप्पणी करायला कोणतीही जागा राहात नाही. आणि विषयाच्या संदर्भात देखील जे पवित्र क़ुरआन आणि अन्य सत्य हदीसींशी सुसंगत होत नाही अशी कोणतीही गोष्ट यात नाही. अप्रमाणीत व निराधार पैगंबरीय वचनांची नोंद करण्याचे टाळण्यात आले आहे. कारण अशा हदीसी धर्मा मध्ये प्रमाण नाहीत, परंतु शोचनीय स्थिती अशी आहे की, उलेमा आणि मोठया संख्येने धर्मोपदेशक निराधार व अप्रमाणित हदीसी आणि कोणताही पुरावा नसलेले पैगंबरीय वचनांचे वर्णन करण्यात व्यस्त आहेत. ते लोक हे पाहण्याचे देखील कष्ट करीत नाही की या निराधार ''रिवायती'' (हजरत मुहम्मद पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या तोंडून ऐकलेली गोष्ट त्याच शब्दात इतराना सांगणे). क़ुरआन आणि पैगंबरीय कथनांच्या विरूद्ध तर नाही ना. परिणामस्वरूप क़ुरआन चे वर्णन आणि आदेश या रिवायतीमुळे पडद्या आड टाकले जातात. आणि जनता रिवायतीचे पालन करू लागते.

क़ुरआन च्या अध्ययनांबरोबरच पैगंबरीय वचना चे वाचन करणे देखील अत्यावश्यक आहे. पैगंबरीय वचनांमुळे क़ुरआन चे अर्थबोध होणेही सुलभ होते, आणि क़ुरआन च्या





आदेशाच्या तपशीलाची देखील माहिती मिळते, तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण होते. आणि ज्ञान व दूरदृष्टीही प्राप्त होते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की क़ुरआन च्या शिकवणी च्या प्रकाशात पैगंबराच्या मार्गदर्शना खाली ईश्वरीय आदेशांवर अंमलबजावणीच्या पद्धती निश्चित होतात. आणि त्याचे प्रभावी व आचरणात्मक उदाहरण देखील सादर केले जाते. म्हणून पैगंबरीय वचना पासून मुसलमान कधीही बेपर्वा होऊ शकत नाही.

मुसलमानांमध्ये श्रध्देचा जो मतभेद आढळून येतो, आणि धर्मात सद्सद्विवेकबुध्दीची जी कमतरता आढळून येते; आणि ज्या वक्र बुद्धी मध्ये ते सापडले आहेत; त्याचे खरे कारण म्हणजे क़ुरआन आणि पैगंबरीय आचरणाशी थेट संबंध न ठेवणे आणि त्यांची समज प्राप्त करण्याच्या बाबतीत त्यांचा दुर्लक्षपणा आहे. ते आपआपल्या संबंधीत कक्षेतील रचनाकार आणि लेखकांची पुस्तके वाचून घेतात: पण खुल्या अंत:करणाने अल्लाह चा ग्रंथ आणि त्याच्या प्रेषितांच्या हदीसींच्या अध्ययनाकडे लक्ष केंद्रित करीत नाही. हेच कारण आहे की त्यांचा बुद्धी एका विशिष्ट मर्यादेच्या आतच बंदिस्त होऊन राहते.

अल्लाह करो, हदीसाचे हे पुष्पगुच्छ मुसलमानांच्या सुधारणे कामी सहाय्यक होवो. त्याच्यात क़ुरआन आणि सत्य पैगंबरीय वचनाच्या अध्ययन संबंधी गोडी निर्माण होवो. ते अल्लाह च्या प्रेषिताचे खऱ्या अर्थाने अनुकरण करणारे होवोत. आणि त्यांच्या अंत:करणातून ही प्रार्थना आणि दुआ जारी होवो.

رَبَّنَاۤ اٰمَنَّا بِمَاۤ اَنۡزَلۡتَ وَاتَّبَعۡنَا الرَّسُوۡلَ فَاكۡتُبۡنَا مَعَ الشّٰهِدِيۡنَ.

(آل عمران:۵۳)

''हे आमचे पालनकर्त्या, जे मार्गदर्शन तू अवतरले आहेस, त्यावर आम्ही ईमान आणले, आणि आम्ही प्रेषितांचे अनुकरण अवलंबिले. आमचे नांव साक्षी देणाऱ्या मध्ये लिहून ठेव.'' (सूरह अले-इमरान - ५३)

शम्स पीरजादा
**इदारा दअवतुल क़ुरआन**
मुंबई-४०० ००३

८ - शव्वाल, १४ १८ हिजरी
५ - फेब्रुवारी - १९९८.

# अनुक्रमाणिका


| पृष्ठ | शीर्षक |
|---|---|
| ९ | अल्लाह चे भय राखून संयम पाळणे |
| १० | ईमान चे माधुर्य |
| ११ | वारंवार पश्चाताप व्यक्त करणे |
| १२ | अल्लाहशी भेटीची उत्कंठा |
| १३ | अल्लाहशी सद्भावना राखणे |
| १५ | अल्लाह जेव्हा दासाशी प्रेम करतो |
| १६ | दासाच्या पश्चातापामुळे अल्लाह प्रसन्न |
| १७ | मनांवर अल्लाह चा पूर्ण ताबा |
| १८ | अल्लाह ला नजरेत ठेवणे |
| २० | संपूर्ण श्रध्दा |
| २३ | जो खर्च केला जावा तो अल्लाहला राजी करण्याकरिता असावा |
| २४ | अल्लाह च्या भयाने डोळे पाणावणे |
| २५ | **प्रेषितांचे प्रेम आणि आज्ञा पालन** |
| २६ | प्रेषित - प्रेम |
| २७ | प्रेषितांचे आज्ञापालन |
| २८ | दरूदचा मोबदला |
| ३० | प्रेषितांची अवज्ञा करणारे स्वर्गापासून वंचित |
| ३१ | खोटे पैगंबरीय वाचनांचे वर्णन करण्याचा पाप. |
| ३३ | पैगंबरीय वचन पोहोचविणाऱ्या करिता खुषखबर |
| ३५ | पैगंबरीय परंपरेला घट्ट धरून ठेवणे |
| **३८** | **धर्म काय आहे?** |
| ३९ | ईमान आणि इस्लाम ची वास्तविकता |
| ४२ | मनाची सचोटी |
| ४४ | धर्म सोपे आहे, त्यास कठिण बनवू नये |
| ४६ | लोकांसाठी सहज सुलभता निर्माण करणे |
| ४७ | चांगल्या पध्दती प्रचलित करणे |
| ४९ | स्वार्थ ईमान च्या विरुध्द आहे |
| ५० | **धर्म काय नाही आहे** |
| ५१ | धर्मात नवीन पध्दत |
| ५२ | खूप प्रश्न केल्यामुळे अडचणी निर्माण होतात |
| ५५ | अल्लाह संबंधी निरर्थक प्रश्न |
| ५६ | जेव्हा इस्लाम अपरिचित झालेला असेल |
| ५७ | ज्या गोष्टींची आज्ञा केली गेली त्या न करणे व ज्यांची आज्ञा नाही केली त्या करणे |
| ५९ | उपद्रवापासून सावधान |
| ६० | जेव्हा कट्टर अज्ञानी लोक धार्मिक नेते म्हणून समोर येतील. |

| पृष्ठ | शिर्षक |
|---|---|
| ६१ | मार्गभ्रष्ट लोकसमूहांचे अनूकरण करणे |
| ६३ | एखाद्या मुसलमानाला काफिर म्हणून संबोधणे |
| ६४ | **धर्माची जाणीव आणि स्वयं निर्णय** |
| ६५ | धर्माची जाणीव असणे ही अल्लाह ची फार मोठी देणगी आहे. |
| ६६ | स्वयं निर्णय ची कदर वाढवणे. |
| ६८ | स्वयं निर्णयातील मतभेद सहन करून घ्यावा. |
| ६९ | पुण्यकर्म आणि दुष्कर्मची ओळख |
| ७० | न्यायालयीन निर्णय प्रकट परिस्थितीनुरूप होत असतो. |
| **७२** | **स्वप्न आणि शरीअत (धर्म शास्त्र)** |
| ७३ | कबरीतील विश्वाची एक झलक. |
| ७९ | ईमान धारकाच्या खऱ्या स्वप्नाची श्रेष्ठता |
| ८१ | स्वप्न खरेही आणि खोटे ही. |
| ८३ | **कुरआन ची आवड आणि त्याची जाणीव** |
| ८४ | कुरआन च्या सुगंधाने दरवळणारा |
| ८६ | कुरआन तज्ञ |
| ८७ | न समजता कुरआन वाचन करणारे |
| ८८ | हेवा कोणी करायला हवा. |
| ९० | देखावा पुण्यकर्माचा सर्वनाश करतो |
| ९३ | **सुंदर उपासना आणि सुंदर कर्म** |
| ९४ | सुंदर उपासने साठी प्रार्थना |
| ९५ | आपल्या ईस्लाम मध्ये सौंदय निर्माण करणे |
| ९६ | नमाज सामूहिकरित्या पठण करणे आणि त्यात पुढाकार घेणे. |
| ९७ | अशी नमाज अदा करणे जी अदा न केल्या सारखी असावी. |
| ९९ | नमाज़ च्या बरकती |
| १०० | फज़र आणि असर ची नमाज वेळेवर अदा करण्याचे प्रलोभन |
| १०१ | उत्कृष्ट कर्म. |
| १०३ | सामूहिक नमाज अदा करण्याचे महत्त्व |
| १०४ | ''वज़ू'' च्या प्रभावाने चेहरे उज्वल |
| १०५ | उत्कृष्ट दान |
| १०६ | महान दान |
| १०८ | रोज़ा ईमानच्या कैफियतीसह |
| १०९ | हज्ज मध्ये पथ्य |
| ११० | सर्वश्रेष्ठ कर्म |
| १११ | मरणोत्तर पुण्यदान नव्हे,निरंतर पुण्य. |







| पृष्ठ | शीर्षक |
|---|---|
| ११३ | **ईश-स्मरण** |
| ११४ | अल्लाहपाशी प्रिय वचन |
| ११५ | अल्लाहच्या स्मरणाने बुध्दी जागृत होते |
| ११६ | नामस्मरणाचे शब्द प्रिय असणे |
| ११८ | मुजाकिराती नशीस्ते (आपसातील चर्चे च्या बैठका) |
| **१२०** | **अल्लाह च्या मार्गातील संघर्ष** |
| १२१ | जिहाद ची श्रेष्ठता |
| १२३ | जगाच्या तुलनेत स्वर्ग. |
| १२४ | खरी दुर्बलता |
| १२६ | या लोकसमूहाची एक ज़मात जी कियामती पर्यंत सत्यतेवर टिकून राहील |
| **१२८** | **सत्कर्माचा आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखण्याचे कर्तव्य** |
| १२९ | सत्कर्माचा आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखण्याच्या कर्तव्याचा त्याग केल्याने होणाऱ्या नरक यातना |
| १३० | दुष्कर्मापासून न रोखण्याचा परिणाम म्हणजे सामूहिक सर्वनाश |
| १३२ | रस्याच्या कडेला बसणे टाळले पाहिजे |
| १३३ | रस्त्यातून यातना देणाऱ्या वस्तू बाजूला सारणे |
| १३४ | **''दअवत'' आणि धर्मप्रचार** |
| १३५ | ''दअवत'' आणि धर्मप्रचारचा मोबदला |
| १३६ | ''दअवत'' मधील क्रमश: वाढ |
| १३८ | **व्यवस्था आणि संघटन** |
| १३९ | संघटित व्यवस्था टिकवण्याकरिता ऐकणे व आज्ञापालन करणे आवश्यक |
| १४० | धर्मप्रमुखाच्या न आवडणाऱ्या गोष्टींवंर संयम पाळणे |
| १४२ | खुर्चीची लालसा करु नका |
| १४४ | इस्लामी संप्रदाय एका शरीरा प्रमाणे एका मुसलमाना ची दुसऱ्या |
| १४५ | मुसलमानाशी वर्तणुक |
| १४७ | **चांगला संकल्प आणि ईश प्रसन्नतेची आवड** |
| १४८ | पुण्यकर्माच्या स्वीकृतीकरिता शुध्द इरादा असणे आवश्यक |
| १४९ | कर्म इराद्याशी संबंधित असतात |
| १५१ | आपल्या परिवारावर खर्च करण्यावर मोबदला |
| १५२ | संकटात आपले पुण्यकर्म सादर करुन सूटकेसाठी प्रार्थना किंवा दुआ करणे |
| १५६ | **सर्वोत्तम गुण** |

| पृष्ठ | शीर्षक |
|---|---|
| १५७ | अनामती ठेवणे हे एक आधारभूत गुण |
| १५९ | ईमानधारक हा नखशिखांत शुभमंगल |
| १६० | भौतिक दृष्टया जो आपल्या पेक्षा कमी दर्ज्याचा आहे त्याच्याकडे बघा. |
| १६१ | जे क्षमा करतात अल्लाह त्याना क्षमा करतो. |
| १६२ | जीभेने अशा गोष्टी बोलणे ज्यामुळे उच्च स्थान प्राप्त होतात. |
| १६३ | शालीनतेमुळे उच्चसथान प्राप्त होतात. |
| १६४ | आजारपणात संयम |
| १६५ | संयम आणि कृतज्ञता. |
| १६६ | माणूस त्याच्या बरोबर असेल ज्याला तो प्रेम करतो. |
| १६७ | चांगल्या आणि वाईट संगतीचा परिणाम |
| १६८ | न्याय करणाऱ्याचे उच्च स्थान. |
| १६९ | चारित्र्याची उच्चता. |
| १७१ | अनुभवाने धडा घेणे. |
| १७२ | लोकांसाठी सुलभता निर्माण करणे. |
| १७३ | जितकी जास्त यातना तितका मोठा मोबदला |
| १७४ | दु:ख हे भल्या साठी |
| १७५ | अल्पसंतुष्टता. |
| १७६ | दु:खामुळे पापनष्ट होतात. |
| १७७ | मुसलमान मुसलमानांसाठी सुरक्षिततेचे निमित्त असतो. |
| १७८ | दुराग्रहाची संधी निर्माण न होऊ देणे. |
| १७९ | दु:ख पोहोचल्यानंतर जर तर च्या गोष्टी न करणे |
| १८० | कर्ज घेण्याचे टाळणे |
| १८२ | शेती आणि वृक्षारोपण हे चांगुलपणाचे निमित्त असते. |
| १८३ | निकाह करण्यासाठी धार्मिक वृत्तीच्या स्त्री ची निवड. |
| १८४ | **पाप कृत्ये आणि न आवडणाऱ्या गोष्टी** |
| १८५ | मुसलमानाची हत्या अधर्मी कृत्य आहे. |
| १८६ | विना कारण रक्तपात. |
| १८७ | आत्म हत्येचा परिणाम. |
| १८८ | ईमानधारक जेव्हा पापकृत्य करतो. |
| १८९ | डोळ्याचा व्यभिचार. |
| १९० | भांडखोर व्यक्ती अल्लाहला अजिबात पसंत नाही. |
| १९१ | अफरातफरी चा परिणाम. |
| १९४ | कपडे लोंबकळत चालणे. |
| १९५ | पायाच्या घोटयाखाली पर्यंत कपडे ठेवणे. |

| पृष्ठ | शीर्षक |
|---|---|
| १९७ | अहंकाराचा परिणाम |
| १९८ | धनाचा गुलाम. |
| १९९ | निकृष्ट समाज. |
| २०० | वाईटातील वाईट काळ |
| २०१ | काळाला बरे वाईट संबोधणे |
| २०२ | वाहयात काव्या पासून अलिप्तता. |
| २०३ | अघाशी पणे खाणे |
| २०४ | पाण्यात फुंका मारणे वाईट आहे. |
| २०५ | **कियामतीच्या दिवशी घडणारी घटना** |
| २०६ | प्रत्येक व्यक्तीशी अल्लाह संभाषण करेल. |
| २०८ | अल्लाह समोर हजेरीची समस्या. |

| पृष्ठ | शीर्षक |
|---|---|
| २०९ | स्त्रीयांचे आपल्या पतीची किंवा आपल्या सहकाऱ्याशी अकृतघ्नता व्यक्त करणे. |
| २११ | प्रसिद्धी इच्छिणाऱ्यांशी वागणूक. |
| २१२ | ज्यांच्यावर जुलूम करण्यात आले त्याला बदल्यात पुण्यकर्म द्यावे लागतील. |
| २१४ | **स्वर्ग हे ईमानधारकाचे ध्येय.** |
| २१५ | स्वर्ग देखील किती जवळ आहे आणि नरक देखील. |
| २१६ | संयमाचा मोबदला स्वर्ग. |
| २१७ | स्वर्गच्या महालांच्या उंचीची एक झलक |
| २१८ | अल्लाह ची सर्वात्तम देणगी. |






# अल्लाह चे भय राखून संयम पाळणे

# ईमानचे माधुर्य

## **हदीस** (पैगंबरीय वचन)

**عَنْ اَنَسٍ عَنِ النَّبِيِّ صلى الله عليه وسلم قَالَ ثَلٰثٌ مَنْ كُنَّ فِيْهِ وَجَدَ حَلَاوَةَ الْاِيْمَانِ اَنْ يَّكُوْنَ اللّٰهُ وَرَسُوْلُهٗ اَحَبَّ اِلَيْهِ مِمَّا سِوَا هُمَا وَ اَنْ يُّحِبَّ الْمَرْءُ لَا يُحِبُّهٗ اِلَّا لِلّٰهِ وَ اَنْ يَّكْرَهَ اَنْ يَّعُوْدَ فِى الْكُفْرِ كَمَا يَكْرَهُ اَنْ يُّقْذَفَ فِي النَّارِ ـ** (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अनस (रजि.) म्हणतात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात-ज्याच्या अंगी या तीन गोष्टी असतील, त्याने जणू ईमानचे माधुर्य प्राप्त केले. एक तर हे की, अल्लाह आणि त्याचा प्रेषित त्याच्या दृष्टीत सर्व लोकांपेक्षा अधिक प्रिय असावेत, त्याने कोणा व्यक्तीशी प्रेम करावे, तर ते अल्लाह साठीच करावे; आणि अधर्माकडे परत जाण्याला अशा तऱ्हेने नापसंत करावे,ज्या तऱ्हेने अग्नीत टाकला जाण्याला नापसंत करतो. (बुखारी-किताबुल ईमान)**

## स्पष्टीकरण

ईमान चे माधुर्य याचा अर्थ असा की ईमानच्या प्रसन्नता पूर्ण परिणामाची जाणीव आपल्या मनात होणे, आणि त्याच्या मधुर स्वादाच्या प्रसन्नतेची कैफियत उत्पन्न होणे आहे. हदीस मध्ये ईमान च्या माधुर्या संबंधी ज्या तीन गोष्टींचे वर्णन करण्यात आले आहे, त्यात पहिली गोष्ट तर अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताला सर्व लोकांपेक्षा अधिक प्रिय राखणे असे आहे. म्हणजे अल्लाह त्याच्या प्रेषिताचे प्रेम हे सर्व प्रेमांवर प्रभावी असावे. अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी संबंधाचे वैशिष्ठ्य केवळ आज्ञापालनाचे नव्हे तर त्याच बरोबर घट्ट संबंध आणि अतिप्रेमाचे असावयास हवे. अल्लाह चे प्रेम मुख्य आहे, त्यानंतर त्याच्या प्रेषिताचे प्रेम. कारण हे देखील अल्लाहशी प्रेमाच्याच अधीन आहे. आणि त्याची निकड देखील.

दुसरी गोष्ट जिचे वर्णन हदीस मध्ये आहे ती अशी की, कोणाव्यक्तीशी प्रेम करावे, तर अल्लाह खातरच करावे. म्हणजे लोकाशी त्याचे प्रेम देखील स्वार्थासाठी नव्हे तर अल्लाह





खातर असायला हवे. अशी व्यक्ती केवळ त्या लोकांशी प्रेम करेल जे अल्लाहला प्रिय राखतात. निधर्मी आणि दुराचारी लोकांशी तो प्रेम करणार नाही; आणि त्याला आपला मित्र बनवणार नाही.

हदीस मध्ये तिसरी गोष्ट अशी नमूद आहे की निधर्माकडे परतण्याला त्याने त्याच पद्धतीने नापसंत करावे ज्या पद्धतीने अग्नीत परतवण्याला तो ना पसंत करतो. स्पष्ट आहे की, निधर्मीपणाचा परिणाम नरक आहे. म्हणून एका मुसलमानाचे निधर्माकडे परत जाणे स्वत:ला नरकात ढकलण्यासमानच आहे. म्हणून त्यात परतण्याला आगीत जाण्याशी अर्थ लावले गेले आहे. निधर्मीपणाशी हा अतितिरस्कार आपल्या ईमान मध्ये शुद्ध व निर्भेळ असण्याची खूण आहे.

# वारंवार पश्चाताप व्यक्त करणे

## हदीस

**عَنْ اِبْنِ عُمَرَ قَالَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وسلم يَا اَيُّهَا النَّاسُ تُوْبُوْا اِلَى اللّٰهِ فَاِنِّىْ اَتُوْبُ فِى الْيَوْمِ اِلَيْهِ مِائَةَ مَرَّةٍ ـ** (مسلم کتاب الذکر)

## अनुवाद

**हजरत उमर (रजि.) म्हणतात की रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ने फर्माविले, लोकहो ! अल्लाहपाशी पश्चाताप व्यक्त करा. मी दिवसातून शंभर वेळा अल्लाह जवळ पश्चाताप व्यक्त करतो.**(मुस्लिम किताबुजजिक्र)

## स्पष्टीकरण

हे दररोज वारंवार पश्चाताप व्यक्त करण्याकरिता प्रोत्साहन आहे.माणसाकडून दररोज किती पाप आणि किती अपराध घडत असतील हे त्यालाही ठाऊक नसतात. याकरिता खूप खूप पश्चाताप व्यक्त करीत राहिले पाहिजे. पश्चाताप हे आहे की मानवाने या जाणीवेतून की माझ्या कडून पाप घडले आहे अल्लाहकडे वळावे आणि त्याची क्षमायाचना करावी. माणुस जितका अधिक पश्चाताप व्यक्त करेल तेवढीच त्याच्या अंगी दास्यत्वाची भावना निर्माण होईल; अपराध स्वीकृतीची जाणीव निर्माण होईल. आणि अल्लाह पाशी कृपेसाठी आशावादी राहील. पश्चाताप हे केवळ जिभेने ''पश्चाताप पश्चाताप'' (तौबा,तौबा) म्हणणे नाही; तर पश्चाताप चे शब्द, उदाहरणार्थ -हे अल्लाह !मी तुझ्यापाशी पश्चाताप व्यक्त करीत आहे. या श्ब्दानी अल्लाह कडे पलटणे आणि रूजू होणे आहें, म्हणजे त्यामुळे तो त्याला पापमुक्त करेल.

१२

# अल्लाहच्या भेटीची उत्कंठा

## हदीस

**عَنْ اَبِی هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ قَالَ اللّٰهُ اِذَا اَحَبَّ عَبْدِیْ لِقَآئِیْ اَحْبَبْتُ لِقَآئَهٗ وَاِذَا كَرِهَ لِقَآئِیْ كَرِهْتُ لِقَآءَهٗ۔**

(البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हजरत अबुहुरैरा (रजि.) यानी म्हटले आहे की रसूलुल्लाहु सल्लल्लाहु अलैही वसल्लम ने फर्माविले की अल्लाह फर्मावतो- जेव्हा माझा दास मला भेटणे पसंत करतो, तर मी देखील त्याला भेटणे पसंत करतो. आणि जेव्हा तो माझ्या भेटीला नापसंत करतो तर मी देखील त्याच्या भेटीला नापसंत करतो.** (बुख़ारी किताबुत तौहीद)

## स्पष्टीकरण

ज्या माणसाला अल्लाशी प्रेम असते आणि जो ईश भय पूर्ण आयुष्य व्यतीत करतो त्याच्या ऱ्हदयात अल्लाह च्या भेटीची उत्कंठा निर्माण होते त्याचे मन अल्लाह कडे लागलेले राहते. आणि तो याची वाट पाहात असतो की केव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला आपल्या भेटी ची संधी प्रदान करतो. एक ईमानधारक नि:संयमी होऊन मृत्यूची प्रार्थना करीत नाही तेथेच तो मृत्यूला नापसंतही करीत नाही. ही याची खून आहे की, तो आखिरतला जगावर प्राधान्य देतो. या विरुद्ध ज्या माणसाचे जीवन दुराचारीपणाचे असते; तो अल्लाह च्या भेटीला पसंत करीत नाही. कारण तो असे समजतो की अल्लाहला आपल्या पापांचे काय उत्तर देईन; आणि माझा अंत काय होईल. म्हणून दुराचारी लोक जगात जास्तीत जास्त जगण्याचे लोभी असतात आणि पवित्र कुरआनात नमूद आहे की ते हजारो वर्षे जगू इच्छितात.

**يُوَدُّ اَحَدُهُمْ لَوْ يُعَمَّرُ اَلْفَ سَنَةٍ وَمَا هُوَ بِمُزَحْزِحِهٖ**

**مِنَ الْعَذَابِ اَنْ يُّعَمَّرَ ۔** (سورہ بقرہ:۹٦)

''त्यांच्यातील प्रत्येक जण इच्छा करतो की त्याला हजार वर्षाचे आयुष्य लाभो. यद्यपि दीर्घायुष्य त्याला नरकयातनेपासून वाचविणार नाही.'' (सूरह अल-बकर-९६)



१३

# अल्लाहशी सद्‌भावना राखणे.

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ یَقُوْلُ اللّٰهُ تَعَالٰی اَنَا عِنْدَ ظَنِّ عَبْدِیْ بِیْ وَاَنَا مَعَهٗ اِذَا ذَكَرَنِیْ فَاِنْ ذَكَرَنِیْ فِیْ نَفْسِهٖ ذَكَرْتُهٗ فِیْ نَفْسِیْ وَاِنْ ذَكَرَنِیْ فِیْ مَلَاٍ ذَكَرْتُهٗ فِیْ مَلَاٍ خَیْرٍ مِّنْهُمْ وَاِنْ تَقَرَّبَ اِلَیَّ بِشِبْرٍ تَقَرَّبْتُ اِلَیْهِ ذِرَاعًا وَاِنْ تَقَرَّبَ اِلَیَّ ذِرَاعًا تَقَرَّبْتُ اِلَیْهِ بَاعًا وَّاِنْ اَتَانِیْ یَمْشِیْ اَتَیْتُهٗ هَرْوَلَةً۔**

(البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**अबू हुरैरा (रजि.) म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात की अल्लाह फर्मावतो-मी आपल्या दासाच्या सद्‌भावनेशी निकट असतो, जी तो माझ्या विषयी बाळगतो. आणि मी त्याच्या बरोबर असतो जेव्हा तो माझे नामस्मरण करतो. जर तो आपल्या मनात माझे नामस्मरण करीत असेल तर मी देखील आपल्या मनात त्याचे स्मरण करतो. आणि जर तो माझा उल्लेख एखाद्या सभेत करतो तर मी त्यापेक्षा चांगल्या सभेत त्याचा उल्लेख करतो. आणि जर तो माझ्या कडे एक वीत भर येतो, तर मी त्याच्या कडे हात भर येतो. आणि जर तो माझ्याकडे हात भर येत असेल तरी मी त्याच्या कडे दोन हात भर येतो. आणि जर तो माझ्याकडे चालून येतो तर मी त्याच्या कडे पळत जातो.** (बुखारी - किताबुत तौहीद)

## स्पष्टीकरण

अल्लाहशी सद्‌भावना राखणे ही ईमानची निकड आहे. जेव्हा एखादा माणूस आजारी पडतो किंवा त्याला काही त्रास सहन करावा लागतो आणि खूप दुआ किंवा प्रार्थना करुन देखील त्याच्या यातना कमी होत नाही. तर ही अल्लाह कडून परिक्षा असते. की त्याचा दास

कुठपर्यंत संयम पाळतो आणि अल्लाह संबंधी त्याच्या काय भावना आहेत. अशा स्थितीत जर तो अल्लाहच्या कृपेशी निराश होतो आणि असा विचार मनात करतो की, अल्लाह त्याच्या प्रार्थनांचा स्वीकार करणार नाही. तर हा अल्लाह संबंधी मोठा गैरसमज असतो आणि त्याच्या कृपेशी निराश झाल्यानंतर त्याला अन्य कोणताही आश्रय राहात नाही. एका सच्चा ईमान राखणाऱ्याची अशी वर्तणुक कधीही राहात नाही. तो आहे त्या स्थितीत अल्लाहपाशी आशा बाळगून असतो; दुआ स्वीकृतीत जरी विलंब झाला तरी त्याला काही फरक पडत नाही. दासाने अल्लाहशी भल्याचीच आशा ठेवली पाहिजे. आणि त्याच्याशी चांगले संबंध राखून आपल्या सत्कर्माने स्वत: ला लायक बनवले पाहिजे. जसे की, याच हदीसमध्ये पुढे वर्णन करण्यात आले आहे.

या अल्लाह पारित पैगंबरीय वचना मध्ये अल्लाहने हे सत्य स्पष्ट केले आहे की दास अल्लाह संबंधी जशी भावना बाळगतो अल्लाह त्याला तशीच वागणूक देतो. जर त्याच्या मनात त्याच्या विषयी सद्भावना असेल तर निश्चितपणे तो त्याला आपल्या कुशीत जागा प्रदान करतो.

अल्लाहच्या नामस्मरणाचाही मोठा मोबदला आहे. आणि तो असा आहे की, त्याचे नामस्मरण करणाऱ्या दासाला त्याची निष्ठा प्राप्त होते. आणि तो त्याच्या कृपेच्या छायेखाली आपले जीवन व्यतीत करतो आणि त्याचे सहाय्य त्याला प्राप्त होते; विशेष करून कठिण समयी. मनातल्या मनात आणि सभांमध्ये देखील अल्लाहचे नामस्मरण केले पाहिजे; अल्लाह चा दास जर सभांमध्ये अल्लाह चे नामस्मरण करतो तर सर्वश्रेष्ठ अल्लाह फरिशत्यांच्या सभांमध्ये त्याचे नामस्मरण करतो. आणि ही बाब दासाकरिता किती सौभाग्याची आहे.

अल्लाह च्या दासाचे अल्लाहकडे पाऊल टाकण्याचा अर्थ त्याची भक्ति आणि त्याचे आज्ञापालन करुन त्याची अवळीक प्राप्त करणे आहे. आणि अल्लाह चे आपल्या दासाकडे पाऊल टाकण्याचा अर्थ असा की, तो त्याला आपली कृपा आणि आपली दया प्रदान करतो; आणि त्याला आपल्या निकटतेची शुभ संधी देतो. दास जेवढा अल्लाह कडे जातो; अल्लाह त्याच्या पेक्षा किती तरी अधिक त्याच्याकडे पाऊल टाकतो, म्हणजे त्याच्या प्रतिष्ठेत वाढ करतो. आणि त्याला आपल्या कृपेपेक्षाही अधिक प्रदान करतो. उरतो अल्लाह चे वीत भर आणि हात भर चालणे आणि दासाकडे पळण्याचा प्रश्न तर तेथे त्याचा शाब्दिक अर्थ अभिप्रेत नाही. तर त्यातील आंतरिक सत्यता अशी आहे अल्लाह आपल्या कडे पाऊल टाकणाऱ्या आणि दासाला आपली कृपा आणि दया प्रदान करण्यांच्या बाबतीत त्याची गति किती जलद आहे. हे उदाहरणा दाखल वर्णन केले आहे.





# अल्लाह जेव्हा दासाशी प्रेम करतो

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ ﷺ اِنَّ اللّٰهَ تَبَارَکَ وَ تَعَالٰی اِذَا
اَحَبَّ عَبْدًا نَّادٰی جِبْرِیْلَ اِنَّ اللّٰهَ قَدْ اَحَبَّ فُلَانًا فَاَحِبَّهٗ فَیُحِبُّهٗ جِبْرِیْلُ
ثُمَّ یُنَادِیْ جِبْرِیْلُ فِی السَّمَآءِ اِنَّ اللّٰهَ قَدْ اَحَبَّ فُلَانًا فَاَحِبُّوْهُ فَیُحِبُّهٗ
اَهْلَ السَّمَآءِ وَیُوْضَعُ لَهُ الْقَبُوْلُ فِی اَهْلِ الْاَرْضِ ۔ (بخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**अबू हुरैरा (रजि.) म्हणतात की रसूलुल्लाहु सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा आपल्या कोणा दासाशी प्रेम करतो तर जिब्रील (फरिशत्याचे नांव) ला उद्देशून म्हणतो की अल्लाह अमुक व्यक्तीशी प्रेम करतो तर तुम्ही देखील त्याला प्रेम करावं. म्हणून जिब्रील देखील त्याला प्रेम करू लागतात. नंतर जिब्रील आकाशात घोषणा देतात की, अल्लाह अमुक व्यक्तिशी प्रेम करतो म्हणून तुम्ही देखील त्याला प्रेम करा तर आकाशवासी देखील त्याला प्रेम करू लागतात. आणि त्याच्या साठी पृथ्वीवासियामंध्ये प्रियता निर्माण केली जाते.** (बुखारी-किताबुततौहीद)

## स्पष्टीकरण

ही हदीस किती प्राणवर्धक आणि मनआकर्षित करणारी आहे! अल्लाह चे कृपा वैभव पहा की तो आपल्या दासाला प्रेम करतो ज्याने स्वत:ला अल्लाह च्या प्रेमाला पात्र बनवले आहे. आणि जेव्हा तो प्रेम करतो तर धरती आकाशात त्याला मान्यता प्राप्त होते. हज़रत जिब्रील जे फरिश्त्यांचे सरदार आहेत. त्यांना त्या दासाशी प्रेम करण्याची आज्ञा केली जाते. म्हणून त्यांना देखील तो दास प्रिय असतो. मग आकाशात त्याच्या प्रियतेची घोषणा केली जाते. तेव्हा फरिश्ते देखील त्याला प्रेम करू लागतात. अशा पद्धतीने या दासाची ओळख परलोकातील सज्जन व श्रेष्ठ फरिश्त्यांमध्ये होते.त्याचे वर्णन फरिश्त्यांच्या मैफिलीत केले जावे आणि त्यांच्या नजरेत तो प्रिय ठरतो. अशा तऱ्हेने आकाश वासीयामध्ये त्याला प्रतिष्ठा व इज्जत प्राप्त होते. त्या शिवाय असे की, धरती वासियांमध्ये ही त्याला प्रासिद्धी प्राप्त होते. धरतीवासी या शब्दाशी ईमानधारक आणि चारित्र्यवान लोक अभिप्रेत आहेत. ज्यांना त्यांच्याशी प्रिती आणि प्रेम होऊन जाते. आणि ही वस्तुस्थिती आहे की अल्लाह चे सदाचारी दास, सदाचारी दासानांच पसंत करतात. आणि त्या दासाशी असणाऱ्या अल्लाह

च्या प्रेमाचा परिणाम त्यांच्या मनावर देखील होतो.

स्पष्ट आहे की या हदीसमध्ये त्या दासाचे वर्णन करण्यात आले आहे; जो ईमान राखणारा आहे; जो अल्लाहला प्रिय आहे. आणि ज्याचे आयुष्य अल्लाहचे आज्ञापालन आणि त्याची प्रसन्नता संपादन करण्यात व्यतीत होत आहे. असाच दास अल्लाहच्या प्रेमाला पात्र होऊ शकतो जसे पवित्र कुरआनमध्ये नमूद आहे. किती उच्चस्थान आहे. जे सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या त्या दासानां लोक, जे अशा स्थानाकडे आकर्षित होतात.

# दासाच्या पश्चातापामुळे अल्लाह प्रसन्न

## हदीस

عَنُ انَسِ بُنِ مَالِكٍ اَنَّ رَسُوُلَ اللّٰهِ ﷺ قَالَ اللّٰهُ اَشَدُّ فَرَحاً بِتَوُبَةِ عَبُدِهٖ
مِنُ اَحَدِكُمُ اِذَا اسُتَيُقَظَ عَلٰى بَعِيُرِهٖ قَدُ اَضَلَّهٗ بِاَرُضِ فَلَاةٍ ۔ (مسلم کتاب التوبہ)

## अनुवाद

**अनस बिन मालिक (रजि.) म्हणतात की रसूलुल्लाहु सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- अल्लाहला आपल्या दासाच्या पश्चातापाने या पेक्षाहि अधिक प्रसन्नता प्राप्त होते जितकी तुमच्यातील एखाद्या व्यक्तिला त्यावेळी होते जेव्हा त्याचा उंट जंगलात हरवलेला असावा आणि उठल्या बरोबर ते सापडावा.** (मुस्लिम -किताबुत तौबा)

## स्पष्टीकरण

दासाच्या पश्चाताप व्यक्त केल्याने अल्लाह प्रसन्न होतो ते असे की माझ्या दासाला त्याने केलेल्या पापाची जाणीव आहे. आणि त्यांवर तो लज्जित होऊन माझ्याकडे रूजू झालेला आहे. त्यामुळे अल्लाह त्याच्या पश्चातापाचा स्वीकार करतो. पश्चाताप व्यक्त केल्याने अल्लाहला जी प्रसन्नता प्राप्त होते; ती प्रसन्नता या पेक्षा फारच जास्त असते जी एखाद्या माणसाला त्यावेळी होते जेव्हा त्याचा हरवलेला उंट त्याला जंगलात सापडतो जेव्हा तो निराश होऊन झोपून गेला होता. परंतु जाग आल्या वर आपल्या उंटाला आपल्या समोर पाहतो. सारांश पश्चाताप जर शुध्द मनाने केला असेल तर सर्वश्रेष्ठ अल्लाह निश्चितपंणे तिचा स्वीकार करतो. पश्चाताप स्वीकृतीची ही कल्पना दासाला अल्लाह संबंधी आशादायी बनवते





# मनांवर अल्लाहचा पूर्ण ताबा

## हदीस

عَنُ عَبُدِ اللّٰهِ بُنُ عَمُرِو بُنِ الُعَاصِ : اَنَّهٗ سَمِعَ رَسُوُلَ اللّٰهِ ﷺ يَقُوُلُ
اِنَّ قُلُوُبَ بَنِىُ آدَمَ كُلَّهَا بَيُنَ اِصُبَعَيُنِ مِنُ اَصَابِعِ الرَّحُمٰنِ كَقَلُبٍ وَّاحِدٍ
يُصَرِّفُهٗ حَيُثُ يَشَاءُ ثُمَّ قَالَ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ اَللّٰهُمَّ مُصَرِّفَ الُقُلُوُبَ صَرِّفُ
قُلُوُبَنَا عَلٰى طَاعَتِکَ. (مسلم کتاب القدر)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन अमरू बिन अल-आस द्वारा उल्लिखित आहे की त्यानी रसूलुल्लाहु सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावताना ऐकले की सर्व लोकांची मनं रहमान (अल्लाह) च्या बोटांपैकी' दोन बोटांच्या दरम्यान आहेत जणू एक मन आहे: तो आपल्या इच्छेनुसार त्यात परिवर्तन करतो नंतर रसूलुल्लाहु सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्माविले ''हे ! अल्लाह मन परिवर्तन करणारे आमची मनं तुझ्या आज्ञापालना कडे प्रवृत्त कर.''**

## स्पष्टीकरण

या हदीस द्वारा जी गोष्ट लक्षात आणून देण्यात आली आहे. ती अशी आहे की मानवाच्या अंत:करणावर अल्लाहचा पूर्ण ताबा आहे. अल्लाह चे आज्ञापालन माणूस त्याच वेळी करू शकतो. जेव्हा अल्लाह ने त्याला आपल्या आज्ञापालनाकडे आकर्षित करावं. सूरह तकवीर मध्ये अल्लाह फर्मावतो. وَمَا تَشَآءُوُنَ اِلَّا اَنُ يَّشَآءَ اللّٰهُ رَبُّ الُعَالَمِيُنَ ۔

''केवळ तुम्ही इच्छिल्याने काहीच होणार नाही. सर्व विश्वांचा पालनहार च्या इच्छिल्याने सर्व काही होते'' (आयत क्र. २९)

परंतु ही गोष्ट येथे लक्षात असू द्यावी की, अल्लाह त्या माणसाला आपल्या आज्ञापालनाची शक्ती निश्चितपणे प्रदान करतो जो त्या शक्तीची इच्छा बाळगतो. असे कधीही होत नाही की आज्ञापालनाची त्याने इच्छा करावी आणि अल्लाह ने त्याला बंडखोर बनवून टाकवे. हदीस मध्ये अल्लाह च्या बोटांचे जे वर्णन आले आहे त्यावर संक्षिप्तपणे ईमान राखणे पुरे आहे. त्याचे स्पष्टीकरण करणे म्हणजे उपद्रवाला आमंत्रण देणे होय. अल्लाह हरप्रकार च्या दोष आणि उणीवां पासून अलिप्त आणि पाक आहे. त्याच्या गुणवैशिष्ठया संबंधी आम्हास तेवढेच ज्ञान आहे. जेवढे त्याने आम्हास ज्ञान करुन दिले आहेत. त्यात संशोधन करणे अणि कुरापती काढल्याने माणूस मार्गभ्रष्ट होतो.

# अल्लाह ला नजरेत ठेवणे

## हदीस

عَنْ اِبْنِ عَبَّاسٍ قَالَ : كُنْتُ خَلْفَ النَّبِيِّ ﷺ يَوْماً، فَقَالَ يَا غُلَامُ ، اِنِّیْ اُعَلِّمُکَ کَلِمَاتٍ : اِحْفَظِ اللّٰـهَ يَحْفَظْکَ، اِحْفَظِ اللّٰهَ تَجِدْهُ تُجَاهَکَ، اِذَا سَأَلْتَ فَاسْأَلِ اللّٰهَ، وَاِذَا اسْتَعَنْتَ فَاسْتَعِنْ بِاللّٰهِ ، وَاعْلَمْ اَنَّ الْاُمَّةَ لَوِ اجْتَمَعَتْ عَلٰی اَنْ يَنْفَعُوْکَ بِشَیْءٍ لَمْ يَنْفَعُوْکَ اِلَّا بِشَیْءٍ قَدْ کَتَبَهُ اللّٰهُ لَکَ ، وَاِنِ اجْتَمَعُوْا عَلٰی اَنْ يَضُرُّوْکَ بِشَیْءٍ لَمْ يَضُرُّوْکَ اِلَّا بِشَیْءٍ قَدْ کَتَبَهُ اللّٰهُ عَلَيْکَ، رُفِعَتِ الْاَقْلَامُ وَجَفَّتِ الصُّحُفُ۔ هٰذَا حَدِيْثٌ حَسَنٌ صَحِيْحٌ۔ (الترمذی ابواب صفۃ القیامۃ)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास (रजि.) म्हणतात की एक दिवस मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या मागे (उंटावर) सवार होतात. त्यानी फर्माविले हे बालक मी तुला काही गोष्टी शिकवतो. अल्लाहला नजरेत ठेव, तो तुला नजरेत ठेवेल. अल्लाह ला नजरेत ठेवशील तर तू त्याला आपल्या समोर पाहशील जेव्हा काही मागायचे असेल तर अल्लाह पाशीच माग. जेव्हां सहाय्य हवे असेल तर अल्लाह कडे माग. आणि जाणून घे की जर लोक या गोष्टीवर सहमत झाले की, तुला काही लाभ पोहोचवतील तर ते तुला लाभ पोहोचवू शकत नाहीत , केवळ तोच लाभ जो अल्लाहने तुझ्या नशीबी लिहून ठेवला आहे. आणि जर तुला हानी पोहोचवण्यासाठी सर्व जण एकत्र आले तर ते हानी पोहोचवू शकणार नाही केवळ ती हानी जी अल्लाहने तुझ्या नशीबी लिहून ठेवली आहे. लेखण्या उचलल्या गेल्या. धर्मग्रंथ कोरडे झाले. ही हदीस ''हसन-सहीह'' आहे.** (तिर्मिझी-अबवाब सुफ्फतुल कियामा)





## स्पष्टीकरण

हजरत इब्ने अब्बास (रजि.) यांना प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी अत्यंत सहानुभूतीपूर्वक पणे ज्या गोष्टी शिकवल्या आहेत, ती अशी गुणवैशिष्ठये आहेत; ज्यांचा मानसिक कैफियतीशी घनिष्ठ संबंध आहे.

अल्लाहला नजरेत ठेवणे म्हणजे त्याला साक्षात आपल्या समोर प्रकट होण्यासारखे आहे. आणि माणूस अल्लाहला आपल्या समोर प्रकटलेला पाहिल्यानंतर कधी ही त्याची अवज्ञा करणार नाही. आणि त्याची आज्ञापालन करण्यात तो सदैव तत्पर राहील. शिवाय त्याच्या अंत:करणात दास्यत्वाची भावना देखील अधिकाधिक जागृत होईल.

जेव्हा मागाल तर अल्लाहशीच मागा आणि जेव्हा सहाय्यता अपेक्षित असेल तर त्याची अपेक्षा अल्लाह कडेच करा.'' या बाबीचा संबंध श्रध्देशीही आहे आणि चारित्र्याशी देखील आहे. श्रध्देशी संबंधाचा अर्थ असा की माणसाने खरा लाभ पोहोचवणारा अल्लाहलाच समजावे. आणि त्यालाच खऱ्या अर्थाने सहाय्यक देखील समजावे.

अल्लाह शिवाय कोणाशीही मागू नये; आणि सहाय्यतेची देखील अपेक्षा करू नये. अल्लाहला एकेश्वर मानण्यात या सर्व गोष्टी अभिप्रेत आहेत. उरतो प्रश्न चारित्र्याच्या पैलूचा, तर माणसाने स्वत:ला इतक्या उच्च स्थांनावर नेऊन पोहोचवावे की भौतिक साधनांच्या आधारावर लोक जे काही करू शकतात, त्याची देखील त्यांच्या कडून इच्छा करू नये. त्याच्या धनदौलत वगैरे काहीही त्याने मागू नये.

या वास्तविकतेला त्याने आपल्या दृष्टीसमोर ठेवावे की सर्व लोक एकत्र येऊन देखील ना त्याला लाभ पोहोचवू शकतात ना ही हानी केवळ तोच फायदा किंवा हानी जे अल्लाह ने त्याच्या नाशिबात लिहीले असावे. यामुळे अल्लाहच्या नशिबा वर त्याची श्रध्दा बळकट होते.

''लेखण्या उचलल्या गेल्या आणि धर्मग्रंथ कोरडे झाले'' याचा अर्थ असा आहे की अल्लाहला त्याच्या नाशिबात जे काही लिहावयाचे होते ते त्याने लिहून टाकले. आता त्यात कोणताही बदल होऊ शकत नाही म्हणून मानवाने अल्लाह लिखित भाग्यावर श्रध्दा ठेवली पाहिजे. यामुळे श्रध्देची कैफियत उत्पन्न होते. आणि त्याला मानसिक समाधान प्राप्त होते.

लक्षात असू द्यावे की भाग्य हे अल्लाह निर्मित योजना आहे. ज्यात मानवाचे ते प्रयत्न आणि युक्तीयांचा देखील समावेश आहे. जे अल्लाह ने त्याला दिलेल्या अधिकारा अंतर्गत तो करेल म्हणून मानसाने प्रयत्न करण्यात कोणती ही कसूर करू नये. आणि त्याच बरोबर हे देखील लक्षात असू द्यावे की जे काही घडणार आणि ते अल्लाह च्या संमतीनेच घडणार आहे.

# संपूर्ण श्रध्दा

## हदीस

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ رَضِىَ اللّٰهُ عَنهُمَا قَالَ : خَرَجَ عَلَيْنَا النَّبِىُّ ﷺ يَوماً فَقَالَ عُرِضَت عَلَىَّ الْاُمَمُ فَجَعَلَ يَمُرُّ النَّبِىُّ مَعَهُ الرَّجلُ وَالنَّبِىُّ مَعَهُ الرَّجُلَانِ وَالنَّبِىُّ مَعَهُ الرَّهطُ وَالنَّبِىُّ لَيس مَعَهٗ اَحدُوَّ رَاَيتُ سَوادًا كَثِيرًا سَدَّ الاُفُقَ فَرَجُوتَ اَنْ يَّكُونَ اُمَّتِىُ فَقِيلَ هٰذَا مُوسىٰ وَ قَومُهٗ، ثُمَّ قِيلَ لِىَ انْظُرْ فَرَاَيْتُ سَوادًا كَثِيرًا سَدَّ الْاُفُقَ فَقِيلَ لِىَ انْظُرْ هٰكَذَا وَهٰكَذَا فَرَاَيْتُ سَوادًا كَثِيرًا سَدَّ الْاُفُقَ فَقِيلَ هٰؤُلَآءِ اُمَّتُکَ وَ مَعَ هٰؤُلَآءِ سَبْعُونَ اَلْفاً يَّدْخُلُونَ الْجَنَّةَ بِغَيْرِ حِسَابٍ فَتَفَرَّقَ النَّاسُ وَلَمْ يُبَيّنْ لَهُمْ ، فَتَذَاكَرَ اَصْحَابُ النَّبِىِّ ﷺ فَقَالُوا اَمَّا نَحْنُ فَوُلِدْنَافِى الشِّرکِ وَلٰكِنَّا اٰمَنَّا بِاللّٰهِ وَ رَسُوْلِهٖ وَلٰكِنَّ هٰؤُلَآءِ هُمْ اَبْنَاؤُنَا: فَبَلَغَ النَّبِىَّ ﷺ فَقَالَ: هُمُ الَّذِيْنَ لَا يَتَطَيَّرُوْنَ وَلَا يَسْتَرْقُوْنَ وَلَا يَكْتَوُوْنَ وَعَلٰى رَبِّهِمْ يَتَوَكَّلُوْنَ فَقَامَ عُكَاشَةُ بْنُ مِحْصَنٍ فَقَالَ اَمِنْهُمْ اَنَا يَا رَسُوْلَ اللّٰهِ ؟ قَالَ نَعَمْ، فَقَامَ اٰخَرُ فَقَالَ اَمِنْهُمْ اَنَا؟ فَقَالَ سَبَقَکَ بِهَا عُكَاشَةُ. (البخاری کتاب الطب)

## अनुवाद

**हजरत इब्ने अब्बास (रजि.)कथन करतात की एके दिवशी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आमच्याकडे आले आणि फर्माविले-माझ्या समोर लोक समूह आणण्यात आले. तेव्हा एक प्रेषिता बरोबर एक जण होता. दुसऱ्या प्रेषिताबरोबर दोन जण होते. एखाद्या प्रेषिताबरोबर एक लोकसमूह होता. आणि एखादे प्रेषित असे होते. ज्यांच्या बरोबर कोणीही नव्हता आणि मी पाहिले की एक फार मोठा लोकसमूह आहे. ज्याने क्षितिजा ला भरून टाकले होते. मी बोललो कदाचित ही माझी उम्मत''(लोकसमूह किंवा अनुयायी) असेल. परंतु मला सांगण्यात आले की ही मूसा आणि त्यांची उम्मत आहे. नंतर मला सांगण्यात आले की पहा तर मी एक मोठे लोकसमूह पाहिले,ज्याने क्षितिज भरून गेले होते. मला सांगण्यात आले की ही तुमची उम्मत आहे आणि त्यांच बरोबर हे सत्तर हजार लोक आहेत; जे बिना हिशोबाचे स्वर्गात जाणार आहेत. त्यानंतर (ऐकणारे) लोक विखुरले गेले. आणि प्रेषितांनी यांचे स्पष्टीकरण केले नाही की हे लोक कोण असतील. म्हणून प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम चे अनुयायी म्हणू लागले जेथपर्यंत आमचा संबंध आहे आम्ही नास्तिकतेच्या काळात (अनेकेश्वरवाद) जन्मलो; तरी ही आम्ही अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांवर ईमान आणला. परंतु ही आमची संतान असू शकते. जेव्हा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम पर्यंत**





**ही वार्ता पोहोचली तेव्हा त्यांनी फर्माविले ते लोक आहेत जे ना शुभाशुभ वर श्रद्धा ठेवतात,ना मंत्रतंत्र मानतात,ना (आपले हात पाय चेहरे वगैरे) डागतात. उलटपक्षी आपल्या पालनकर्त्यावर श्रद्धा बाळगतात. हे ऐकून अकाशा बिन मुहसिन उभे राहिले आणि म्हणाले.हे अल्लाहचे प्रेषित ! काय मी त्यांच्या पैकी आहे.ते म्हणाले-होय ! त्यानंतर दुसरा एक माणूस उभा राहिला. आणि त्याने विचारले काय मी त्यांच्या पैकी आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्माविले अकाशा हे तुमच्या पेक्षा वरचढ केली आहेत.**
(बुखारी- किताबुत तिब)

## स्पष्टीकरण

ज्या गुणवैशिष्ठया च्या मोबदल्यात सत्तर हजार लोकानां बिना हिशोबाने स्वर्गात प्रवेश दिला जाईल; ते त्यांची संपूर्ण श्रद्धा आहे. अल्लाह वर श्रद्धा तशी तर प्रत्येक मुसलमानाची राहते; परंतु त्याच्याही श्रेणी आहेत. आणि त्याचा संबंध ऱ्हयाच्या कैफियतीशी आहे, ज्या नुसार त्याच्याकडून कृति होत असते. ज्या लोकांना स्वर्गाची शुभवार्ता देण्यात आली आहे. ते असे लोक आहेत; जे ईशश्रद्धेच्या अतिउच्या स्थानावर टिकून राहिले. त्यांच्या ईशश्रद्धेच्या ची काही उदाहरणें उपरोक्त हदीस मध्ये नमूद करण्यात आली आहेत. एक तर हे की ते शुभाशुभ वर श्रध्दा ठेवत नाही. अपशकूनी हे अनुचित आहे. कारण ती असत्य आणि निराधार गोष्टी आहे. उदा. पक्ष्यांच्या उडल्याने किंवा मांजरी समोरुन निघून जाणे या गोष्टी वाईट समजून ते अशुभ मानणे आणि त्यामुळे एखादे काम करण्याचे टाळणे. त्या प्रमाणे आपल्या राहत्या घराला किंवा आपल्या पत्नीला किंवा एखाद्या दिवसाला अशुभ समजणे हया सर्व फालतू गोष्टी आहेत. आणि अल्लाहवर श्रध्देच्या विरूध्द देखील आहेत. पवित्र कुरआनात आदेश देण्यात आले आहे. (بنی اسرائیل:۳٦). **ولا تقف ما لیس لک به علم**

''ज्या गोष्टीचे तुम्हास ज्ञान नाही तिच्या मागे लागू नका.'' (बनी इस्त्राईल - ३६)

म्हणजे ज्या गोष्टीचा वैज्ञानिक पुरावा नाही त्यापासून दूर राहिले पाहिजे. अशा पध्दतीने पवित्र कुरआन ने हरप्रकारच्या लोकभ्रम आणि वाहयात गोष्टी पासून रोखले आहे.

तसे पाहिले तर प्रत्येक सच्चा ईमान राखणारा अपशकुनीपासून दूर राहतो. परंतु ज्या सत्तर हजार लोकानां विना हिशोब स्वर्गात प्रवेशाची शुभवार्ता वर्तविली गेली आहे; त्यांच्यात हे गुणवैशिष्ठय अधिक बळकट असते. त्यांचे विचार व आचार हे अपशकुनापासून फार लांब असतात.

दुसऱ्या ज्या गुणवैशिष्ठयाचे वर्णन करण्यात आले आहे ते असे की ते मंत्रतंत्र मानीत नाही. मंत्रतंत्र किंवा जप, जर कुरआनच्या आयती नुसार किंवा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी शिकवलेल्या दुआच्या आधारांवर असेल तर ते धर्मानुकूल आहे. म्हणून हदीस मध्ये नमूद आहे की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम जेव्हा अंथरूणावर पहुळत होते; त्या वेळी ''मऊजतैन '' (सूरह फलक आणि सूरह नास) चे पठण करुन आपल्या

दोन्ही हातांवर फुकत असत आणि नंतर आपले दोन्ही हात आपल्या संपूर्ण शरीरावर फिरवीत असत.(बुखारी-किताबुत-तिब).परंतु मंत्र तंत्र व जाप करणे आणि करवून घेण्यामध्ये फरक आहे. जेव्हा एखाद्या प्रतिष्ठित व्यक्ती किंवा आलिम वगैरेच्या मध्यस्ती ने मंत्र तंत्र करवून घेतले जाते, तर ते करणारा श्रद्धेच्या उच्च स्थानावर राहात नाही. कारण तो आपला त्रास अल्लाह समोर थेट मांडत नसतो.

हे जाणून घेतले पाहिजे की मसनून दुआ म्हणजे ज्या दुआची शिकवणुक प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी दिली आहे; त्यांची वास्तविकता अशी आहे की ती दुआ आजार किंवा यातना घालवण्यासाठी दुआच आहे. परंतु त्यात पवित्र क़ुरआनच्या आयती किंवा पैगंबरांनी शिकवलेले असतात जसे ''अज़हिबिल बासा रब्बन्नासी वशफ़ि अन्तश्शाफ़ी ला शिफ़ाआ इल्ला शिफ़ाऊका शिफ़ाअल ला युग़ादिरु सक़मन''

اَذْهِبِ الْبَاسَ رَبَّ النَّاسِ وَاشْفِ اَنْتَ الشَّافِیْ لَا شِفَآءَ اِلَّا شِفَآءُ کَ شِفَاءً لَّا یُغَادِرُ سَقَماً ۔ (بخاری کتاب الطب)

या दुआचे पठण करून शरीरावर फुंकले जाते. त्यामुळे या शब्दाच्या गुणधर्मामुळे आरोग्य लाभते. या पेक्षा या तंत्रमंत्राची कोणतीही वास्तविकता नाही; ना ताईत आणि गंडयानां इस्लामने वैध ठरवले आहे. त्यांचा तिसरा गुण असा नमूद करण्यात आला आहे की, तो असा की ते डाग लावून घेत नाही. त्या काळात शरीरावर जखम वगैरे झाल्यानंतर डाग लावून उपचार करण्यात येत असे उपचाराच्या पद्धतीला वैध तर ठरवले आहे परंतु या उपचार पद्धतीला नापसंत केले आहे. कारण या पद्धतीत आगीच्या सहाय्याने शरीराच्या एका भागाला जाळून टाकण्यात येते. जे आगचे अजाब (नरकाग्नीच्या यातना) शी साम्य राखणारे आहे. आणि अत्यंत यातना व दु:ख देणोरही आहे. बिन हिशोब स्वर्गात जाणाऱ्याचे हे गुण वैशिष्ठय वर्णन करण्यात आले आहे की, ते जख्मे वगैरेंची कशीही यातना असो ते लोक उपचाराच्या या पद्धतीचा अवलंब करीत नसतात; जे शरीअत नावडते आहे. उलटपक्षी ते अल्लाहवर पूर्ण श्रद्धा ठेवतात की जर त्याची इच्छा असेल तर आरोग्य लाभेल. ही गुणवैशिष्ठये अशी आहेत त्यात उत्त्चत्तम दर्ज्याची श्रद्धा आहे. आणि त्यामुळेच त्यानां विना हिशोब स्वर्गप्रवेशाची शुभवार्ता वर्तविण्यात आलेली आहे.

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचे हे कथन ऐकल्याबरोबर अकाशनि विचारले की काय मी त्याच्यातला आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्माविले की, होय, तुम्ही त्यांच्यातले आहात. परंतु दुसऱ्या एका जणाने तेच विचारले; तर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी सांगितले की अकाशाने बाजी मारली किंवा ते तुमच्या पेक्षा वरचढ आहेत. याचा अर्थ असा आहे अकाशा हे उपरोक्त वर्णिलेली गुणवैशिष्ठये धारण करणारे होते, अगर त्या वैशिष्ठयांचा अवलंब करण्यासाठी प्रयत्नशील होते, म्हणून त्यांनी दुआची विनंती करण्यात प्राथमिकता दर्शाविली आणि त्यामुळेच त्यांना शुभवार्ता ऐकविण्यात आली. त्यांच्या नंतर तर प्रत्येक जण त्यांना पाहून आपले नांव पुढे करु शकतो. म्हणून प्रत्येकाला उत्तर दिले जाऊ शकत नाही.





# जो खर्च केला जावा तो अल्लाह ला राज़ी करण्याकरिता असावा

## हदीस

عَنْ سَعْدِ بْنِ اَبِیْ وَقَّاصٍ اَنَّہٗ اَخْبَرَہٗ اَنَّ رَسُوْلَ اللّٰہِ ﷺ قَالَ اِنَّکَ لَنْ تُنْفِقَ نَفَقَةً تَبْتَغِیْ بِھَا وَجْہَ اللّٰہِ اِلَّا اُجِرْتَ عَلَیْھَا حَتّٰی مَا تَجْعَلُ فِیْ فَمِ امْرَاَتِکَ .

(البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हजरत सअद बिन अबी वक्कास (रजि.) कथन करतात की रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-तुम्ही अल्लाहला राज़ी करण्याकरिता जे काही खर्च कराल त्यावर तुम्हाला मोबदला प्राप्त होईल;(येथपर्यंत की ) जर तुम्ही आपल्या पत्नीच्या तोंडात (अन्नाचा) जो घास टाकाल, त्यावर देखील तुम्हाला मोबदला प्राप्त होईल.**

(बुखारी-किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

याचा अर्थ असा आहे की, खऱ्या अर्थाने जे काही दान म्हणून खर्च केले केवळ तेच मोबदल्यास पात्र राहिल,असे नसून हर प्रकारचे दान जे अल्लाह ला राजी करण्याकरिता केले जाईल, तो मोबदल्यास पात्र आहे. आणि त्याचे उदाहरण हदीस मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की या नियती ने आपल्या पत्नीच्या तोंडात तुम्ही जो अन्नाचा घास ठेवाल, त्यावर तुम्हाला मोबदला मिळेल. पती आपल्या पत्नीच्या रोजीरोटी साठी तर खर्च करीतच असतो. परंतु त्या खर्चात आणि या उपजीविकेत अल्लाहची प्रसन्नता दृष्टी समोर ठेवली नाही तर त्यावर मोबदला मिळणार नाही. परंतु जर अल्लाह ची प्रसन्नता डोळ्यासमोर ठेवली तर त्यावर देखील मोबदला मिळेल.

दान प्रित्यर्थ खर्च केलेल्या रकमेची किती विशाल कल्पना आहे जी या हदीस मध्ये सादर करण्यात आली आहे. परंतु याचा अर्थ असा देखील नाही की, मानवाने आपली सर्व संपत्ती केवळ पत्नीच्या उपजीविके साठीच खर्च करावी; तर खर्च करण्यासंबंधी जे अधिकार अल्लाहने निश्चित केले आहेत, ते अदा करावे, ज्यात पत्नीची रोजी रोटी देखील सामील आहे.

# अल्लाह च्या भयाने डोळे पाणावणे

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وسلم : لَا يَلِجُ النَّارَ رَجُلٌ بَكٰى مِنْ خَشْيَةِ اللّٰهِ حَتّٰى يَعُوْدَ اللَّبَنُ فِى الضَّرْعِ، وَلَا يَجْتَمِعُ غُبَارٌ فِى سَبِيْلِ اللّٰهِ وَ دُخَانُ جَهَنَّمَ . وَفِى الْبَابِ عَنْ اَبِىْ رَيْحَانَةَ وَابْنِ عَبَّاسٍ -----هٰذَا حَدِيْثٌ صَحِيْحٌ. (الترمذی ابواب الزهد)

## अनुवाद

**हजरत अबू हुरैरा म्हणतात की रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात तो माणूस नरकाग्नीत दाखल होणार नाही. जो अल्लाहच्या भयाने रडला येथ पर्यंत की दुध स्तनांमध्ये परत न जावा आणि अल्लाह च्या मार्गातील धूळ आणि जहन्नमचा धूर दोन्ही एकत्र होऊ शकत नाही. या संबंधी अबू रैहाना आणि इब्ने अब्बासच्याही हदीसी आहेत. ही हदीस बरोबर (सहीह) आहे. (अत-तिरमिज़ी- अबवाबुज-जुहद)**

## स्पष्टीकरण

अल्लाहच्या भयाने शरीर थरथरणे, ही या गोष्टीची खूण आहे की, तो माणूस अल्लाहच्या महानते च्या कल्पनेने थरथरत आहे. आणि त्याला अल्लाह समोर उत्तरदायित्वाच्या जबाबदारीची जाणीव आहे. असा माणूस अनिवार्यपणे अल्लाहचा आज्ञाधारक असेल कारण अल्लाहचा भय बाळगणे आणि त्याची अवज्ञा करणे या दोन परस्पर विरोधी गोष्टी आहेत. म्हणून अल्लाह च्या भयाने रडणाऱ्याला जहन्नम च्या आगीपासून सुरक्षित राहण्याची शुभवार्ता दिली गेली आहे. ज्या प्रमाणे दुधाचे स्तनामध्ये परत जाणे अशक्य आहे. त्याच प्रमाणे अशा व्यक्तीचे जहन्नम मध्ये जाणे देखील शक्य नाही.

अल्लाहच्या मार्गातील धूळ जिहाद साठी त्रास सहन करण्याची खूण आहे. आणि जो माणूस जिहादसाठी निघतो; तो अल्लाहच्या मार्गात त्याच्या शत्रूशी लढणे आणि आपले प्राण अर्पण करण्यासाठी निघतो. हे इतके महान पुण्य आहे की, अशा व्यक्तीला नरकाच्या अग्नी स्पर्श करीत नाहीत.





# प्रेषितांचे प्रेम आणि आज्ञापालन

# प्रेषित प्रेम

## हदीस

عَنْ اَنَسٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ لَا يُؤْمِنُ اَحَدُكُمْ حَتّٰى اَكُوْنَ اَحَبَّ اِلَيْهِ مِنْ وَّالِدِهٖ وَ وَلَدِهٖ وَ النَّاسِ اَجْمَعِيْنَ .(بخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अनस (रजि.) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-तुमच्यापैकी कोणीही माणूस ईमानधारक होऊ शकत नाही. जेथ पावेतो की मी त्याच्या दृष्टीने त्याचे पिता त्यांची संतान आणि सर्व लोकांपेक्षा अधिक प्रिय होत नाही. (बुखारी किताबुल ईमान)**

## स्पष्टीकरण

पवित्र कुरआन मध्ये नमूद आहे :

اَلنَّبِيُّ اَوْلٰى بِالْمُؤْمِنِيْنَ مِنْ اَنْفُسِهِمْ (الاحزاب:٦)

''प्रेषित ईमान धारकांसाठी त्यांच्या आपल्या प्राणापेक्षा अधिक हक्क राखणारा आहे.'' (अहज़ाब -आयत क्र.६)

म्हणून प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना सर्वात जास्त प्रिय राखणे ही ईमानची निकड आहे. आणि त्याशिवाय ईमान विश्वासास पात्र नाही. हे प्रेम बैद्धिक आहे. आणि यांचा अर्थ असा आहे की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्यासाठी मनात खोलवर स्थान असावे. त्यांच्याशी केवळ नियम आहे म्हणून संबंध नसावा. उलटपक्षी मानसिक संबंध असावा. आणि ते असे की आपल्याला प्रिय असलेल्या सर्व व्यक्तीच्या तुलनेत ते वरचढ असावे. केवळ असाच माणून प्रेषितांवर आपले प्राण अर्पण करायला तयार असू शकतो. आणि प्रेषितांच्या ताबेदारीला प्राथमिकता देऊ शकतो.





# प्रेषितांचे आज्ञापालन

## हदीस

عَنِ الزُّهْرِيِّ اَخْبَرَنِىْ اَبُوْ سَلَمَةَ ابْنُ عَبْدِالرَّحْمٰنِ اَنَّهٗ سَمِعَ اَبَا هُرَيْـرَةَ رَضِىَ اللّٰهُ عَنْهُ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ مَنْ اَطَاعَنِىْ فَقَدْ اَطَاعَ اللّٰهَ وَمَنْ عَصَانِىْ فَقَدْ عَصَى اللّٰهَ وَمَنْ اَطَاعَ اَمِيْرِىْ فَقَدْ اَطَاعَنِىْ وَمَنْ عَصٰى اَمِيْرِىْ فَقَدْ عَصَانِىْ . (بخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**जोहरी म्हणतात की, मला अबू सलमा बिन अब्दुर्रहमान यानी खबर दिली की त्यांनी अबु हूरैरा (रजि.) यांना असे म्हणताना ऐकले की रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात--ज्याने माझे आज्ञापालन केले. त्याने अल्लाह चे आज्ञापालन केले. आणि ज्याने माझी अवज्ञा केली त्याने अल्लाहची अवज्ञा केली. आणि ज्याने माझ्या सरदाराची अवज्ञा केली त्याने माझी अवज्ञा केली.** (बुखारी -किताबुल अहकाम)

## स्पष्टीकरण

सर्वश्रेष्ट अल्लाहने स्वत:च्या आज्ञापालनाचे आदेशही दिले आहेत आणि आपल्या प्रेषितांच्या आज्ञापालनाचेही : اَطِيْعُوا اللّٰهَ وَ اَطِيْعُوا الرَّسُوْلَ (نساء:٥٩)

''अल्लाह चे आज्ञापालन करा आणि प्रेषितांचे आज्ञापालन करा.'' (सूरह निसा- आयत क्र.५९) कारण की प्रेषित जे काही आदेश देतो ते ईश्वरीय आदेशाच्या आधारावर देतो. आणि आपल्या इच्छेनुसार बोलत नसतो. म्हणून त्याचे आज्ञापालन हे अल्लाहच्या आज्ञापालनाच्या समानार्थी आहे. यामुळे ''सुन्नते रसूल'' (प्रेषिताच्या पद्धती) चे महत्व देखील स्पष्ट होते. आणि त्याच्या मार्गभ्रष्टतेबद्दल कोणतीही शंका राहात नाही; जे क़ुरआनलाच पुरे असल्याचे समजतात. आणि सुन्नतच्या आवश्यकतेची जाणीव ठेवत नाही. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, सुन्नत मुळेच क़ुरआनच्या आदेशाचा तपशील आणि ते अमलात आणण्याच्या पद्धतींचे ज्ञान प्राप्त होते. उदाहरणार्थ फर्ज़ नमाज़चे रकअती, ते अदा करण्याची पद्धत ज़कातचा दर वगैरे. या करिता सुन्नत चा इन्कार करणे म्हणजे प्रेषितांचा इन्कार करणे होय. आणि रसूलच्या आज्ञापालनांचा इन्कार म्हणजे अल्लाहच्या आज्ञापालनाचा इन्कार करणे होय.

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम जेव्हा एखादे शिष्टमंडळ किंवा तुकडी कोणत्या मोहिमेवर रवाना करत होते तेव्हा त्याचा सरदार ही नियुक्त करीत असत म्हणजे जेणे करून त्यांच्यात शिस्त क़ायम राहावी आणि जो पाऊलही उचलला जावा आपल्या सरदारच्या मार्गदर्शनाखालीच उचलला जावा. आणि त्यांच्यात एकजूट आणि ऐक्य टिकून राहावे.

# दरूद चा मोबदला

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ : اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ مَنْ صَلّٰی عَلَیَّ وَاحِدَةً، صَلَّی اللّٰهُ عَلَيْهِ عَشْرًا .** (مسلم کتاب الصلاۃ)

## अनुवाद

**हजरत अबू हुरैरा म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात जो माणूस माझ्या वर एकदा दरूद पाठवतो. अल्लाह त्याच्यावर दहा वेळा दरूद पाठवतो.** (मुस्लिम किताबुस-सलात)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम वर दरूद पाठवण्याचा अर्थ त्यांच्यासाठी कृपेची प्रार्थना किंवा दुआ करणे आहे. आणि अल्लाहच्या दासावर ‘‘सलात’’अर्थात दरूद पाठवण्याचा अर्थ त्यावर आपली कृपा अवतरविणे आहे. दरूद आपल्या संपूर्ण स्वरुपात ते आहे जे नमाज़ मध्ये ‘‘तशहहुद’’ नंतर पठण केले जाते ते असे.

**اَللّٰهُمَّ صَلِّ عَلٰی مُحَمَّدٍ کَمَا صَلَّيْتَ عَلٰی اِبْرَاهِيْمَ وَعَلٰی آلِ اِبْرَاهِيْمَ اِنَّکَ حَمِيْدٌ مَّجِيْدٌ. اَللّٰهُمَّ بَارِکْ عَلٰی مُحَمَّدٍ کَمَا بَارَکْتَ عَلٰی اِبْرَاهِيْمَ وَعَلٰی آلِ اِبْرَاهِيْمَ اِنَّکَ حَمِيْدٌ مَّجِيْدٌ.**

‘‘हे अल्लाह ! मुहम्मद  सल्लल्लाहु अलैहि वसल्लम वर कृपा कर, ज्या प्रमाणे तू इब्राहीम आणि इब्राहीमच्या संतान वर कृपा केली. नि:संशय तू स्तुतीस पात्र आहे आणि तू महान आहे. हे अल्लाह ! तू मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम वर समृद्धी प्रदान कर, ज्या प्रमाणे तू इब्राहीम आणि इब्राहीमच्या संतान वर समृद्धी प्रदान केली नि:संशय तू स्तुतीस पात्र आहे. आणि तू महान आहे.’’

आणि संक्षिप्त दरूद आहे की प्रेषितांच्या नावाचा वर्णन होत असेल तर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम (अल्लाह- प्रेषितांवर दरूद पाठव) आणि त्याच बरोबर सलामही पाठवावे. म्हणजे ‘‘वसल्लम’’ देखील म्हणावे.





या हदीस मध्ये जी सहीह मुस्लिम ची हदीस आहे. आणि जिचा दर्जा ‘‘सहीह’’ चा दर्जा आहे. एकदा दरूद पाठविण्याचा मोबदला दहा पटीने अधिक वर्णन केला गेला आहे. आणि क़ुरआनची ही आयत: **مَنْ جَآءَ بِالْحَسَنَةِ فَلَهٗ عَشْرُ اَمْثَالِهَا**.(انعام.١٦٠) ‘‘जो एक नेकी (पुण्य) घेऊन येईल त्याच्या करिता त्याच्या दहा पटीने (मोबदला) आहे.’’ (सूरह अनआम आयत: १६०)

पवित्र क़ुर्आनची ही आयत उपरोक्त हदीस प्रमाणेच आहे. परंतु हदीस च्या अविश्वस्नीय पुस्तकामध्ये दरूद च्या प्रतिष्ठेत घडवलेल्या खोट्या हदीसी देखील सामिल केल्या गेल्या आहेत. उदाहरण ही हदीस :-

**مَنْ صَلّٰی عَلَیَّ يَوْمَ الْجُمُعَةِ ثَمَانِيْنَ مَرَّةً غَفَرَ اللّٰهُ لَهٗ ذُنُوْبَ ثَمَانِيْنَ عَاماً .** (سلسلۃ الاحادیث الضعیفۃ والموضوعۃ للالبانی ج۱ ص۱۵۱)

‘‘शुक्रवार च्या दिवशी जो कोणी माझ्यावर ऐंशी वेळा दरूद पाठवील, अल्लाह त्याचे ऐंशी वर्षाच्या पापांना क्षमा करेल.’’

ही हदीस घडवणाऱ्या ने दरूद प्रतिष्ठेत अतिशयोक्तीची मर्यादा ओलांडली आहे. आणि प्रतिष्ठेच्या अशाच बिनबुडाच्या हदीसी आहेत, ज्यामुळे मुसलमान निष्क्रिय बनले गेले आहेत. परंतु खेदाने नमूद करावेसे वाटते की, उलेमामध्ये काही लोक असे आहेत; जे अशा हदीसींचे वर्णन करण्यात व्यस्त आहेत. आणि या गोष्टीला धर्माची सेवा आणि धर्मप्रचार समजत आहेत.

जो माणूस प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम वर जितके जास्त दरूद पाठवेल तेवढाच त्याच्यांशी श्रद्धा आणि प्रेमामध्ये वाढ होईल परंतु ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, दरूदला धर्माने जे स्थान दिले आहे, दरूदला त्याच स्थानावर ठेवले पाहिजे. आणि ईश-स्मरण जसे तसबीह, तहमीद, तकबीर, तहलील (ला इलाहा इल्लल्लाहु म्हणणे) ला जी प्राथमिकता आणि प्रतिष्ठा प्राप्त आहे. त्याला त्याच स्थानावर ठेवले पाहिजे अन्यत: त्यामुळे धर्माचे सामर्थ्य प्रभावित होईल, आणि त्यातील संतुलन देखील स्थिर राहू शकणार नाही. पवित्र क़ुरआन मध्ये दरूद पाठवण्याचा आदेश एके ठिकाणी देण्यात आलेला आहे. आणि तो म्हणजे सूरह ‘‘अहजाब ’’ मध्ये ........ आणि क़ुरआनचा आदेश जो एकच वेळा जरी दिला गेला असेल; तरी देखील त्याला फार महत्त्व प्राप्त आहे...... परंतु अल्लाह चे नामस्मरण तसबीह आणि तहमीद चे आदेश क़ुरआन मध्ये अनेक ठिकाणी दिले गेले आहे. आणि अल्लाह चे नाम स्मरण करण्याची ताकीद वारंवार केली गेली आहे. म्हणून अल्लाहच्या नाम स्मरणाने जीभ नेहमी ओली असली पाहिजे. जे लोकांना सुन्नत आणि बिदअत मधील फरकाची कल्पना नाही,ते वर्तुळाकाराने बसून लाख सव्वालाख वेळा दरूद वाचनाचे आयोजन करतात. परंतु दरूदसाठी अशा पद्धती च्या आयोजनाला शरीअत नुसार कोणताही पुरावा उपलब्ध नाही. आणि पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या सहाबांच्या आयुष्यांमध्ये यासंबंधी कोणत्याही खाणाखुणा दिसून येत नाहीत.

# प्रेषितांची अवज्ञा करणारे स्वर्गापासून वंचित

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ : كُلُّ اُمَّتِیْ یَدْخُلُوْنَ الْجَنَّةَ اِلَّا مَنْ اَبٰی قَالُوْا یَا رَسُوْلَ اللّٰهِ وَمَنْ یَّابٰی ؟ قَالَ مَنْ اَطَاعَنِیْ دَخَلَ الْجَنَّةَ وَمَنْ عَصَانِیْ فَقَدْ ا اَبٰی .** (البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**हजरत अबु हुरैरा (रजि.) म्हणतात की, रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात ''माझ्या उम्मत (लोक समूह) चे सर्व लोक स्वर्गात जातील, त्यांच्या शिवाय ज्यांनी इन्कार केला.''सहाबांनी विचारले.हे अल्लाह चे प्रेषिता ! इन्कार करणारे कोण? फर्मावले. ज्यानी माझे अज्ञापालन केले, तो स्वर्गात जाईल.आणि ज्याने माझी अवज्ञा केली त्याने माझा इन्कार केला. (अलबुखारी -किताबुल एअतिसाम)**

## स्पष्टीकरण

ही तंबी आहे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम कडून आपल्या उम्मतच्या त्या लोकांना जे त्यांचे अनुकरण करण्या ऐवजी त्यांची अवज्ञा करतात आणि या भ्रमात असतात की आम्ही प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या उम्मत मध्ये आहोत; म्हणून आम्ही निश्चितपणे स्वर्गात जाणार आहोत. परंतु कुरआन मध्ये वारंवार स्पष्टीकरण करण्यात आले आहे की, स्वर्गाला पात्र तेच लोक आहेत. जे ईमान चा स्वीकार करुन नंतर सत्कर्म करतात. आणि हे अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञापालना शिवाय शक्य नाही. कुरआन मध्ये हे देखील स्पष्ट केले आहे की:-

**بَلٰی مَنْ كَسَبَ سَیِّئَةً وَّ اَحَاطَتْ بِهٖ خَطِیْٓئَتُهٗ فَاُولٰٓئِكَ اَصْحَابُ النَّارِ هُمْ فِیْهَا خَالِدُوْنَ** (بقرہ : ٨١)

''का नाही? जो कोणी वाईट कर्म करुन येईल. आणि त्या अपराधानी त्याला घेरलेले असेल. तर असेच लोक नरकवासी आहेत. आणि नेहमी नेहमी तिथे राहतील.''





आज मुसलमान हे मोठया संख्येने निष्क्रियतेत व्यस्त आहेत. परंतु स्वत:ला मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या उम्मत मध्ये असल्याचे गर्व करतात. आणि समजतात की उम्मतशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या मुक्तीला एवेढेच कारण पुरे होईल-उपरोक्त हदीस अशा लोकांना चिंतन करण्याचे आमंत्रण देत आहे.

# खोटे पैगंबरीय वचनांचे वर्णन करण्याचा पाप

## हदीस

**قَالَ اَنَسٌ لَیَمْنَعُنِیْ اَنْ اُحَدِّثَكُمْ حَدِیْثاً كَثِیْرًا اَنَّ النَّبِیَّ ﷺ قَالَ مَنْ تُعَمَّدَ عَلَیَّ كَذِباً فَلْیَتَبَوَّأْ مَقْعَدَهٗ مِنَ النَّارِ.** (بخاری کتاب العلم)

## अनुवाद

**हज़रत अनस (रजि.) म्हणतात की मला बहुसंख्येने हदीस चे वर्णन करण्यापासून जी गोष्ट प्रावृत्त करते. ती प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम चे हे कथन आहे की ज्याने जाणून बुजून माझ्या संबंधी खोटे कथन केले (खोटी हदीस चे वर्णन) त्याने आपले स्थान नरकात बनवून घ्यावे. (अल-बुखारी, किताबुल इल्म)**

## स्पष्टीकरण

हजरत अनस हे हदीसीचे वर्णन करण्याच्या बाबतीत सावध राहात होते, जेणे करुन एखादी चुकीची गोष्ट प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या नावाने संदर्भित न व्हावी. विश्वसनीय कथनकारानी या संबंधी सावधगिरीचा अवलंब केला आहे. परंतु अनेकविध कथनकारानी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमकडे हदीसी संदर्भित करण्याच्या बाबतीत फारच निष्काळजीपणा दर्शविला आहे. ज्याचा परिणाम असा आहे की, किती तरी परस्पर विरुध्द हदीसी त्यांच्याकडे संदर्भित केल्या गेल्या आहेत. किती तरी हदीसी चे अर्थाप्रमाणे कथन झाल्याने कथनांच्या उद्देशांमध्ये फरक झालेला आहे. किती तरी कथनां मध्ये कथनकारांच्या विस्मृतीचा शिरकाव झाला आहे. किती तरी कथनांमध्ये हदीसचे वर्णन करतानां कथनकारानी स्वत:च्या मना प्रमाणे स्पष्टीकरण केले आहे,जे हदीसींचेच एक भाग बनले गेले आहे.

ज्याला हदीस च्या परिभाषेत ''मुदरज'' म्हटले जाते किती तरी हदीसी मध्ये ''तदलीस'' झाली आहे. म्हणजे कथनकाराने अशा कथनकाराचे नांव मध्येच गाळून टाकले आहे ज्याच्या कथनाचा स्वीकार करण्यात हदीसचे जाणकार टाळाटाळ करीत होते. आणि कितीतरी निराधार कथन चुकीच्या उद्देशांकरिता विश्वसनीय कथनकारांकडे जाणून बुजून संदर्भित केल्या गेल्या आहेत. नंतरच्या हदीस चे जाणकार उलेमा आणि धर्मशास्त्रज्ञांची दुर्बलता अशी राहिली आहे की, अशा कथनानां क़ुरआन आणि सिध्द असलेल्या सुन्नत च्या कसौटी वर पारखण्या ऐवजी कथन स्वीकृतिच्या बाबतीत अधिकाधिक विशालता दाखवीत राहिले. आणि निराधार पेक्षाही अधिक निराधार कथनाला प्रेषितांचे वचन सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत राहिले. परिणाम असा झाला की, सर्वसामान्य मुसलमान प्रत्येक हदीसला जी हदीसच्या कोणत्याही पुस्तकात लिहीली असेल मग ते पुस्तक खऱ्या खोटया गोष्टींचा संग्रह का असेना. अशा सर्व हदीसीना ते प्रेषितांचे वचनच समजत आहेत. आणि जर कोणी एखादा माणूस अशा एखाद्या हदीस ला पुराव्यानिशी रद्दबातल ठरवीत असेल तर ते असे समजतात की हा माणूस पैगंबरीय वचनांचा स्वीकारच करीत नाही आशा संशोधकां बद्दल हा एक मोठा गैरसमज आहे, जो सर्वसामान्य लोकांमध्ये अशा लोकांबद्दल निर्माण झालेला आहे.

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमचे असे म्हणणे की त्यांच्या बद्दल जाणून बुजून खोटे बोलणाऱ्याने आपला निवारा नरकात बनवून घ्यावा; हे त्या कथनकारांसाठी शिक्षेची धमकी आहे ज्यानी आपल्या मनाने हदीसी रचल्या. परंतु जे लोक अशा स्वनिर्मित हदीसींचा प्रचार व प्रसार करतात. ते देखील अत्यंत बेजबाबदारपणे वागत आहेत. हदीस च्या बाबतीत बेजबाबदारच्या वर्तणुकीने धर्माची शक्कलच बिघडून टाकली आहे. ईश्वर करो लोकानी हज़रत अनसच्या उपरोक्त हदीस पासून काही तरी बोध घ्यावेत.





# पैगंबरीय वचन पोहोचविणाऱ्या करिता खुष खबर

## हदीस

**عَنْ عَبْدُاللّٰهِ بْنِ مَسْعُوْدٍ قَالَ : سَمِعْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ : نَضَّرَ اللّٰهُ اِمْرَأً سَمِعَ مِنَّا شَيْأً فَبَلَّغَهٗ كَمَا سَمِعَهٗ فَرُبَّ مُبَلَّغٍ اَوْعیٰ مِنْ سَامِعٍ ..........هذا حديث حسن صحيح ـ** (الترمذی ابواب العلم)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) म्हणतात की, मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना असे फर्मावतानां ऐकले की अल्लाह त्या माणसाला टवटवीत ठेवो ज्याने आमच्या कडून कोणतीही गोष्ट ऐकली आणि ती जशी ऐकली होती तशीच (इतरांपर्यंत) पोहोचविली कित्येक लोक असेही असतील जे ऐकणाऱ्यापेक्षा जास्त ते सुरक्षित ठेवणारे आहेत. ही हदीस ''हसन सहीह''आहे.** (तिरमिजी-अबवाबुल इल्म)

## स्पष्टीकरण

प्रेषितांच्या या कथना मध्ये त्या माणसाला खुषखबर देण्यात आली आहे; जो प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या कडून हदीस ऐकून दुसऱ्या लोकापर्यंत जशीच्या तशी पोहोचवतो. त्याच बरोबर त्यानी या वास्तविकतेचेही वर्णन केले की, ज्यांच्या पर्यंत हदीस पोहोचवली जावी, त्यांच्यात असे लोकही असू शकतात जे ऐकणाऱ्यां पेक्षा जास्त त्यांना सुरक्षित ठेवणारे असावेत. म्हणजे हदीसच्या शब्दांना चांगल्या प्रकारे लक्षात ठेवावेत, आणि अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावेत. पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, जो सहाबी (प्रेषितांचे घनिष्ठ मित्र)त्यांच्या मैफिलीत हजर आहे, आणि त्याने प्रेषितांकडून कोणतीही गोष्ट ऐकावी, तर त्या गोष्टीला त्या लोकांपर्यंत पोहोचवावे, जे मैफिलीत हजर नाहीत. म्हणून त्यांचे जे सहाबी त्यांच्या कडून कोणतीही गोष्ट ऐकून घेत तर ते दुसऱ्या सहाबी पर्यंत तिला पोहोचवत. उदाहरणार्थ हज़रत इब्ने अब्बास जे वयाने लहान होते. किती तरी हदीसी दुसऱ्या सहाबी कडून ऐकून वर्णन केल्या

आहेत. आणि नंतर त्याच सहाबींनी दुसरे लोक ''ताबेईन'' व ''तबअ-ए-ताबअीन'' पर्यंत. (अर्थात ज्यानी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या निकटवर्ती लोकांना पाहिले होते व त्यांची भेट घेतली होती; असे अरब मनुष्य म्हणजे ताबेईन. व या ताबेईन लोकांना ज्यानी पाहिले त्यांना ''तबअ-ए-ताबेअीन'' अशी संज्ञा आहे) हदीस पोहोचविण्याची ही परंपरा चालत राहिली येथ पावेतो की हदीस ची पुस्तके ठोस पुराव्यानिशी संग्रहीत झालीत.

आता आमच्या जवळ हदीसीचा फार मोठा साठा हदीस च्या ग्रंथाच्या स्वरुपात उपलब्ध आहे.ज्यात सत्य हदीसी बरोबरच अप्रमाणित आणि खोटया हदीसी देखील सामिल झालेल्या आहेत. परंतु धर्मामध्ये अंतिम मान्यता केवळ खऱ्या हदीसीनाच आहे; म्हणजे केवळ त्याच हदीसी ज्या पुरावा आणि सनदांच्या दृष्टीकोनांतून 'सहीह' किवां 'हसन' असाव्यात आणि ज्यांचा विषय देखील क़ुरआन आणि सुन्नत च्या विरूद्ध नसावा.

अशा हदीसीच्या प्रचार व प्रसाराची अधिकाधिक व नितान्त आवश्यकता आहे. आणि जे लोक ही सेवा पार पाडतील त्यांच्या साठी ही खुषखबर आहे.

**اَلنَّبِىُّ اَوْلٰى بِا لْمُؤْمِنِيْنَ مِنْ اَنْفُسِهِمْ** (احزاب:٦)

**''अल्लाह च्या नबीशी संबंधामुळे ईमानधारकांवर त्यांच्या प्राणांपेक्षा जास्त हक्क पैगंबराचा आहे.''**

(सूरह अहजाब, आयत क्र. ६)





# पैगंबरीय परंपरेला घट्ट धरून ठेवणे.

## हदीस

**عَنِ الْعِرْبَاضِ بْنِ سَارِيَةَ قَالَ : وَعَظَنَا رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَوماً بَعْدَ صَلَاةِ الْغَدَاةِ مَوْعِظَةً بَلِيْغَةً ذَرَفَتْ مِنْهَا الْعُيُوْنُ وَوَجِلَتْ مِنْهَا الْقُلُوْبُ فَقَالَ رَجُلٌ اِنَّ هٰذِهٖ مَوْعِظَةُ مَوَدِّعٍ فِبِمَاذَا تَعْهَدُ اِلَيْنَا يَا رَسُوْلَ اللّٰهِ ؟ قَالَ : اُوْصِيْكُمْ بِتَقْوَى اللّٰهِ ، وَالسَّمْعِ وَالطَّاعَةِ وَاِنْ عَبْدٌ حَبَشِيٍّ فَاِنَّهٗ مَنْ يَّعِشْ مِنْكُمْ يَرَ اخْتِلَافاً كَثِيْرًا، وَاِيَّاكُمْ وَمُحْدَثَاتِ الْاُمُوْرِ، فَاِنَّهَا ضَلَالَةٌ فَمَنْ اَدْرَكَ ذٰلِكَ مِنْكُمْ فَعَلَيْهِ بِسُنَّتِىْ وَسُنَّةِ الْخُلَفَاءِ الرَّاشِدِيْنَ الْمَهْدِيِّيْنَ. عَضُّوْا عَلَيْهَا بِالنَّوَاجِذِ ............... هٰذَا حَدِيْثٌ حَسَنٌ صَحِيْحٌ.** (الترمذی ابواب العلم)

## अनुवाद

**हजरत अरबाज बिन सारिया म्हणतात की एके दिवशी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फजर च्या नमाज़ नंतर आम्हाला ऱ्हदयस्पर्शी प्रवचन दिले, जे ऐकून आमचे डोळे पाणावले; आणि मनं हेलावली. एक माणूस म्हणाला हे निरोप घेणाऱ्याचे प्रवचन आहे तर हे अल्लाहचे प्रेषिता तुम्ही आम्हाला कोणत्या गोष्टीची ताकीद करता? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले मी तुम्हाला अल्लाहचे भय बाळगण्याची आणि ऐकून आज्ञा पालनाची ताकीद करीत आहे. मग तुमच्यावर राज्यकर्ता एक निग्रो गुलाम का असेना कारण तुमच्या पैकी जे जिवंत राहतील ते बहुसंख्येने आपसातील मतभेद पाहतील. त्यावेळी तुम्ही धर्मात समाविष्ठ झालेल्या त्या नवीन गोष्टीपासून सावध राहा. कारण त्या मार्गभ्रष्टता आहेत. तर तुमच्या पैकी जो कोण अशा स्थितीनां सामोरे जाईल, त्याच्या साठी आवश्यक आहे की त्याने माझ्या परंपरेला आणि आज्ञाधारक ''खुलफा-ए-राशिदीन''(पैगंबरा नंतर चे चार खलीफा) च्या परंपरेला घट्ट धरून ठेवावा ही हदीस ''हसन सहीह '' आहे.**

(तिरमिज़ी-अबवाबुल ईल्म)

# स्पष्टीकरण

या हदीस मध्ये संकेत आहेत, त्या उपद्रवा कडे जे जवळ च्या भविष्य काळात उठणार होते. म्हणून हजरत अबू बकर (रजि.) च्या खिलाफ़त मध्ये ज़कात चे इन्कार करणाऱ्यानी उपद्रव माजविले. हजरत उस्मान (रजि.) च्या खिलाफ़त मध्ये सबाई उपद्रव माजले. हज़रत अली (रजि.) च्या खिलाफत मध्ये खवारिज चा उपद्रव माजला; त्यानंतर कदरिया आणि जबरिया चे उपद्रव माजले. आणि सर्वात मोठा उपद्रव शिआ लोकांनी माजविला.ज्यात उम्मत मधील मोठया संख्येने लोक समाविष्ठ झाले. आणि जे आजही एका मोठया लोक समूहाच्या स्वरुपात अस्तित्वात आहेत. या उपद्रवांमध्ये ज्या गोष्टीपासून सावध राहण्याची ताकीद पैगंबरानी केली आहे, ती त्या नव्या गोष्टी आहेत; ज्या धर्मामध्ये निर्माण करुन दिल्या जातील.आणि ज्या गोष्टीवर घट्ट पणे क़ायम राहण्याची ताकीद करण्यात आली आहे, ती सुन्नत म्हणजे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांची परंपरा आहे. आणि त्याच बरोबर ''खुलफा-ए-राशिदीन'' च्या परंपरा देखील घट्ट धरुन ठेवण्याचे उपदेश पैगंबरानी केले आहेत. ज्या खलीफांच्या परंपरेचे पालन करण्याचा उपदेश त्यानी केले, त्याचे दोन गुण वर्णिले आहेत. एक हे की, ते राशिद असतील, म्हणजे सन्मानाने चालणारे व धर्मभिरू असतील. भावनानां बळी पडून मध्य मार्गाचा त्याग करणारे नसतील. त्यांचा दुसरा गुण असा आहे की ते श्रद्धा आणि ईमान च्या दृष्टीकोनातून सन्मार्ग ग्रहण केलेले असतील. ते आपल्या श्रद्धा आणि ईमान मध्ये कोणतीही नवीन गोष्ट निर्माण करणार नाहीत. उलटपक्षी त्या उपदेशांवर कायम राहतील; ज्यांचे वर्णन क़ुरआन मध्ये अगदी स्पष्टपणे करण्यात आले आहे. ही गुण वैशिष्ठये चारही खलीफा च्या अंगी अगदी स्पष्ट पणे जाहीर होत्या. म्हणून ते उम्मतकरिता मार्गदर्शनाचे ईमाम म्हणून ओळखले गेले. त्यांचे मार्गदर्शन त्या नवनवीन समस्यांमध्ये होते; जे अगदी उमटून समोर उभे राहिले होते. आणि लोकांसाठी उपद्रवाचे कारण बनले होते. उदाहरणार्थ जकात चे इन्कार करणाऱ्यांचा उपद्रव सबाई उपद्रव खवारिज चा उपद्रव कादरिया आणि जबरियांचा उपद्रव, वगैरे दुसरी गोष्ट अशी की इस्लामने राजकारण आणि शासनच्या संबंधी जे नियामक आदेश दिले होते; त्या आदेशानां परिस्थितीनुसार लागू करणे आणि त्यानुसार सामूहिक आराखडा तयार करण्याचे मुख्य कर्तव्य ''खुलफा-ए-राशिदीन'' च्या हस्ते पार पाडले जावयाचे होते; जेणे करुन इस्लाम च्या राजकारणाचा उत्कृष्ट नमूना लोकांसमोर येऊ शकावा. या अर्थाने ''खुलफा-ए-राशीदीन'' च्या परंपरेचा अवलंब करण्याकडे मार्गदर्शन करण्यात आले आहे. अन्यत: खुलफा-ए-राशिदीन ची परंपरा प्रेषितांच्या सुन्नत पेक्षा काही वेगळी अशी परंपरा नव्हे, ज्याची अनुकरण करण्याचे मार्गदर्शन देण्यात आलेले असावे. क़ुरआन ने स्पष्टपणे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालनाचेच आदेश दिलेले आहेत; म्हणजे मतभेदाच्या वेळी मार्गदर्शक क़ुरआन आणि प्रेषितांच्या परंपरेलाच बनवण्यात यावे आणि या पासून खुलफा-ए-राशिदीन ला देखील सूट देण्यात आली नाही. आणि कोणताही माणूस देखील त्यांच्या





कोणत्याही पुराव्याची मागणी करण्यास पात्र आहे. आणि सन्माननीय सहाबा मध्ये खुलफा-ए-राशिदीन च्या विचारांशी मतभेद करणारे लोक होते. म्हणून खुलफा-ए-राशिदीन च्या परंपरेचा अवलंब करण्याचा जो आदेश हदीस मध्ये दिला गेला आहे; त्यास त्या प्रसंगानुसारच समजले पाहिजे.

क़ुरआनात बनी इस्राईल (ज्यू) संबंधी नमूद आहे :

وَجَعَلْنَا مِنْهُمْ اَئِمَّةً يَّهْدُوْنَ بِاَمْرِنَا لَمَّا صَبَرُوْا
وَكَانُوْا بِاٰيٰتِنَا يُوْقِنُوْنَ. (السجدہ-٢٤)

''आणि आम्ही त्यांच्यात पेशवा आणि सरदार निर्माण केले जे आमच्या आज्ञा (धर्म) प्रमाणे मार्गदर्शन करीत होते, जेव्हा की त्यांनी संयम पाळले आणि आमच्या आयतींवर विश्वास ठेवत होते.'' (सूरह सजदा आयत क्र. २४)

बनी इसराईल चे सरदार आणि नेते अल्लाहच्या धर्माप्रमाणे मार्गदर्शन करीत होते. त्याच अर्थाने खुलफा-ए-राशिदीन यांचे मार्गदर्शन आहे.

हे देखील येथे लक्षात असू द्यावे की, खुलफा-ए-राशिदीन हे आपसातील सल्ल्याने एकमताने निवडण्यात आले होते. ज्यामुळे शिआ लोकांच्या या दाव्याचे खंडन होते ज्यानुसार त्यांचे असे म्हणणे आहे की खिलाफत वर हज़रत अली (रजि.) आणि त्यांच्या वंशाचा हक्क आहे. हज़रत अली चे त्यांच्या पूर्वीच्या खुलफा-ए-राशीदीन च्या खिलाफत चा स्वीकार करणे या घटने मुळे शिआ संप्रदायाचे आपोआप खंडन होते. आणि वास्तविकता ही आहे की, क़ुरआन आणि सुन्नत चा कोणताही पुरावा, शिआंच्या दाव्याच्या समर्थनार्थ उपलब्ध नाही. या उलट शिआ लोकानी हदीसींचे चुकीचे अर्थ लावले आहेत.

धर्म
काय
आहे?





# ईमान आणि इस्लामची वास्तविकता

## हदीस

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ كَانَ النَّبِىُّ ﷺ بَارِزًا يَّوْماً لِلنَّاسِ فَاَتَاهُ رَجُلٌ فَقَالَ مَا الْاِيْمَانُ قَالَ الْاِيْمَانُ اَنْ تُؤْمِنَ بِاللّٰهِ وَمَلٰٓئِكَتِهٖ وَبِلِقَآئِهٖ وَ رُسُلِهٖ وَتُؤْمِنَ بِالْبَعْثِ قَالَ مَا الْاِسْلَامُ قَالَ الْاِسْلَامُ اَنْ تَعْبُدَ اللّٰهَ وَّلَا تُشْرِكَ بِهٖ وَ تُقِيْمَ الصَّلٰوةَ وَ تُؤَدِّىَ الزَّكٰوةَ الْمَفْرُوْضَةَ وَ تَصُوْمَ رَمَضَانَ قَالَ مَا الْاِحْسَانُ قَالَ اَنْ تَعْبُدَاللّٰهَ كَاَنَّكَ تَرَاهُ فَاِنْ لَّمْ تَكُنْ تَرَاهُ فَاِنَّهٗ يَرَاكَ قَالَ مَتَى السَّاعَةُ قَالَ مَا الْمَسْئُوْلُ بِاَعْلَمَ مِنَ السَّآئِلَ وَ سَاُخْبِرُكَ عَنْ اَشْرَاطِهَا اِذَا وَلَدَتِ الْاَمَةُ رَبَّهَا وَاِذَا تَطَاوَلَ رُعَاةُ الْاِبِلِ الْبُهْمِ فِى الْبُنْيَانِ . فِىْ خَمْسٍ لَّا يَعْلَمُهُنَّ اِلَّا اللّٰهُ ثُمَّ تَلَا النَّبِىُّ ﷺ اِنَّ اللّٰهَ عِنْدَهٗ عِلْمُ السَّاعَةِ اَلْاٰيَةُ ثُمَّ اَدْبَرَ فَقَالَ رُدُّوْهُ فَلَمْ يَرَوْا شَيْئًا فَقَالَ هٰذَا جِبْرِيْلُ جَآءَ يُعَلِّمُ النَّاسَ دِيْنَهُمْ . (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

हजरत अबू हुरैरा (रजि.) म्हणतात की,प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम एके दिवशी लोकाकडे आले. त्या वेळी जिब्रील (फरिश्ता अर्थात देवदूत) हे देखील मानवी रूप धारण करुन आले. आणि प्रश्न केला की ईमान काय आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम म्हणाले ईमान हे आहे तुम्ही अल्लाह मलाईका (फरिश्ते) अल्लाहशी भेट (कियामती चा दिवस) त्याच्या प्रेषितांवर आणि मरणानंतर परत उठवले (जिवंत केले जाणे) जाण्यावर ईमान आणावे. विचारले इस्लाम काय आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम म्हणाले. इस्लाम हा आहे की तुम्ही अल्लाहची भक्ती करावी आणि त्याचा कोणी भागीदार ठरवू नये. नमाज़ कायम करावे (पठण करावे), अनिवार्य ज़कात अदा करावी आणि रमज़ान चे रोज़े पाळावे त्याने विचारले एहसान (भक्ती चे सौदंर्य) काय आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि

**वसल्लम म्हणाले अल्लाह ची भक्ती अशा पद्धतीने करावी जणू तुम्ही त्याला पाहात आहात कारण जर तुम्ही त्याला पाहात नाही तर तो तर तुम्हाला पाहातच आहे. जिब्रील ने विचारले क़ियामत (अंतिम न्याय दिवस) केव्हा येणार आहे? प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम म्हणाले या संदर्भात ज्याला प्रश्न केला गेला आहे तो प्रश्न करणाऱ्या पेक्षा जास्त जाणीत नाही. परंतु तुम्हाला मी तिच्या निशाण्याची जाणीव करुन देत आहे. जेव्हा दासी आपल्या मालका ला जन्म देईल. आणि जेव्हा अडाणी उंट चारणारे उंच उंच इमारती बांधून त्यावर गर्व करू लागतील. क़ियामतीचे ज्ञान त्या पांच गोष्टीपैकी एक आहे ज्याना अल्लाह शिवाय कोणीही जाणीत नाही. त्यानंतर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी आयत**

**اِنَّ اللّٰہَ عِنْدَہٗ عِلْمُ السَّاعَۃِ (لقمان:٣٤)**

**(सूरह-लुकमान, अंतिम आयत) चे वाचन केले. जिब्रील निघून गेल्यानंतर प्रेषितानी सहाबानां सांगितले त्यांना परत बोलवा परंतु ते त्याना पाहू शकले नाही. प्रेषितानी सांगितले. हे जिब्रील होते. जे लोकांना त्यांचा धर्म शिकवण्या साठी आले होते. (बुखारी-किताबुल ईमान)**

## स्पष्टीकरण

ही हदीस अत्यंत महत्त्वाची आहे. कारण यात जिब्रील अलैहिस्सलाम आणि प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या संभाषणाचे वर्णन आहे. थोडक्यात येथे काही गोष्टींचे वर्णन करण्यात येत आहे; जेणे करुन त्यांचा अर्थ चांगल्या प्रकारे समजून घेण्यात यावा.

हज़रत जिब्रील हे मानवी रुपामध्ये प्रकटले होते. त्यांना प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी ओळखले हेते. परंतु मैफिलीतील उपस्थितांना हे त्या वेळी कळले जेव्हा ते निघून गेले होते, आणि प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी त्यावेळी त्यांना त्या बद्दल सांगितले. त्यांची उपस्थिती या उद्देशा साठी झाली होती की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या तोडून मैफिलीतील उपस्थितानां आणि त्यांच्या मध्यस्थीने नंतर येणाऱ्या लोकानां ईमान आणि इस्लामची वास्तविकता स्पष्ट व्हावी आणि जिब्रीलनी त्याचे समर्थन करावे.

ईमान ची वास्ताविकता प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी ही फर्मावली की, अल्लाह, फरिश्ते, अल्लाहशी भेट त्याचे प्रेषित आणि मृत्यूपश्चात उठवले जाण्यावर ईमान आणला जावा. यामुळे हे स्पष्ट आहे की, प्रश्न ईमानच्या व्याख्येसंबंधी (Defination) नव्हता; तर तो या संबंधी होता की, ईमान किती बाबींवर हवे आहे; ज्यामुळे ईमान ची





वास्तविकता आपोआप स्पष्ट होते. यामध्ये थोडक्यात त्या गोष्टी वर्णिल्या गेल्या आहेत. ज्यांच्यावर श्रद्धा ठेवल्याशिवाय ईमानची कल्पनाच केली जाऊ शकत नाही; आणि जे ईमान चे अत्यंत प्रमुख शीर्षक आहेत. अल्लाह च्या ग्रंथांवर ईमान आणण्याचे वर्णन स्वतंत्रपणे केले नाही. परंतु ही बाब प्रेषितांवर ईमान आणण्याच्या गोष्टीत सामील आहे.

इस्लाम ची वास्तविकता देखील प्रेषितांनी प्राथमिक गोष्टीचे वर्णन करुन सांगितली आहे; म्हणजे एकमेव अल्लाहची भक्ती कोणालाही त्याचा भागीदार न ठरवता केली जावी. नमाज़, ज़कात आणि रमज़ानचे रोज़े व हज्जचे वर्णन या हदीस मध्ये नाही. परंतु सहीह मुस्लिमच्या हदीसमध्ये आहे. येथे हे लक्षात असू द्यायला हवे की जेव्हां ईमान आणि इस्लाम चे सामूहिकपणे वर्णन केले जाते तर ईमान चा अर्थ श्रद्धा असतो आणि इस्लामशी भक्ती व आज्ञापालन हा अर्थ अभिप्रेत असतो.

उपकार चा अर्थ येथे त्या उपकार चे नाही जे कोणा एखाद्या व्यक्तीवर केले जाते. तर एखादे काम उत्तम प्रकारे पूर्ण करणे आणि एखादे कर्तव्य सुस्थितपणे पार पाडणे असा आहे. एखादे काम करावयाचे आहे म्हणूनही केले जाऊ शकते. परंतु जर तेच काम मन लावून उत्तमोत्तम पद्धतीने पार पाडले जावे तर त्यात सुंदरता निर्माण होते. प्रार्थनेत हे सौंदर्य त्याच वेळी निर्माण होऊ शकते जेव्हा ते अल्लाहकडे लक्ष केंद्रित करुन केली जावी जणू तो अल्लाहला पाहात आहे. मनाची अशी कैफियत असेल तर इबादत किंवा प्रार्थनेत नम्रता व शालीनता उत्पन्न होते. अशी कैफियत निर्माण करण्याकरीता अल्लाहचे हे गुणधर्म लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे की, अल्लाह तर सर्वच स्थितीत त्याला पाहात आहे.

या प्रश्नाचे उत्तर हे की, कियामत कधी येईल, त्यांनी असे दिले की या संदर्भात त्यांचे ज्ञान जिब्रील पेक्षा जास्त नाही. याचा अर्थ असा आहे की याचे ज्ञान कोणालाही नाही. या संबंधी त्यानी सूरह लुकमान च्या अंतिम आयतीचे पठण केले. ज्यात पाच गोष्टींचे ज्ञान अल्लाहलाच विशेष करुन असल्याचे वर्णन आहे. या पाच गोष्टींपैकी एक क़ियामत उद्भवण्याचे ज्ञान आहे. परंतु क़ियामत जवळ आल्यानंतर प्रकट होणाऱ्या दोन खुणा चे वर्णन त्यानी केले. एक तर हे की दासी आपल्या मालकाला जन्म देईल. कदाचित या खुणेचा शब्दः अर्थ लावण्यात आलेला नाही तर रूपक म्हणून त्या स्थितीत उदभवणाऱ्या या घटनेकडे संकेत गेले आहे. याचा अर्थ असा आहे की संतान अशी निष्क्रिय व नालायक जन्माला येईल जी आपल्या मातेला आज्ञा करेल, आणि तिला एखाद्या दासीप्रमाणे वागवेल आधुनिक युगात ही गोष्ट अनुभवाला येत आहे की मुलं आपल्या माता पित्याशी अत्यंत वाईटपणा ने वागत आहेत. येथपावेतो की आपल्या मातापित्यांना शिव्याही देतात, आणि त्याना मारझोडही करतात.

दुसरी निशाणी अशी सांगितली की उंट चारणारे अडाणी लोक उंच उंच इमारती बांधून एकमेकांवर गर्व करतील. प्रेषितांचा हा इशारा अरब जगतात उत्पन्न होणाऱ्या अफाट संपत्ती कडे होता; ज्याचा अनुभव आपण आधुनिक युगात घेत आहोत. अरब चे ''बद्दू'' (खेडूत) अडाणी होते, आणि उंट त्यांच्या जीवनाचा आश्रय होते. त्यांचे दारिद्रय पाहून ही कल्पना

केली जाऊ शकत नव्हती की एक वेळ येईल जेव्हा हे संपत्तीने मालामाल होतील. आणि साध्या घरात राहणारे हे लोक आलीशान इमारतींमध्ये राहू लागतील. परंतु त्यांची कायापालट झाली. अरब भूमिवर तेलाचे असे प्रचंड साठे सापडले की एकाएकी अचानकपणे त्यांची दुनियाच बदलली. अफाट धनसंपत्ती ने त्यांना शिष्टाचारी बनवले. आता ते अडाणी राहिले नाही; तर सुशिक्षित आणि सुसंस्कृत बनवले, आणि आलीशान इमारती बनवून त्यात राहू लागले; आणि त्यावर गर्व करू लागले. म्हणजे जेव्हा त्यानी प्रगती केली तेवढे ते पैश्याची उधळपट्टी करू लागले हदीस मध्ये ही बाब दृष्टी समोर ठेवून त्यांची निंदा केली गेली आहे. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांची ही भविष्यवाणी तंतोतंत पूर्ण झाली, जी त्यांच्या प्रेषित्वाचा उघड पुरावा आहे.

अन्यत: त्या काळात कोण म्हणू शकत होता की, आधुनिक युगात बारा तेरा शतकं पालटल्यानंतर अशी क्रान्ती घडून येईल. हदीस मध्ये या क्रान्तीस कियामतची निशाणी म्हणून संबोधले गेले आहे. ज्यामुळे हे सिद्ध होते की, कियामती ची घटना अगदी जवळ येऊन ठेपली आहे.

# मनाची सचोटी

## हदीस

عَنْ تَمِيْمِ الدَّارِيِّ اَنَّ النَّبِيِّ صلى الله عليه وسلم قَالَ : الدِّيْنُ النَّصِيْحَةُ قُلْنَا: لِمَنْ ؟
قَالَ لِلّٰهِ وَ لِكِتَابِهٖ وَلِرَسُوْلِهٖ وَلِاَئِمَّةِ الْمُسْلِمِيْنَ وَ عَامَّتِهِمْ. (مسلم كتاب الايمان)

## अनुवाद

**हज़रत तमीम दारी कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-धर्म हे पूर्णत: मना ची सचोटी आहे. आम्ही विचारले कोणा करिता? त्यांनी फर्मावले. अल्लाहसाठी त्याच्या ग्रंथासाठी, त्याच्या प्रेषितासाठी, मुसलमानांचे शासक आणि सर्वसामान्य मुसलमानांसाठी.**

(मुस्लिम-किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

इस्लाम हा केवळ दिखाऊपणा आणि नियमांच्या रिकाम्या जागा भरुन टाकण्याचे नाव नाही. आणि ना ही ते एखादे रिती रिवाजाचा धर्म आहे. तर त्याचा संबंध मानवाच्या अंत:करणाशी आणि आंतरिक कैफियतीशी आहे. धर्म आणि मनाची सचोटी हे दोन्ही





परस्परावलंबी आहेत. अशी धार्मिकता ज्यात मनाची सचोटी नाही, निरर्थक आहे.

हदीस मध्ये धर्माला ''अन-नसीह:'' म्हणून संबोधले आहे. आणि ''अन-नसीह:'' या अरबी शब्दाचा अर्थ मनाची सचोटी, शुभेच्छा, आणि एक निष्ठता असा आहे. मग ही मनाची सचोटी कशी असायला हवी याचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे; प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-मनाची सचोटी अल्लाहसाठी, याचा अर्थ असा की माणसाने अल्लाह वर निर्भेळपणे ईमान राखावे तो दांभिकते पासून पाक असावा. आणि अल्लाह च्या एकेश्वरत्वाला त्याच्या खऱ्या कल्पनेबरोबर मनापासून स्वीकार करावा. शिवाय त्याने अल्लाह ला सर्वांपेक्षा प्रिय समजावे. आणि अल्लाहशी एकनिष्ठ राहावे.

मनाची सचोटी अल्लाहच्या ग्रंथासाठी. याचा अर्थ असा आहे की, क़ुरआन हे अल्लाह कडून अवतरले आहे. यावर त्याचा विश्वास असावा. ते वाचनाची त्याच्या मनात गोडी असावी; ते समजण्याचा त्याने प्रयत्न करावा आणि क़ुरआन च्या मार्गदर्शना ने आपल्या प्रात्याक्षिक जीवनात स्वीकार करावा, मनाची सचोटी त्याच्या प्रेषितासाठी-याचा अर्थ असा आहे की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या प्रेषित्वावर त्याची पूर्ण श्रद्धा असावी त्यांना सर्व मानवजाती पेक्षा जास्त प्रिय समजावे. मनाच्या तयारी ने त्यांच्या आदेशांचे पालन करावे. आणि त्यांच्या ''सुन्नत'' (पैगंबरीय परंपरा) विरुद्ध कोणतेही कर्म करु नये. सूरह तौबा मध्ये म्हटले आहे.

اِذَا نَصَحُوْا لِلّٰهِ وَ رَسُوْلِهٖ (سورہ توبہ:٩١)

''असेच लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराचे हितचिंतक एकनिष्ठ (वफादार) असतील.'' (आयत क्र. ९१)

मनाची सचोटी मुसलमानाच्या शासकांसाठी याचा अर्थ असा आहे की त्यांच्या साठी सदिच्छा बाळगण्यात यावी. शरीअत चे कायदे लागू करणे धर्मवर्चस्वाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचे सहाय्य केले जावे. जर त्यांनी धर्म, विरोधी गोष्टींचा अवलंब केला तर त्यांना त्यापासून लांब राहण्याचा उपदेश केला जावा. आणि त्याच्यांत सुधारणा घडवून आणण्याचे शक्य तेवढे प्रयत्न केले जावे. जो पर्यंत ते मोठया बिघाडास कारणीभूत होत नाहीत आणि त्यांच्या जागी चांगले शासक आणले जाऊ शकत असावे तो पर्यंत त्यांच्या विरोधात बंड पुकारू नये. मुसलमानाच्या राज्यात अशी क्रांती घडवण्याचा प्रयत्न करावा ज्याचा परिणाम रक्तपाताशिवाय दुसरं काही ही होऊ शकत नाही, शरीअत मध्ये निषिद्ध आहे.

मनाची सचोटी सर्वसामान्य मुसलमानासाठी याचा अर्थ असा आहे की आम मुसलमानांबद्दल सदिच्छ बाळगावी. त्यांच्या सुधारणे चे कार्य पूर्ण सहानुभूतिने केले जावे. स्वार्थी बनून आणि आपले नेतृत्व गाजविण्यासाठी त्यांचे हित व त्यांचे कल्याणाचे बळी घेऊ नये. त्यांच्या यातना दूर करण्याचा प्रयत्न केला जावा. आणि त्यांच्या शत्रूंचा मुकाबला त्यांच्या बरोबर राहून केला जावा.

# धर्म सोपे आहे त्यास कठिण बनवू नये.

## हदीस

**عَنۡ اَبِیۡ هُرَيۡرَةَ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ اِنَّ الدِّيۡنَ يُسۡرٌوَّ لَنۡ يُّشَادَّ الدِّيۡنَ اَحَدٌ اِلَّا غَلَبَهٗ فَسَدِّدُوۡا وَقَارِبُوۡا وَ اَبۡشِرُوۡا وَاسۡتَعِيۡنُوۡا بِالۡغُدۡوَةِ وَالرَّوۡحَةِ وَ شَیۡءٌ مِّنَ الدُّلۡجَةِ.** (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-धर्म सोपे आहे आणि जो कोणीही त्यास कठिण बनवेल तो प्रभावशाली होईल. म्हणून चांगली (योग्य) पद्धत आणि मधल्या मार्गाचा अवलंब करा. आणि प्रसन्न व्हा. आणि सहाय्यता प्राप्त करा सकाळ व संध्याकाळच्या प्रार्थनेने. आणि रात्रीच्या अंतिम प्रहरी काही वेळ प्रार्थनेत घालवा. (बुखारी- किताबुल ईमान)**

## स्पष्टीकरण

कुरआन आणि हदीस मध्ये इस्लाम ज्या स्वरुपात सादर करण्यात आले आहे; ते सोपे आहे; म्हणून त्याचे आदेश सोपे आहेत. आणि पूर्वीच्या उम्मत (लोकसमूह) वर ज्या प्रमाणे ओझे टाकण्यात आले तसे ते तुमच्यावर टाकण्यात आले नाही, उदा. यहुदी (ज्यू लोक) यांच्या वर त्यानी केलल्या अवज्ञांच्या बदल्यात ''सब्त'' (शनिवार) चे कडक आदेश देण्यात आले होते. परंतु मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या उम्मतसाठी शुक्रवारच्या नमाज़चा सोपा आदेश दिला गेला. त्याच प्रमाणे इस्लाम मध्ये सवलतीही दिल्या गेल्या आहेत; जेणे करुन कोणीही गैरवाजवी कष्टात पडू नये. आता जो कोणी या सोप्या धर्माला कठिण बनवेल तर धर्म प्रभावशाली होणार नाही उलट तो स्वत: प्रभावित होईल. म्हणजे ज्या अडचणी त्याने निर्माण केल्या आहेत. त्या तो सोसू शकणार नाही, म्हणून हदीस मध्ये





मार्गदर्शन केले गेले आहे की योग्य पद्धतीचा अवलंब करा म्हणजे धर्मावर चालण्याच्या त्या पद्धतीचा अवलंब करा जी योग्य व दुरुस्त असावी त्यात आपल्यातर्फे कोणतीही कठीण बाब निर्माण करु नका. उदाहरणार्थ असे की माणूस कोणत्याही एका ''मसलक'' (पद्धत) लाच धरुन त्यावरच वचनबद्ध असावा. आणि दुसऱ्या एखाद्या ''फिकही मसलक'' (इस्लामी धर्मशास्त्रीय पद्धत) किंवा दुसऱ्या उलेमाच्या गोष्टी ज्या त्याच्या ''फिकही मसलक'' प्रमाणे नाहीत, त्यांचा त्याने स्वीकारच करु नये. स्पष्ट आहे की ही अट घालून ''मुकल्लिदीन'' (कोणत्याही एका विशिष्ठ धर्म शास्त्राचे कट्टरतेने पालन करणारे) यानी इस्लामला कठीण बनवून टाकले आहे. आणि सोपा व सवलतीचा मार्ग बंद करुन टाकला आहे.

हदीस मध्ये दुसरे मार्गदर्शन असे केले गेले आहे की धर्माच्या बाबतीत मघल्या मार्गाचा अवलंब करा. म्हणजे न्यायावर कार्यान्वित राहा.

धर्माच्या सोप्या मार्गाचा अवलंब करुन तुम्ही कोणत्याही संकटात सापडणार नाही. म्हणून प्रसन्न व्हा की अल्लाह ने तुमच्या करिता कशा कशा पद्धतीच्या सवलती दिलेल्या आहेत.

हदीस च्या शेवटी सूचना दिली गेली आहे की सकाळ संध्याकाळच्या प्रार्थना करुन सहाय्यता मिळवा. आणि रात्रीच्या अंतिम प्रहरी काही वेळ प्रार्थनेत घालवा. सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशा प्रार्थनेचे आदेश दिलेले नाहीत की तुम्ही कष्टात सापडावे आणि तुम्हाला तुमचे जीवन व्यतीत करणे कठिण व्हावे.

---

**يُرِيۡدُاللّٰهُ بِكُمُ الۡيُسۡرَ وَلَا يُرِيۡدُ بِكُمُ الۡعُسۡرَ**

(سورہ بقرہ : ۱۸۵)

अर्थात :- **अल्लाह तुमच्या करिता सवलती इच्छितो सक्ती इच्छित नाही.** (सूरह - बकरा आयत . १८५)

# लोकासाठी सहजसुलभता निर्माण करणे

## हदीस

عَنْ سَعِيْدِ ابْنِ اَبِىْ بُرْدَةَ قَالَ سَمِعْتُ اَبِىْ قَالَ بَعَثَ النَّبِىُّ ﷺ اَبِىْ وَمُعَاذَ بْنَ جَبَلٍ اِلَى الْيَمَنِ فَقَالَ : يَسِّرَا وَلَا تُعَسِّرَا وَ بَشِّرَا وَلَا تُنَفِّرَا وَ تَطَاوَعَا.

(البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**सईद बिन अबी बुरदा म्हणतात की, मी माझ्या वडीलांना कथन करतांना ऐकले की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी माझे वडील (अबू मूसा) आणि मुआज बिन जबल यांना येमेनला पाठवताना फर्मावले सहजसुलभता निर्माण करा. अडचण निर्माण करु नका शुभवार्ता सांगा. तिरस्कार निर्माण करु नका. आणि दोघानी आपसात ऐक्य निर्माण करा.** (बुखारी-किताबुल अहकाम)

## स्पष्टीकरण

हे एक अत्यंत महत्त्वाचे उपदेश आहे; ज्यांना शासकीय अधिकार आहे आणि धर्मप्रचार व प्रसार आणि उपदेश व सुधारणेचे कार्य करणाऱ्यासाठीही. त्यांच्या करिता हे आवश्यक आहे की, धर्मात ज्या सहज सुलभ गोष्टी आहेत; त्यांचे पूर्णत: अवलंब करावे. आणि त्यात अतिरेक व अडचण निर्माण करू नये. अडचण ही धर्मामध्ये बारीक सारीक गोष्टींवर ठाम राहिल्यामुळे निर्माण होते. आणि धर्मामध्ये नवनवीन गोष्टी निर्माण करुन त्यात वृद्धी केल्यानेही धर्म कठिण होत असतो. एकेश्वरवादाची श्रद्धा,या तत्वाला इस्लामने अशा नैसर्गिक पुराव्यानिशी सादर केले आहे की ते अगदी सहजपणे समजले जाऊ शकते. परंतु नंतरच्या काळात शाब्दिक वादविवादा मुळे वेगवेगळ्या समस्या निर्माण केल्या.

दुसरी सूचना प्रेषितानी ही दिली की, शुभवार्ता ऐकवा, तिरस्कार निर्माण करु नका. म्हणजे जे लोक धर्माचा स्वीकार करतील, त्यांना ईमान आणि सत्कर्मा चे परिणाम म्हणून मिळणाऱ्या चिरकालीन यशाची शुभ वार्ता द्या. म्हणजे त्यांच्यात सत्कर्माबद्दल आवड निर्माण व्हावी. कोणती अशी गोष्ट सांगू नका ज्यामुळे त्यांना धर्माचा तिरस्कार वाटावा.

तिसरी सूचना प्रेषितानी अशी केली की, हजरत अबू मूसा आणि हजरत मुआज या दोन सज्जनांना येमेनला पाठवले जात आहे. आपसात ऐक्य निर्माण करावे. मतभेद करू नये. कारण ऐक्याशिवाय धर्माची सेवा उत्तम प्रकारे पार पाडता येणार नाही. येथे मतभेद चा अर्थ असा आहे की ज्यामुळे ऐक्य दुभंगले जाते. आणि एकमेका हुन वेगळे होण्याची स्थिति निर्माण होते. म्हणून शक्यतोवर ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजे.





# चांगल्या पद्धती प्रचलित करणे.

## हदीस

عَنْ جَرِيْرِ بْنِ عَبْدِاللّٰهِ قَالَ جَاءَ نَاسٌ مِنَ الْاَعْرَابِ اِلٰى رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ عَلَيْهِمُ الصُّوْفُ. فَرَاٰى سُوْءَ حَالِهِمْ قَدْ اَصَابَتْهُمْ حَاجَةٌ. فَحَثَّ النَّاسَ عَلَى الصَّدَقَةِ. فَاَبْطَؤُا عَنْهُ. حَتّٰى رُوِىَ ذٰلِكَ فِى وَجْهِهٖ. قَالَ: ثُمَّ اِنَّ رَجُلًا مِنَ الْاَنْصَارِ جَاءَ بِصُرَّةٍ مِنْ وَرَقٍ ثُمَّ جَاءَ آخَرُ ثُمَّ تَتَابَعُوْا حَتّٰى عُرِفَ السُّرُوْرُ فِىْ وَجْهِهٖ. فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَنْ سَنَّ فِى الْاِسْلَامِ سُنَّةً حَسَنَةً فَعُمِلَ بِهَا بَعْدَهٗ، كُتِبَ لَهٗ مِثْلُ اَجْرِ مَنْ عَمِلَ بِهَا. وَلَا يَنْقُصُ مِنْ اُجُوْرِهِمْ شَىْءٌ. وَمَنْ سَنَّ فِى الْاِسْلَامِ سُنَّةً سَيِّئَةً، فَعُمِلَ بِهَا بَعْدَهٗ، كُتِبَ عَلَيْهِ مِثْلُ وِزْرِ مَنْ عَمِلَ بِهَا، وَلَا يَنْقُصُ مِنْ اَوْزَارِهِمْ شَىْءٍ.

(مسلم کتاب العلم)

## अनुवाद

**हजरत जरीर बिन अब्दुल्लाह म्हणतात की, काही बद्दू लोक (खेडूत) प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या सेवेत हजर झाले. त्यांनी घोंगडया पांघरळेल्या होत्या. प्रेषितांनी त्यांचे दारिद्र पाहून की ते गरजू आहेत लोकानां दान करायला प्रोत्साहित केले परंतु लोकांनी त्यात विलंब केला येथपावेतो की प्रेषितांच्या चेहऱ्यावर उदासीनता प्रकट होऊ लागली. नंतर अन्सार पैकी एक माणूस रोख रकमेची थैली घेऊन आला.त्या नंतर दुसरा माणूस आला. त्यानंतर रांग लागली. येथ पावेतो की त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेच्या खुणा दिसू लागल्या मग प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ने फर्मावले. जो कोणी इस्लाम मध्ये चांगली पद्धत प्रचलित करतो. आणि त्यानंतर ती अमलात आणली जावी तर त्याचा तेवढाच मोबदला लिहीला जाईल जेवढा ते अमलात आणणाऱ्याला मिळेल.आणि जो माणूस इस्लाम मध्ये वाईट पद्धती निर्माण करतो. आणि त्या नंतर ती अमलात आणली जाऊ लागली तर त्याच्यासाठी तेवढेच पाप लिहीले जाईल जेवढे ते अमलात आणणाऱ्याला मिळेल. आणि त्यांच्या पापात कोणतीही कपात केली जाणार नाही.** (मुस्लिम-किताबुल इल्म)

## स्पष्टीकरण

इस्लाम मध्ये चांगल्या पद्धती प्रचलित करण्याचा अर्थ असा नाही की, इस्लाम मध्ये ''बिदअते'' (इस्लाम धर्मामध्ये मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्यावेळी नसलेली व नंतर आलेली गोष्ट किंवा प्रथा) प्रचलित करुन दिल्या जाव्यात. आणि त्यांचे नांव ''बिदअते हस्ना'' (चांगली प्रथा अगर पद्धत) ठेवल्या जाव्यात; जसे की सर्वसामान्य पणे समजले जाते. खरे तर या हदीसचा बिदअते हस्नाशी काही एक संबंध नाही. आणि प्रत्येक बिदअत जसे सहीह हदीस मध्ये वर्णन करण्यात आले आहे, तिरस्कृत व बहिष्कृत आहे. उलट या हदीस चा अर्थ असा आहे की शरीअतचे जे आदेश अमलात आणण्याचा संबंध प्रयत्नाशी असावा तर जो माणूस पुढे येऊन चांगल्या प्रयत्नाचा अवलंब करेल आणि या पद्धतीचा अवलंब अन्य लोक करतील त्याच्या करिता तो मोबदला आहे, ज्याचे वर्णन या हदीस मध्ये करण्यात आले आहे. आणि त्याचे उदाहरण देखील याच हदीस मध्ये वर्णिले आहे. ते असे की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी एक गरजू आणि दरिद्र माणसाला दान करण्याचे प्रोत्साहन दिले तर एका अन्सारी ने रोख रकमेची थैली सादर केली. उलट दान करण्याचे आदेश पाळण्यात पुढाकार केला. आणि रोख रकमेची थैली देऊन सत्कर्मावर पैसे खर्च करण्याचा उत्कृष्ट नमूना दाखवून दिला. यावर आपण दुसऱ्या गोष्टींचाही कयास करु शकतो. पण त्यात अट अशी आहे की त्यांचा संबंध शरीअत च्या एखाद्या आदेशाचे पालन करण्यात सावधगिरी असावी,तो धर्मामध्ये नवीन वाढलेल्या गोष्टींशी नसावा. उदाहरणार्थ क़ुरआन च्या शिकवणुकीचा संबंध प्रयत्नाशी आहे. त्या करिता ''दर्से क़ुरआन'' (क़ुरआन चे अध्ययन किंवा क़ुरआन शिकणे) च्या पद्धतीचा अवलंब देखील केला जाऊ शकतो. आणि क़ुरआन वाचनाचा ही. क़ुरआन समजण्या करिता आपसातील चर्चेच्या बैठकाही घेतल्या जाऊ शकतात. आणि क़ुरआन तोंडपाठ करण्याची देखील व्यवस्था केली जाऊ शकते. क़ुरआन वाचनाच्या कॅसेटस देखील तयार करून ऐकविल्या जाऊ शकतात. आणि क़ुरआन चे महत्त्व आणि श्रेष्ठते संबंधी आकाशवाणी आणि दूरदर्शन वर व्याख्यानाचे देखील प्रसारण केले जाऊ शकते. त्याच प्रमाणे धर्मप्रचाराचे कार्य लिखाणाच्या सहाय्याने ही केले जाऊ शकते; व्याख्यान मासिक पुस्तक आणि साहित्याच्या सहाय्याने तसेच कॅसेटने ही. या पैकी कोणत्याही पद्धतीचा संबंध धर्मात वृद्धी किंवा ''बिदअत'' शी नाही. उलट शरीअतचा उद्देश पूर्ण करण्याच्या उपायाशी आहे. आणि आज्ञेचे वैशिष्ठ असे आहे जे उपायाचा तगादा करतात.

उरतो प्रश्न इस्लाम मध्ये वाईट पद्धत प्रचलित करण्याचा तर त्याचा संबंध बिदअतशी ही आहे. आणि शरीअत विरुद्ध पद्धतींशीही बिदअत चे एक उदाहरण ''क़ुरआन ख्वानी'' (सामूहिक क़ुरआन पठण करणे) आहे. जी मेलेल्या लोकांना पुण्य प्राप्ती च्या उद्देशाने केली जाते. आणि शरीअत विरूद्ध पद्धती ज्या इस्लाम मध्ये





प्रचलित केल्या जाव्यात, त्यांचे उदाहरण हे आहे की मुसलमानांच्या हातात सत्ता प्राप्त झाल्या वर त्या ठिकाणी इस्लामी राजवट कायम करण्या ऐवजी तेथे लोकशाही राजवट प्रस्थापित करावी. आणि त्याचे दुसरे उदाहरण असे आहे की, इस्लाम चे कौटुंबिक कायदे (family Laws) बदलण्यात यावेत.

# स्वार्थ ईमानच्या विरूद्ध आहे

## हदीस

عَنْ اَنَسٍ عَنِ النَّبِيِّ صلى الله عليه وسلم قَالَ لَايُؤْمِنُ اَحَدُكُمْ حَتّٰى

يُحِبَّ لِاَخِيْهِ مَا يُحِبُّ لِنَفْسِهٖ ۔ (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हजरत अनस (रजि.) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात -तुमच्या पैकी कोणीही ईमानधारक होऊ शकत नाही जो पर्यंत की तो आपल्या बांधवासाठी तेच पसंत ना करावा जे आपल्या स्वत: साठी पसंत करतो.**

(बुखारी किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

ईमानचा तगादा असा आहे की मुसलमानाने केवळ स्वार्थ न पाहता दुसऱ्यांच्या फायद्याचेही पाहावे. स्वार्थ हा फार मोठा रोग आहे. आणि त्याचा ताळमेळ ईमानशी बसत नाही. हदीस मध्ये ईमानधारक होण्यास जो नकार देण्यात आला आहे. तर त्याचा अर्थ असा आहे की अशा माणसाचा ईमान उच्च दर्ज्याचे नाही. जे आपल्या मुस्लिम बांधवासाठी ती वस्तू पसंत करीत नाही जी स्वत: साठी पसंत करतो.

# धर्म काय नाही आहे





# धर्मात नवीन पद्धत

## हदीस

عَنْ عَآئِشَةَ قَالَتْ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَنْ اَحْدَثَ فِىْ اَمْرِنَا هٰذَا مَا لَيْسَ فِيْهِ فَهُوَرَدٌّ . (البخاری کتاب الصلح)

## अनुवाद

**हजरत आयशा (रजि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-जो माणूस आमच्या धर्मात कोणतीही अशी गोष्ट निर्माण करतो जी त्यात नाही, तर ती रद्द (नापसंत) आहे.**

(बुखारी - किताबुस्सुलह)

## स्पष्टीकरण

या लहानशा हदीस मध्ये एका अत्यंत महत्त्वाच्या आधारभूत गोष्टीचे वर्णन करण्यात आले आहे. ती अशी की, धर्मात जी नवीन गोष्ट निर्माण केली जाईल, ती तिरस्कृत आहे. आणि शरीअतच्या परिभाषेत तिचे नांव बिदअत आहे.

धर्मात अशी गोष्ट निर्माण करणे, जी त्यापैकी नाही, चा अर्थ असा आहे. की, जिचा ना कोणताही ही आदेश दिला गेला आहे आणि ना ती एखाद्या शरीअतच्या पुराव्यावर आधारित असावी तर लोकानी किंवा उलेमानी केवळ आपल्या इच्छेनुसार त्या गोष्टीची धर्मामध्ये वृद्धी केलेली असावी; मग ते कोणतेही पुण्य कर्म का असे ना. उदाहरणार्थ 'जोहर' च्या चार रकअती फर्ज (अनिवार्य) आहेत. त्यावर जर कोणी पाचव्या रकअत ची वृद्धी करीत असेल, तर जरी ही पाचवी रकअत इबादत अर्थात भक्ती आहे. परंतु आपल्या कडून धर्मात वृद्धी असल्या कारणाने बिदअत आहे. आणि पाच रकअती पढणाऱ्याची खऱ्या अर्थाने नमाज़ अदा होणारच नाही ख्रिस्ती लोकानी ''रहबानियत'' (अर्थात सन्यास) ची जी पद्धत निर्माण केली होती. त्यामागे धर्मशास्त्राचा कोणताही पुरावा नव्हता. उलट तो त्यांच्या इच्छेचा परिणाम होता. आणि यालाच क़ुरआन ने बिदअत संबोधले आहे.

धर्मशास्त्राचा पुरावा म्हणजे तो पुरावा जो शरीअतला मान्य असावा म्हणून ''इज्तिहाद'' (योग्य मार्ग शोधून काढणे-जेथे क़ुरआन व हदीस या धर्म ग्रंथांमध्ये एखाद्या समस्ये संबंधी स्पष्ट आदेश नसेल तेथे आपल्या बुद्धीने विधिनिषेधा संबंधी निर्णय घेणे). ''कयास'', ''इस्तिम्बात'' (निर्णय घेणे) चे पुरावे एखाद्या शुद्ध शरीअतच्या किंवा शरीअतच्या आदेशावर आधारित असतात. आणि या गोष्टींची आवश्यकता पुढे उदभवणाऱ्या समस्यांमध्ये असते. परंतु जेथे कोणतीही समस्या उदभवलीच नाही. तेथे ''इज्तिहाद'' वगैरे चा काय प्रश्न?

या हदीस मुळे ही गोष्ट स्पष्ट आहे की धर्मात जी नवीन पद्धत काढण्यात येईल किंवा सुरु करण्यात येईल ती तिरस्कृत व तुच्छ आहे. ''बिदअते हस्ना'' अर्थात धर्मात चांगली नवीन पद्धत या सारखी कोणतीही गोष्ट धर्मात नाही. आणि ही ''बिदअते हस्ना'' ही परिभाषा नंतरच्या काळातील निर्मिती आहे. ज्याचा परिणाम असा आहे की, आज मुसलमानांमध्ये अनेक बिदअती किंवा नवीन पद्धतींची प्रथा पडली आहे. उदा. मोहर्रम चे सरबत आणि खिचडा, मीलादुन्नबी, ग्यारव्ही, उर्स, सन्दल, औलियाच्या (मुस्लिम संत) कबरींचे बांधकाम, क़ुरआन ख्वानी, गुंबदे खिज़रा' (मस्जिदे नबवी,मदीना चे घुमट) च्या दिशेने तोंड करुन अत्यंत अदबीने उभे राहणे, आणि दुआ करणे वगैरे. मुसलमानानी जर त्यांच्यातील जमातींचे आणि धार्मिक शत्रुत्व बाजूला सारून उपरोक्त हदीसचा विचार केला तर धर्माची सुरेख कल्पना त्यांच्या ध्यानात येईल. आणि ते हर प्रकारच्या बिदअती पासून लांब राहू लागतील.

# खूप प्रश्न केल्यामुळे अडचणी निर्माण होतात

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ عَنِ النَّبِیِّ صلی اللہ علیہ وسلم قَالَ : دَعُوْنِیْ مَاتَرَكْتُكُمْ اِنَّمَا هَلَكَ مَنْ كَانَ قَبْلَكُمْ بِسُؤَالِهِمْ وَاخْتِلَافِهِمْ عَلٰى اَنْبِيَآئِهِمْ فَاِذَا نَهَيْتُكُمْ عَنْ شَیْءٍ فَاجْتَنِبُوْهُ وَاِذَا اَمَرْتُكُمْ بِاَمْرٍ فَاتُوْا مِنْهُ مَا اسْتَطَعْتُمْ . (البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**हजरत अबू हुरैरा म्हणतात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम**





**फर्मावतात - मला सोडून द्या त्या स्थितीत ज्या स्थितीत मी तुम्हाला सोडून द्यावे. तुमच्या पूर्वीचे लोक प्रश्न आणि आपल्या प्रेषिता संबंधी मतभेद केल्या मुळे नष्ट झाले. म्हणून मी जेव्हा तुम्हाला एखादी गोष्ट न करण्याचे आदेश देतो तेव्हा ते करू नका. आणि जेव्हा एखादी गोष्ट करण्याचे आदेश देतो,तेव्हा तुमच्यात जेवढी शक्ती आहे त्यानुसार ते करा.**

(बुखारी किताबुल एअतिसाम)

## स्पष्टीकरण

सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे मोठे उपकार आहेत की, त्याने धर्माला सोपे बनवले आहे. म्हणून काहीही काकू न करता सरळ व सोप्या पद्धतीने त्याचे पालन केले पाहिजे. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी आपल्या निकटवर्ती सहाबाचे प्रशिक्षण देखील त्याच पद्धतीने केले होते की, शरीअतच्या आदेशांची अमंलबजावणी आपल्या बुद्धी प्रमाणे करीत होते. ते कुरापती काढणारे नव्हते. आणि ना ही ते धर्माच्या बाबतीत सक्ती करुन स्वत: साठी अडचणी निर्माण करीत नव्हते. कोणतेही संकोच न करता कोणत्याही आदेशाचा जो अर्थ त्यांच्या समोर यायचा त्याची अंमलबजावणी करु लागत. परंतु जेव्हा गैरअरबांची संख्या वाढली तर प्रश्न उभे करुन आणि समस्या उकरुन काढून धर्माला कठिण बनवले गेले. त्यात इस्लामी तत्ववेत्त्याचा देखील मोठा सहभाग आहे. ज्यानी शरीअत च्या आदेशामध्ये बारीक सारीक गोष्टी व समस्या निर्माण केल्या. आणि स्वनिर्मित प्रश्न उभे केले. उदाहरणार्थ हा एक प्रश्न की जर कोणी आपल्या पत्नीच्या हाताला तलाक दिला तर काय? आणि कोणी आपल्या पत्नी च्या डोक्याला तलाक दिला तर काय? आणि जर कोणी बोलला की, आकाशात जेवढे तारे आहेत, तुला तेवढेच तलाक तर केवढया तलाक झाल्या? आपल्या धर्म तत्त्ववेत्यांची अशी बुद्धी होती, ज्यानी मुसलमानांमध्ये संकोच आणि सक्तीची भावना निर्माण केली; आणि धर्म कठिण होऊन बसले. परंतु अशी पद्धत सहाबांची नव्हती. म्हणून सुधारणे ची शक्कल हीच आहे की सहाबांसारखी बुद्धी आणि त्यांच्या प्रमाणे विचारसरणी निर्माण केली जावी.

पवित्र क़ुरआन मध्ये बनी इस्त्राईल (ज्यु किंवा यहुदी) यांचा गाई चे बळी देण्याचा किस्सा नमूद करण्यात आला आहे. त्यांना गाईचा बळी देण्याचा आदेश दिला गेला होता. जर त्यानी या आदेशाचे सरळ सरळ पालन केले असते; आणि कोणत्याही गाईचा बळी दिला असता तर ते त्याना पुरे होते. परंतु तसे न करता त्यानी त्यासंबंधी निरनिराळे प्रश्न उपस्थित केले. ते असे की, त्या गाईचे वय किती असावे, तिचा रंग कसा असायला हवा. आणि दुसरे कोणते वैशिष्ठय त्यात असायला पाहिजे. वगैरे. त्याचा परिणाम असा झाला की, एक सोपी गोष्ट त्यांच्यासाठी कठिण बनली आणि मोठया मुष्किलीने ते तिचा बळी देऊ शकले.

सूरह बकर मध्ये या घटनेचे वर्णन आलेले आहे; जे ईमान धारकांचे या गोष्टीकडे मार्गदर्शन करते की जेव्हा अल्लाहची कोणतीही आज्ञा समोर येते, तेव्हा त्या संबंधी कोणतेही वादविवाद न करता त्या आज्ञेचे पालन केले गेले पाहिजे.

उपरोक्त हदीस मध्ये देखील प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी याच वास्तविकतेचे वर्णन केले आहे. ते असे की, जुन्या काळातील लोकांनी जेव्हा धार्मिक आदेशांसंबंधी निरनिराळे प्रश्न निर्माण केले आणि प्रेषिताच्या शिकवणुकीमध्ये मतभेद निर्माण केला, तर ते धर्माच्या मार्गावर कायम राहू शकले नाही; आणि त्यांचा सर्वनाश झाला. म्हणून मुस्लिम जनसमूदायाने त्यापासून बोध घ्यायला हवे.

या हदीस ने आपणास हे देखील मार्गदर्शन मिळते की जेथ पावेतो या गोष्टीं चा संबंध आहे; ज्यापासून रोखले गेले आहे. प्रयत्न हे असायला हवे की,त्या गोष्टीपासून पूर्णपणे सावध राहायला हवे. आता उरतात ते आदेश ज्यामध्ये एखादे काम करण्याबद्दल सांगण्यात आले आहेत; तर कोणतेहि वाद विवाद न करता आपल्या ऐपतीप्रमाणे मानवाने त्यांची अंमलबजावणी करावी. उदाहरणार्थ नमाज़ पठण उभे राहून करायला हवे, परंतु जर उभे राहून नमाज़ अदा करता येत नसेल तर बसून अदा करावे. जर तसेही जमत नसेल तर पहुडलेल्या स्थितीत अदा करावे. पण नमाज़ ''कज़ा'' (वेळ संपल्यानंतर नमाज़ अदा करणे). होता काम नये. अशा अनेक बाबी आहेत; ज्यात एखाद्या मुसलमानाने जर पक्का निर्णय करुन ठेवला तर क़ुरआन आणि हदीस च्या मार्गदर्शना खाली अल्लाह ने दिलेल्या बुद्धीचा वापर करुन स्वत: निर्णय घेऊ शकते की अमुक एका आदेशा चे पालन कोणत्या पद्धतीने केले पाहिजे. प्रत्येक माणसाबरोबर प्रत्येक वेळी कोणी मुफ्ती राहू शकत नाही. आणि तसे करण्याची गरज देखील नाही.





# अल्लाह संबंधी निरर्थक प्रश्न

## हदीस

**عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عَبْدِالرَّحْمٰنِ سَمِعْتُ اَنَسَ بْنَ مَالَكٍ يَّقُوْلُ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلی اللہ علیہ وسلم : لَنْ يَّبْرَحَ النَّاسُ يَتَسَآءَلُوْنَ حَتّٰى يَقُوْلُوْاهٰذَا اللّٰهُ خَالِقُ كُلِّ شَيْءٍ فَمَنْ خَلَقَ اللّٰهُ .**

(البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन अब्दुर्रहमान म्हणतात, मी अनस बिन मालिक यांना असे म्हणतानां ऐकले की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात - लोक आपसात बरोबर प्रश्न करीत राहतील तेथ पावेतो की, ते म्हणतील, हा अल्लाह आहे जो प्रत्येक वस्तुचा निर्माता आहे, तर मग अल्लाहला कोणी जन्म दिला.** (बुखारी-किताबुल ऐअतिसाम)

## स्पष्टीकरण

हा प्रश्न की अल्लाहला कोणी जन्म दिला?अत्यंत निरर्थक आहे. कारण अल्लाह जर संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता आहे तर निर्मात्याचा निर्मिती असण्याचा काय प्रश्न? निर्माता तर तोच असू शकतो ज्याला कोणीही जन्म दिला नसावा. आणि तो सदैव (सृष्टी च्या उत्पत्तीच्या दिवसापासून) अस्तित्वात आहे. आणि सदैव राहणारा आहे. निर्माण करणे हे अल्लाह चे गुणधर्म आहे. म्हणून त्यास निर्मिता या अर्थाने कयास केले जाऊ शकत नाही. आणि हा प्रश्न देखील अवाजवी आहे. तर जर असे हे चक्र कोठेही समाप्त होणार नाही. आणि निर्माता व निर्मित यामध्ये कोणताही फरक शिल्लक राहणार नाही. खऱ्या अर्थाने हा प्रश्न ''वसवस-ए-शैतानी'' (माणसाच्या मनात सैताना कडून उत्पन्न केला जाणार धर्मबाहय विचार) आहे. जेणे करुन माणूस मार्गभ्रष्ट व्हावा. म्हणून अशा प्रश्नाकडे दुर्लक्ष केले पाहिजे. आणि तिरस्कृत सैतानाशी अल्लाहचे संरक्षण मागितले पाहिजे.

# जेव्हा इस्लाम अपरिचित झालेला असेल

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ بَدَأَ الْاِسْلَامُ غَرِیْباً
وَسَیَعُوْدُ کَمَا بَدَأَ غَرِیْباً . فَطُوْبٰی لِلْغُرَبَاءِ . (مسلم کتاب الایمان)

## अनुवाद

**हजरत अबू हुरैरा म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात, इस्लाम चा आरंभ अपरिचितावस्थेत झाला आणि तो त्याच अवस्थेत परतेल; ज्या अवस्थेत त्याचा आरंभ झाला होता. तर शुभवार्ता आहे अपरिचित लोकांसाठी.** (मुस्लिम किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी आपल्या प्रेषित्वाच्या आरंभच्या काळात जेव्हा इस्लामकडे लोकांना आंमत्रित केले. तर त्या परिस्थितीत इस्लाम एक अपरिचित धर्म होता. लोक एकेश्वरवाद, प्रेषित आणि अंतिम न्यायदिवसाच्या कल्पनेशी अपरिचित होते. आणि मनात येईल त्या पद्धतीने जीवन जगत होते. हळू हळू लोक इस्लामचा स्वीकार करीत राहिले; येथपावेतो की संपूर्ण अरबमध्ये त्याचा प्रसार झाला आणि नंतर जगाच्या कानाकोपऱ्यात फैलावला.

त्यानंतर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी केलेल्या भविष्यवाणी नुसार इस्लाम मध्ये एक असा काळ येणार आहे; जेव्हा तो पुन्हा अपरीचित होऊन बसेल. या भविष्य वाणीच्या खुणा दिसू लागल्या आहेत. म्हणून मुसलमान जगात बहुसंख्येने असूनहि इस्लामची वास्तविकता अदृष्य होत चालली आहे. चारित्र्य आणि आचरणातील बिघाड इतक्या मोठया प्रमाणावर प्रकट होऊ लागले आहे की, ऐकश्वरवादाच्या खऱ्या कल्पनेपासून लोक अपरिचित होत चालले आहेत. अंतिम न्यायदिवशी आपल्या कृत्यांचे उत्तर द्यावे लागेल याची कल्पना अस्पष्ट होत चालली आहे. प्रेषितांच्या सुन्नतची जागा बिदअतने घेतली आहे. आणि अप्रमाणित व घडवलेल्या हदीसीनी धर्माचे स्वरुप बिघडून टाकले आहे. अशा परिस्थितीत जे लोक अल्लाहच्या कृपेने व खऱ्या अर्थाने क़ुरआन आणि सुन्नतचे





पालन कर्ते बनतात आणि धर्माला त्याच्या खऱ्या व शुद्ध स्वरुपात पेश करतात; त्यांना आम मुसलमान तर नव्हेच दृष्टीहीन उलेमा देखील आश्चर्याच्या नजरेने पाहतात. आणि त्यांच्या धार्मिकतेला शंकेच्या नजरेने पाहतात.आणि अशा तऱ्हेने सत्य इस्लामसाठी अपरिचितता दिवसेंदिवस वाढत जात आहे. परंतु जे लोक खऱ्या इस्लामची अंमलबजावणी करीत राहतील आणि धर्माला हर प्रकार च्या विकृती पासून पवित्र आणि शुद्ध स्वरुपात सादर करतील. ते फारच भाग्यवान लोक असतील. ज्याना या पवित्र हदीस मध्ये अभिनंदन केले गेले आहे.

# ज्या गोष्टींची आज्ञा केली गेली त्या न करणे व ज्यांची आज्ञा नाही त्या करणे.

## हदीस

عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ مَسْعُوْدٍ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ : مَا مِنْ نَبِیٍّ
بَعَثَهُ اللّٰهُ فِیْ اُمَّةٍ قَبْلِیْ ، اِلَّا کَانَ لَهٗ مِنْ اُمَّتِهٖ حَوَارِیُّوْنَ وَاَصْحَابٌ
یَأخُذُوْنَ بِسُنَّتِهٖ وَیَقْتَدُوْنَ بِاَمْرِهٖ . ثُمَّ اِنَّهَا تَخْلُفُ مِنْ بَعْدِهِمْ خُلُوْفٌ
یَقُوْلُوْنَ مَالَایَفْعَلُوْنَ . وَیَفْعَلُوْنَ مَالَا یُؤْمَرُوْنَ فَمَنْ جَاهَدَهُمْ بِیَدِهٖ.
فَهُوَ مُؤْمِنٌ . وَمَنْ جَاهَدَهُمْ بِلِسَانِهٖ فَهُوَ مُؤْمِنٌ وَمَنْ جَاهَدَهُمْ بِقَلْبِهٖ
فَهُوَمُؤْمِنٌ. وَلَیْسَ وَرَاءَ ذٰلِکَ مِنَ الْاِیْمَانِ حَبَّةُ خَرْدَلٍ .
(مسلم کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद म्हणतात की, अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात -अल्लाह ने माझ्या पूर्वी ज्या पैगंबरालाही पाठवले त्याची उम्मत (लोक समूह) मध्ये त्याचे ''हवारी'' (त्याचे शुद्ध**

**आचरण करणारे मित्र) आणि सदगृहस्थ राहिले आहेत; जे त्या प्रेषिता ची सुन्नत कबूल करीत आणि त्याच्या आज्ञेचे पालन करीत राहिले. मग त्यानंतर असे कुपुत्र लोक जन्म घेत राहिले, जे त्या गोष्टी म्हणत जे करीत नव्हे आणि ते काम करीत होते, ज्यांचे आदेश त्यांना दिले गेले नव्हते. तर जो माणूस त्यांच्याशी आपल्या हाताने लढाई करेल तो ईमानधारक आहे. आणि जो आपल्या जिभेने लढेल तोही ईमानधारक आहे. आणि जो आपल्या मनाने लेढल तोही ईमानधारक आहे.त्यानंतर राईच्या कणाच्या इतके ईमान शिल्लक राहात नाही.** (मुस्लिम किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

या उम्मत मध्येही असे कुपुत्र लोक बहुसंख्येने जन्मले आहेत जे त्या गोष्टी बोलतात ज्या ते करीत नाही. आणि ते काम करतात ज्याचे त्याना आदेश देण्यात आलेले नाही. ते इस्लाम च्या नावाने नुसती बडबड करतात आणि स्वत: ला इस्लामचा झेंडा फडकवणारे म्हणून जाहीर करतात. परंतु स्वत: आचरणात शून्य असतात तर अशा कामामध्ये मात्र पुढे पुढे असतात ज्या कामांचे त्यांना आदेश देण्यात आलेले नाही.

ते ''नियाज़'' ''फातेहा'' च्या रितींचे फार इतमामाने पालन करतील ''कुरआन ख्वानी''च्या मज्लिसी करतील. बुजुर्गांच्या जन्म तिथी साजरे करतील. दर्ग्याच्या सजावटी करतील आणि उर्स न सन्दल आग्रहाने करतील. हया आणि अशाच अन्य बिदअती आणि फालतू गोष्टींवर अगदी सक्तीने अमलात आणतील. परंतु ज्या कामांची त्यांना आज्ञा करण्यात आली आहे; त्यांना कानाडोळा करतील. उदाहरणार्थ - नमाज़ आणि ज़कात अदा करणे; कुरआन पठण, ते समजणे व आचरणात आणणे सत्कर्मांचे आदेश देणे आणि दुष्कृत्यां पासून रोखणे वगैरे.

अशा दुराचारी लोकांशी गाठ पडल्यावर एका मुसलमानाचे हे कर्तव्य आहे की, त्याने त्याना मान्यता देऊ नये; उलट असे दुष्कर्म रोखण्याचे प्रत्यक्षात प्रयत्न करावे. परंतु जर परिस्थिती अनुकूल नसेल तर या दुष्कर्माच्या विरोधात आवाज बुलंद करावा. पण जर परिस्थिती कठिण असेल आणि अशा लोकांना अशा दुष्कृत्यां पासून रोखताही येत नसेल तर कमीत कमी आपल्या मनात अशा लोकांना वाईट समजावे. आणि त्यानी फैलावलेल्या दुष्कृत्यांचा आणि शरीअत विरोधी गोष्टींचा तिरस्कार करावा, की हेच ईमानचा तगादा आहे अन्यत: ईमान शिल्लक राहू शकत नाही.





# उपद्रवांपासून सावधान

## हदीस

**عَنْ اُمِّ سَلَمَةَ قَالَتِ اسْتَيْقَظَ النَّبِىُّ ﷺ ذَاتَ لَيْلَةٍ فَقَالَ سُبْحَانَ اللّٰهِ مَاذَا اُنْزِلَ اللَّيْلَةَ مِنَ الْفِتَنِ وَمَاذَا فُتِحَ مِنَ الْخَزَائِنِ اَيْقِظُوْا صَوَاحِبَ الْحُجَرِ فَرُبَّ كَاسِيَةٍ فِى الدُّنْيَاعَارِيَةٌ فِى الْآخِرَةِ.** (البخاری کتاب العلم)

## अनुवाद

**हजरत उम्मे सलम: म्हणतात की, एका रात्री प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम झोपेतून उठले आणि फर्मावले - ''सुबहानल्लाह ''!(अर्थात परमेश्वर पवित्र आहे, वाह वा छान), कसे ''फितने ''(उपद्रव) आहेत. जे आजच्या रात्री अवतरले आहेत. आणि कसे खजीने आहेत, जे उघडले गेले. एकान्तात राहणाऱ्या (स्त्रीयांना ) उठवा. कारण कित्येक स्त्रीया जगात वस्त्र परिधान केल्या असतील परंतु आखिरत मध्ये विवस्त्र असतील.** (बुखारी किताबुल इल्म)

## स्ष्टीकरण

प्रेषितां (ते चिरंजीव होवोत) चे स्वप्न हे ईश्वरीय आज्ञा असतात. म्हणून ते अगदी खरे असतात. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ची उपरोक्त हदीस त्यांच्या स्वप्नाचे स्पष्टीकरण करणारी आहे.यात त्यानी त्या उपद्रवांचे संकेत स्पष्ट केले आहेत.जे त्यांच्या नंतर जवळच्या काळात उद्‌भवणारे होते. म्हणून तिसरे खलीफा हज़रत उस्मान यांचे हुतात्म्यामुळे उम्मत मध्ये उपद्रवांचा प्रारंभ झाला. त्याच बरोबर त्यांनी भल्या गोष्टींकडे संकेत केले आहेत; जे या उम्मतला काही दिवसानी प्राप्त होणार होते. म्हणून सहाबांच्या काळातच या उम्मतला भव्य विजय ही प्राप्त झाले; आणि ते मोठमोठया खजिन्यांचे मालक झाले.हे या उम्मत करिता भल्या गोष्टीचा एक भाग होता.परंतु त्यातही परिक्षा व कसोटी होती; कारण धनसंपत्तीच्या वृद्धीमुळे ज्या जबाबदाऱ्या वाढतात त्याना ही उम्मत कशा पद्धतीने पार पाडू शकेल.

''एकान्तात राहणाऱ्या'' या शब्दाशी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या पवित्र पत्न्या असा अर्थ अभिप्रेत आहे. त्यानी उम्मे सलमांना म्हटले की, त्यांना उठवा; म्हणजे त्यानी तहज्जुद ची नमाज़ अदा करावी. आणि स्वत: आखिरत मध्ये यश प्राप्त करण्यास पात्र बनवाव्यात. संसारात गुरफटलेल्या स्त्रीयांपासून सावधान राहाव्यात, ज्या जगात चांगले व सुंदर वस्त्र तर परिधान करुन घेतात. परंतु आखिरत संबंधी बेपर्वा असल्या कारणाने कियामती च्या दिवशी मोकळे हात राहतील; आणि विवस्त्र होतील. भाग्यवान आहेत त्या स्त्रीयां ज्या आपल्या मुक्तीची काळजी ध्याव्यात.

# जेव्हा कट्टर अज्ञानी लोक धार्मिक नेते म्हणून समोर येतील

## हदीस

**عَنْ عُرْوَةَ قَالَ حَجَّ عَلَيْنَا عَبْدُاللّٰهِ بْنِ عَمْرٍ وَفَسَمِعْتُهُ يَقُوْلُ سَمِعْتُ النَّبِيِّ ﷺ يَقُوْلُ : اِنَّ اللّٰهَ لَا يَنْزِعُ الْعِلْمِ بَعْدَ اَنْ اَعْطَا هُمُوْهُ اُنْتِزَاعاً، وَلٰكِنْ يَنْتَزِعُهُ مِنْهُمْ مَعَ قَبْضِ الْعُلْمَآءِ بِعِلْمِهِمْ فَيَبْقٰى نَاسٌ جُهَّالٌ يُسْتَفْتُوْنَ بِرَأْيِهِمْ فَيُضِلُّوْنَ وَيَضِلُّوْنَ .** (البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**उर्वा म्हणतात की अब्दुल्लाह बिन अम्र हज्ज केल्या नंतर आमच्या जवळून गेले,तेव्हा मी त्यांना सांगताना ऐकले की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावतांना ऐकले की, अल्लाह ज्ञान प्रदान केल्यानंतर त्याला त्याच स्वरुपात नष्ट करणार नाही; तर उलेमांना त्यांच्या ज्ञानासहित आपल्या कब्ज्यात करुन ज्ञान नष्ट करेल. मग कट्टर अज्ञानी लोक शिल्लक राहतील, ज्यांना फतवा विचारण्यात येईल, आणि ते आपल्या मताने फतवे देतील. ते लोकांना मार्गभ्रष्ट करतील आणि स्वत:ही मार्गभ्रष्ट होतील.**

(बुखारी - किताबुल एअतिसाम)

## स्पष्टीकरण

अल्लाह च्या कृपेने उम्मते मुस्लिम: (मुस्लिम लोक समूह) कोणत्याही काळात उलेमापासून वंचित राहिली नाही. म्हणून या वरुन असे स्पष्ट होते की, उपरोक्त हदीस मध्ये कियामत च्या जवळील काळा कडे संकेत करण्यात आले आहे, जेव्हां ऐहिक ज्ञानाचे वर्चस्व असेल आणि धार्मिक ज्ञानाची कदर होणार नाही. अशा स्थितीत अल्लाह उलेमांना उचलून घेईल (त्याना मरण येईल) म्हणजे त्यांचे अस्तित्व हळूहळू नष्ट होईल. या स्थितीत जेव्हा धार्मिक समस्या उदभवतील, तर त्या साठी अज्ञानी नेत्याकडे धाव घेतली जाईल. हे अज्ञानी नेते अज्ञानी उलेमाही असू शकतात. उदाहरणार्थ-अनेकेश्वरवाद आणि बिदअत व फाज़िल गोष्टींनां धार्मिकता समजणारे उलेमा आणि ताईत गंडे आणि तंत्रमंत्र शिकवणारे बाबा लोक.





अशा लोकांना जेव्हा धर्माबद्दल विचारले जाईल तर,जेव्हा ते स्वत: मार्गभ्रष्ट आहेत, विचारणाऱ्यानांही मार्गभ्रष्ट करतील.

आपल्या मताने फतवा जारी करण्याचा अर्थ परिभाषीक फतव्याच्या सीमेपर्यंत मर्यादित नाही; तर विस्तृत अर्थाने धर्मा संबंधी केल्या प्रश्नांचा क़ुरआन व हदीसच्या मार्गदर्शनाशिवाय केवळ आपल्या मताने उत्तर देणे आहे. या वरुन स्पष्ट आहे की, धर्माच्या बाबतीत कुरआन आणि हदीस च्या ज्ञानाशिवाय केवळ आपल्या मताने उत्तर देणे किती भयंकर बाब आहे.

# मार्गभ्रष्ट लोकसमूहाचे अनूकरण करणे

## हदीस

**عَنْ اَبِىْ سَعِيْدِ الْخُدْرِيِّ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ لَتَتَّبِعُنَّ سُنَنَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِكُمْ شِبْرًا بِشِبْرٍ ، وَذِرَاعاً بِذِرَاعٍ . حَتّٰى لَوْ دَخَلُوْفِىْ جُحْرِ ضَبٍّ لَاتَّبَعْتُمُوْهُمْ قُلْنَا: يَارَسُوْلَ اللّٰهِ الْيَهُوْدَ وَالنَّصَارٰى ؟ قَالَ فَمَنْ ؟**

(مسلم کتاب العلم)

## अनुवाद

**हजरत अबुसईद खुदरी म्हणतात की अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- तुम्ही मागील लोक समूहाच्या रिती रिवाजा प्रमाणे चालाल, वीत च्या वीत समान आणि हातच्या हात समान. येथे पावेतो की, जर ते एखाद्या बिळात घुसले होते तर तुम्ही देखील घुसाल; आम्ही विचारले; हे अल्लाह चे प्रेषिता ! काय याने यहूदी आणि ख्रिस्ती अभिप्रेत आहेत. त्यांनी उत्तर दिले. नाही तर कोण?**

(मुस्लिम किताबुल इल्म)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांची ही भविष्यवाणी अक्षरश: पूर्ण झाली. मुसलमानांची आज काय स्थिती आहे. यांची फार मोठी संख्या आज यहुदी आणि ख्रिस्ती

च्या पाऊल खुणांवर चालत आहे. यहुदी ईश्वरीय ग्रंथधारक असून देखील आज पाप व दुराचारात व्यस्त आहेत. त्यांनी ईश्वरीय ग्रंथाला फार मागे टाकून दिले होते. आणि जादू टोणे च्या मागे लागले होते. मुसलमानांची देखील एक संख्या जादू टोण्यावर विश्वास ठेवते; आणि बाबा लोकांचे अनुकरन करते. यहुदी लोकांनी आपल्या धर्माला रिती रिवाजांचा धर्म बनवून घेतला आणि धर्माच्या वास्तविकतेला अनभिज्ञ झाले. यहुदीनी धर्मशास्त्राच्या तत्वां मध्ये बारीक सारीक समस्या निर्माण करुन शरीअत मध्ये कठिणता निर्माण केली. मुसलमानानी देखील आपल्या सरळ व सोप्या धर्माला धर्मशास्त्राच्या तत्त्वांमध्ये बारीक सारीक समस्या निर्माण करुन कठिण बनवून टाकले. यहुदी हरामाचा माल खाण्यात निर्भय झाले होते. मुसलमानांमध्ये देखील अशा लोकांची कमतरता नाही, जे हारामाचा माल खातात. आणि हराम खाण्यात तेही निर्भय आहेत.

मुसलमानांची एक मोठी संख्या ख्रिस्ती लोकांच्या पाऊल खुनांवर देखील चालत आहे. त्यानी पांपाच्या प्रायश्चितच्या श्रद्धेचा शोध लावून पांपावर आखिरत मध्ये मिळणाऱ्या अजाबच्या श्रद्धेला नष्ट करुन टाकले होते. तर मुसलमानांची शफाअत (शिफारस) च्या चुकीच्या कल्पनेला रिवाज देऊन कर्मावर मिळणाऱ्या फळाच्या श्रद्धेला नष्ट करुन टाकले ख्रिस्ती लोकानी येशू ख्रिस्ताच्या व्यक्तीमत्त्वाच्या बाबतीत कोलाहल केले तर मुसलमानानी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या व्यक्तीमत्त्वाच्या बाबतीत कोलाहल केले. म्हणून त्यांना प्रत्येक ठिकाणी हजर समजू लागले. ख्रिस्ती लोकानी संसार त्यागाची श्रद्धा शोधली. तर मुसलमानांच्या एका जमाती ने संयम आणि सन्यासाच्या पद्धती ''तसव्वुफ'' (सूफी पंथाचे तत्त्वज्ञान) च्या नावाने प्रचलित केले. जे कुरआन आणि हदीसला धरुन नाही. ख्रिस्ती लोक बिदअत मध्ये पडले. आणि मुसलमान देखील बिदअत व निरर्थक गोष्टींमध्ये मशगूल झाले. परंतु आश्चर्य याचे आहे की कुरआन आणि हदीस चे प्रकाश असून देखील मुसलमानांची मोठी संख्या मार्गभ्रष्ट होत आहे.





# एखाद्या मुसलमानाला काफिर म्हणून संबोधणे

## हदीस

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ دِيْنَارٍ اَنَّهٗ سَمِعَ ابْنَ عُمَرَ يَقُوْلَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ
صلی اللہ علیہ وسلم اَيُّمَا امْرِیءٍ قَالَ لِاَخِيْهِ : يَا كَافِرُ . فَقَدْ بَاءَ بِهَا اَحَدُهُمَا. اِنْ كَانَ
كَمَا قَالَ . وَ اِلَّا رَجَعَتْ عَلَيْهِ .  (مسلم کتاب الایمان)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन दीनार कथन करतात की त्यानी हजरत इब्ने उमरला सांगताना ऐकले की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-जो माणूस आपल्या बंधूला काफिर म्हणून हाक मारतो तर दोघांपैकी एकावर त्याचा घाव लागेल. त्याने ज्याला काफिर म्हटले, तो जर तसा आहे तर ठीक अन्यत ! ही गोष्ट बोलणाऱ्यावरच परतून येईल.**

**(मुस्लिम - किताबुल ईमान)**

## स्पष्टीकरण

ही हदीस इशारा करीत आहे की एखाद्या मुसलमानाला काफिर म्हणणे काही साधी गोष्ट नव्हे; उलट इतकी गंभीर बाब आहे की, जर तो या म्हणण्याला पात्र झाला नाही तर म्हणणाऱ्यावर त्याचे म्हणणे परतून जाईल. म्हणून मुसलमानाला काफिर म्हणण्याच्या बाबतीत सावध राहिले पाहिजे.

अशी सूचना असून देखील वस्तुस्थिती अशी आहे की, किती तरी उलेमा एकमेकानां काफिरचे फतवे देतात; आणि मुसलमानांमध्ये फूट पाडतात. हे आपसातील शत्रूत्व आणि कट्टर वादाचे परिणाम आहे.

# धर्मा ची जाणीव आणि स्वयं निर्णय





# धर्माची जाणीव असणे ही अल्लाह ची फार मोठी देणगी आहे

## हदीस

عَنِ ابْنِ شِهَابٍ اَخْبَرَنِیْ حُمَیْدُ قَالَ سَمِعْتُ مُعَاوِیَةَ بْنَ اَبِیْ
سُفْیَانَ یَخْطُبُ قَالَ سَمِعْتُ النَّبِیَّ ﷺ یَقُوْلُ مَنْ یُّرِدِ اللّٰهُ بِهٖ
خَیْرًا یُّفَقِّهْهُ فِی الدِّیْنِ . (البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**इब्ने शहाब म्हणतात मला हमीद यानी खबर दिली ते म्हणतात, मी मआविय: इब्ने अबी सुफियानला व्याख्यान देताना ऐकले. ते म्हणत होते प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना मी फर्मावतानां मी ऐकले की, अल्लाह ज्याचे भले करणे इच्छितो त्याला धर्माची समज प्रदान करतो. (बुखारी - किताबुल एअतिसाम)**

## स्पष्टीकरण

धर्माची जाणीव असणे ही अल्लाह ची फार मोठी देणगी आहे. कारण यामुळे एका मुसलमानाची धर्मासंबंधी कल्पनाही दुरुस्त होते. आणि आचरण ही दुरुस्त होते. आणि यामुळे त्याला धर्मशास्त्रही समजू लागते. आणि धर्माच्या आज्ञांचा दूरदर्शीपणाही समजू लागतो. तो धर्माच्या आत्म्याशी अभिप्रेत होतो. म्हणून जे काम तो करतो; खऱ्या धार्मिक भावनेने करतो. त्या शिवाय तो लोकांचे मार्गदर्शनही खऱ्या अर्थाने करतो; त्यांच्या वर धर्माची वास्तविकता स्पष्ट करतो. धर्माची ही समज सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यालाच प्रदान करतो; ज्याचे भले तो इच्छितो. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याच माणसाचे भले इच्छितो आणि त्याचेच कल्याण करतो, जो खऱ्या अर्थाने धर्माची समज प्राप्त करु इच्छितो. आणि स्वत:चे मत आणि स्वत:च्या इच्छा आकांशा च्या मागे चालणारा नसावा; उलट तो मनापासून धर्माचे आचरण करीत असावा.

धर्माची समज अशी गोष्ट आहे जी बऱ्याच उलेमानां प्राप्त होत नाही. कारण ते खुऱ्या अंत:करणाने धर्माचा अभ्यास करीत नसतात. त्यांची बुद्धी जमाती किंवा पंथाच्या शत्रूत्वा मुळे सत्यतेला सत्य स्वरूपात पाहण्यासाठी तयार होत नाही. आशी प्रभावित बुध्दी (Prejudiced Mind)असणाऱ्या माणसा मध्ये धर्माची समज निर्माण होणे फारच कठिण आहे.

# स्वंय निर्णयाची कदर वाढवणे

## हदीस

عَنْ عَمْرِوبْنِ الْعَاصِ اَنَّهُ سَمِعَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ اِذَا حَكَمَ الحَاكِمُ فَاجْتَهَدَ ثُمَّ اَصَابَ فَلَهُ اَجْرَانِ وَاِذَا حَكَمَ فَاجْتَهَدَ ثُمَّ اَخْطَأَ فَلَهُ اَجْرٌ. (البخاری الاعتصام)

## अनुवाद

**अम्र बिन अल-आस कथन करतात की, त्यानी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावतांना ऐकले की जेंव्हा न्यायाधीश निर्णय घेतो, ज्यात तो स्वयं निर्णय घेतो आणि त्याचा निर्णय बरोबर असतो तर त्याच्या साठी दोन अज्र'' (मोबदला) आहेत. आणि जेव्हा निर्णय घेण्यात स्वयं निर्णय घेतो आणि त्यानंतर त्याच्या कडून चूक होते. तर त्याच्या साठी एक अज्र'' आहे.**

**(बुखारी-किताबुल एअतिसाम)**

## स्पष्टीकरण

''इज्तिहाद'' अर्थात स्वंय निर्णयचा अर्थ समोर आलेल्या समस्येत, ज्यात कुरआन आणि हदीस चे सरळ सरळ आदेश उपलब्ध नाहीत. शरीअतच्या पुराव्यांच्या आधारावर हे जाणून घेण्याचा कसोशीने प्रयत्न करणे की शरीअतच्या दृष्टीकोनातून त्याबद्दल काय आदेश आहेत. कुरआन आणि हदीसला लागून आणि जवळ असलेला कोणता मुद्दा आहे, त्या करिता शरीअतच्या आदेशातील दोषाची माहीती करणे. आणि समोर असलेल्या समस्येमध्ये ही तेच दोष असल्यावर शरीअतच्या त्या आदेशाला त्यावर लागू करणे. उदाहरणार्थ जुगार हराम असणे यातील दोष लॉटरी च्या समान असल्याने लॉटरीवर ते





लागू करणे त्याचप्रमाणे एखादे शरीअतचे आदेश घेऊन त्याचा तपशील निश्चित करणे. उदाहरणार्थ सल्ला घेणे संबंधीचे आदेश घेऊन लोकशाहीच्या त्या पद्धती वैध ठरवणे, ज्या ''सल्ला घेणे'' च्या पध्दतीशी संबंधित आहेत; आणि ज्या आधुनिक काळात अमलात आहेत, किंवा अमलात आणल्या जाऊ शकतात. मताधिकाराचा उपयोग, राष्ट्राच्या प्रमुखाची निवड, संसदेच्या निर्णयासाठी कायदे व दस्तूर वगैरे.

स्वयंनिर्णय म्हणजे वरच्या वर निर्णय घेणे नाही; तर विचार विनिमय करुन समस्येच्या खोलपर्यंत जाण्याचे प्रयत्न करणे आणि त्यानुसार शरीअतचे आदेश जाणून घेण्याचे प्रयत्न आहे. म्हणून हे कार्य तेच लोक पार पाडू शकतात जे कुरआन व हदीसचे थेट व गहण ज्ञान बाळगतात. हदीस मध्ये ''हाकिम'' (न्यायधीश) म्हणजे न्यायदान करणारा आहे; मग तो न्यायालयाचा निर्णय असो अगर शासनातील जबाबदार व्यक्तींचा निर्णय असो किंवा स्वंय निर्णयच्या समस्यामध्ये उलेमा धर्मशास्त्रज्ञ आणि मुफ्ती चे निर्णय व फतवे .

जर स्वयांनिर्णय घेणाऱ्याचा निर्णय अल्लाहपाशी दुरुस्त व योग्य असेल तर तो दुहेरी अज्र'' (मोबदला) ला पात्र आहे. एक मोबदला शरीअतचा आदेश माहीत करण्याकरिता योग्य प्रकारे आपला भरपूर प्रयत्न करण्याचा आणि दुसरा मोबदला योग्य निर्णय देण्याचा. परंतु जर स्वयंनिर्णय देणारा असा निर्णय देतो जो अल्लाह पाशी चुकीचा आहे. तरीही तो एका मोबदल्यास पात्र आहे. कारण त्याने योग्य निर्णय घेण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. यामुळे इस्लामच्या त्या विशालतेची कल्पना येते, जी त्याने नवनवीन उत्पन्ना होणाऱ्या समस्यांसंबंधी ठेवली आहे; आणि त्यात संकुचितपणा नाही. स्वयंनिर्णयाची ही कदर वाढविणे आणि धैर्य वाढविणे यामुळे येणाऱ्या स्वयंनिर्णयाच्या समस्या संदर्भात मुसलमानाना सहिष्णुता व उदारता अवलंबिली पाहिजे. अशा समस्यानां सत्य व असत्याची समस्या बनवून एकमेकांचा विरोध करणे, आपसात खेचाताण निर्माण करणे हे इस्लाम च्या विशालतेला संकुचितपणात रुपांतर करणे होय. या हदीस मुळे ही गोष्ट देखील स्पष्ट होते की इस्लाम ने स्वयं निर्णयाचे दार उघडे ठेवले आहे. म्हणून कोणालाही अधिकार पोहचत नाही की त्याने हे दार बंद करावे.

# स्वयंनिर्णयातील मतभेद सहन करून घ्यावा

## हदीस

**عَنِ ابْنِ عُمَرَ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ لَنَا لَمَّا رَجَعَ مِنَ الْاَحْزَابِ لَا يُصَلِّيَنَّ اَحَدُ، الْعَصْرَ اِلَّا فِيْ بَنِيْ قُرَيْظَةَ فَاَدْرَکَ بَعْضُهُمُ الْعَصْرَ فِي الطَّرِيْقِ وَقَالَ بَعْضُهُمْ بَلْ نُصَلِّيْ لَمْ يُرِدْمِنَّا ذٰلِکَ فَذَکَرَ ذٰلِکَ لِلنَّبِيِّ ﷺ فَلَمْ يُعَنِّفْ اَحَدًا مِّنْهُمْ .** (البخاری کتاب صلوۃ الخوف)

## अनुवाद

**हजरत इब्ने उमर म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी अहाज़ाबच्या युध्दानंतर परत येताना आम्हाला फर्मावले-तुमच्या पैकी कोणीही अस्रची नमाज़ अदा करू नये, परंतु बनी करीज़ा मध्ये. त्या नंतर मार्गातच अस्रची वेळ झाली, तर लोक बोलले की आम्ही त्या ठिकाणी जाऊनच नमाज़ अदा करु.आणि काही लोक बोलले-आम्ही आता येथेच नमाज़ अदा करून टाकू. कारण आम्ही नमाज़ कज़ा (नमाज़ च्या वेळेनंतर नमाज़ अदा करणे) करावी अशी त्यांची इच्छा नव्हती.नंतर जेव्हा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना या घटनेचे वर्णन करण्यात आले तर त्यानी कोणालाही निस्तेज व निरुत्साही संबोधले नाही.**(बुखारी-किताब सलातुल-खौफ)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम याना सहाबानां (प्रेषितांचे निकटचे मित्र) यांना बनी करीज़ा मध्ये अस्र ची नमाज़ अदा करण्याची सूचना केली होती, त्याचे कारण असे होते की, त्यानी तेथे पोहोचण्याची घाई करावी. आणि बनी करीज़ाच्या विरोधात शीघ्रतेने युद्धाची कारवाई सुरु केली जावी. कारण त्यानी खंदकच्या युद्धाचे वेळी, जे नुकतेच संपले होते; धोका दिला होता. योगागोगाने वाटेतच अस्र नमाज़ची वेळ झाली. आणि असे वाटले की, मार्गातच बनी करीज़ा पोहोचेपर्यंत नमाज़ कज़ा होईल यासाठी काही अनुयांनची मत हे झाले की नमाज़ वाटेत अदा केली पाहिजे. आणि काहींचे मत असे झाले की, प्रेषितांनी केलेल्या सुचनेनुसार बनी करीज़ा पोहोचल्यानंतरच नमाज़ अदा केली जावी; मग ती कज़ा का होत नाही !म्हणून प्रत्येकाने आपल्या मताप्रमाणे कृती केली आणि नंतर जेव्हा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना या घटनेचे वर्णन केले गेले.तर प्रेषितांनी कोणालाही विरोध





दर्शविला नाही. याचा अर्थ असा की त्यानी दोन्ही गोष्टीनां सहमती दिली; ज्यामुळे हे मार्गदर्शन प्राप्त होते.की,स्वयंनिर्णयाच्या कार्यांमध्ये विशाल वृत्ती व सहिष्णुता असायला हवी. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या म्हणण्याचा अर्थ निश्चित करण्यात कथनकारांमध्ये मतभेद असू शकते. केवळ त्यामुळे एकामेंकावर दोषारोप करणे उचित नाही.

किती तरी हदीसी आहेत; ज्यांचे अर्थ समजण्याच्या बाबतीत उम्मतच्या दरम्यान मतभेद आढळून येते. जे सहन करायला हवे. या मतभेदाच्या आधारावर एक दुसऱ्यावर हदीस नाकारण्याचा आरोप लावणे उचित नाही.

# पुण्य कर्म आणि दुष्कर्माची ओळख

## हदीस

**عَنِ النَّوَّاسِ بْنِ سَمْعَانَ ، اَنَّ رَجُلاً سَأَلَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ عَنِ الْبِرِّ وَالْاِثْمِ ، فَقَالَ النَّبِيُّ ﷺ : اَلْبِرُّ حُسْنُ الْخُلُقِ ، وَالْاِثْمُ مَا حَاکَ فِيْ نَفْسِکَ وَ کَرِهْتَ اَنْ يَّطَّلِعَ النَّاسُ عَلَيْهِ .** (الترمذی ابواب الزھد)

## अनुवाद

**हज़रत नवास बिन समआन कथन करतात की, एका माणसाने प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना ''बिर्र''(पुण्यकर्म) आणि दुष्कर्मा संबंधी विचारले त्यावर त्यानी फर्माविले, पुण्यकर्म म्हणजे सदाचार आहे. आणि पापकर्म ते आहे जे तुमच्या मनामध्ये टोचणे निर्माण करते आणि लोकांनी त्या संबंधी सूचित करण्याला नापसंत करावं.** (अत-तिर्मिजी - अबवाबुज जुहद)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये पुण्यकर्म आणि पापकृत्याची ओळख करुन देण्यात आली आहे. पुण्यकर्माचे वैशिष्ठ्य हे आहे की त्यामुळे सदाचरणात सौंदर्य निर्माण होते. म्हणून माणसाच्या मनोविज्ञानावर त्याचा चांगला परिणाम होतो. त्याउलट पापकर्म चे वैशिष्ठय हे आहे की ते मनात टोचणे निर्माण करते. आणि मानवाला हे आवडत नाही लोकांना त्याची माहीती व्हावी. माणसाला वारंवार अशा परिस्थितीला तोंड द्यावे की अमुक एक काम करांवे अगर करु नये. ते काम करण्यात टोचल्यासारखे वाटते आणि हा विचार ही निर्माण होतो की जर लोकांना या घटनेची माहीती झाली तर ते त्याला वाईट समजतील. ही या गोष्टीची खूण आहे की, ते कृत्य योग्य नव्हे. म्हणून अशा कामांपासून सावध राहायला हवे.

# न्यायालयीन निर्णय प्रकट परिस्थितीनुरुप होत असतो.

## हदीस

عَنِ ابْنِ شِهَابٍ قَالَ اَخْبَرَنِىْ عُرْوَةُ بْنُ الزُّبَيْرِ اَنَّ زَيْنَبَ ابْنَةَ اَبِىْ سَلَمَةَ اَخْبَرَتْهُ اَنَّ اُمَّ سَلَمَةَ زَوْجَ النَّبِىِّ ﷺ اَخْبَرَتْهَا عَنْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ اَنَّهٗ سَمِعَ خُصُوْمَةً بِبَابِ حُجْرَتِهٖ فَخَرَجَ اِلَيْهِمْ فَقَالَ : اِنَّمَا اَنَا بَشَرٌ وَّاِنَّهٗ يَاتِيْنِىْ الْخَصْمُ فَلَعَلَّ بَعْضَكُمْ اَنْ يَّكُوْنَ اَبْلَغَ مِنْ بَعْضٍ فَاَحْسِبُ اَنَّهٗ صَادِقٌ فَاَقْضِىْ لَهٗ بِذٰلِكَ فَمَنْ قَضَيْتُ لَهٗ بِحَقِّ مُسْلِمٍ فَاِنَّمَا هِىَ قِطْعَةٌ مِّنَ النَّارِ فَلْيَاْخُذْهَا اَوْ لِيَتْرُكْهَا.(البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**इब्ने शहाब म्हणतात की, मला उर्वा बिन ज़ुबैर यानी खबर दिली की ज़ैनब बिन्ते अबी सलमानी त्यांना खबर दिली की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या पवित्र पत्नी उम्मे सलमा यानी खबर दिली की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी आपल्या घराच्या दरवाज्याजवळ भांडणाचा आवाज ऐकला; त्यावर ते बाहेर आले; आणि फर्मावले-मी एक माणूस आहे. आणि लोक माझ्याकडे भांडण तंटे घेऊन येतात. आणि या गोष्टीची शक्यता आहे काही लोक अन्य लोकांच्या तुलनेत गोडबोले व बडबडे असावेत. आणि मी अशा माणसाला खरा समजून त्याच्या पक्षाने निर्णय द्यावा.तर ज्याला मी अशा पद्धतीने दुसऱ्या मुसलमानाचा हक्क देऊन टाकतो, तर तो अग्नीचा एक तुकडा असेल. आता त्याने ते घेऊन द्यावं अगर सोडून द्यावे.** (बुखारी- किताबुल अहकाम)





## स्पष्टीकरण

इस्लामी न्याय व्यवस्थेचे निर्णय देखील प्रकट परिस्थिती नुसारच असतात. म्हणजे जे पुरावे आणि ग्वाही त्याच्या समोर सादर केल्या जातात. त्यांच्या आधारावरच निर्णय दिले जातात. अंतरिक्षाचे ज्ञान कोणा काझी किंवा न्यायाधीशाला ज्ञान नसते. म्हणून न्याय व्यवस्थेने एखाद्याला हक्क मिळवून दिले परंतु खऱ्या अर्थाने जर तो ते हक्क प्राप्त करुन घेण्यास पात्र नाही; तर मग न्याय व्यवस्थेचे निर्णय त्या हक्काला केवळ कायदेशीररित्या वैध ठरवतात. वास्तविकतेच्या दृष्टीकोनातून नव्हे. कारण अल्लाहपाशी वास्तविकतेचा विश्वास आहे, वर वर दिसून येणाऱ्या निर्णयांचा नव्हे. या वास्तविकतेला प्रेषित सल्लल्लाहु अलैहिं वसल्लम यानी स्वत: आपल्या निर्णयाला समोर ठेवून स्पष्ट करुन दाखवले आहे. ते असे की जर त्यानीही न्यायालयीन कारवाई नंतर कोणाला तरी जमीनी चा एखादा तुकडा देऊन टाकला; ते यामुळे की त्याने सादर केलेले पुरावे आणि दाखले सबळ होते. परंतु खऱ्या अर्थाने तो त्या जमीनीच्या तुवड्याचा मालक नव्हता. तर तो अग्नीचा एक तुकडा असेल. त्याला ते घ्यायला कोणते ही कारण नाही.

आधुनिक युगात ही सर्वसामान्य बाब आहे की, काही कारणानिमित किंवा कर वगैरे वाचण्यासाठी एखादी मालमत्ता आपल्या नातेवाईकांमधून एखाद्या व्यक्तीच्या नावाने कायदेशीररित्या वर्ग केली जाते. परंतु त्याला त्या मालमत्तेचे मालकी हक्क दिले जात नाही; म्हणूनच कायदेशीररित्या तो त्या मालमत्तेचा मालक राहात नाही; तर ती मालमत्ता त्याच्या नावाने वर्ग करणाऱ्याची अनामत असते. आणि जर तो मरण पावला तर त्याचे वारसदार त्याचे मालक होतील. परंतु बहुतेक लोक कायद्याचा लाभ घेऊन अशी मालमत्ता गिळंकृत करतात जे एक मोठे पापाला कारणीभूत आहे.

# स्वप्न आणि शरीअत (धर्मशास्त्र)





# कबरीतील विश्वाची एक झलक

## हदीस

قَالَ سَـمُرَةُ بْنُ جُنْدُبٍ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مِمَّا يُكْثِرُ اَنْ
يَّقُوْلَ لِاَصْحَابِهٖ هَلْ رَاٰى اَحَدٌمِّنْكُمْ مِنْ رُّؤْيَا ؟ قَالَ فَيَقُصُّ عَلَيْهِ مَنْ شَآءَ اللّٰهُ
اَنْ يَّقُصَّ وَاِنَّهٗ قَالَ ذَاتَ غَدَاةٍ : اِنَّهٗ اَتَانِیْ اللَّيْلَةَ اٰتِيَانِ وَاِنَّهُمَاابْتَعَثَانِیْ
وَاِنَّهُمَاقَالَا لِیَ اِنْطَلِقْ وَاِنِّیْ اِنْطَلَقْتُ مَعَهُمَا،وَاِنَّا اَتَيْنَا عَلٰى رَجُلٍ مُضْطَجِعٍ
وَاِذَا اٰخَرُ قَائِمٌ عَلَيْهِ بِصَخْرَةٍ وَّ اِذَا هُوَيَهْوِیْ بِالصَّخْرَةِلِرَاسِهٖ فَيَثْلَغُ رَاْسَهٗ فَيَتَدَ
هْدَهُ الْحَجَرُ هٰهُنَا فَيَتْبَعُ الْحَجَرَفَيَأْخُذُهٗ فَلَا يَرْجِعُ اِلَيْهِ حَتّٰى يَصِحُّ رَاسُهٗ
كَمَاكَانَ، ثُمَّ يَعُوْدُ عَلَيْهِ فَيَفْعَلُ بِهٖ مِثْلَ مَا فَعَلَ الْمَرَّةَ الْاُوْلٰى قَالَ قُلْتُ لَهُمَا
سُبْحَانَ اللّٰهِ مَا هٰذَانِ؟ قَالَ قَالَا لِیْ اِنْطَلِقْ، قَالَ فَانْطَلَقَا فَاَتَيْنَا عَلٰى رَجُلٍ
مُسْتَلْقٍ لِقَفَاهُ وَاِذَا اٰخَرُ قَائِمٌ عَلَيْهِ بِكَلُّوْبٍ مِّنْ حَدِيْدٍ وَّاِذَا هُوَ يَاتِیْ اَحَدَ شِقَّیْ
وَجْهِهٖ فَيُشَرْشِرُ شِدَقَهٗ اِلٰى قَفَاهُ وَمَنْخِرَهٗ اِلٰى فَقَاهُ وَ عَيْنَهٗ اِلٰى قَفَاهُ قَالَ وَرُبَّمَا
قَالَ اَبُوْرَجَآءٍ فَيَشُقُّ قَالَ ثُمَّ يَتَحَوَّلُ اِلٰى الْجَانِبِ الْاٰخِرِفَيَفْعَلُ بِهٖ مِثْلَ مَا فَعَلَ
بِالْجَانِبِ الْاَوَّلِ فَمَا يَفْرُغُ مِنْ ذٰلِكَ الْجَانِبِ حَتّٰى يَصِحَّ ذٰلِكَ الْجَانِبُ كَمَا
كَانَ، ثُمَّ يَعُوْدُ عَلَيْهِ فَيَفْعَلُ مِثْلَ مَا فَعَلَ الْمَرَّةَالْاُوْلٰى، قَالَ قُلْتُ سُبْحَانَ اللّٰهِ
مَا هٰذَانِ ؟ قَالَ قَالَا لِیْ اِنْطَلِقْ فَانْطَلَقْنَا فَاَتَيْنَا عَلٰى مِثْلِ التَّنُّوْرِ قَالَ فَاَحْسِبُ
اَنَّهٗ كَانَ يَقُوْلُ فَاِذَا فِيْهِ لَغَطٌ وَّاَصْوَاتٌ، قَالَ فَاطَّلَعْنَا فِيْهِ فَاِذَا فِيْهِ رِجَالٌ وَّ
نِسَآءٌعُرَاةٌ وَاِذَا هُمْ يَاْتِيْهِمْ لَهَبٌ مِّنْ اَسْفَلَ مِنْهُمْ فَاِذَا اَتَاهُمْ ذٰلِكَ اللَّهَبُ
ضَوْضَوْا قَالَ قُلْتُ لَهُمَا مَا هٰؤُلَآءِ قَـــالَ قَالَا لِیْ اِنْطَلِقْ اِنْطَلِقْ :قَالَ فَانْطَلَقْنَا
عَلٰى نَهْرٍحَسِبْتُ اَنَّهٗ كَانَ يَقُوْلُ اَحْمَرَ مِثْلَ الدَّمِ وَ اِذَا فِی النَّهْرِ رَجُلٌ سَابِحٌ
يُسَبِّحُ وَاِذَا عَلٰى شَطِّ النَّهْــرِ رَجُـلٌ قَدْ جَمَعَ عِنْدَهٗ حِجَارَةً كَثِيْرَةً وَاِذَا ذٰلِك

السَّابِحُ يَسْبَحُ ثُمَّ يَاتِىْ ذٰلِكَ الَّذِىْ قَدْ جَمَعَ عِنْدَهُ الْحِجَارَةَ فَيَفْغَرُلَهٗ فَاهُ فَيُلْقِمَهٗ حَجَرًا فَيَنْطَلِقُ يَسْبَحُ ثُمَّ يَرْجِعُ اِلَيْهِ كُلَّمَا رَجَعَ اِلَيْهِ فَغَرَلَهٗ فَاهُ فَاَلْقَمَهٗ حَجَرًا قَالَ قُلْتُ لَهُمَا مَا هٰذَانِ ؟قَالَ قَالَا لِىْ اِنْطَلِقْ اِنْطَلِقْ قَالَ فَانْطَلَقْنَا فَاَتَيْنَا عَلٰى رَجُلٍ كَرِيْهِ الْمَرْأَةِ كَا كْرَهِ مَا اَنْتَ رَآءٍ رَجُلًا مَّرْ اٰةً وَاِذَا عِنْدَهٗ نَارٌ يَحُشُّهَا وَيَسْعٰ حَوْلَهَا قَالَ قُلْتُ لَهُمَامَا هٰذَا قَالَ قَالَا لِىْ اِنْطَلِقْ اِنْطَلِقْ فَانْطَلَقْنَا فَاَتَيْنَا عَلٰى رَوْضَةٍ مُّعْتَمَّةٍ فِيْهَا مِنْ كُلِّ نَوْرِ الرَّبِيْعِ وَ اِذَا بَيْنَ ظَهْرَىِ الرَّوْضَةِ رَجُلٌ طَوِيْلٌ لَااَكَادُ اَرٰى رَاسَهٗ طُوْلًا فِى السَّمَآءِ وَاِذَا حَوْلَ الرَّجُلِ مِنْ اَكْثَرِ وِلْدَانٍ رَّاَيْتُهُمْ قَطُّ قَالَ قُلْتُ لَهُمَا مَا هٰذَا مَا هٰٓؤُلَآءِ قَالَ قَالَا لِى اِنْطَلِقْ اِنْطَلِقْ قَالَ فَانْطَلَقْنَافَانْتَهَيْنَا اِلٰى رَوْضَةٍ عَظِيْمَةٍ لَمْ اَرَ رَوْضَةً قَطُّ اَعْظَمَ مِنْهَا وَلَا اَحْسَنَ قَالَا قَالَا لِىْ اِرْقَ فِيْهَا قَالَ فَارْتَقَيْنَا فِيْهَا فَانْتَهَيْنَا اِلٰى مَدِيْنَةٍ مَبْنِيَّةٍ بِلَبَنِ ذَهَبٍ وَّلَبَنِ فِضَّةٍ فَاَتَيْنَا بَابَ الْمَدِيْنَةِ فَاسْتَفْتَحْنَا فَفُتِحَ لَنَا فَدَخَلْنَاهَا فَتَلَقَّا نَا فِيْهَا رِجَالٌ شَطْرٌ مِّنْ خَلْقِهِمْ كَأَحْسَنِ مَا اَنْتَ رَآءٍ وَشَطْرٌ كَأَقْبَحِ مَا اَنْتَ رَاءٍ قَالَ قَالَالَهُمْ اِذْهَبُوْا فَقَعُوْا فِىْ ذٰلِكَ النَّهْرِ، قَالَ وَاِذَا نَهْرٌ مُعْتَرِضٌ يَّجْرِىْ كَاَنَّ مَآئَهُ الْمَحْضُ فِى الْبَيَاضِ فَذَهَبُوْافَوَقَعُوْا فِيهِ، ثُمَّ رَجَعُوْا اِلَيْنَا قَدْ ذَهَبَ ذٰلِكَ السُّوْءُ عَنْهُمْ فَصَارُوا فِىْ اَحْسَنِ صُوْرَةٍ، قَالَ قَالَا لِىْ هٰذِهٖ جَنَّةُ عَدْنٍ وَّهٰذَاكَ مَنْزِلُكَ قَالَ فَسَمَا بَصَرِىْ صُعُدًا فَاِذَا قَصْرٌ مِثْلُ الرَّبَابَةِ الْبَيْضَآءِ قَالَ قَالَالِى هٰذَاكَ مَنْزِلُكَ قَالَ قُلْتُ لَهُمَا بَارَكَ اللّٰهُ فِيْكُمَا ذَرَانِىْ فَاَدْخُلَهٗ، قَالَا اَمَّا الْاٰنَ فَلَا وَاَنْتَ دَاخِلُهٗ قَالَ قُلْتُ لَهُمَا فَاِنِّى قَدْ رَاَيْتُ مُنْذُاللَّيْلَةَعَجَبًا فَمَا هٰذَا الَّذِىْ رَاَيْتُ؟ قَالَ قَالَالِىْ: اَمَّا اِنَّا سَنُخْبِرُكَ : اَمَّا الرَّجُلُ الْاَوَّلُ الَّذِىْ اَتَيْتَ عَلَيْهِ يُثْلَغُ رَاْسُهٗ بِالْحَجَرِ فَاِنَّهُ الرَّجُلُ يَأْخُذُالْقُرْاٰنَ فَيَرْ فِضُهٗ وَيَنَامُ عَنِ الصَّلٰوةِ الْمَكْتُوْبَةِ وَاَمَّا الرَّجُلُ الَّذِىْ اَتَيْتَ عَلَيْهِ يُشَرْ شَرُ شِدْقَهٗ اِلٰى قَفَاهُ وَمِنْخِرُهٗ اِلٰى قَفَاهُ وَعَيْنُهٗ اِلٰى قفَاهُ فَاِنَّهُ الرَّجُلُ يَغْدُوْامِنْ بَيْتِهٖ فَيَكْذِبُ الْكِذْبَةَ تَبْلُغُ الْاٰفَاقَ وَاَمَّا الرَّجُلُ وَالنِّسَآءُ الْعُرَاةُ الَّذِيْنَ فِىْ مِثْلَ بِنَآءِ التَّنُّوْرِ فَاِنَّهُمْ الزُّنَاةُ وَالزَّوَانِىْ وَاَمَّا الرَّجُلُ الَّذِىْ اَتَيْتَ عَلَيْهِ.يَسْبَحُ فِى النَّهْرِ





وَيُلْقَمُ الْحَجَرُ فَاِنَّهٗ اٰكِلُ الرِّبَا وَاَمَّا الرَّجُلُ الْكَرِيْهُ الْمَرْأَةِ الَّذِىْ عِنْدَالنَّارِيَحُشُّهَا وَيَسْعٰى حَوْلَهَا فَاِنَّهٗ مَالِكٌ خَازِنُ جَهَنَّمَ . وَاَمَّا الرَّجُلُ الطَّوِيْلُ الَّذِىْ فِىْ الرَّوْضَةِ فَاِنَّهٗ اِبْرَاهِيْمَ عَلَيْهِ السَّلَامُ . وَاَمَّا الْوِلْدَانُ الَّذِيْنَ حَوْلَهٗ فَكُلُّ مَوْلُوْدٍ مَاتَ عَلَى الْفِطْرَةِ. قَالَ فَقَالَ بَعْضُ الْمُسْلِمِيْنَ يَا رَسُوْلَ اللّٰهِ وَ اَوْلَادُ الْمُشْرِكِيْنَ. فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صَلَّى اللّٰهُ عَلَيْهِ وَسَلَّمَ وَ اَوْلَادُ الْمُشْرِكِيْنَ.وَاَمَّا الْقَوْمُ الَّذِيْنَ كَانُوْا شَطْرٌ مِّنْهُمْ حَسَنًا وَّشَطْرٌمِّنْهُمْ قَبِيْحًا فَاِنَّهُمْ قَوْمٌ خَلَطُوْا عَمَلاً صَالِحاً وَاٰخَرَ سَيِّئاً تَجَاوَزَ اللّٰهُ عَنْهُمْ ـ ( البخارى كتاب التعبير)

## अनुवाद

समुरा बिन जुनदब रजिअल्लाहु अन्हो म्हणतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आपल्या सहाबानां नेहमी विचारत असत की काय तुमच्या पैकी कोणी एखादे स्वप्न पाहिले आहे? मग ज्याला अल्लाह ची इच्छा होत होती की वर्णन करावे तर तो वर्णन करीत असे. एक दिवशी प्रेषितानी फर्मावले की आज रात्री दोन येणारे (फरिश्ते अर्थात देवदूत) आले, मला उठवले आणि म्हटले चला, मी त्यांच्या बरोबर निघालो. आम्ही एका अशा माणसाजवळ पोहोचलो जो पहुडलेला होता. आणि दुसरा त्याच्या जवळ मोठा दगड घेऊन उभा होता. जेव्हा तो दगड त्याच्या डोक्यावर मारायचा, तर त्याचे डोके फाडून टाकत असे. मग तो दगड परत येत असे. आणि तो परत तो दगड उचलायचा, त्याच दरम्यान पुन्हा त्या माणसाचे डोके पूर्ववत तसाच व्हायचा जसा पूर्वी होता. माणूस त्याचे बरोबर तसेच वर्तन करायचा जसे पूर्वी केले होते. मी आपल्या दोन्ही साथीदाराना म्हटले, सुबहानल्लाह ! (अल्लाह पवित्र आहे, तो) या दोघांची काय समस्या आहे? त्यानी सांगितले, पुढे चला. आम्ही पुढे गेल्यावर एका माणसाजवळ पोहोचलो. जो आपल्या मानेच्या आधारावर पहुडलेला होता. आणि दुसरा त्याच्या जवळ लोखंडाचा आकडा घेऊन उभा होता. तो त्याच्या तोंडाचा भाग घेत होता. आणि त्याने त्याचा डोळे आणि मानेपर्यंत चिरुन टाकत असे.मग दुसऱ्या दिशेच्या भागाला घेत तसेच करत होता; ज्याप्रमाणे त्याने पहिल्यांदा केले होते. पहिल्या बाजूने तो मोकळा होत नाही की, ती बरी होत असे; आणि पहिल्या स्थितीत परत येत असे. मग पुन्हा तो तसेच करी. मी विचारले सुबहानल्लाह! या दोघांची काय समस्या आहे. माझ्या साथीदारानी सांगितले, पुढे चला. मग आम्ही आगीच्या भट्टी सारख्या

**एका वस्तु जवळ आलो; ज्यात आरडाओरड होत होती. आम्ही तेथे डोकावून पाहिले तर त्यात विवस्त्र स्त्री-पुरुष होते. आणि खालून अग्नीच्या ज्वाळा भडकत होत्या. जेव्हा त्या ज्वाळा त्यांना लपटून घेत तर ते ओरडू लागत. मी विचारले-हे कोण आहेत? माझ्या साथीदारानी उत्तर दिले, पुढे चला. आम्ही पुढे आलो; आणि एका कालव्याजवळ जो रक्तासारखा तांबडा होता त्या कालव्यात एक माणूस पोहत होता. आणि त्या कालव्याच्या काठावर एक दुसरा माणूस होता. ज्याच्या जवळ पुष्कळशे दगड गोळा करुन ठेवले होते. जेव्हा त्या माणसाजवळ तो पोहणारा माणूस येत असे तर तो त्याचे तोंड उघडून त्यात दगड टाकून देत असे. मी आपल्या साथीदारानां विचारले हे कोण आहेत? त्यानी उत्तर दिले पुढे चला. आम्ही पुढे आल्यावर अशा माणसाजवळ पोहोचलो जो दिसायला अत्यंत विद्रुप होता. आणि त्याच्या जवळ आग होती, जी तो पेटवत होता. आणि तिच्या चोहोबाजूनी प्रदक्षिणा घालत होता. मी आपल्या साथीदारानां विचारले, ही काय समस्या आहे. त्यानी सांगितले पुढे चला, पुढे चला. आम्ही पुढे आल्यावर एका हिरव्यागार बागे जवळ पोहोचलो. ज्यात ''रबीअ'' ची फुलं उमलली होती. या बागेच्या मधोमध एक उंच धिप्पाड माणूस उभा होता; ज्याचे डोके खूप उंचावलेले होते; ज्याला मी पाहू शकत नव्हतो. त्या माणसाच्या आजूबाजूला इतक्या मोठ्या संख्येने मुलं होती ज्याना मी कधीही पाहू शकलो नव्हतो. मी आपल्या साथीदारानां विचारले. हे काय आहे आणि हे कोण आहेत? त्यानी सांगितले पुढे चला, पुढे चला मग आम्ही पुढे गेल्यावर एका मोठ्या बागे जवळ पोहोचलो. त्या पेक्षा मोठी आणि सुंदर बाग मी या पूर्वी कधीही पाहिली नव्हती. माझ्या साथीदारानी सांगितले यात चढा, तेव्हा आम्ही त्यात चढलो आणि एका अशा शहरात पोहोचलो, जे सोने आणि चांदीच्या विटानी बनलेले होते. आम्ही या शहराच्या दरवाज्याजवळ पोहोचलो. आणि ते उघडायला सांगितले: तर आमच्या साठी दार उघडले गेले. आणि आम्ही त्यात प्रवेश केला. आम्ही त्यात अशा माणसानां पाहिले ज्यांचे अर्धे शरीर अत्यंत सुंदर होते तर अर्धे शरीर अत्यंत विद्रुप. त्यांनी त्यानां सांगितले, जा, आणि त्या कालव्यात डुबक्या लावा. तो कालवा विस्तीर्ण होता आणि वाहत होता. आणि त्या कालव्याचे पाणी शुद्ध शुभ होते. ते लोक गेले आणि त्या कालव्यात डूबक्या लावल्या मग आमच्या जवळ परतले तर त्यांचा विद्रुपपणा नष्ट झाला होता. आणि ते सुंदर बनले होते. माझ्या साथीदारानी**





**सांगितले. हे ''जन्नते अदन'' (स्वर्ग) आहे. आणि हे तुमचे ठिकाण आहे. मी माझे डोके वर करुन पाहिले; तर पांढरे शुभ् ढगासारखे एक महाल होते. त्यानी मला सांगितले, हे तुमचे ठिकाण आहे. मी बोललो अल्लाह तुम्हास बरकत देवो. मला सोडा म्हणजे मी त्यात प्रवेश करावा असे, ते म्हणाले एवढयात नव्हे. परंतु तुम्ही त्यात निश्चितपणे प्रवेश कराल. मी त्यानां सांगितले. रात्र भर मी विचित्र गोष्टी पाहिल्या .तर हे सर्व काय आहे? त्यानी सांगितले. आम्ही तुम्हाला दाखवून देतो. पहिला तो माणूस ज्याच्या जवळ तुम्ही पोहोचला होता ज्याचे डोके दगडाने ठेचले जात होते; त्याने क़ुरआन प्राप्त करुन त्याचा त्याग केला होता; आणि फर्ज़ नमाज़ सोडून झोपून राहात होता. दुसरा माणूस ज्याच्या जवळ तुम्ही पोहोचला ज्याचा जबडा चिरला जात होता. आणि त्याची नाकपुडी त्याच्या डोळ्या आणि मानेपर्यंत चिरली जात होती; तो माणूस सकाळी आपल्या घरातून निघे आणि खोटे बोले, ज्याचा प्रसार जगात होत असे ज्या स्त्री-पुरुषांना तुम्ही तंदूर मध्ये विवस्त्र पाहिले ते व्यभिचारी पुरुष आणि व्यभिचारी स्त्रीया होत्या आणि ज्या माणसाजवळ तुम्ही पोहोचलात आणि जो पोहत होता; आणि त्याला दगड खाऊ घातले जात होते तो व्याज खाणारा माणूस होता आणि जो माणूस कुरुप दृष्य आगी जवळ होता; आणि त्याला जाळत जात होते. आणि तो त्याच्या चारही बाजूनी प्रदाक्षिण घालीत होता. तो जहन्नम (नरक) चा खजीनदार मालिक होता. आणि बागेत जो उंच धिप्पाड माणूस होता,ते इब्राहीम अलैहिस्सलाम होते...... त्यांच्या आजूबाजूला जी मुलं होती, ती अशी मुलं होती, ज्यांचे मृत्यू नैसर्गिक रित्या झाले होते. काही मुसलमानानी त्यानां विचारले. आणि अनेकेश्वरवादींची मुलं? प्रेषितानी उत्तर दिले अनेकेश्वरादींची मुलं देखील...... उरतात ते लोक ज्यांचे अर्धे शरीर सुंदर आणि अर्धे शरीर विद्रुप होते, ते असे लोक होते ज्यानी आपल्या सत्कर्माबरोबर दुष्कर्मही मिळवले होते. अल्लाह ने त्यांना क्षमा केले.** (बुखारी-किताबुत तअबीर)

## स्पष्टीकरण

ही हदीस जरी लांब आहे तरी विषयाच्या दृष्टीकोनातून फार महत्त्वाची आहे, कारण त्यात मरणोत्तर जीवनातील (कबरीतील) एक झळक दाखवली गेली आहे. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी कबरीतील जगाच्या या घटने चा अनुभव स्वप्नामध्ये दोन फरिश्त्यांबरोबर घेतला. प्रेषिताचे स्वप्न हे अगदी खरे असते. आणि क़ुरआनमध्ये ही प्रेषित सल्लल्लाहु

अलैहि वसल्लम यांच्या स्वप्नाबद्दल म्हटले आहे.

**لَقَدْ صَدَقَ اللّٰهُ رَسُوْلَهُ الرُّؤْيَا بِالْحَقِّ** (سورہ فتح۔۲۷)

"अल्लाह ने आपल्या पैगंबराच्या स्वप्नाला जे सत्यावर आधारित होते, खरे करुन दाखवले" (सूरह फतह -आयत क्र.२७)

म्हणून कबरीच्या जगातील ज्या घटना उपरोक्त हदीस मध्ये वर्णिल्यात आल्या आहेत. त्या अगदी खऱ्या आहेत. आरंभी ज्या चार घटनाचे वर्णन करण्यात आले आहेत, त्यातील पहिली घटना तर अशा माणसाशी संबंधीत आहे, जो क़ुरआनशी गाफिल राहात होता; आणि नमाज़च्या वेळी झोपत होता. त्याची शिक्षा त्याला ही मिळत आहे की त्याचे डोके ठेचले जात आहेत. क़ुरआनचा त्याग करणे याचा अर्थ असा नव्हे की केवळ त्याचे वाचन सोडून दिले जावे तर ते न समजण्याचे प्रयत्न केले जावे ना ही ते आचरणात आणले जावे. पहाटेची वेळ नमाज़ची आणि अल्लाहचे नामस्मरण करण्याची वेळ असते. परंतु ज्याला झोप प्रिय असते. तो सकाळी खूप वेळे पर्यंत झोपलेला असतो. त्याच प्रमाणे रात्री ईशा" ची नमाज़ अदा केल्या शिवाय झोपून जातो. ही झोप त्याच्या डोक्यात भरलेली असते. म्हणून त्याची शिक्षा ही आहे की, त्याचे डोके ठेचून काढण्यात यावे.

दुसरी घटना खोटे बोलणाऱ्याशी संबंधीत आहे, ज्याचे असत्य जगभरात प्रसिद्ध होत होते. हे एका अशा माणसाचे पात्र आहे जो असत्य बोलून आणि खोटा प्रचार करुन उत्पात माजवतो. त्याची शिक्षाही त्याने केलेल्या कृत्याप्रमाणेच दिली जात आहे. म्हणजे त्याचा जबडा चिरला जात आहे.

तिसरी घटना व्यभिचारी पुरुष आणि स्त्रीयांची आहे, ज्याची शिक्षा त्यानी केलेल्या कृत्यानुरुप त्यानाही दिली जात आहे की, ते अग्नीच्या तंदूर मध्ये विवस्त्र आहेत ज्यात खालून ज्वाळा भडकतात. जगात त्यानी अवैध मार्गाने जी चव चाखली त्याचा परिणाम त्याना किती वाईट पद्धतीने भोगावे लागत आहे.

चौथी घटना व्याज खाणाऱ्याची आहे; जो तांबडया कालव्यात झेपत आहे. आणि त्याला दगड खाऊ घातले जात आहेत. तांबडा कालवा रक्ताचा कालवा आहे. आणि व्याज खाणारा वास्तविकपणे लोकांचे रक्ताचे शोषण करतो. आणि संपत्तीचा असा लोभी असतो की त्याचे पोट कधीही भरत नाही. म्हणून त्याचे पोट दगडाने भरले जात आहे. हया कशा यातनामय शिक्षा आहेत ज्या कुकर्म करणाऱ्याना कबरीच्या जगात दिल्या जात आहेत. केवळ अल्लाहचे भय जे या शिक्षा पासून वाचवू शकते

हदीस च्या उरलेल्या विषयात कोणतीही गोष्ट स्पष्टीकरण करण्या सारखी नाही. केवळ हेच की, हज़रत इब्राहीम अलैहिस्सलाम च्या आजूबाजूला जी मुलं होती, त्यांच्या बाबतीत सहाबांनी प्रश्न केल्यावर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी हे सांगितले की, त्यात अनेकेश्वरवादींची मुलंही सामील आहेत कारण त्याचे मृत्यू देखील प्राकृतिकरित्या झाले होते. अजून ते तरुण झाले नव्हते. की शिष्टाचारयुक्त ठरवले जावोत. आणि प्रत्येक माणूस एकेश्वरवादावरच जन्म घेतो. आणि हे मानवाचे परिपूर्ण निसर्ग आहे.





# ईमानधारका च्या खऱ्या स्वप्नाची श्रेष्ठता

## हदीस

**عَنْ اَنَسٍ رَضِىَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ النَّبِىُّ صلى الله عليه وسلم : مَنْ رَاٰنِىْ فِى الْمَنَامِ فَقَدْ رَاٰنِىْ فَاِنَّ الشَّيْطٰنَ لَا يَتَخَيَّلُ بِىْ وَ رُؤْيَا الْمُؤْمِنِ جُزْؤٌ مِنْ سِتَّةٍ وَّاَرْبَعِيْنَ جُزْءً مِّنَ النُّبُوَّةِ.** (البخاری کتاب التعبیر)

## अनुवाद

**अनस रजिअल्लाह अन्हो म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात -ज्याने मला स्वप्नात पाहिले त्याने खरोखरच मला पाहिले कारण सैतान माझे रुप धारण करू शकत नाही. आणि ईमानधारकाचे स्वप्न प्रेषित्वाच्या शेहचाळीसव्या भागामधून एक भाग आहे.** (बुखारी - किताबुत तअबीर)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वस्ल्लमच्या म्हणण्याचा अर्थ म्हणजे ज्याने मला स्वप्नात पाहिले त्याने खूरोखरच मला पाहिले; मागील हदीस मध्ये सांगण्यात अला आहे. काझी अयाज़ म्हणतात.

**يحتمل ان يكون المراد بقوله فقد رانى اوفقد راى الحق ان من راه على صورته فى حياته كانت رؤياه حقا ومن راه على غير صورته كانت رؤياه تاويل .**

(فتح الباری۱۲ ص ۲۲۳)

"प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या या म्हणण्याचा अर्थ की, खरोखरच त्याने मला पाहिले किंवा त्याने वास्तविकपणे पाहिले, संशयास्पद आहे. हा अर्थ ही होऊ शकतो, ज्याने या रुपात त्याना पाहिले, जे त्यांच्या आयुष्यात होते. तर पाहणाऱ्याचे स्वप्न खरे आहे. आणि ज्याने दुसऱ्या एखाद्या रुपात त्यांना पाहिले तर ते स्वप्न स्पष्टीकरणास पात्र आहे."

आता कोण हे ठामपणे सांगू शकतो की त्याने ज्या रुपात प्रेषितांना पाहिले, ते तेच रुप आहे. जे त्यांच्या पवित्र जीवनात होते. आणि जेव्हा ही गोष्ट पवित्र सहाबा शिवाय कोणीही ठामपणे सांगू शकत नाही तर त्यांचे स्वप्नात त्याना पाहणे संशयास्पदच आहे.

दुसरी गोष्ट जी या हदीस मध्ये वर्णन करण्यात आली आहे. ती ही आहे की, ईमानधारकाचे स्वप्न हे प्रेषित्वाच्या शेहचाळीसव्या भागा पैकी एक भाग आहे. हे एक उदाहरणादाखल केलेले वर्णन आहे. ज्याचा अर्थ असा आहे की ईमानधारक जर सत्य स्वप्न पाहून घेतो, ज्याचा संबंध भविष्यात उद्‌भवणाऱ्या एखाद्या घटनेशी आहे तर हे एका तऱ्हेने प्रेषितत्वाच्या त्या वैशिष्ठ्याशी समानता राखणारी गोष्ट आहे की एक पैगंबर ईश्वरीय आदेशाच्या आधारावर भविष्यातील घटनांचे वर्णन करतो. यामुळे ईमानधारकाच्या खऱ्या स्वप्नाचे श्रेष्ठत्व तर जाणवतो. परंतु त्याचा मुळीच असा अर्थ नाही की जो ईमानधारक खरे स्वप्न पाहतो, तर त्याच्यात प्रेषित्वाचे एखादे वैशिष्ठ्य निर्माण झाले असावे. हदीसच्या शब्दामध्ये हा अर्थ लावण्याची जागा अजिबात नाही. आणि ना ही ईमानधारकाचे एखादे स्वप्न शरीअतच्या आदेशा प्रमाणे आहे. म्हणून ''बुखारी'' चे भाष्यकार हाफिज इब्ने हजर स्पष्ट करतात की-

فَقَدُ صَرَحَ الْاَئِمَّةُ بِاَنَّ الْاَحُكَامَ الشَّرُعِيَّةَ لَا تَثْبُتُ بِذٰلِکَ .

(فتح الباری ج ۲ ص ۳۲۵)

''ईमामानी स्पष्ट केले आहे की शरीअतचे आदेश याच्याने (अर्थात स्वप्नानी) सिध्द होत नाहीत.''





# स्वप्न खरेही आणि खोटे ही

## हदीस

عَنُ اَبِیُ قَتَادَۃَ قَالَ قَالَ النَّبِیُّ صلی اللہ علیہ وسلم : الرُّؤُيَا الصَّالِحَةُ مِنَ اللّٰهِ وَ ا لُحُلُمُ مِنَ الشَّيُطَانِ فَمَنُ رَأَى شَيُئًا يَكُرَهُهٗ فَلْيَنُفِثُ عَنُ شِمَالِهٖ ثَلَاثًا وَّلُيَتَعَوَّذُ مِنَ الشَّيُطَانِ فَاِنَّهَا لَا تَضُرُّهٗ وَ اِنَّ الشَّيُطَانَ لَايَتَزَا يَابِیُ . (البخاری کتاب التعبیر)

## अनुवाद

**अबू कत्तादा म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- चांगले स्वप्न अल्लाह कडून आहे. आणि वाईट स्वप्न सैतानाकडून. तर जो कोणी माणसाने नावडती वस्तु पाहून घ्यावी, तर त्याने तीन वेळा आपल्या डाव्या बाजूस फुंक मारावी आणि सैतानाशी संरक्षण मागावे, मग त्याला हानी पोहचणार नाही. आणि सैतान माझे रुप धारण करु शकत नाही. (बुखारी - किताबुत -तअबीर)**

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये दोन प्रकारच्या स्वप्नाचे वर्णन करण्यात आले आहे. एक चांगले आणि सत्य स्वप्न आणि दुसरे वाईट आणि असत्य स्वप्न. चांगले आणि खरे स्वप्न अल्लाह कडून असतात. आणि ते ईमानधारकाला, जसे की हदीस मध्ये नमूद आहे खुषखबरीला कारणीभूत ठरतात. सर्व साधारण पणे खरे स्वप्न अत्यंत सूक्ष्मशैलीत असतात. म्हणून ते समजण्याकरिता ''तअबीर'' (स्वप्नाचे स्पष्टीकरण) ची आवश्यकता असते. काही वेळा माणूस भविष्यात उद्‌भवणाऱ्या एखाद्या घटनेला पाहून घेतो, आणि पुढे ती घटना घडते. उदा. एखाद्या सज्जनाचा ''जनाज़ा'' (प्रेत यात्रा) पाहिला; आणि काही दिवसानीच त्याच्या मृत्यूची बातमी आली; किंवा कुठे तरी भयंकर आग पाहिली. आणि नंतर दंगेधोपे सुरु झाले. जणू आगीचे संकेत दंगेधोत्याच्या आगीकडे होते. या स्वप्नाचे खरे ठरणे अल्लाह ची एक निशाणी आहे. आणि या गोष्टी चा विश्वास निर्माण करते की तो अल्लाह आहे; ज्याने प्रत्येक गोष्टीची पहिल्यापासून योजना (अर्थात भाग्य) आखली आहे. अन्यत: एखादी घटना घडण्यापूर्वी माणूस का म्हणून ते स्वप्नात पाहू शकतो. आणि जेंव्हा खऱ्या स्वप्नात अल्लाहची निशाणी आहे; जी चिंतण मनन करण्याचे आमंत्रण देते. तर काही वेळा अल्लाह काफिरांना देखील सत्य स्वप्न दाखवतो. जसे ''अज़ीज़े मिस्र'' (इजिप्त चे राजे)

याला दुष्काळासंबंधी स्वप्न दाखवले गेले होते.

चांगल्या आणि खऱ्या स्वप्नाची वास्तविकता केवळ इतकीच आहे अन्यत: यांच्यामुळे एखादा शरीअतचा आदेश सिद्ध होत नाही, आणि ना ही एखाद्यांचे चांगले आणि खरे स्वप्न दुसऱ्या माणसासाठी पुरावा असते.

दुसऱ्या प्रकारचे स्वप्न जे वाईट आणि खोटे असतात, ‘‘हलम अणि एहलाम’’ म्हटले जातात.हे सैतानाकडून असतात. सैतान वाईट स्वप्नांच्या सहाय्याने दु:ख आणि भय निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. आपसात दुराग्रह निर्माण करण्यासाठी विचित्र गोष्टींचा प्रचार करतो आणि मार्गभ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतो.जर माणसाने वाईट स्वप्न पाहून घेतले तर त्याच्या होणाऱ्या वाईट परिणामांपासून सावध राहण्याचा मार्ग हदीस मध्ये असा सांगितला गेला आहे की, त्याने तीन वेळा डाव्या बाजूला फुंकावे; हा जणू सैतानाच्या दुष्परिणामापासून सावध राहण्याचा मानसशास्त्रीय तोडगा आहे. त्याच बरोबर सैतानापासून अल्लाहचे संरक्षणाची याचना करावी. म्हणजे त्याने **اعوذ باللّٰہ من الشیطن الرجیم** असे म्हणावे.

स्वप्नाचे हे प्रमुख दोन प्रकार आहेत; ज्याचे वर्णन हदीस मध्ये करण्यात आले आहे. स्वप्नाचा एक तिसरा प्रकार हदीस ‘‘नफ्स’’ (आत्म्याचे स्वप्न देखील आहे. ज्यात माणसाचा आत्माच बोलतो. आणि हे बोलणे एखाद्या आजार वगैरे मुळेच होत असते. उदाहरणार्थ पोटाचा आजार वगैरे असेल तर तो भयानक स्वप्न पाहू लागतो किंवा माणूस ज्या कामामध्ये व्यस्त असतो; त्यांच्या संबंधी स्वप्नांमध्ये ही काही गोष्टी पाहून घेतो. अशी स्वप्ने ‘‘तअबीर’’ (स्वप्नाचे स्पष्टीकरण) साठी नसतात.

या हदीस मुळे हे देखील स्पष्ट झाले आहे की स्वप्नात जेव्हा सैतान बहकवण्याचा प्रयत्न करतो, तर कोणत्याही माणसाचे स्वप्न मग ते एखाद्या ‘‘बुजुर्ग’’ (धर्मगुरु) चे ही का असेना, ना ही त्याच्यासाठी ‘‘हुज्जत’’ (पुरावा) असू शकतो आणि ना ही दुसऱ्या करिता. हुज्जत शरीअतचे आदेश आहेत. स्वप्न नव्हेत. केवळ सर्व प्रेषित अलैहिस्सलाम त्यास अपवाद आहेत. त्यांची स्वप्नं ‘‘रुययाए सादिक़ा’’ अर्थात सत्य स्वप्न असतात. आणि सैतान त्यात हस्तक्षेप करु शकत नाही.

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी हे देखील फर्मावले आहे की सैतान माझे रुप धारण करु शकत नाही. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, त्यांची खरोखरची जी आकृती किंवा रुप आहे; ते सैतान धारण करु शकत नाही. आता ही बाब की प्रेषितांचे रूप कसे होते; हे त्याच लोकांना माहित असू शकते, ज्यानी त्यांना आपल्या आयुष्यात पाहिले. परंतु नंतरच्या लोकांनी, ज्यानी त्यांना पाहिलेच नाही, तर ते कोणत्या आधारावर म्हणू शकतात की स्वप्नात त्यानी जी आकृती पाहिली ती प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचीच होती. काय सैतान दुसरे कोणतेही रुप धारण करुन विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करु शकत नाही की, ही आकृती प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमची आहे? म्हणून नंतरच्या लोकांचे स्वप्न हे संदिग्धच असू शकतात.





# कुर्आनची आवड आणि त्याची जाणीव

# कुरआन च्या सुगंधाने दरवळणारा

## हदीस

عَنْ اَبِىْ مُوسىٰ عَنِ النَّبِىِّ ﷺ قَالَ مَثَلُ الَّذِىْ يَقْرَأُ الْقُرْآنَ
كَالْاُتْرُجَّةِ طَعْمُهَا طَيِّبٌ وَ رِيْحُهَا طَيِّبٌ وَّ الَّذِىْ لَا يَقْرَأُ الْقُرْآنَ كَالتَّمْرَةِ
طَعْمُهَا طَيِّبٌ وَّلَا رِيْحَ لَهَا وَ مَثَلُ الْفَاجِرِ الَّذِىْ يَقْرَأُ الْقُرْآنَ كَمَثَلِ
الرَّيْحَانَةِ رِيْحُهَا طَيِّبٌ وَّطَعْمُهَامُرٌّوَّمَثَلُ الْفَاجِرِ الَّذِىْ لَايَقْرَأُ الْقُرْآنَ
كَمَثَلِ الْحَنْظَلَةِ طَعْمُهَا مُرٌّ وَّلَا رِيْحَ لَهَا. (البخاری کتاب فضائل القرآن)

## अनुवाद

**हज़रत अबू मूसा कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-ईमानधारकाची उपमा, जो क़ुरआन पठण करतो आणि ते आचरणात आणतो, तुरुंज (मोसंबी) सारखी आहे ज्याची चवही चांगली असते आणि सुगंधही चांगला असतो. आणि त्या ईमानधारकाची उपमा जो क़ुरआन पठण करीत नाही; आणि ते आचरणात आणतो, त्या खजूरी सारखी आहे जिची चव चांगली परंतु त्यात सुगंध राहात नाही. आणि दांभिकाची उपमा जो क़ुरआन पठण करतो, सुगंधित रोपासारखी आहे, ज्याचा सुगंध चांगला परंतु चव कडवट, आणि त्या दांभिकाची उपमा जो क़ुरआन पठण करीत नाही ''हनज़ला'' सारखी आहे. जिची चव कडवट आणि वासही कडवट.**(बुखारी- किताब फजाईलुल क़ुरआन)

## स्पष्टीकरण

वरील सर्व उपमांमध्ये सर्वोत्कृष्ट उपमा त्या ईमानधारकाची आहे. जो क़ुरआन पठण करतो. आणि ते आचरणात आणतो. क़ुरआन पठणचा अर्थ ते समजून वाचन करणे होय; कारण येथे ज्या श्रेष्ठतेचे वर्णन केले गेले आहे, ती अशाच माणसाची आहे. आणि जेव्हा





तो ते आचरणात आणतो तर त्याच्यावर ''मोसंबी'' ची उपमा पूर्णपणे खरी ठरते. तिची चवही चांगली आणि सुगंध ही चांगला. अशा तऱ्हेने ईमानधारक क़ुरआनच्या माध्यमाने नखशिखांत कल्याणकारी बनतो; आणि क़ुरआनच्या सुगंधाने दरवळू लागतो. परंतु जो ईमानधारक क़ुरआन पठण करीत नाही. परंतु ते आचरणात आणतो, त्याची उपमा खजूरीने दिली गेली आहे; जिची चव चांगली असते; परंतु त्यात सुगंध राहात नाही. क़ुरआन पठण न करण्याचा अर्थ असा नव्हे की तो क़ुरआन अजिबात वाचतच नसावा. कारण क़ुरआन पठणाशिवाय नमाज कशी अदा होईल. आणि क़ुरआन आचरणात आणण्याची गोष्ट कशी खरी ठरेल.उलट अर्थ असा आहे की, क़ुरआन अत्यंत आवडीने वाचन करण्याचा बंदोबस्त तो करीत नाही. म्हणून तो क़ुरआनच्या सुगंधापासून वंचित आहे.

तिसरे उदाहरण त्या दांभिकाचे आहे जो क़ुरआन वाचन करतो. सुवासिक रोपाप्रमाणे त्याचे बाहय प्रकटन चांगले आहे. परंतु आंतरंग कडवट आहे. चौथे उदाहरण अशा दांभिकाचे आहे जो क़ुरआन पठण करीत नाही. त्याचे बाहयांग ही वाईट आणि आंतरंग ही वाईट म्हणून त्याच्या साठी ''हनज़ला'' ची उपमा खरी ठरते. ज्याची चवही कडवट आणि ज्याचा वासही कडवट.

---

اَلَّذِيْنَ اٰتَيْنٰهُمُ الْكِتٰبَ يَتْلُوْنَهٗ حَقَّ تِلَاوَتِهٖ .

( سوره بقره: ۱۲۱ )

**ज्या लोकानां आम्ही ग्रंथ प्रदान केले आहे. ते त्यास असे वाचतात, जसे ते वाचण्याचा हक्क आहे.**
(सूरह बकर - आयत क्र. १२१)

# क़ुरआन तज्ञ

## हदीस

عَنْ عَائِشَةَ قَالَتْ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَلْمَاهِرُ بِالْقُرْآنِ مَعَ السَّفَرَةِ الْكِرَامِ الْبَرَرَةِ، وَالَّذِىْ يَقْرَأُ الْقُرْآنَ وَ يَتَتَعْتَعُ فِيْهِ ، وَهُوَ عَلَيْهِ شَاقٌّ ، لَهٗ اَجْرَانِ . (مسلم کتاب فضائل القرآن)

## अनुवाद

**हज़रत आयशा रज़िअल्लाह अन्हा कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात, क़ुरआन तज्ञ त्या फरिशत्यांसोबत आहे जे क़ुरआन लिहिणारे प्रतिष्ठित आणि एकनिष्ठ आहेत. आणि जो क़ुरआन अडखडत वाचतो. आणि त्याचे वाचन करणे त्याला कठिण होऊन बसते; त्याच्या करिता दुप्पट मोबदला आहे.** (मुस्लिम किताब-फजाईलुल क़ुरआन)

## स्पष्टीकरण

क़ुरआनचा तज्ञ शी अभिप्रेत तो माणूस आहे. जो क़ुरआन पठणात, ते समजण्यात तरबेज आहे. आणि त्यानुसार त्याचे आचरण देखील आहे. अशा माणसा ला या गोष्टीची शुभवार्ता दिली गेली आहे की, त्याला त्या दोन फरिश्त्यांची सोबत प्राप्त आहे; जे आकाशात क़ुरआनचे लिखाण करतात, ते अत्यंत आदरणीय आहेत, सदाचारी आहेत आणि एकनिष्ठ आहेत; सूरह ''अबस'' आयत क्रमांक १३ ते १६ मध्ये क़ुरआन आणि ते लिहिणाऱ्यां संदर्भात म्हटले आहे:

فِىْ صُحُفٍ مُّكَرَّمَةٍ مَّرْفُوْعَةٍ مُّطَهَّرَةٍ بِاَيْدِىْ سَفَرَةٍ كِرَامٍ بَرَرَةٍ .

''आदर पात्र पाना (पत्रिका) मध्ये आहे. जो पठण करील त्याचा दर्जा उंच होईल व तो स्वच्छ पाक होईल. मर्तबा राखणारे हात याला लिहितात. जे सन्माननीय आणि नेक सदाचारी आहेत.'' (आयत १३ ते १६ )

क़ुरआन तोंडपाठ करुन घेणे देखील अत्यंत श्रेष्ठत्वाची गोष्ट आहे परंतु जो ''हाफिज'' (संपूर्ण क़ुरआन तोंड पाठ असलेली व्यक्ती) कधी क़ुरआन समजण्याचा प्रयत्न करीत





नाही; आणि ना ही ते आचरणात आणतो, त्याच्यासाठी हे श्रेष्ठत्व नाही. तर उलट पक्षी अशा लोकांना या गोष्टीचे उत्तर द्यावे लागेल की, ते क़ुरआन समजण्याकडे का दुर्लक्ष करीत राहिले. आणि ते आचरणात आणून आपले जीवन का समृद्ध करुन घेतले नाही.

उपरोक्त हदीस मध्ये दुसरी गोष्ट ही नमूद करण्यात आली आहे. ज्या माणसाला क़ुरआन वाचण्यात आपल्या जिभेच्या तोतरेपणामुळे अडथळा निर्माण होत असेल. परंतु असा अडथळा असून देखील तो क़ुरआन वाचण्याचे प्रयत्न करीत असेल आणि जरी तो वेगाने वाचू शकत नसेल, परंतु तरीही जिभेचा अडथळा असून देखील त्याचे क़ुरआन वाचन अल्लाहपाशी फारच मोठया कदरीची बाब आहे. आणि त्यावर तो दुहेरी मोबदल्यास पात्र आहे.

# न समजता क़ुरआन वाचन करणारे

## हदीस

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عَمْرٍ و اَنَّ النَّبِىَّ ﷺ قَالَ : لَمْ يَفْقَهْ مَنْ قَرَاءَ الْقُرْآنَ فِىْ اَقَلَّ مِنْ ثَلَاثٍ . (ترمذی ابواب القرأت)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन अमरू कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- ज्याने तीन दिवस पेक्षा कमी दिवसात क़ुरआन वाचून काढले, तो काहीही समजला नाही. (तिर्मिजी -अबवाबुल-किरआत)**

## स्पष्टीकरण

स्पष्ट आहे की जो माणूस तीन दिवसापेक्षाही कमी वेळात क़ुरआन वाचन संपवेल तो अल्लाहच्या या वाणीवरुन ओझरतेपणाने निघून जाईल. आणि त्याचा अर्थबोध व ते समजून घेण्याकडे अजिबात लक्ष देणार नाही. एक अरबी भाषेचा जाणकार देखील जर असे वाचन करीत असेल; तर या उपरोक्त हदीस नुसार तो अप्रिय ठरला गेला आहे. म्हणून यामुळे ही गोष्ट आपोआप स्पष्ट आहे की क़ुरआन वाचन या शब्द प्रयोगाने केवळ जिभेने शब्द उच्चारणे असा अर्थ होत नाही. तर त्याच बरोबर ते समजण्याचा प्रयत्न करणे देखील आहे.

# हेवा कोणी करायला हवा

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ لَا تَحَاسُدَ اِلَّا فِی اثْنَتَیْنِ رَجُلٌ اٰتَاهُ اللّٰهُ الْقُرْآنَ فَهُوَ یَتْلُوْهُ اٰنَآءَ الَّیْلِ وَاٰنَآءَ النَّهَارِ فَهُوَ یَقُوْلُ لَوْ اُوْتِیْتُ مِثْلَ مَآ اُوْتِیَ هٰذَا لَفَعَلْتُ كَمَا یَفْعَلُ وَرَجُلٌ اٰتَاهُ اللّٰهُ مَالاً فَهُوَ یُنْفِقُهٗ فِیْ حَقِّهٖ فَیَقُوْلُ لَوْ اُوْتِیْتُ مِثْلَ مَا اُوْتِیَ عَمِلْتُ فِیْهِ مِثْلَ مَا یَعْمَلُ .(البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हजरत अबू हुरैरा कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात, हेवा करणे केवळ दोनच माणसानी उचित, एक तो ज्याला अल्लाह ने क़ुरआन प्रदान केले आहे; तर तो रात्र दिवसांच्या क्षणामध्ये त्याचे वाचन करीत असतो. अशा माणसाला पाहून दुसरा माणूस म्हणतो. जर मलाही अशी वस्तु दिली गेली असती तर मी देखील हेच केले असते. आणि दुसरा तो माणूस ज्याला अल्लाह ने धनसंपत्ती दिली तर तो त्या संपत्तीचे हक्क अदा करण्यात खर्च करतो. अशा माणसाला पाहून दुसरा माणूस म्हणतो की मला देखील जर ही गोष्ट मिळाली असती तर मी ही असेच केले असते.** (बुखारी-किताबुत-तौहीद)

## स्पष्टीकरण

लोक धनिक लोकांना पाहून हेवा करतात की आम्हाला ही असे धन प्राप्त झाले असते, आणि एखाद्या मोठया हुद्यावर असलेल्या माणसाला पाहून हेवा करतात की आम्हाला देखील हुद्दा मिळाला असता. या हेव्यापाठी मागे लोकाना ऐहिक वैभव हवे असते. या सर्व गोष्टींचा जर कोणता लाभ असेल तर तो केवळ जगाच्या तात्पुरत्या जीवना पुरताच सीमित असतो. म्हणून अशा गोष्टीची इर्श्या बाळगणे निरर्थक आहे. आखिरतच्या सदैव राहणाऱ्या यशासंबंधी ज्या लोकांना पाहून हेवा केला जाऊ शकतो त्यांची दोन उदाहरणं या हदीस मध्ये सादर करण्यात आली आहेत. एक तर तो माणूस ज्याला क़ुरआन ची संपत्ती जे प्राप्त झाली आहे; आणि तो रात्रंदिवस त्याच्या तिलावते म्हणना वाचनात मग्न आहे ''तिलावत'' अर्थात वाचन या शब्दाशी केवळ क़ुरआन न समजता वाचन करणे हा अर्थ अभिप्रेत नाही.





ज्यांना उद्देशून हे विधान केले गेले आहे ते व त्याची मातृभाषा अरबी होती म्हणून जेंव्हा ते क़ुरआन ची तिलावत करीत तर त्याचा अर्थ त्यांच्या लक्षात येऊन जात असे. म्हणून हदीस मध्ये क़ुरआन समजून वाचन करण्याबद्दलचे स्पष्टीकरण करण्यात आले नाही. आणि ही गोष्ट तर इतकी उघड आहे की, अशा माणूस कसा हेव्यास पात्र होऊ शकतो जो क़ुरआन ची तिलावत तर रात्रंदिवस करीत राहतो परंतु आयुष्यात एकदा ही त्याने क़ुरआन समजून वाचन करण्याचा प्रयत्न केला नाही. आणि यामुळे त्याला क़ुरआन पासून जे लाभ मिळायला हवे; ते मिळू शकत नाही. त्याने ज्या पद्धतीने क़ुरआन ची कदर करायला हवी होती, त्याचा अर्थ समजण्याकडे दुर्लक्ष करुन त्याची कदर केली नाही. पवित्र क़ुरआन मध्ये तर या ईश्वरीय ग्रंथ चे वाचन करणाऱ्याची जेथे स्तुति केली गेली आहे. तेथेच त्यांचे हे वैशिष्ट्य ही वर्णन करण्यात आहे की,(بقرہ:۱۲۱) يَتْلُوْنَهٗ حَقَّ تِلَاوَتِهٖ अर्थात ''ते त्याची अशा पद्धतीने तिलावत करतात ज्या पद्धतीने तिलावत करण्याचा हक्क आहे.'' (सूरह बकरा-आयत क्र. १२१). उघड आहे की, तिलावत करण्याचा हक्क यात त्याचा अर्थ समजणे आणि ते आचरणात आणणे हे दोन्ही अर्थ अभिप्रेत आहे. आणि तिलावत या शब्दाच्या अति विशाल अर्थामध्ये आचरणात आणणे या अर्थाचा देखील समावेश आहे. मग पांरपारिक पद्धतीने तिलावत करणारा माणूस का म्हणून हेव्यास पात्र ठरला जाऊ शकतो? वास्तविकपणे या हदीस मध्ये रात्रंदिवस क़ुरआनची तिलावत करणाऱ्या माणसाला जे हेव्यास पात्र ठरवले गेले आहे.तर त्यामुळे त्याची क़ुरआनशी असलेली आवड त्याने त्यात गर्क असण्याची स्तुति करणे हा अर्थ आभिप्रेत आहे. उरतो तो दुसरा माणूस जो हेव्यास पात्र आहे तर तो या अर्थाने की त्याला भरपूर संपत्ती मिळाली. आणि तो या संपत्तीचा हक्क अदा करण्यासाठी (गरजवंताना सहाय्य करण्यासाठी) रांत्रदिवस खर्च करीत आहे. आणि एका अन्य कथनात. -فَهُوَ يُهْلِكُهٗ فِى الْحَقِّ अर्थात तो सत्याच्या मार्गात बेहिशेब खर्च करीत आहे.''(बुखारी-फजाईलुल क़ुरआन) म्हणजे श्रीमंत होणे ही फार मोठी गोष्ट नव्हे. तर मोठी गोष्ट ही आहे की, माणसाने जास्तीत जास्त खर्च करावे. लोक पैसे कमवतात परंतु ते खर्च करण्याच्या बाबत कंजूशी करतात. ते समजात की जी संपत्ती त्यांना प्राप्त झाली आहे. ती केवळ त्यांच्या स्वत: साठी किंवा आपल्या संतानच्या खर्चा साठीच आहे. म्हणून त्यांना स्वत:ची बँकेतील शिल्लक वाढवण्याचीच काळजी जास्त राहते परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्या संपत्ती मध्ये इतर लोकांचाही अधिकार असतो. उदाहरणार्थ जवळच्या नातेवाईकांचे अधिकार गरीब आणि गरजवंतांचे अधिकार,धर्माचे प्रचार व प्रसार, धर्माचे प्रभुत्व आणि अल्लाहचा कलिमा (एकेश्वरवाद) ची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न आणि जिहाद या सारख्या बाबींवर खर्च करणे होय. मग जो माणूस या सर्वबाबींवर आपल्या संपतीतून बेहिशेब पैसे खर्च करतो. निश्चिपणे हेव्यास पात्र आहे. कारण तो आपली संपत्ती अल्लाहकडे जमा करीत आहे आणि अल्लाह कियामतीच्या दिवशी किती तरी पटीने वाढवून ती परत करणार आहे. या म्हणण्याशी या सर्वावर मिळणारा मोठा मोबदला अभिप्रेत आहे.

# देखावा पुण्यकर्माचा सर्वनाश करतो

## हदीस

عَنْ سُلَيْمَانَ بْنِ يَسَارٍ قَالَ : تَفَرَّقَ النَّاسُ عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ فَقَالَ لَهٗ نَاتِلُ اَهْلِ الشَّامِ اَيُّهَاالشَّيْخُ ! حَدِّثْنَا حَدِيْثاً سَمِعْتَهٗ مِنْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ اِنَّ اَوَّلَ النَّاسِ يُقْضٰی يَوْمَ الْقِيَامَةِ عَلَيْهِ، رَجُلٌ اُسْتُشْهِدَ. فَأُتِیَ بِهٖ فَعَرَّفَهٗ نِعَمَهٗ فَعَرَفَهَا قَالَ فَمَا عَمِلْتَ فِيْهَا؟ قَالَ: قَاتَلْتُ فِيْکَ حَتّٰی اُسْتُشْهِدْتُ قَالَ: كَذَبْتَ وَلٰكِنَّکَ قَاتَلْتَ لِأَنْ يُقَالَ جَرِئٌ . فَقَدْقِيْلَ ثُمَّ اُمِرَ بِهٖ فَسُحِبَ عَلٰی وَجْهِهٖ حَتّٰی اُلْقِیَ فِی النَّارِ. وَرَجُلٌ تَعَلَّمَ الْعِلْمَ وَ عَلَّمَهٗ وَقَرَأَ الْقُرْآنَ. فَأُتِیَ بِهٖ فَعَرَّفَهٗ نِعَمَهٗ فَعَرَفَهَا قَالَ : فَمَا عَمِلْتَ فِيْهَا؟ قَالَ تَعَلَّمْتُ الْعِلْمَ وَعَلَّمْتُهٗ وَ قَرَأْتُ فِيْکَ الْقُرْآنَ قَالَ:كَذَبْتَ وَلٰكِنَّکَ تَعَلَّمْتَ الْعِلْمَ لِيُقَالَ عَالِمٌ . وَقَرَأْتَ الْقُرْآنَ لِيُقَالَ هُوَ قَارِئٌ. فَقَدْقِيْلَ. ثُمَّ اُمِرَبِهٖ فَسُحِبَ عَلٰی وَجْهِهٖ حَتّٰی اُلْقِیَ فِی النَّارِ.وَرَجُلٌ وَسَّعَ اللّٰهُ عَلَيْهِ وَ اَعْطَاهُ مِنْ اَصْنَافِ الْمَالِ كُلِّهٖ فَأُتِیَ بِهٖ فَعَرَّفَهٗ نِعَمَهٗ فَعَرَفَهَا. قَالَ: فَمَا عَمِلْتَ فِيْهَا؟ قَالَ: مَاتَرَكْتُ مِنْ سَبِيْلٍ تُحِبُّ اَنْ يُّنْفَقَ فِيْهَا اِلَّا اَنْفَقْتُ فِيْهَا لَکَ قَالَ : كَذَبْتَ وَلٰكِنَّکَ فَعَلْتَ لِيُقَالَ هُوَ جَوَادٌ فَقَدْ قِيْلَ ثُمَّ اُمِرَ بِهٖ فَسُحِبَ عَلٰی وَجْهِهٖ. ثُمَّ اُلْقِیَ فِی النَّارِ. (مسلم كتاب الامارات)

## अनुवाद

सुलेमान बिन यसार म्हणतात की जेव्हा लोक अबु हुरैरा रजिअल्लाह जवळून निघून गेले तर नातिल जो शामचा (सीरिया)राहणारा होता, बोलला





हे शेख ! मला एक हदीस ऐकवा, जी तुम्ही अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या कडून ऐकली आहे. अबु हुरैरा म्हणाले होय मी अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावताना ऐकले आहे की कियामती च्या दिवशी सर्वप्रथम ज्या माणसा चा फैसला होईल तो एक माणूस असेल जो शहीद झाला होता. त्याला आणले जाईल. आणि अल्लाह त्याला आपल्या उपकाराची आठवण करून देईल; तर तो ते सर्व आठवेल. अल्लाह विचारेल हे सर्व प्राप्त केल्यावर तू कोणते कर्म केलेस? तो म्हणेल मी तुझ्या मार्गात लढलो येथ पावेतो की शहीद झालो. अल्लाह फर्माविल तू खोटे बोलतोस. तू यासाठी लढला की शूर म्हटला जावा. तर तू शूर म्हटला गेलास. मग आदेश होईल की याला तोंडघशी पाडीत नरकात टाकून देण्यात यावे. आणि एका माणसाला आणले जाईल. ज्याने ज्ञान प्राप्त केले होते. आणि शिकवले होते. आणि क़ुरआन वाचले होते. अल्लाह त्याला आपल्या उपकारांची आठवण करून देईल. तर त्याला त्यांची आठवण येईल, मग अल्लाह विचारेल तू हे सर्व प्राप्त करून कोणते कर्म केले? म्हणेल मी ज्ञान प्राप्त केले. आणि शिकवले आणि तुझ्या साठी क़ुरआन वाचन केले अल्लाह फर्माविल. तु खोटे बोलतोस तू या करिता ज्ञान प्राप्त केले होतेस की तू आलिम (ज्ञानी) म्हटला जावा. आणि क़ुरआन यासाठी वाचला होतास की ''कारी'' (क़ुरआन चे वाचन करणारा) म्हटला जावा. तर तुला आलिम व कारी म्हटले गेले. मग आदेश होईल की याला तोंडघशी पाडीत नरकात टाकून देण्यात यावे. आणखी एका माणसाला आणले जाईल. ज्याला अल्लाह ने संपन्नता मिळवून दिली होती. आणि अनेक प्रकारची धनसंपत्ती दिली होती. अल्लाह त्याला आपल्या उपकारांची आठवण करून देईल; तर त्याला ते सर्व आठवेल. मग अल्लाह विचारेल की, तू हे सर्व प्राप्त करुन कोणते कर्म केले? तो म्हणेल, मी त्या प्रत्येक मार्गात खर्च केले जे तुला आवडणारे होते, अल्लाह ने फर्मावले तू खोटे बोलत आहेस. तू या करिता खर्च केला की, दानशूर म्हटला जावा. तर तू दानशूर म्हटला गेलास. मग आदेश होईल तर त्याला तोंडघशी पाडीत नरकात टाकून दिले जाईल.

(मुस्लिम - किताबुल अमारात)

१२

## स्पष्टीकरण

ही हदीस ईमानधारकांना खडबडून जागे करणारी आहे. सत्कर्म किती का महान असेना जर त्यात ''रिया'' (देखावा) सामिल असेल तर ते व्यर्थ जाणारे आहे. अल्लाह तर केवळ त्याच सत्कर्मानां कबूल करतो. जे केवळ त्याच्या प्रसन्नते साठी केले गेले असावे.

शहीद चे स्थान किती महान आहे, परंतु ते त्यावेळी आहे. जेव्हा ते अल्लाहला प्रसन्न करण्यासाठी लढलेला असावा. जर शहीद म्हणविण्यासाठी आणि प्रसिद्धी प्राप्त करण्यासाठी लढला तर उलट तो शिक्षेस पात्र ठरेल.

क़ुरआन पठण करणारे आणि त्याचे ज्ञान प्राप्त करणे आणि दुसऱ्यानां त्यांचे शिक्षण देणाऱ्याचा दर्जा किती महान आहे; पण हे त्याच वेळी आहे जेव्हा त्यामुळे अल्लाहला प्रसन्न करणे हे उद्दिष्ट असावे. जर हे सत्कर्म 'क़ारी' आणि 'आलिम' म्हणविण्यासाठी केले होते तर त्यावर तो मोबदल्याचा नाही तर शिक्षेस पात्र राहील. आज क़ुरआन चे किती क़ारी आहेत जे क़िराअतच्या कलेत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करीत असतात. म्हणून त्यांच्या क़िराअत-हृदयाला पीळ पाडणारी नसते. आणि ना ही ते पवित्र ग्रंथाचा गुणधर्म लोकानां प्रभावित करव्यकडे लक्ष देतात. तर आपल्या गोड गळ्याचा आणि आपल्या क़िराअतचा चमत्कार दाखवून लोकांकडून वाहवा प्राप्त करु इच्छितात. ईश्वर करो त्यांना आपल्या परिणामाची जाणीव व्हावी.

ज्या माणसाला अल्लाहने धन संपत्ती दिली आहे. त्याचे अल्लाहच्या मार्गात धनसंपत्ती उधळणे किती महान पुण्य आहे. परंतु हे त्याचवेळी की जेंव्हा हा खर्च केवळ अल्लाहच्या प्रसन्नते साठी केला जावा, जर देखाव्यासाठी खर्च केला असेल तर ना केवळ हे की त्यावर कोणताही मोबदला प्राप्त होईल उलटपक्षी असा माणूस शिक्षेस पात्र ठरेल. आज किती धनिक आहेत जे लाखो रुपये सत्कर्ममध्ये खर्च करतात. परंतु त्यांची खर्च करण्याची पद्धत प्रदर्शनीय असते. आणि ते प्रसिद्धी साठी मोठमोठ्या रकमा देणगी म्हणून देतात. अशा लोकांनी या हदीस पासून धडा घ्यावा - की देखाव्याचा कसा वाईट परिणाम होणार आहे.



१३

# सुंदर उपासना आणि सुंदर कर्म

# सुंदर उपासनेसाठी प्रार्थना

## हदीस

عَنْ مُعَاذِ بْنِ جَبَلٍ اَنَّ رَسُوْلَ ﷺ اَخَذَبِيَدِهٖ وَقَالَ : يَامُعَاذُ وَاللّٰهِ اِنِّىْ
لَاُحِبُّکَ، فَقَالَ اُوْصِيْکَ يَامُعَاذُ لَا تَدَعَنَّ فِىْ دُبُرِ کُلِّ صَلَاةٍ تَقُوْلُ : اَللّٰهُمَّ
اَعِنِّىْ عَلٰى ذِکْرِکَ وَ شُکْرِکَ وَ حُسْنِ عِبَادَتِکَ . (ابوداؤد، ابواب الوتر)

## अनुवाद

**हज़रत मुआज़ बिन जबल कथन करतात की अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी त्यांचे हाथ धरले आणि फर्मावले, हे मुआज ! अल्लाहची शपथ मी तुझ्याशी प्रेम करतो (अर्थात तू मला प्रिय आहेस) मग फर्मावले, मी तुला ताकीद करीत आहे की, हे मुआज़ ! तुम्ही प्रत्येक नमाज़ नंतर हे म्हणणे. सोडू नका:** اَللّٰهُمَّ اَعِنِّىْ عَلٰى ذِکْرِکَ وَ شُکْرِکَ وَ حُسْنِ عِبَادَتِکَ .

**''हे अल्लाह ! मला मदत कर, म्हणजे मी तुझे नामस्मरण करावे. तुझे आभार मानावे आणि तुझी प्रार्थना चांगल्या पद्धतीने करावी.'' (अबु दाऊद-किताबुल वित्र)**

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी अत्यंत सहानुभूतीपूर्वक पद्धतीने हजरत मुआज़ यांना उपदेश केले ज्यात नामस्मरण, आभार आणि चांगल्या पद्धतीने उपासने साठी प्रत्येक नमाज़ नंतर अल्लाह पाशी प्रार्थना करण्याचा उपदेश होता. अल्लाह चे नामस्मरण करणे, त्याचे आभार मानणे आणि त्याची उपासना चांगल्या पद्धतीने करणे अल्लाह च्या मदती शिवाय शक्य नाही. सूरह फातिहा ची आयत اِيَّاکَ نَعْبُدُ وَاِيَّاکَ نَسْتَعِيْن अर्थात ''आम्ही तुझीच उपासना करतो आणि तुझीच मदत मागतो.'' मध्ये या गोष्टीची शिकवणुक आहे. की अल्लाहच्या उपासनेसाठी अल्लाहचेच सहाय्य मागीतले जावे. उपरोक्त हदीस या पवित्र आयतीशी पुर्णत: जुळणारी आहे.

जो माणूस प्रत्येक नमाज नंतर ही दुआ करेल.पण त्याला अट अशी की,तो सद्सद्विवेक बुद्धीने प्रार्थना करीत असावा; तर त्याचे पूर्ण लक्ष नामस्मरण,आभार आणि सुंदर उपासनेकडे राहील. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला त्याचे सामर्थ्य प्रदान करेल. हदीसने हे ही स्पष्ट आहे की अल्लाह ची प्रार्थना माणसाने मनापासून करावी. केवळ वोझं उतरुन टाकल्या सारखे करू नये. तर त्यात सुंदरता निर्माण करावी, कारण हीच दास्यत्वाची शान आहे.





# आपल्या इस्लाम मध्ये सौंदर्य निर्माण करणे

## हदीस

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِذَا اَحْسَنَ اَحَدُکُمْ
اِسْلَامَهٗ فَکُلُّ حَسَنَةٍ يَّعْمَلُهَاتُکْتَبُ لَهٗ بِعَشْرِ اَمْثَالِهَا اِلٰى سَبْعِ مِائَةِ
ضِعْفٍ وَّ کُلُّ سَيِّئَةٍ يَّعْمَلُهَا تُکْتَبُ لَهٗ بِمِثْلِهَا. (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-जेव्हा तुमच्या पैकी कोणी आपल्या इस्लाम मध्ये सौंदर्य निर्माण करतो.तर प्रत्येक पुण्य कर्माच्या बदल्यात,जो तो करीत असतो; त्याच्यासाठी दहा पट ते सातशे पटी पर्यंत मोबदला लिहिला जात असतो.आणि जे पापकर्म तो करतो तर त्या पापकर्मा एवढाच गुन्हा लिहिला जातो.** (बुखारी किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

आपल्या इस्लाम मध्ये सौंदर्य निर्माण करण्याचा अर्थ असा आहे की माणूस आज्ञा पालनचे कार्य करीत असताना ते वरच्या वर करु नये, म्हणजे आपल्या डोक्यावरचं वोझं उतरुन जावं हा उद्देश असता कामा नये. तर आदेशाचे पालन चांगल्या प्रकारे करावे म्हणजे ते उत्तमोत्तम पद्धतीने पार पाडण्याचा प्रयत्न करावा. जेव्हा अल्लाहशी घनिष्ट संबंध प्राप्त होतो; तर ईमान धारक त्याची आज्ञा पालन मनापासून करीत असतो. अशा स्थितीत त्याला प्रत्येक पुण्यकर्माचा मोबदला कमीत कमी दहा पटीने मिळतो. आणि जेवढे सौंदर्य निर्माण केले गेले असेल त्याच तुलने ने हा मोबदला वाढत असतो. येथ पावेतो की एका पुण्यकर्माचा मोबदला सातशेपटी पर्यंत वाढून जातो. हे अल्लाहचे किती मोठे दानशूरपना आहे. परंतु जर अशा माणसाकडून पाप कर्म घडत असेल तर त्याच्या बदल्यात त्या पापकर्मा एवढाच गुन्हा लिहिला जातो; त्यापेक्षा जास्त नाही. हे याकरिता की, अल्लाह चे वैशिष्ठ्य न्याय आहे. तो कोणावरही अतिरेक करीत नाही.

# नमाज़ सामूहिकरित्या पठण करणे आणि त्यात पुढाकार घेणे.

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ لَوْ یَعْلَمُ النَّاسُ مَافِی**
**النِّدَآءِ وَالصَّفِّ الْاَوَّلِ ثُمَّ لَمْ یَجِدُوْٓا اِلَّا اَنْ یَّسْتَهِمُوْا عَلَیْهِ**
**لَاَسْتَهَمُوْا وَلَوْ یَعْلَمُوْنَ مَا فِی التَّهْجِیْرِ لَا سْتَبَقُوْآ اِلَیْهِ وَلَوْ یَعْلَمُوْنَ**
**مَا فِی الْعَتَمَةِ وَالصُّبْحِ لَاتَوْهُمَا وَلَوْ حَبْوًا** ۔ (البخاری کتاب الشہادات)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- जर लोकांना माहीत राहिले असते की ''अज़ान'' (नमाज़ पठणासाठी केली जाणारी घोषणा) आणि पहिली सफ (नमाज़ ची पहिली रांग) यात किती मोठा मोबदला आहे; तर त्यासाठी फासा टाकावा लागला असता. तर त्यानी फासा टाकून निर्णय घेतला असता. आणि जर त्यांना माहीत राहिले असते की, नमाज़े जोहर (दुपारची नमाज़) साठी लवकर जाण्यात किती मोबदला आहे. तर त्यासाठी त्यानी पुढाकार घेतला असता आणि जर त्याना माहीत झाले असते की ईशा (रात्री) आणि फजर (पहाटे) च्या नमाज़ मध्ये किती मोबदला आहे. तर ते त्यात निश्चितच सामिल झाले असते, मग त्यानां गुडघ्याच्या आधार वर जरी चालावे लागले असते तरी चालले असते.** (बुखारी किताबुश-शहादात)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये या गोष्टी चे प्रोत्साहन देण्यात आले आहे की मुसलमानाने नमाज़चे इतमाम अशातऱ्हेने करावे की, उपासनेसाठी पुढे पुढे राहण्याचे श्रेष्ठत्व त्याला प्राप्त व्हावे. अजान देण्यासाठी तो नेहमी तयार असावा कारण त्यात फार मोठा मोबदला आहे. नमाज़ साठी पहिल्या सफ मध्ये जागा प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा, कारण त्यात मिळणाऱ्या मोबदल्याची लोकांना माहिती नाही. अशा तऱ्हेने नमाज़ जोहर ज्यात उन्हाचे चटके सहन





करावे लागतात. आणि ईशा आणि फजर ची नमाज़ जेव्हा झोपेची ओढ असते; सामूहिकरित्या ती नमाज़ अदा करण्याचे मोठे श्रेष्ठत्व वर्णन करण्यात आले आहे. या श्रेष्ठत्वाची माहिती जर त्यानी करुन घेतली असती तर या दोन्ही नमाज़ सामूहिकरित्या अदा करण्याकामी आळस दाखवले नसते.

आज काल मशीदींची अशी स्थिती आहे की लोक पुढच्या सफ मध्ये राहण्या एवजी मागील सफ मध्ये (रांगांमध्ये) उभे राहणे पसंत करतात. सामूहिकरित्या नमाज़ पठण करणाऱ्यांची संख्या कमी असते. आणि फज़रच्या नमाज़ मध्ये तर अत्यल्प असते. या हदीसचे वाचन जर त्यानी केले काही सांगता येत नाही की, त्यांच्यात नमाज़ मध्ये पुढाकार घेत राहण्याची उत्सुक्ता निर्माण होईल.

# अशी नमाज़ अदा करणे जी अदा न केल्या सारखी असावी

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ دَخَلَ الْمَسْجِدَ فَدَخَلَ**
**رَجُلٌ یُّصَلِّیْ فَسَلَّمَ عَلَی النَّبِیِّ ﷺ فَرَدَّ فَقَالَ ارْجِعْ فَصَلِّ فَاِنَّکَ لَمْ**
**تُصَلِّ فَرَجَعَ فَصَلّٰی کَمَا صَلّٰی ثُمَّ جَآءَ فَسَلَّمَ عَلَی النَّبِیِّ ﷺ فَقَالَ**
**ارْجِعْ فَصَلِّ فَاِنَّکَ لَمْ تُصَلِّ ثَلَاثًا فَقَالَ وَالَّذِیْ بَعَثَکَ بِالْحَقِّ مَآ**
**اُحْسِنُ غَیْرَهٗ فَعَلِّمْنِیْ فَقَالَ اِذَاقُمْتَ اِلَی الصَّلٰوةِ فَکَبِّرْ ثُمَّ اقْرَأْ**
**مَاتَیَسَّرَ مَعَکَ مِنَ الْقُرْاٰنِ ثُمَّ ارْکَعْ حَتّٰی تَطْمَئِنَّ رَاکِعًا ثُمَّ ارْفَعْ**
**حَتّٰی تَعْتَدِلَ قَآئِمًا ثُمَّ اسْجُدْ حَتّٰی تَطْمَئِنَّ سَاجِدًا ثُمَّ ارْفَعْ حَتّٰی**
**تَطْمَئِنَّ جَالِسًا وَّ افْعَلْ فِیْ صَلٰوتِکَ کُلِّهَا.** (البخاری کتاب صفۃ الصلوٰۃ)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी मशीदीत प्रवेश केल्यावर एक माणूस आला. आणि**

**त्याने नमाज़ अदा केली. मग प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना सलाम केला. त्यानी उत्तर दिले आणि फर्मावले. जा आणि नमाज़ पढा कारण तुम्ही नमाज़ अदा केली नाही. तो माणूस गेला आणि पहिल्या सारखीच नमाज़ अदा केली. मग आला आणि प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम याना सलाम केला. त्यानी फर्मावले जा आणि नमाज़ पढा कारण तुम्ही नमाज़ पढलीच नाही. ही गोष्ट त्यानी तीन वेळा फर्मावली त्याने सांगितले शपथ आहे अल्लाह ची ज्याने तुम्हाला सत्य घेऊन पाठवले आहे. मी या पेक्षा चांगली नमाज़ पठण करु शकत नाही म्हणून तुम्ही मला ती शिकवा. त्यानी फर्मावले जेव्हा तुम्ही नमाज़ साठी उभे राहता तर तकबीर (अल्लाहु अकबर) म्हणा मग क़ुरआन जेवढेही अगदी सरळतेने पठण करता येईल, तेवढे पठण करा. मग रुकूअ (घुडग्यांवर हात ठेवून वाकणे) करा. येथ पावेतो की अत्यंत समाधानाने रुकूअ व्हावा. मग डोके वर करा. येथ पावेतो की संयमाने उभे राहावे. मग सजदा' (साष्ठांग जमीनी वर टेकणे), करा येथ पावेतो की संयमाने बसावे अशा पद्धती ने आपली नमाज़ पूर्ण करा.** (बुख़ारी-किताब सफ़फ़तुस्सलात)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी त्या माणसाची नमाज़ला ज्याने नमाज़च्या सर्व प्रक्रिया समाधानाने अदा केल्या नव्हत्या नमाज़ न अदा केल्या सारखेच सांगितले होते. आणि त्याला नमाज़ पुन्हा अदा करायला सांगितले. दुरुस्त नमाज़ची पद्धत त्यानी ही सांगितली की समाधानाने रुकूअ आणि सजदा वगैरे केले जावेत.

त्यानी केलेली ही सूचना असून देखील आजही किती नमाज़ी आहेत जे आपल्या नमाज़ इतक्या घाई गर्दी ने अदा करतात जणू त्यांच्या डोक्यावर ओझं असावं जे उतरुन फेकण्याचे काम ते करीत आहेत. आता रुकूअमध्ये गेले नव्हते की लगेच उभे राहिले; आणि सरळ उभे राहात नाही की, लगेच सजद्यात जातात. आणि सजद्यात डोके ठेवले होते की लगेच उठून बसले. असे लोक आपली नित्याची कामं तर मन लावून समाधानाने करतात. परंतु प्रार्थना आणि विशेष करुन नमाज़चा मामला आला की घाई गर्दी ने रुकाणे भरण्याचे काम करुन टाकले. नमाज़ मध्ये त्यांचे मन लागत नाही- वस्तुस्थिती तर अशी आहे की अल्लाह ने नमाज़ चे एहतमाम करणे आणि नम्रता व अज़ीजीने तिला अदा करण्याची ताकीद केली आहे. किती बरे होईल की मुसलमानानी आपल्या नमाज़ दुरुस्त कराव्यात.





# नमाज़च्या बरकती

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّهٗ سَمِعَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ یَقُوْلُ اَرَاَیْتُمْ لَوْ اَنَّ نَهْرًا بِبَابِ اَحَدِكُمْ یَغْتَسِلُ فِیْهِ كُلَّ یَوْمٍ خَمْسًا مَّا تَقُوْلُ ذٰلِكَ یُبْقِیْ مِنْ دَرَنِهٖ قَالُوْ لَا یُبْقِیْ مِنْ دَرَنِهٖ شَیْئًا قَالَ فَذٰلِكَ مِثْلُ الصَّلَوَاتِ الْخَمْسِ یَمْحُوا اللّٰهُ بِهَا الْخَطَایَا.

(البخاری کتاب مواقیت الصلوۃ)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) म्हणतात की त्यानी अल्लाह चे प्रेषित यांना फर्मावतानां ऐकले -जर तुमच्या पैकी कोणाच्या दारा जवळ कालवा असावा आणि त्यात त्याने पाच वेळा स्नान करावे तर तुमचे काय मत आहे. त्याच्या शरीरावर मळ वगैरे शिल्लक राहणार आहे? सहाबानी उत्तर दिले. त्याच्या शरीरावर अजिबात मळ वगैरे शिल्लक राहणार नाही. फर्मावले-तर या पांच वेळच्या नमाज़ची उपमा आहे. ज्यामुळे अल्लाह सर्व पाप नष्ट करुन टाकतो.**

(अल-बुखारी किताब मवाकीतुस-सलात)

## स्पष्टीकरण

या उदाहरणाने स्पष्ट झाले की पाचवेळ ची नमाज़ एका मुसलमानाच्या पापकर्मांना कसे नष्ट करुन टाकतात; आणि त्याला कसे पवित्र बनवून टाकतात. ज्या नमाज़च्या अशा बरकती आहेत; त्याची नियमबद्धता आणि त्याचा एहतमाम एका मुसलमानाला किती हसतमुखाने व आनंदाने करायला हवे. परंतु अधिकांश मुसलमानांची स्थिती अशी आहे की, ते नमाज़ला एक वोझं समजतात; आणि "बेनमाज़ी" (नमाज़ अदा न करणारे) बनून राहतात. असे लोक नमाज़ चे कर्तव्य न पार पाडल्यामुळे मोठे गुन्हेगार होतात; आणि नमाज़च्या बरकतीपासून ही वंचित राहतात.

# फजर आणि असर ची नमाज़ वेळे वर अदा करण्याचे प्रलोभन

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ یَتَعَاقَبُوْنَ فِیْكُمْ مَلَائِكَةٌ بِاللَّیْلِ وَ مَلَائِكَةٌ بِالنَّهَارِ وَ یَجْتَمِعُوْنَ فِیْ صَلٰوةِ الْفَجْرِ وَ صَلٰوةِ الْعَصْرِ ثُمَّ یَعْرُجُ الَّذِیْنَ بَاتُوْا فِیْكُمْ فَیَسْأَلُهُمْ رَبُّهُمْ وَهُوَ اَعْلَمُ بِهِمْ كَیْفَ تَرَكْتُمْ عِبَادِیْ فَیَقُوْلُوْنَ تَرَكْنَاهُمْ وَهُمْ یُصَلُّوْنَ وَ اَتَیْنَا هُمْ وَ هُمْ یُصَلُّوْنَ .

(البخاری کتاب مواقیت الصلوة)

## अनुवाद

**हजरत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात-तुमच्या जवळ रात्र आणि दिवसाचे फरिश्ते एका मागून एक येत असतात. ते नमाज़े असर आणि नमाज़े फजर मध्ये एकत्र होतात. मग ते फरिश्ते जे तुमच्या बरोबर राहिल्यानंतर निघून जातात.त्यावेळी त्यांचा पालनकर्ता त्यांना विचारतो; परंतु स्थिती अशी आहे की, तो त्यांच्या पेक्षाही अधिक जाणकार आहे; विचारतो-तुम्ही माझ्या दासानां कोणत्या स्थितीत सोडून आलात? ते म्हणतात-आम्ही त्यानां अशा स्थितीत सोडून आलो की ते नमाज़ पठण करीत होते. आणि जेव्हा आम्ही त्यांच्या जवळ गेलो तेव्हा देखील ते नमाज़ पठण करीत होते.**

(बुखारी-किताब मवाकीतुस-सलात)





## स्पष्टीकरण

प्रत्येक माणसाच्या उक्ती कृती लिहून ठेवण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाह ने फरिश्ते नियुक्त केले आहेत. ज्याचे स्पष्टीकरण पवित्र क़ुरआन मध्ये अनेक ठिकाणी करण्यात आलेले आहे. या हदीसमुळे ही बाब स्पष्ट होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने ''अअमाल नामा'' (माणसा चे बरे वाईट कृत्याची नोंद असलेली वही) तयार करणाऱ्या फरिश्त्यांचा असा बंदोबस्त केला आहे की रात्र आणि दिवसाचे फरिश्ते पाळी पाळीने येत असतात रात्री फरिश्ते जेव्हा निरोप घेऊन अल्लाह जवळ पोहोचतात, तर अल्लाहने प्रश्न विचारल्यावर ज्या माणसाठी त्यानां निश्चित करण्यात आले आहे ते त्या दासाच्या स्थितीचे वर्णन करतात, आणि ते असे की, जेव्हा आम्ही त्यांच्या जवळ गेलो तर ते असर ची नमाज़ पढत होते. आणि जेव्हा आम्ही त्यांना सोडले तर ते फजर ची नमाज़ पढत होते. अशाच पध्दीने दिवसाचे फरिश्ते देखील अहवाल सादर करतात.

जो माणूस नमाज़ ची नियमबद्धता पाळतो, विशेषकरुन फ़ज़र ची नमाज़ वेळेवर अदा करतो त्याचा किती सुंदर अहवाल अल्लाहच्या हुजूर सादर होत असेल. परंतु जो माणूस फजर च्या नमाज़ च्या वेळी झोपलेला राहात असेल; किंवा नमाज़शीच बेपर्वाई करीत असेल, त्याचा किती वाईट अहवाल अल्लाहच्या दरबारी सादर होत असेल. असर ची वेळ देखील धंदा व्यवहारात व्यस्त राहण्याचीच असते. तर जो माणूस नमाज़े असर वेळे वर अदा करीत नाही. किंवा नमाज़शीच बेपर्वाई करतो. त्याच्या बाबतीत फरिश्ते अल्लाह पाशी किती दु:खदायक गोष्ट सादर करीत असतील. या हदीस मध्ये जेथे वेळेवर नमाज़ अदा करणाऱ्यासाठी शुभ वार्ता आहे. तेथे नमाज़शी बेपर्वाई करणाऱ्यानी धडा घ्यायला हवा.

# उत्कृष्ट कर्म

## हदीस

عَنِ ابْنِ مَسْعُوْدٍ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ اَنَّ رَجُلًا سَأَلَ النَّبِیَّ ﷺ اَیُّ الْاَعْمَالِ اَفْضَلُ قَالَ الصَّلٰوةُ لِوَقْتِهَا وَ بِرُّ الْوَالِدَیْنِ ثُمَّ الْجِهَادُ فِیْ سَبِیْلِ اللّٰهِ . (البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**इब्ने मसऊद (रजि.) कथन करतात की एका माणसाने प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानां विचारले कोणते कर्म उत्कृष्ट आहे? फर्मावले-वेळेवर नमाज़ अदा करणे. माता-पित्यांशी चांगली वर्तणुक करणे नंतर अल्लाह च्या मार्गात जिहाद करणे.** (बुखारी-किताबुत-तौहीद)

## स्पष्टीकरण

एका ईमानधारकाचे चारित्र्य उच्च होत असते. मनापासून अल्लाहची उपासना केल्याने, चांगले चारित्र्याने आणि धर्मासाठी संकट पत्करणाऱ्या संघर्षाने आणि त्यासाठी बलिदान देण्याने. उपरोकत हदीस मध्ये ही तीनही वौशिष्ठ्ये निर्माण करणाऱ्या आचरणामध्ये जे पहिल्या ऋमांकावर आहेत. येथे त्यांचे वर्णन करण्यात आले आहे.

नमाज़ ही अति प्रथम महत्त्व असलेली उपासना आहे. आणि नमाज़ वेळेवर अदा करणे या गोष्टीचा पुरावा आहे की नमाज़ पढणाऱ्याला अल्लाहच्या भक्तीशी घनिष्ट संबंध असतो म्हणून तो जगातल्या कशाही कार्यमग्नात का असेनात; नमाज़ ला कधी ही कज़ा'' (नमाज़ वेळेवर अदा न करणे) होऊ देत नाही; उलट नमाज़ ला तो सर्व कामांवर प्राधान्य देतो. त्या उलट ज्या माणसाला अल्लाहच्या प्रार्थनेची आवड राहात नाही. तो आपल्या दैनंदिन कामां मध्ये असा व्यस्त होऊन जातो की नमाज़ वेळेवर अदा करण्याचे त्याला भानच राहात नाही. परिणाम तो एक तर खुप उशीरा निषिद्ध वेळांमध्ये नमाज़ पढतो. किंवा त्याची नमाज़ कज़ा होते. नमाज़शी ही बेपर्वाई धर्माच्या बाबतीत शिथिलता निर्माण करतो,जो फार मोठी दुर्बलता आहे.

शीलतेला मानवी चारित्र्यामध्ये फार महत्त्व आहे; आणि त्यामुळे मानवी जीवन सावरले जाते. माता-पिता ज्यानी पालन पोषण केले; ते या गोष्टीला सर्वाधिक पात्र आहेत की, त्यांच्याशी चांगली वर्तणुक केली जावी. म्हणून हदीसमध्ये याची गणणा उत्कृष्ट कर्मांमध्ये केली गेली आहे. यामुळे अंदाज लावला जावा की, जो माणूस आपल्या मातापित्यांशी वाईट वर्तणुक करतो. तो किती चरित्रहीन आहे आणि किती मोठे पाप आपल्या डोक्यावर उचलत आहे.आधुनिक युगात तर अशी औलाद देखील जन्माला येत आहे. जी आपल्या माता पित्याना शिव्याही देतात; आणि मारझोडही करतात. ही कशी चरित्रहीनता आहे; आणि किती मोठे पाप आहे ज्याचे हे लोक धैर्य करीत आहेत.

अल्लाहच्या मार्गात जिहाद ला उत्कृष्ट कर्म म्हटले गेले आहे. कारण हे अल्लाह साठी प्राणार्पण आणि शौर्य आहे. जो माणूस इतके मोठे बलिदान द्यायला तयार होऊन जातो; तो अल्लाह आणि त्याच्या धर्माशी घनिष्ठ प्रेमाचा पुरावा सादर करतो. आणि धर्मामध्ये खरे महत्व त्याच कर्मांचे आहेत. ज्यात कोणत्या ना कोणत्या प्रकार चे बलिदान द्यावे लागते. जेव्हा एक ईमानधारक आपल्या धर्मासाठी इच्छा आकांक्षांचे बलिदान देणे, आपल्या धन संपत्तीचे बलिदान देणे, आपले घरदार सोडून देणे येथपावेतो की आपल्या प्राणाचे बलिदान द्यायला तयार होऊन जातो तर आपले ईमान बळकट असणे आणि आपल्या उच्च चारित्र्याचा पुरावा देत असता.





# सामूहिक नमाज़ अदा करण्याचे महत्तव

## हदीस

عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ عُمَرَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ صَلٰوةُ الْجَمَاعَةِ
تَفْضَلُ صَلٰوةُ الْفَذِّ بِسَبَعٍ وَّ عِشْرِيْنَ دَرَجَةً. (بخاری کتاب صلوة الجماعة)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन उमर म्हणतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- सामूहिक नमाज़ एकटया नमाज़ पेक्षा सत्तावीस पटीने अधिक श्रेष्ठ आहे.**

(बुखारी किताब सलातुल जमाअत)

## स्पष्टीकरण

जेंव्हा सामूहिक नमाज़ एकटया नमाज़च्या तुलने ने सत्तावीस पटीने श्रेष्ठ आहे तर ''जमात'' मध्ये (सामूहिक नमाज़) सामील होऊन त्याचे श्रेष्ठत्व का प्राप्त करु नये. परंतु किती नमाज़ी असे आहेत, जे सामूहिक नमाज़ अदा करण्याकडे एक तर दुर्लक्ष करतात किंवा आळस करतात . ते घरात नमाज़ पढणे पसंत करतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की घरात नमाज़ कोणत्या ही सबबी मुळेच पढली जाऊ शकते. जर एखाद्या माणसाला हे माहीत झाले की, एक अमुक वस्तु जवळच्या ठिकाणी विकल्याने एक रुपया नफा मिळतो. आणि बाजारात तीच वस्तु विकल्याने सत्तावीस रुपये नफा होतो. तर कोण आहे जो बाजारात जाऊन माल विकण्याचे कष्ट सहन करणार नाही? आश्चर्य आहे की ऐहिक लाभ प्राप्त करण्याकरिता तर माणूस कष्ट आणि त्रास सर्व काही सहन करुन घेतो. परंतु आखिरतचा लाभ प्राप्त करण्याच्या बाबतीत सरलता दाखवतो.

# ''वज़ू'' च्या प्रभावाने चेहरे उज्वल

## हदीस

عَنْ نُّعَيْمِ الْمُجْمِرِ قَالَ رَقِيْتُ مَعَ اَبِىْ هُرَيْرَةَ عَلٰى ظَهْرِ الْمَسْجِدِ فَتَوَضَّاَ فَقَالَ اِنِّىْ سَمِعْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ اِنَّ اُمَّتِىْ يُدْعُوْنَ يَوْمَ الْقِيَامَةِ،غُرًّا مُحَجَّلِيْنَ مِنْ اٰثَارِ الْوُضُوْءِ فَمَنِ اسْتَطَاعَ مِنْكُمْ اَنْ يُّطِيْلَ غُرَّتَهٗ فَلْيَفْعَلْ .(البخاری کتاب الوضوء)

## अनुवाद

**नईम-उल-मजमर म्हणतात की, मी अबू हुरैरा (रजि.) बरोबर मशीदीवर चढलो. त्यानी ''वज़ू'' केला आणि फर्मावले-मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानां फर्मावतानां ऐकले की, माझ्या उम्मत (लोक समूह) ला कियामतीच्या दिवशी अशा स्थितीत बोलावले जाईल की, त्यांच चेहरे आणि त्यांचे हात वजूच्या प्रभावाने प्रकाशमान असतील. तर जो कोणी आपल्या चेहऱ्याच्या प्रकाशमान भागाला वाढवू इच्छित असेल, ते वाढवून घ्यावे. (बुखारी-किताबुल-वज़ू)**

## स्पष्टीकरण

प्रार्थनेसंबंधी आदेश म्हणजे ते आदेश जे भक्तीच्या प्रकाराशी संबंधीत आहेत. त्यातील अंतर्ज्ञानाची आम्हाला कल्पना नाही किंवा कल्पना जरी असेल तर जुजबीच असेल. परंतु त्यांचे आचरण हे आंतर्ज्ञानाची कल्पना असण्यावर अवलंबून नाही. तर ते आचरणात आणण्यासाठी हे जाणून घेणे पुरेसे आहे की हे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचे आदेश आहे.यां आदेशां मध्दे किती मोख शुभ मंगल आहे त्याची कल्पना कियामतीच्या दिवशी येईल. उदाहरणार्थ वजू मध्ये चेहरा आणि हात धुवावे लागते.त्याचा जो परिणाम कियामतीच्या दिवशी दिसून येईल तो असा की चेहरा आणि हात प्रकाशमान होतील यामुळे कल्पना येईल की प्रार्थनेसंबंधी आदेशामध्ये सर्व श्रेष्ठ अल्लाह ने किती भलाई ठेवली आहे, जे आपल्या नजरेपासून लपलेले आहे, परंतु कियामती च्या दिवशी ते आपल्या नजरे समोर येतील. परंतु ज्या लोकांची अल्लाहवर श्रद्धा नाही. ते प्रार्थनेसंबंधी आदेशांचे अंतर्ज्ञान स्पष्ट न झाल्यामुळे ते समाधानी नसतात. आणि अशा करतात की प्रत्येक आदेशाचे अंतर्ज्ञान पहिल्याने त्यांना ज्ञात व्हावेत. त्यानंतर ते त्यांचे पालन करतील. त्यांचे अशापद्धतीने वागणे एखाद्या खऱ्या ईमानधारकाकडून शक्य नाही.





हदीसच्या शेवटी हे जे फर्मावण्यात आले आहे की, जो कोणी आपल्या चेहऱ्याच्या प्रकाशमान भागाला वाढवू इच्छित असेल, ते वाढवून घ्यावे. तर त्याचा अर्थ असा आहे की चेहऱ्याची जी सीमा आहे, त्यापेक्षा जास्तच धुवावे म्हणजे आदेशाचे हुबेहुब पालन होईल परंतु याचा अर्थ नव्हे हा की चेहऱ्यां बरोबर मान आणि कान ही धूवून टाकावे त्याच प्रमाणे हात धुताना इतकीही अतिशयोक्ती व्हायला नको की हात खांद्यापर्यंत धुवून टाकावे. तर हाताच्या कोपऱ्या पेक्षा जास्तच धुवावे जर जास्त अतिशयोक्ती केली गेली तर हे सुन्नतच्या विरुद्ध कृत्य होईल. म्हणून सुन्नत मध्ये कानावरुन ओला हात फिरवणे सावित आहे, ते धुणे नव्हे.

# उत्कृष्ट दान

## हदीस

عَنْ حَكِيْمِ بْنِ حِزَامٍ عَنِ النَّبِىِّ صَلَّى اللّٰهُ عَلَيْهِ وَسَلَّمَ قَالَ اَلْيَدُ الْعُلْيَا خَيْرٌ مِّنَ الْيَدِ السُّفْلٰى وَ ابْدَأْ بِمَنْ تَعُوْلُ وَ خَيْرُ تَعُوْلُ وَخَيْرُ الصَّدَقَةِ مَا كَانَ عَنْ ظَهْرِ غِنًى وَّمَنْ يَّسْتَعْفِفْ يُعِفَّهُ اللّٰهُ وَمَنْ يَّسْتَغْنِ يُغْنِهِ اللّٰهُ. (البخاری کتاب الزکوة)

## अनुवाद

**हकीम बिन हिज़ाम कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले वरचा हात खालच्या हातापेक्षा उत्तम आहे. आणि दानाचा प्रारंभ आपल्यावर ज्यांची जबाबदारी आहे अशा लोकांपासून करा. उत्तम दान ते आहे जो श्रीमंत माणसाची स्थिती शाबूत ठेवून केले जावे. जो माणूस शीलतेची इच्छा करेल अल्लाह त्याला शीलता प्रदान करेल.**

(बुखारी -किताबुज़-ज़कात)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये पाच महत्वाच्या गोष्टींचे वर्णन करण्यात आले आहे:

एक तर हे की, वरचा हात खालच्या हातापेक्षा उत्तम आहे. म्हणजे दान देणारा हात दान घेणाऱ्या हातापेक्षा उत्तम आहे. दुसऱ्या शब्दात दान करणे हे मोठया श्रेष्ठत्वाचे कार्य आहे.

दुसरे असे की, दान करण्याला प्रोत्साहन देणे याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या मुलाबाळानां उपाशी ठेवून दान करावे. तर आपल्या कुटुंब व मुलाबाळांच्या पालन पोषणांची जी जबाबदारी तुमच्यावर आहे, पहिल्याने ती पूर्ण करावी. कारण हे देखील एका तऱ्हेचे दान करणेच आहे. त्यानंतरच दुसऱ्यानां दान करावे. तिसरे असे की दान अशा पद्धती ने करु नये की, दान करणारा स्वत:च गरजू आणि पराश्रयी बनून राहावा; तर आपल्या पराश्रयी अवस्थेला कायम ठेवून दान केले जावे. याचा अर्थ असा आहे की सर्व काही दान करुन स्वत:ला कंगाल (निर्धन) न बनवले जावे. की असे केल्याने रोजी रोटी चे कोणतेही साधन शिल्लक राहू नये. आणि दुसऱ्यांच्यापुढे हात पसरविण्याची वेळ यावी

चौथे असे की जो माणूस अल्लाहकडे शीलता म्हणजे पावित्र्याची मागणी करेल, अल्लाह त्याला पावित्र्य प्रदान करेल. म्हणजे त्याच्या चारित्र्याला पवित्रय प्रदान करेल. आणि त्याला इंद्रियनिग्रहता प्रदान करेल. पाचवे असे की जो माणूस निस्पृहतेची इच्छा करेल, अल्लाह त्याला निस्पृहता प्रदान करेल; म्हणजे जो माणूस ही इच्छा करेल की तो कोणावर ही अवलंबून राहू नये, तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला परावलंबी ठेवणार नाही. आणि अशी साधन उपलब्ध करेल की त्याच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचणार नाही.

क्षमायाचना आणि निस्पृहता हे अत्यंत चांगले गुण आहेत; जे चारित्र्याला उच्च स्थान प्राप्त करुन देतात. या गुणांना माणसाने आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा. आणि अल्लाहपाशी कळकळीने प्रार्थन करावी, म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला निश्चितपणे हे गुण प्रदान करेल.

# महान दान

## हदीस

عَنْ اَبِىْ هُرَيْـرَةَ قَالَ اَتٰى رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وسلم رَجُلٌ فَقَالَ : يَا رَسُوْلَ اللّٰه اَىُّ الـصَّـدَقَـةِ اَعْـظَـمُ ؟ فَـقَالَ اَنْ تَصَدَّقَ وَ اَنْتَ صَحِيْحٌ شَحِيْحٌ. تَخْشَى الْـفَـقْـرَ وَ تَـأَمَـلُ الْـغِـنٰـى . وَلَا تُمْهِلْ حَتّٰى اِذَابَلَغَتِ الْحُلْقُوْمَ قُلْتَ لِفُلَانٍ كَذَاوَلِفُلَانٍ كَذَا اَلَاوَقَدْ كَانَ لِفُلَانٍ. (مسلم كتاب الزكاة)

## अनुवाद

**हजरत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु**





**अलैहि वसल्लम यांच्या सेवेत एक माणूस हजर झाला. आणि विचारले हे अल्लाहचे प्रेषिता ! कोणते दान महान आहे ? फर्मावले ते दान जे तुम्ही अशा स्थितीत करावे की तुम्ही निरोगी असावं, आणि आपल्या संपत्तीला लालसेच्या नजरेने पाहात असावं,निर्धन होण्याची भिती असावी, आणि धनवान होण्याची आशा असावी. दान करण्याकामी इतके विलंब करु नका की प्राण घश्यापर्यंत पोहचून जावे आणि तुम्ही म्हणू लागावे की, अमुक माणसाला इतके देऊन टाका आणि अमुकला इतका येथ पावेतो की तो (माल) अमुकच्या ताब्यात पोहचून गेलेला असावा.**

(मुस्लिम -किताबज़-ज़कात)

# स्पष्टीकरण

''सदका'' किंवा दान हे धनाचे ते बलिदान आहे जे अल्लाहसाठी केले जावे. मग ते गरजू आणि गरीबानां दिले जावे, किंवा अल्लाहच्या धर्माच्या प्रचारार्थ आणि अल्लाहच्या मार्गात जिहाद साठी खर्च केला जावा. हे दान अत्यंत महान बनते. ते त्याच स्थितीत की जेव्हां माणसाच्या जीवावर दान करणे हे एक मोठे ओझे असावे. ज्याचे चिंत्र हदीस मध्ये अशा पद्धतीने रेखाटले गेले आहे की, तुम्ही निरोगी असावे आणि आपल्या संपत्तीला लालसेच्या नजरेने पाहात असावे. खर्च केल्याने दारिद्रयाची भिती असावी आणि धनाचे संग्रह करुन धनवान बनण्याची आशा असावी. या मानसिक स्थितीच्या विरुद्ध तुम्ही दान करावं तर निश्चितपणे हे एक मोठे बलिदान होईल.

उरते ते दान जे माणूस मृत्यु घश्यापर्यंत आल्यानंतर करु इच्छितो, तर त्याची संधी कुठे शिल्लक राहिली. कारण ते तर वारसदारांचे झाले. याचा अर्थ असा की मृत्यूच्या फरिशत्याला पाहून माणूस आपले धन दान करण्याची इच्छा करतो तर ते निरर्थक आहे. त्या वेळी तो मृत्यू पत्र देखील करु शकत नाही. कारण तो तर मृत्यूच्या जबडयात गेलेला आहे.

# ''रोज़ा'' ईमानच्या कैफियतीसह

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ مَنْ صَامَ رَمَضَانَ اِیْمَانًا وَّ احْتِسَاباً غُفِرَلَهٗ مَا تَقَدَّمَ مِنْ ذَنْبِهٖ .** (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत अबू हुरैरा कथन करतात की अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावितात ज्यांने रमज़ान चे रोज़े ईमान आणि ''एहतेसाब'' (आत्मपरिक्षण) यासह पाळले तर त्याचे मागील सर्व पाप माफ केले जातील.**

(बुखारी किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

रमज़ानचे रोज़े एक कर्तव्य आणि एक महत्वाची उपासना आहेत. या उपासनेत सौंदर्य त्याच वेळी निर्माण होऊ शकते जेव्हा रोज़े हे ईमान आणि आत्मपरिक्षणाच्या कैफियतीच्या भावनेतून पाळले जावेत. ईमानची कैफियत जी एक अंतरीक्ष कैफियत आहे, ही कैफियत अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांच्या स्मरणाने निर्माण होते. उदाहरणार्थ-हे की अल्लाह हाज़िर व नाज़िर'' (अर्थात उपस्थित व पाहणारा) आहे. तो आपल्या दासांची अवस्था आणि त्यांच्या मनातल्या विचारांची देखील त्याला कल्पना असते त्यांनी केलेल्या भक्तीतील चांगुलपणा आणि त्यातील दोषांची त्याला चांगल्या प्रकारे कल्पना आहे. तो आपल्या दासांची प्रत्येक गोष्ट ऐकतो; आणि त्यानां निरंतर पाहात असतो. त्यांची कोणतीही कृती आणि त्यांचे कोणतेही कृत्य त्याच्यापासून लपलेले राहू शकत नाही.

आत्मपरिक्षणाच्या कैफियतीचा अर्थ असा आहे की, या प्रार्थनेच्या बदल्यात अल्लाहकडून मोबदल्यासाठी आशा बाळगून असावा अल्लाहकडून मोबदल्याची आशा अल्लाहशी प्रेम निर्माण करते. आणि त्यांच्याशी संबंध दृढ होत असतो; शिवाय आखिरत संबंधी श्रद्धा निर्माण होते. या हदीसमुळे ही वास्तविकता आपोआप स्पष्ट होते की रोजे हे केवळ पारंपारिक स्वरुपाचे नसावेत, म्हणजे रमजानचे रोज़े या साठी पाळले जाऊ नयेत की या महिन्यात सर्वसामान्यपणे रोज़े पाळतात. आणि ना ही लोकांना दाखवण्यासाठी रोज़े पाळले जावेत, की जेणे करुन आम्ही रोजेदार म्हटले जाऊ. ही उपासना अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी केली जावी आणि त्याच्याकडूनच मोबदला मागितला जाव.





# हज्ज मध्ये पथ्य

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ سَمِعْتُ النَّبِیَّ صَلَّی اللّٰهُ عَلَیْهِ وَسَلَّمَ یَقُوْلُ مَنْ حَجَّ لِلّٰهِ فَلَمْ یَرْفُثْ وَلَمْ یَفْسُقْ رَجَعَ کَیَوْمٍ وَّ لَدَتْهُ اُمُّهٗ.** (البخاری کتاب الحج)

## अनुवाद

**हज़रत अबू हुरैरा (रजि.) म्हणतात की, मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना म्हणताना ऐकले की ज्याने सर्वश्रेष्ठ अल्लाह साठी हज्ज केले, ज्यात त्याने कोणत्याही निर्लज्जतेचे कृत्य केले नाही व न पाप केले तर तो अशा पद्धतीने परतेल जणू अत्ताच मातेच्या पोटातून जन्मला असावा.**

(बुखारी - किताबुल हज्ज)

## स्पष्टीकरण

हज्ज मध्ये हज्ज करणाऱ्याच्या संयमाची परिक्षा होत असते. विशेषत: लाज लज्जेचे संरक्षण, आपल्या साथीदारांबरोबर चांगली वर्तणुक वर्दळीमध्ये कोणाला त्रास देणे, भांडण तंटयापासून दूर राहणे, आणि प्रत्येक प्रकारच्या गुन्हयापासून अलिप्त राहणे. हया गोष्टी सोप्या नाहीत. परंतु कठिण गोष्टी सहन केल्याशिवाय उच्च दर्ज्याचे कोणतेही कार्य पार पाडले जाऊ शकत नाही. म्हणून हज्ज मध्ये ईशभयाची शिदोरी बरोबर घेऊन जाण्याची सूचना पवित्र क़ुरआन मध्ये केली गेली आहे. आणि हज्जच्या पवित्र प्रवासात जर ईशभयाचे प्रशिक्षण होऊ शकले नाही; तर दुसरी कडे कोठे होणार? उदाहरणार्थ हज्जच्या प्रवासात स्त्रीया देखील असतात. आणि लाजलज्जेचा तगादा असा आहे की नज़रा झुकलेल्या असाव्यात. परंतु जो माणूस कामवासनेच्या नजरेने स्त्रीयांकडे पाहतो,म्हणजे तो निर्लज्जतेने वागतो. त्याच प्रमाणे जो माणूस दुसऱ्यानां धक्का मारून पुढे निघतो; तो गुन्हेगारीचे कृत्य करतो. आणि जो माणूस हरप्रकारच्या गुन्हयापासून सुरक्षित राहतो. जो हज्ज ची अशी शुभसंधी प्राप्त करवून घेतो की, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याचे पूर्वीचे सर्व पाप माफ करुन टाकतो. येथ पावेतो की त्याच्यावर पापाचा कोणताही डाग शिल्लक राहात नाही. जणू तो मातेच्या पोटातून नुकताच जन्मलेला असावा, ज्याच्यावर पापाचा कोणता ही डाग लागलेला नाही.

आधुनिक युगात हज्ज करणाऱ्याची संख्या खूप वाढलेली आहे. परंतु कित्येक मुसलमान केवळ पारंपारिक पद्धतीने हज्ज करुन घेतात. त्यांना हज्जच्या प्रवासाची जेवढी आवड असते तेवढी हज्जची राहात नाही. हेच कारण आहे की हज्ज नंतर त्यांच्यात सुधारणेचे कोणते ही कृत्य दिसून येत नाही. त्यानी लक्षात घेतले पाहिजे की हज्जचे जे श्रेष्ठत्व हदीस मध्ये सांगण्यात आले आहे; ते पारंपारिक हज्जचे नव्हेत; तर त्या हज्जचे आहेत, ज्याचे वैशिष्ठ्य क़ुरआन आणि हदीस मध्ये वर्णन करण्यात आले आहेत.

# सर्वश्रेष्ठ कर्म

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ سُئِلَ النَّبِیُّ صَلَّی اللّٰهُ عَلَیْهِ وَسَلَّمَ اَیُّ
الْاَعْمَالِ اَفْضَلُ قَالَ اِیْمَانٌ بِاللّٰهِ وَ رَسُوْلِهٖ قِیْلَ ثُمَّ مَا ذَا قَالَ جِهَادٌ فِیْ
سَبِیْلِ اللّٰهِ قِیْلَ ثُمَّ مَا ذَا قَالَ حَجٌّ مَّبْرُوْرٌ. (البخاری کتاب الحج)

## अनुवाद

**हजरत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानां विचारले गेले कोणते कर्म सर्वश्रेष्ठ आहे? फर्मावले अल्लाह आणि त्याच्या प्रेषिता वर ईमान ठेवणे. विचारले गेले नंतर कोणते? फर्मावले अल्लाह च्या मार्गात जिहाद, विचारले गेले. नंतर कोणते? फर्मावले, ''हज्जे मबरुर''. (अर्थात पापमुक्त हज्ज)** (बुखारी-किताबुल-हज्ज)

## स्पष्टीकरण

ईमानचे श्रेष्ठत्व तर सर्व कर्मावर असल्याचे जाहीर आहे. त्या शिवाय कोणतेही कर्म मग ते किती का चांगले असे ना,अल्लाह पाशी स्वीकार्य नाही, म्हणून त्यावर कोणताही मोबदला मिळणार नाही, ईमान नंतर जे कर्म आधिक श्रेष्ठ आहेत; त्या कर्मांचे वर्णन प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी त्यांच्या प्रसंगांनुरुप केले आहे. जर अल्लाहच्या मार्गात जिहाद चा प्रसंग असेल तर ते श्रेष्ठ कर्म असेल; कारण त्यामध्ये एक ईमान धारक आपला जीव मुठीत घेऊन निघतो आणि अल्लाहच्या शुंत्रुचा अत्यंत शौर्याने मुकाबला करतो. त्या नंतर ''हज्जे मबरुर'' (पापमुक्त हज्ज) चा दर्जा आहे. जणू हज्ज चा इस्लामच्या पाच आधार स्तंभामध्ये समावेश आहे. परंतु जर जिहाद ची घोषणा झाली असेल तर प्रसंमावधानानुसार जिहादला प्राधान्य दिले जाईल. ''हज्जे मबरुर'' चा असा अर्थ आहे, ज्यात हज्ज चे सर्व धार्मिक विधी चांगल्या प्रकारे अदा केले गेले असावेत, ज्यात अल्लाहच्या एकेश्वरत्वाची स्वीकृती असावी; आणि जे अनेकेश्वरवाद आणि धर्मात दाखल झालेल्या नवनवीन विधीच्या मिश्रणांपासून मुक्त असावे. ज्यात शुद्धता आणि केवळ अल्लाह साठी ते केले गेले असल्याची गवाही असावी. त्यात देखावा असता कामा नये. केवळ असेच हज्ज अल्लाहपाशी स्वीकार्य आहे. आणि हदीस मध्ये अशा हज्जलाच ''हज्जे मबरुर'' म्हणून संबोधण्यात आले आहे.





# मरणोत्तर पुण्यदान नव्हे निरंतर पुण्य (दान)

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ صلی اللہ علیہ وسلم قَالَ اِذَا مَاتَ الْاِنْسَانُ
اِنْقَطَعَ عَنْهُ عَمَلُهٗ اِلَّا مِنْ ثَلَاثَةٍ. اِلَّا مِنْ صَدَقَةٍ جَارِیَةٍ اَوْ عِلْمٍ
یُنْتَفَعُ بِهٖ، اَوْ وَلَدٍ صَالِحٍ یَدْعُوْلَهٗ. (مسلم کتاب الوصیة)

## अनुवाद

**अबु हुरैरा (रजि.) म्हणतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात जेव्हा माणूस मरण पत्करतो; तर त्याच्या कर्मांचा सिलसिला समाप्त होतो. शिवाय तीन गोष्टींचे एक निरंतर पुण्य दुसरे ज्ञान ज्यापासून लाभ उचलला जात असावा आणि तिसरे चरित्रवान संतान, जी त्याच्यासाठी प्रार्थना करीत असावी.** (मुस्लिम-किताबुल वसियत)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये स्पष्टपणे वर्णन केले गेले आहे की मृत्यू नंतर माणसाच्या कर्मांचा सिलसिला समाप्त होतो. केवळ तीन गोष्टी व्यतिरिक्त.

एक ''सदक-ए-जारिया'' अर्थात ते निरंतर पुण्यकर्म अगर दान जे त्याने ''वक्फ'' अर्थात धर्मदाय संपत्तीच्या स्वरुपात केलेले असावे. आणि त्याच्या मृत्यू नंतर लोक त्यापासून लाभ उचलीत असावेत. उदाहरण मशीद, शिक्षणसंस्था, विहीर, धर्मशाळा, रुग्णालय वगैरे.

दुसरे ज्ञानाचा वारस. ज्यापासून लोक त्याच्या मृत्यू नंतर देखील लाभ उचलीत राहावेत. उदा.धर्माचे शिक्षण, धर्मप्रसाराची अगर सुधारणेसंबंधीची पुस्तक शुद्ध साहित्य

क़ुरआन व सुन्नत मध्ये जागृती निर्माण करणारे लिखाण आणि ते कॅसेटस ज्यामुळे धर्मप्रचार केला जावा. आणि अल्लाहचा कलिमा बुलंद करण्याची भावना वाढीस लागावी. तिसरे चरित्रवान संतान जी आपल्या माता पित्यांच्या मोक्षाची प्रार्थना करीत असावी हे या कारणामुळे की,त्यानी आपल्या मुलांचे अशा पध्दीने पालन पोषण केले की ते चरित्रवान बनले. म्हणून ते चरित्रवान बनले या गोष्टीमध्ये निश्चितपणे त्याच्या माता पित्यांचा वाटा आहे; या दृष्टीकोनातून ते मोबदल्यास पात्र आहेत, जो पर्यंत त्यांची संतान चरित्रवान बनून आपले जीवन व्यतीत करीत असे. त्यानी आपल्या माता पित्यासाठी क्षमे ची प्रार्थना करणे म्हणजे त्यानी आपल्या माता पित्याशी चांगली वर्तणुक केल्याचे जाहीर आहे. जे अल्लाहपाशी अत्यंत आवडते कर्म आहे.

हदीस मध्ये या तीन गोष्टींचे वर्णन करण्यात आले आहे. त्यातील प्रत्येक गोष्ट ही माणसाच्या कर्माशी संबंधीत आहे. आणि तो आपल्या याच कर्माच्या आधारावर ज्यामुळे लोकानां लाभ मिळत आहे, मोबदल्यास पात्र आहे: याचा कोणताही संबंध मरणोत्तर पुण्यदानाशी नाही. कारण मरणोत्तर पुण्यदाना मध्ये तर आपल्या कर्माचे पुण्य एखाद्या अशा माणसाच्या आत्म्याला दिले जाते ज्याला मृत्यूने कवटाळले आहे. ही हदीस खऱ्या अर्थाने, मरणोत्तर पुण्यदानाच्या कल्पनेवर घाव घालीत आहे. कारण त्यात स्पष्टपणे नमूद आहे की, माणसाच्या मरणानंतर केवळ तीन अवस्था आहेत, ज्या त्याच्या मोबदल्याला जारी ठेवतात. आणि या तीन अवस्था त्या आहेत. ज्यात त्याच्या कर्माचा सिलसिला जारी असतो. म्हणून ज्या कामात त्याच्या स्वकर्माचा कोणताही सहभाग नाही. त्याचे पुण्य त्याला मिळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उदाहरणार्थ क़ुरआन ख्वानी (सामूहिक क़ुरआन पठण) जी एखाद्या माणसाच्या मृत्यु नंतर केली जाते; त्याचे पुण्य त्याला कसे लाभणार, कारण त्याच्या कर्माच्या मोबदल्याचा जो नियम निश्चित करण्यात आलेला आहे त्यामुळे मरणोत्तर पुण्यदाना ची पद्धत अजिबात संबंधीत नाही. हेच कारण आहे की ''सहाबा किराम''(प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम चे पवित्र साथीदार) यांच्या दरम्यान या गोष्टीचा अजिबात रिवाज नव्हता; उलट ही पद्धत नंतरच्या लोकांनी शोधून ती अमलात आणली.

मरणोत्तर पुण्यादानाच्या सर्मर्थनार्थ ''दुआ'' अर्थात प्रार्थनेची बाजू मांडली जाते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की ''दुआ'' ही अल्लाह पाशी एक विनंती आहे, मरणोत्तर पुण्यदान नव्हे. आणि ''दुआ'' जिवंत व मृत दोघांसाठी केली जाते. तर काय मरणोत्तर पुण्यदान देखील दोघांसाठी केला जाऊ शकतो? आणि दुआ काफिर साठी देखील त्यांच्या ईमान स्वीकार संबंधी केली जाऊ शकते, तर काय हे मरणोत्तर पुण्यदान आहे?





# ईश-स्मरण

# अल्लाहपाशी प्रिय वचन

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ كَلِمَتَانِ حَبِيْبَتَانِ اِلَی الرَّحْمٰنِ خَفِيْفَتَانِ عَلَی اللِّسَانِ ثَقِيْلَتَانِ فِی الْمِيْزَانِ سُبْحَانَ اللّٰهِ وَ بِحَمْدِهٖ سُبْحَانَ اللّٰهِ الْعَظِيْمِ .** (البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**अबु हैरेरा (रजि.) कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले दोन कलमे (शब्द) असे आहेत. जे रहमान (अल्लाह) ला प्रिय आहेत. जीभेवर हलके आणि मीज़ान'' (तराजू) मध्ये वजनदार आहेत. سُبْحَانَ اللّٰهِ وَ بِحَمْدِهٖ ''सुबहानल्लाहि व बिहम्दिही'' ''अल्लाह साठी पवित्रता आहे. आणि हम्द'' म्हणजे त्याच्या स्तुती सोबत.'' سُبْحَانَ اللّٰهِ الْعَظِيْمِ . ''सुबहानल्लाहिल अज़ीम'' अर्थात महानता असलेल्या अल्लाह साठी पवित्रता आहे.**(अल-बुखारी-किताबुत-तौहीद)

## स्पष्टीकरण

इमाम बुखारी यानी आपले ग्रंथ ''सहीह बुखारी'' चा अंत या हदीस ने केलेला आहे, म्हणजे त्यामुळे अल्लाहच्या नाम स्मरणाचे श्रेष्ठत्व स्पष्ट व्हावे. आणि हदीस संक्षिप्त परंतु अर्थपूर्ण शब्द तोंडपाठ व्हावेत. हे शब्द जे अल्लाहची पवित्रता, त्याची स्तुती आणि त्याच्या महानते च्या वर्णनावर आधारित आहेत; त्याच्या ऐकश्वरत्वाचे जाहीर प्रकटन आणि घोषणा आहेत.

अल्लाहसाठी पावित्र्य आहे याचा अर्थ असा आहे की तो प्रत्येक दुर्गुण दोष, दुर्बलता अपराध विस्मृती आणि त्या गोष्टींपासून ज्या त्याच्या योग्यतेस अनुरुप नाहीत, पाक व शुद्ध आणि निर्दोष आहे. त्याला निर्मित गोष्टींवर कदापि कयास केले जाऊ शकत नाही. आणि अल्लाह चे पावित्र्य त्याच्या स्तुती बरोबर वर्णन करण्याचा अर्थ असा आहे की तो ना केवळ या गोष्टींपासून पाक आहे तर तो त्या गुणानी आणि त्या नैपुण्यानी परिपूर्ण आहे आणि त्याच्यासाठी केवळ स्तुती आणि स्तुतीच आहे. उदाहरणार्थ-तो सर्व जगांचा परमेश्वर आणि सर्व जगांचा पालनकर्ता आहे, दयावान व कृपावान आहे. ऐकणारा व पाहणारा आणि ज्ञानी व खबर राखणारा आहे. प्रत्येक वस्तुवर त्याचे प्रभुत्व स्वामी, सत्ताधीश आणि खरा





बादशाह आहे. अशातऱ्हने पहिल्या शब्दात अल्लाहच्या पावित्र्याबरोबर त्याची गुणवैशिष्ठये आणि तो स्तुतीस पात्र असल्याचे वर्णन होकारात्मक पद्धतीने झाले आहे. दुसऱ्या शब्दामध्ये देखील अल्लाहच्या पावित्र्या बरोबरच त्याची महानता व गुणवैशिष्ठये वर्णिली गेली आहेत, जे होकारात्मक पद्धतीने आहे.

हे कलमे जिभेवर हलके आहेत; म्हणजे माणूस त्यानां सहजपणे उच्चारु शकतो. एका अरबीचे ज्ञान नसणाऱ्या माणसाला देखील ते काहीही कठिण नाही. आणि त्यांची विशेषता अशी आहे की ते अल्लाहच्या ''मीज़ान'' (तराजू) मध्ये जड आहेत. म्हणजे जो कोणी या शब्दांबरोबर अल्लाहचे नामस्मरण करेल. तो फारच मोठया मोबदल्याला पात्र ठरेल; कारण हे शब्द अल्लाहला फारच प्रिय आहेत.आणि अल्लाहला जी गोष्ट आवडती व प्रिय आहे, त्या गोष्टीला त्याचे ईमानधारक दास कां म्हणून प्रिय मानणार नाही? आणि चालताना व उठता बसता या शब्दांबरोबर अल्लाहचे नामस्मरण करुन आखिरतची धनसंपत्ती कां कमावणार नाही. ज्ञान असावे की धर्माच्या संदर्भात ज्या मुसलमानांचे विचार समतोल नसतात. ते अल्लाहचे नामस्मरण आणि त्याचे पावित्र्य व स्तुतीला ते महत्त्व देत नसतात जे द्यायला हवे. म्हणून ते या गोष्टींचे रास्त पालन देखील. करीत नसतात. वास्तविकपणे या गोष्टींचे धर्मात जे स्थान आहे; ते क़ुरआन आणि सुन्नतने सिद्ध झालेले आहे. आणि त्यांच्या श्रेष्ठत्वासाठी एवढीच गोष्ट पुरेशी आहे की फरिश्ते ''अर्श'' (अल्लाह चे सिंहासन) च्या चारही बाजूला अल्लाह चे पावित्र्य आणि त्याच्या स्तुतीचे गुणगान करण्यातच सदैव मशगूल असतात.

# अल्लाहच्या स्मरणाने बुध्दी जागृत होते.

## हदीस

**عَنْ اَبِیْ مُوْسیٰ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ مَثَلُ الَّذِیْ يَذْكُرُ رَبَّهٗ وَ الَّذِیْ لَا يَذْكُرُ مَثَلُ الْحَیِّ وَالْمَيِّتِ .** (البخاری کتاب الدعوات)

## अनुवाद

**अबु मूसा (रजि.) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात- त्या माणसाचे उदाहरण जो आपल्या पालनकर्त्याचे नामस्मरण करतो आणि जो आपल्या पालनकर्त्याचे नामस्मरण करीत नाही जिवीत आणि मृता सारखी आहे.** (बुखारी - किताबुद दअवात)

## स्पष्टीकरण

जिवंत माणसात बुद्धी असते तर मृत माणूस चेतनाशुन्य असतो अल्लाहच्या नामस्मरणाने माणसाची बुद्धी जागृत होते; तर त्याचे नामस्मरण न केल्याने तो गफलत मध्ये पडलेला राहतो. अल्लाहचे स्मरण हे आत्म्याचे आहार (खाद्य) आहे; आणि तिच्या विकासाचे साधन देखील आहे. वास्तविकता अशी आहे मानवाचे जीवन त्याच्याआत्म्या मुळेच आहे. हे शारीरिक डोळे कान वगैरे शरीराची उपकरणं आहेत. परंतु खऱ्या अर्थाने ऐकण्याची, पाहण्याची आणि बोलण्याची शक्ती या माणसाच्या आत्म्यामध्ये असते. दुसऱ्या शब्दात प्रत्येक माणूस हा खऱ्या अर्थाने आतील माणूस आहे. हेच कारण आहे की, आपण डोळे मिटून देखील एका प्रकारे पाहातच असतो. आणि कान बंद करुनही आत मध्ये आवाजाची गुंजन ऐकू येत असते. हाच आतील माणूस (आत्मा किंवा प्राण) आहे; जो मृत्यू नंतर देखील जिवंत असतो. आणि त्याच्या शक्ती आणि जागृतीचे साधन हे अल्लाहचे नामस्मरण आहे जो माणूस त्यापासून गाफिल आणि बेपर्वा राहतो. त्याच्या आत्म्यावर मरणाची छाया पडलेली राहते.

# नामस्मरणाचे शब्द प्रिय असणे

## हदीस

عَنْ اَبِیْ هُـــرَیْــرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلی اللہ علیہ وسلم لَأَنْ اَقُوْلَ : سُبْحَانَ اللّٰهِ وَالْحَمْدُ لِلّٰهِ وَلَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَاللّٰهُ اَكْبَرُ ، اَحَبُّ اِلَیَّ مِمَّا طَلَعَتْ عَلَیْهِ الشَّمْسُ . (مسلم کتاب الذکر)

## अनुवाद

**अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले मी** سُبْحَانَ اللّٰهِ وَالْحَمْدُ لِلّٰهِ وَلَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَاللّٰهُ اَكْبَرُ **''सुब्हानल्लाही वल हमदुलिल्लाही व लाइलाहा इल्लल्लाहु वल्लाहु अकबर''(अर्थात अल्लाह साठी पवित्रता आहे आणि अल्लाह साठी स्तुती**





**आहे. आणि कोणीही परमेश्वर नाही अल्लाह शिवाय आणि अल्लाह फारच महान आहे) म्हणावे, हे मला त्या सर्व वस्तु पेक्षा जास्त प्रिय आहे ज्यांवर सूर्योदय होतो. (मुस्लिम-किताबुज-जिक्र)**

## स्पष्टीकरण

प्रेषितांच्या या कथनावरुन अल्लाह चे पावित्र्य त्याची स्तुती आणि त्याच्या महानतेच्या शब्दांच्या अर्थांची कल्पना येते. आणि इतर सर्व गोष्टींवर त्यांचे प्रभुत्वही स्पष्ट होते. ते असे की जगातील सर्व वस्तु त्यांच्या पुढे तुच्छ आहेत. कारण जीभेवर ते शब्द जारी होणे म्हणजे फार मोठी उपासना आहे. हे अल्लाहच्या नामस्मरणाचे अत्यंत चांगले स्वरुप आहे. आणि या शब्दांमुळे दासाचा संबंध आपल्या पालनकर्त्याशी दृढ होत असतो. आणि त्याचे प्रेम वाढीस लागते. माणूस जितक्या आत्मिक कैफियती ने त्या शब्दांना अदा करेल तेवढाच तो त्यांच्या पासून लाभ उचलेल. जगातली साधन सामग्री आज आहेत आणि उद्या नाहीत. परंतु हे शब्द त्याला निरंतर जीवन प्रदान करणारे आहेत.

ज्या लोकांना सर्वश्रेष्ठ अल्लाह ने धार्मिक ज्ञानात दूरदृष्टी प्रदान केली आहे ते लोक या शब्दानां जिभेने उच्चारण्याचे मूल्य चांगल्या प्रकारे जाणतात. आणि त्यांचे मूल्य तेच लोक घटवतात ज्यानां धर्माचे वर वर चे ज्ञान राहते. आणि त्याच्या खऱ्या अर्थाशी अनभिज्ञ आहेत.

या ठिकाणी हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, धर्मात तर एका कर्माच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन करण्यात आले आहे तर त्याचा अर्थ असा नव्हे की, एकट्या या कर्मावर त्यास हे श्रेष्ठत्व प्राप्त होईल, जरी तो ''फ़राईज़ '' (अनिवार्य कर्तव्ये) चा त्याग करणाराच का असे ना; आणि त्याचे आयुष्य दुराचारी ही का असे ना क़ुरआनचे कर्माच्या फळासंबंधी ज्या तात्वीक गोष्टींचे वर्णन केले आहे; त्यावरुन अशा पद्धतीचा अर्थ लावण्याची कोणतीही जागा नाही. जाणकार लोकांपासून ही गोष्ट देखील लपलेली नाही की एक गोष्ट पूर्णपणे वर्णिली जाते. परंतु डोक्यात असलेली गोष्ट म्हणून किती तरी शर्ती व अटी (Ifs & buts) त्याला लागलेल्या असतात.

# ''मुज़ाकिराती नशिस्ते''

## (आपसातील चर्चे च्या बैठका)

## हदीस

عَنْ اَبِیْ سَعِیْدِ الْخُدْرِیْ قَالَ : خَرَجَ مُعَاوِیَةُ عَلٰی حَلْقَةٍ فِی الْمَسْجِدِ فَقَالَ : مَا اَجْلَسَکُمْ ؟ قَالُوْا : جَلَسْنَا نَذْکُرُ اللّٰهَ قَالَ : اَللّٰهِ ! مَا اَجْلَسَکُمْ اِلَّا ذَاکَ ؟ قَالُوْا : وَاللّٰهِ مَا اَجْلَسَنَا اِلَّاذَاکَ . قَالَ: اَمَا اِنِّیْ لَمْ اَسْتَحْلِفْکُمْ تُهْمَةً لَکُمْ . وَمَا کَانَ اَحَدٌ بِمَنْزِلَتِیْ مِنْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ اَقَلَّ عَنْهُ حَدِیْثاً مِنِّیْ. وَاِنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ خَرَجَ عَلٰی حَلْقَةٍ مِنْ اَصْحَابِهٖ. فَقَالَ مَا اَجْلَسَکُمْ ؟ قَالُوْا : جَلَسْنَا نَذْکُرُ اللّٰهَ وَ نَحْمَدُهٗ عَلٰی مَا هَدَانَا لِلْاِسْلَامِ، وَمَنَّ بِهٖ عَلَیْنَاقَالَ اللّٰهِ مَا اَجْلَسَکُمْ اِلَّا ذَاکَ؟ قَالُوْا: وَاللّٰهِ مَا اَجْلَسَنَا اِلَّا ذَاکَ . قَالَ اَمَا اِنِّیْ لَمْ اَسْتَحْلِفْکُمْ تُهْمَةً لَکُمْ . وَلٰکِنَّهٗ اَتَانِیْ جِبْرِیْلُ فَاَخْبَرَنِیْ ، اَنَّ اللّٰهَ عَزَّ وَجَلَّ یُبَاهِیْ بِکُمُ الْمَلَآئِکَةَ.(مسلم کتاب الذکر)

## अनुवाद

**हज़रत अबु सईद खुदरी (रजि.) म्हणतात की हज़रत मुआविया (रजि.) यांनी मशीदीत लोकानां वर्तुळाकारात बसलेले पाहिले त्यानी विचारले, तुम्ही येथे का बसून आहात? त्यांनी सांगितले अल्लाहचे नामस्मरण करण्यासाठी बसलो आहोत. हज़रत मुआवियानी विचारले अल्लाहची शपथ ! काय तुम्ही त्याच कामासाठी बसून आहात.ते बोलले, अल्लाह ची शपथ ! आम्ही त्याच कामासाठी बसलो आहोत. हज़रत मुआविया म्हणाले, मी तुमच्या बद्दल कोणताही दुराग्रह मनात बाळगून शपथ घ्यायला सांगितले नाही. (तर एका हदीस मुळे तसे बोललो) आणि अशा लोकांमध्ये ज्यांचे माझ्या सारखे स्थान अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम जवळ बाळगतात, माझ्या पेक्षा कमी हदीसींचे वर्णन करणारा दुसरा कोणीही नाही.(एकदा) अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आपल्या साथीदारांच्या एका जमावात आले.आणि विचारले तुम्ही येथे का बसलात त्यांनी सांगितले. आम्ही अल्लाह चे नामस्मरण करण्यासाठी येथे बसलो आहोत. आणि त्याने आम्हाला इस्लामच्या मार्गा कडे मार्गदर्शन केले आणि आमच्यावर जे उपकार**





**केले. त्यावर त्याची स्तुती (उपकार) करावी. त्यानी विचारले, काय तुम्ही अल्लाहची शपथ घेऊन सांगता की याच उद्देशाने बसला आहात? त्यांनी सांगितले, अल्लाह ची शपथ याच उद्देशाने बसलो आहोत. त्यानी फर्मावले, मी तुमच्या संबंधी दुराग्रहामुळे तुम्हाला शपथ घ्यायला सांगितले नाही. तर यासाठी तसे म्हटले की जिब्रील (फरिश्ता) माझ्याकडे आले होते. आणि मला सांगितले सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हा लोकांवर फरिश्त्यां समोर गर्व करतो.**(मुस्लिम-किताबुज़ ज़िक्र)

## स्पष्टीकरण

प्रेषितांच्या साथीदारांची ही बैठक ज्याचे वर्णन या हदीस मध्ये केले गेले आहे. आणि ज्यांचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी कौतुक केले, ही ''मुजाकिरा'' (आपसातील अल्लाहच्या नामस्मरणाची चर्चा) च्या स्वरुपाची बैठक होती; जसे की,प्रेषिताच्या ,साथीदारांच्या वर्णना वरुन स्पष्ट झाले आहे. म्हणून त्यानी सांगितले की,आम्ही यासाठी येथे बसलो आहोत की, अल्लाह चे नामस्मरण करावे. आणि त्याने आम्हाला जे इस्लामचे मार्गदर्शन केले आणि आमच्यावर जो उपकार केला, त्याबद्दल आम्ही त्याची कृतज्ञता व्यक्त करावी. यामुळे हे स्पष्ट आहे की, ही अल्लाहच्या नामस्मरणाची एखादी साधीसुधी बैठक नव्हती. म्हणून या हदीसला प्रचलीत नामस्मरणाच्या बैठकींना प्रमाण बनविले जाऊ शकत नाही. नामस्मरणाच्या अशा प्रचलित मजलिसी (बैठका) ज्यात अल्लाहचे पावित्र्य, त्याच्या स्तुती चे शब्द निश्चित संख्येत उदाहरणार्थ-एक लाख किंवा सव्वा लाख वेळा अदा करण्यासाठी लोक वर्तुळाकारात बसतात. आणि शब्दाची गणना चिंचाच्या बियांवर करतात आणि नंतर त्यांचे पुण्य एखाद्या पीर किंवा संत किंवा एखाद्या अशा माणसाला जो मयत झालेला असावा, अर्पण करतात. ही पद्धत ना ही ''सुन्नत'' (पैगंबरीच परंपरा) ने सिद्ध आहे ना, ही पैगंबरांच्या साथीदारानी कधी अशा मजलिसी क़ायम केल्या होत्या.

नियमक गोष्ट अशी आहे की भक्तीच्या स्वरुपाचा प्रत्येक कर्म ज्याचा संबंध व्यक्तींशी आहे, सामूहिक स्वरुप देणे, जर का शरीअत ने त्यास सामूहिक रुप दिलेले नाही, आपण स्वत:हून शरीयत मध्ये वाढ करणे आहे. परंतु ''अम्र बिल मअरुफ व नहय अनिल मुनकर'' (सत्कर्माची आज्ञा करणे व दुष्कृत्यापासून रोखणे) कर्तव्य पार पाडण्यासाठी सामूहिक रुप दिले जाऊ शकते. उदा. ''दरसे-क़ुरआन'' (क़ुरआनचे धडे) च्या बैठका, ते समजणे व त्यावर चिंतन मनन करणे; आणि आपसातील चर्चेचे कार्यक्रम, सार्वजनिक व्याख्यान धर्म प्रचार व प्रसारांची संमेलने शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्यक्रम वगैरे.

# अल्लाह च्या मार्गातील संघर्ष





# जिहाद ची श्रेष्ठता

## हदीस

عَنْ اَبِیْ هُـرَیْـرَةَ قَالَ جَاءَ رَجُلٌ اِلٰی رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ فَقَالَ دُلَّنِیْ عَـلٰی عَمَلٍ یَعْدِلُ الْجِهَادَ قَالَ لَا اَجِدُهٗ قَالَ هَلْ تَسْتَطِیْعُ اِذَا خَرَجَ الْمُجَاهِدُ اَنْ تَدْخُلَ مَسْجِدَکَ فَتَقُوْمَ وَلَا تَفْتُرَ وَ تَصُوْمَ وَلَا تُفْطِرَ قَالَ وَمَنْ یَّسْتَطِیْعُ ذٰلِکَ . (البخاری کتاب الجہاد)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) म्हणतात की एक माणूस अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या सेवेत हजर झाला. आणि म्हणाला. मला कोणत्याही अशा कर्माची माहिती द्यावी जी जिहाद च्या समान असावी. त्यानी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्मावले मला असा कोणताही कर्म आढळून येत नाही. काय तुम्ही हे करु शकता की जेव्हा ''मुजाहिद'' (जिहाद करणारा योद्धा) ज्या वेळी जिहाद साठी निघेल तर तुम्ही आपल्या मशीदीत जाऊन निरंतर नमाज़ अदा करीत राहावे; त्यात खंड होऊ नये. आणि निरंतर रोजे पाळावेत आणि ''अफतार'' (रोज़ा सोडणे) करु नये. त्याने उत्तर दिले हे कोण करु शकतो? (बुखारी किताबुल जिहाद)**

## स्पष्टीकरण

नमाज़ आणि रोज़े हे इस्लामच्या पाच मूलतत्त्वामध्ये सामील आहेत; तर जिहादचा त्यात समावेश नाही. त्याचे कारण असे आहे की, त्या पाच उपासना सातत्याने करावयाच्या आहेत; तर जिहादचा संबंध उद्‌भवणाऱ्या परिस्थितीशी आहे. हे कधी ''फर्जे ऐन'' (मूलभूत कर्तव्य) असते तर कधी ''फ़र्ज़े किफाया'' (संपूर्ण कुटुंब किंवा समाजा तर्फे एक व्यक्ती कडून केले जाणारे कर्तव्य) मग जिहाद चा संबंध सामूहिक कृत्यांशी आहे. आणि त्यासाठी नेतृत्व देखील आवश्यक आहे. परंतु पाच मूलभूत तत्वे तर प्रत्येक माणूस आपल्यापरीने अदा करु शकतो. ते अदा करण्यासाठी सामूहिकतेची आवश्यकता नाही. परंतु नमाज़ आणि हज्ज मध्ये तर सामूहिकतेचे वैभव असते. परंतु जेव्हा मुसलमानांकरिता अल्लाहच्या

मार्गात जिहाद अनिवार्य ठरते, तर जो माणूस जिहाद साठी निघतो, तर त्याचे हे कर्म मोबदल्याच्या दृष्टीकोनातून अन्य उपासनेपेक्षा अधिक श्रेष्ठ असते. कारण तो अल्लाह च्या ''कलिमा'' (अल्लाह चे वचन किंवा शब्द) ला बुलंद करण्यासाठी आपल्या प्राणाची पर्वा करीत नसतो; आणि आपली धनसंपत्ती देखील खर्च करतो. म्हणून उपरोक्त हदीस मध्ये अल्लाहच्या मार्गातील जिहादचे मोठे श्रेष्ठत्व वर्णन करण्यात आले आहे.

लक्षात ठेवले पाहिजे की इस्लाममध्ये जिहाद त्यालाच म्हणतात जे अल्लाहच्या धर्मासाठी त्यांच्या शत्रूंविरुद्ध लढण्यासाठी केला जावा. मग तो स्वयंसंरक्षणासाठी असो अगर पुढाकार घेऊन हल्ला करण्यासाठी असो; म्हणजे धर्म प्रस्थापित करण्यासाठी जिहाद करण्यासाठी संघटित होऊन ''अमीर'' (सेनापती) च्या नेतृत्वा खाली लढणे आवश्यक आहे आणि इतक्या तयारीनिशी इस्लामच्या शत्रूवर हल्ला केला जावा की त्याचे प्रभुत्व संपवले जावे; आणि सत्ता ईमानधारकानां प्राप्त व्हावी. या गोष्टी जिहादला धरती वरील उपद्रवा पेक्षा श्रेष्ठत्व प्रदान करतात.

आधुनिक युगात काही मुसलमानांनी दहशतवादाचे नांव जिहाद ठेवले आहे. यद्यपि हे उघड ''फसाद फिल अर्द'' अर्थात धरतीवरचा उपद्रव आहे. कारण यामुळे जिहाद फी सबीलिल्लाह अर्थात अल्लाहच्या मार्गातील जिहादचे उद्देश सफल होत नाही; उलट निष्पाप लोकांचे रक्तपात केले जाते; आणि हे सर्व काही सर्वानाशाला कारणीभूत ठरतात. त्याच प्रमाणे मुसलमानाचे आपसातील गृहयुद्ध जे सत्ताप्राप्ती साठी केले जाते; अल्लाहच्या मार्गातील जिहादच्या व्याख्येत त्याचा समावेश होत नाही.

---

وَ جَاهِدُوا فِي اللّٰهِ حَقَّ جِهَادِهٖ .

(سورہ حج:٧٨)

**अर्थात. आणि अल्लाह च्या मार्गात जिहाद करा जसे की जिहाद करण्याचा हक्क आहे.** (सूरह हज्ज. आयत क्र. ७८).





# जगाच्या तुलनेत स्वर्ग

## हदीस

**عَنْ سَهْلٍ قَالَ سَمِعْتُ النَّبِيَّ ﷺ يَقُوْلُ مَوْضِعُ سَوْطٍ فِي الْجَنَّةِ خَيْرٌ مِّنَ الدُّنْيَا وَمَا فِيْهَا وَلَغَدْوَةٌ فِي سَبِيْلِ اللّٰهِ اَوْ رَوْحَةٌ خَيْرٌ مِّنَ الدُّنْيَا وَمَا فِيْهَا.** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत सहल म्हणतात की मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावतांना ऐकले-स्वर्गात एका कचऱ्या इतकी जागा जग आणि जगात जे काही आहे त्यापेक्षा बेहत्तर आहे. आणि अल्लाहच्या मार्गात एक सकाळ किंवा एक संध्याकाळ घालविणे जग आणि त्यात जे काही आहे त्यापेक्षा बेहत्तर आहे. (बुखारी- किताबुर-रिक़ाक़).**

## स्पष्टीकरण

जग आणि त्यातील परमेश्वराने दिलेली सर्व धनसंपत्तीच्या तुलनेत स्वर्गाची काही मीटर जमीन बेहत्तर आहे. कारण स्वर्ग हे अमर आहे आणि जग हे तात्पुरते. स्वर्गातील धनसंपत्ती व देणग्या या सर्वश्रेष्ठ अल्लाहचा ईमान आहेत; तर जगाच्या देणग्या ह्या परिक्षा म्हणून आहेत स्वर्गाच्या देणग्या ह्या अति उच्च दर्ज्याच्या आहेत; तर जगातल्या देणग्या त्या तुलनेत तुच्छ आहेत. स्वर्गातील वातावरण अत्यंत पवित्र, शान्त, सुरक्षित आणि आनंदमय असेल; जेथे ना दु:ख असेल आणि ना भय. परंतु जगातील वातावरण या सर्व गुणवौशिष्ठयापासून खाली आहे. मग जगाकडे धावण्यापेक्षा माणसाने स्वर्गाकडे का धावू नये.

हदीस मध्ये दुसरी गोष्ट ही नमूद आहे की अल्लाहच्या मार्गात जिहाद करतानां एक सकाळ किंवा एक संध्याकाळ घालविणे त्याच्या सर्व देणग्या प्राप्ती पेक्षा बेहत्तर आहे. कारण जिहाद साठी जेव्हा एक ईमानधारक बाहेर पडतो तर तो आपले जीव मुठीत घेऊन निघतो. अल्लाहच्या मार्गात त्याच्या शौर्याची ही भावना अल्लाहपाशी अत्यंत वाखाणण्या लायक आहे. आणि जिहादमध्ये जर त्याने थोडा वेळही घालवलेला असू शकला असेल तर अल्लाह त्याला स्वर्ग प्रदान करेल; जे जग आणि त्यातील प्रत्येक वस्तु पेक्षा बेहत्तर आहे. यावरुन कल्पना येईल की, इस्लाम मध्ये जिहादचे काय महत्त्व आहे.

# खरी दुर्बलता
## हदीस

عَنْ ثُوْبَانَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : يُوْشِكُ الْاُمَمُ اَنْ تَدَاعٰى عَلَيْكُمْ كَمَا تَدَاعَى الْاَكَلَةُ اِلٰى قَصْعَتِهَا، فَقَالَ قَائِلٌ: وَمِنْ قِلَّةٍ نَحْنُ يَوْمَئِذٍ؟ قَالَ بَلْ اَنْتُمْ يَوْمَئِذٍ كَثِيْرٌ، وَلٰكِنَّكُمْ غُثَاءٌ كَغُثَاءِ السَّيْلِ، وَلَيَنْزِعَنَّ اللّٰهُ مِنْ صُدُوْرِ عَدُوِّكُمُ الْمَهَابَةَ مِنْكُمْ، وَلَيَقْذِفَنَّ اللّٰهُ فِيْ قُلُوْبِكُمُ الْوَهْنَ، فَقَالَ قَائِلٌ: يَارَسُوْلَ اللّٰهِ وَمَا الْوَهْنُ ؟ قَالَ : حُبُّ الدُّنْيَا وَكَرَاهِيَةُ الْمَوْتِ. (ابوداؤد كتاب الملاحم)

## अनुवाद

**हज़रत सौबान (रजि.) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. वेळ येऊन ठेपली आहे की, लोक समूह तुमच्या विरुद्ध एक मेकानां अशा पद्धतीने हाक मारुन बोलावतील, ज्या प्रमाणे जेवणारे जेवणाच्या प्याल्याकडे (ताटांकडे) एकमेकानां बोलावतात. एका माणसाने विचारले काय हे या कारणामुळे घडेल की, त्यावेळी आमची संख्या कमी असेल? त्यानी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लमनी) फर्मावले नव्हे तर त्यावेळी तुमची संख्या जास्त असेल; परंतु तुमची स्थिती पूराच्या फेस सारखी असेल. अल्लाह तुमच्या शत्रूंच्या मनातून तुमचे भय नष्ट करुन टाकेल आणि तुमच्या मनात ''वहन'' टाकून देईल. कोणा एक व्यक्तीने विचारले. हे अल्लाह चे प्रेषिता ''वहन'' काय आहे? फर्मावले: जगाशी प्रेम आणि मृत्यूला अप्रिय समजणे.** (अबुदाऊद-किताबुल मलाहिम)

## स्पष्टीकरण

या हदीसचे एक कथनकार अबु अब्दुस्सलाम ''मजहूल'' (अज्ञात) आहेत; म्हणजे





त्यांच्या स्थिती संबंधी माहिती उपलब्ध नाही. परंतु अल्लामा अलबानी यानी लिहिले आहे की, ही हदीस ''मुसनद अहमद'' (हदीस च्या पुस्तकाचे नांव) मध्ये अबु अस्माउर्रहबी कडून कथन करण्यात आली आहे. जे ''सेक्क'' (बुद्धीमान) आहेत. आणि ही हदीस ''सहीह'' (दुरुस्त बरोबर) आहे. (अल-अहादीसुस्सहीहा, खंड१,पृष्ठ क्र. ६८४, लिलबानी) आणि जेथ पर्यंत हदीस च्या विषयाचा संबंध आहे.त्यात कोणतीही ''नकारत'' (मज़मून) नाही. ''कसअत'' अरबी भाषेत जेवणा साठी वापरला जाणाऱ्या मोठया प्याल्याला म्हणतात.

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या या हदीस मध्ये भविष्यात ज्या समस्यना तोंड द्यावे लागणार आहेत, त्याकडे संकेत करण्यात आले आहे. मुसलमानांवर विविध जमातीचे हल्ले होतील; त्यावेळी मुसलमानांची संख्या फार जास्त असेल; परंतु त्यावेळी त्यांचे महत्त्व संपले असेल. आणि शत्रूंच्या मनातून त्यांचा धाक संपुष्टात आला असेल मुसलमानामध्ये मोठी दुर्बलता निर्माण झाली असेल. या दुर्बलतेच्या परिणाम स्वरुप त्यांच्या मनात जगाचे प्रेम घर केलेले असेल आणि ते जास्तीत जास्त जगण्याची इच्छा करतील. म्हणून धर्मकार्यात ते प्राणार्पण करायला तयार होणार नाही याचा अर्थ असा आहे की अल्लाहच्या मार्गातील जिहाद संबंधीचे धैर्य त्यांच्यात शिल्लक राहणार नाही. म्हणून शत्रूशी मुकाबला करण्याची हिम्मत त्यांच्यात राहणार नाही.

आधुनिक युगातील स्थिती काहीशी अशीच आहे. त्यानां आपल्या जीवनाच्या उद्देशांची कल्पना नाही: आणि ते डोके झाकून जग पूजेत व्यस्त आहेत. जेथे त्यांच्या हातात सत्ता आहे तेथे ऐश आरामात व्यस्त आहेत. आणि जिहादची भावना थंडावली आहे. परिणाम असा झाला आहे की, त्यांची किमंत कवडीमात्र शिल्लक राहिली आहे. आणि त्यांच्या शत्रूंचे त्यांच्या वर प्रभुत्व निर्माण झाले आहे. काफिर जमाती त्यांच्या वर हल्ले चढवीत आहेत. आणि ते अत्यंत तुच्छतेने भरडले जात आहेत. त्याची स्थिती ज्यू लोकांसारखी होत आहे; त्यांना अल्लाह ने संपूर्ण जगावर श्रेष्ठता प्रदान केली होती, आणि त्यांना सत्ता दिली होती. परंतु त्यांची अकृतज्ञता आणि त्यांच्या दुष्कृत्यांमुळे त्यांच्या वर बख्त नसर सारखे जालिम व अत्याचारी सत्ताधीश लादले गेले. ईश्वर करो मुसलमान या हदीसच्या प्रकाशात आपल्या स्थिती संबंधी चिंतन मनन करो.

# या लोकसमूहाची एक जमात जी कियामतीपर्यंत सत्यतेवर टिकून राहील.

## हदीस

قَالَ مُعَاوِيَةُ سَمِعْتُ النَّبِىَّ صلى الله عليه وسلم يَقُوْلُ لَايَزَالُ مِنْ اُمَّتِىْ اُمَّةٌ قَائِمَةٌ بِاَمْرِاللّٰهِ مَا يَضُرُّهُمْ مَنْ كَذَّبَهُمْ وَلَا مَنْ خَالَفَهُمْ حَتّٰى يَاْتِىَ اَمْرُ اللّٰهِ وَهُمْ عَلٰى ذٰلِکَ. (البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हज़रत मुआविया (रजि.) म्हणतात मी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावताना ऐकले, माझ्या ''उम्मत'' (लोकसमूह) ची एक जमाअत नेहमी अल्लाहच्या आदेशावर क़ायम राहील. त्या जमातीला खोटे ठरवणारे हानी पोहोचवू शकतील आणि ना ही विरोध करणारे येथपावेतो की अल्लाह ची आज्ञा येऊन ठेपेल, आणि ती त्याच स्थितीत राहील.**

(बुखारी -किताबुत तौहीद)

## स्पष्टीकरण

या उम्मतला जसे की क़ुरआन मध्ये नमूद आहे; ''खैरे उम्मत'' (उत्तम लोकसमूह) आणि ''उम्मते वस्त'' (मधले लोकसमूह) बनवले गेले आहे. म्हणजे तो लोकांवर सत्य धर्माची साक्षीदार असावी. प्रेषितांच्या साथीदारानी त्यानुसार अत्यंत चोखपणे कार्यकरत राहिले; आणि ही पदवी पर्याप्त करण्यास पात्र ठरले. परंतु नंतर च्या काळात जेव्हा हर प्रकारचे लोक या उम्मत मध्ये सामील होत राहिले, आपल्या दुर्बलतेवर ताबा ठेवू शकले





नाही. परिणामी उम्मत मध्ये बिघाडाला प्रारंभ झाला. आणि जसजसे लोकसंख्या वाढत गेली बिघाडात वाढच होत गेली. येथपावेतो की, आपण आधुनिक युगातील मुसलमानानां पाहात आहोत की त्यामध्ये जबरदस्त बिघाड निर्माण झालेला आहे. बिघाडचा हा सिलसिला असून देखील कोणताही काळ असा राहिलेला नाही. ज्यात सत्यतेचा आवाज बुलंद करणारे अजिबात राहिलेले नसावे. उलट थोडी फार संख्या मग ती किती का कमी असेना सत्य धर्माचे खऱ्या अर्थाने पालन करणारे राहिले आहेत. आणि याची साक्ष देत राहिले. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या कृपेने प्रत्येक काळात या उम्मत मध्ये अशा लोकानां जन्मी घालीत राहिला आहे. जेणे करुन मुस्लिम उम्मतच्या अस्तित्वाचा उद्देश अजिबात संपुष्ठात येऊ नये. आणि अल्लाहचा पुरावा सातत्याने लोकांवर क़ायम होत राहावा.

हदीस मध्ये याच गोष्टी कडे संकेत आहे की पुढे जेव्हा उम्मत मध्ये आम बिघाड झालेला असेल तर एक जमात-जमात ने संख्या अभिप्रेत आहे. एखाद्या विशिष्ठ ठिकाणी असलेली लोकांची जमात नव्हे -----------------निश्चितपणे असे घडेल; जे अल्लाहचे आदेश अर्थात सत्यतेवर क़ायम राहील आणि त्याची साक्ष देईल. हे लोक विपरित परिस्थितीत देखील आपल्या जागी अटळ राहतील. आणि कोणतीही शक्ती त्यानां आपल्या जागेवरुन हटवू शकणार नाही. त्यांच्यावर सत्यतेला खोटे ठरविणाऱ्यांचा कोणताही परिणाम होणार नाही. आणि ना ही ते विरोधांना दचकतील; उलट ते पर्वतासारखे सत्यतेवर अटळ राहतील. हदीस च्या शब्दानी स्पष्ट होते की, ही जमात (हे लोक) फार भाग्यशाली असेल. आणि त्यांच्यासाठी आखिरत च्या यशाची शुभवार्ता आहे. ईश्वर करो या संधीला प्राप्त करण्यासाठी लोकानी चढाओढ करावी.

## सत्कर्माचा आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखण्याचे कर्तव्य





# सत्कर्माचा आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखण्याच्या कर्तव्याचा त्याग केल्याने होणाऱ्या नरकयातना

## हदीस

عَنْ حُذَيْفَةَ بْنِ الْيَمَانِ عَنِ النَّبِيِّ صلى الله عليه وسلم قَالَ : وَالَّذِىْ نَفْسِىْ بِيَدِهٖ لَتَأْمُرُنَّ
بِالْمَعْرُوْفِ وَلَتَنْهَوُنَّ عَنِ الْمُنْكَرِ اَوْلَيُوْشِكَنَّ اللّٰهُ اَنْ يَّبْعَثَ عَلَيْكُمْ عِقَاباً مِنْهُ
فَتَدْعُوْنَهٗ فَلَا يَسْتَجِيْبُ لَكُمْ ـــــــ هٰذَا حَدِيْثٌ حَسَنٌ . (الترمذى ابواب الفتن)

## अनुवाद

**हज़रत हुज़ैफा बिन यमान कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फ़र्मावतात-शपथ आहे त्याची, ज्याच्या हातात माझे प्राण आहे. तुम्ही सत्कर्माचा आदेश कराल आणि दुष्कर्मापासून रोखाल. अन्यतः नजिकच्या काळात अल्लाह तुमच्यावर अज़ाब पाठवेल.मग तुम्ही दुआ (प्रार्थना) कराल तर तो स्वीकारणार नाही ही हदीस 'हसन' (उत्कृष्ट) आहे.** (तिरमिज़ी - अबवाबुल फितन)

## स्पष्टीकरण

सत्कर्माचे आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखणे हे ''उम्मते-मुस्लिमा'' (मुसलमान लोक समूह) चे अत्यंत महत्वाचे कर्तव्य आहे. या कर्तव्याचा त्याग सामूहिकपणे केल्याने सामूहिक बिघाड निर्माण होतो. आणि जेव्हा सामूहिक बिघाड निर्माण होतो तर अल्लाहचा अज़ाब देखील कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कोसळत असतो. अशा स्थितीत अज़ाबला दूर करण्यासाठी जी दुआ अगर प्रार्थना केली जाईल ती कबूल होणार नाही. येथ पावेतो की सुधारणा न केली जावी. आणि दुःख दायक वास्तविकता आहे की आज मुसलमानामध्ये बिघाड उघड उघड झाले आहे. आणि सत्कर्माचा आदेश करणारे आणि दुष्कर्मापासून रोखणारे अत्यल्प दिसून येतात. परिणाम असा आहे की, मुसलमान सामूहिकरित्या ज्या परिस्थितीनां तोंड देत आहेत, त्या बद्दल होण्यासाठी केलेल्या प्रार्थनाचा देखील काही ही परिणाम दिसून येत नाही. जर ते हे कर्तव्य पार पाडण्यासाठी उठून उभे राहिले तर परिस्थिती निश्चितपणे बदलू शकेल.

# दुष्कर्मा पासून न रोखण्याचा परिणाम म्हणजे सामूहिक सर्वनाश.

## हदीस

عَنِ النُّعمَانَ بُنِ بَشِيُرٍ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ مِثُلُ الُمُدُهِنِ فِیُ حُدُوُدِ اللّٰهِ وَالُوَاقِعُ فِيُهَا مِثُلُ قَوُمِ اسُتَهَمُوُا سَفِيُنَةً فَصَارَ بَعُضُهُمُ فِیٓ اَسُفَلِهَا فَصَارَ بَعُضُهُمُ فِیٓ اَعُلَاهَافَكَانَ الَّذِیُ فِیُ اَسُفَلِهَا يَمُرُّوُنَ بِالُمَآءِ عَلَی الَّذِيُنَ فِیٓ اَعُلَاهَا فَتَاَذَّوُ بِهٖ فَاَخَذَ فَاُساً فَجَعَلَ يَنُقُرُ اَسُفَلَ السَّفِيُنَةِ فَاَ تَوُهُ فَقَالُوُا مَالَکَ قَالَ تَاَذَّيُتُمُ بِیُ وَلَا بُدَّلِیُ مِنَ الُمَآءِ فَاِنُ اَخَذُوُ عَلٰی يَدَيُهِ اَنُجَوُهُ وَ نَجَّوُآ اَنُفُسَهُمُ وَ اِنُ تَرَكُوُهُ فَاَهُلَكُوُهُ وَ اَهُلَكُوُآ اَنُفُسَهُمُ . (البخاری کتاب الشہادات)

## अनुवाद

**नोअमान बिन बशीर कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-अल्लाह ने घालून दिलेल्या हद्दींवर क़ायम राहणारे आणि त्यांचे उल्लंघन करणाऱ्याचे उदाहरण त्या लोकांसारखे आहे; ज्यानी होडीत स्वार होण्यासाठी पासे टाकले. काही लोकांच्या हिस्स्याला वरचा मजला आला तर काही लोकांच्या वाटयाला खालचा मजला. खालच्या मजल्यातील लोकाना जेव्हा पाण्याची आवश्यकता भासत असे तेव्हा ते वरच्या मजल्यावर जात असे; यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत असे. त्यानी सांगितले आपल्या मजल्यावरच आपण का म्हाणून छिद्र करुन घेऊ नये म्हणजे त्यामुळे वरच्या मजल्यावरील लोकांना त्रास देण्यापासून आपण सुरक्षित राहू. या स्थितीत जर वर मजल्यातील लोक त्यांचे हात धरत असतील तर ते त्याना आणि स्वत:लाही वाचवू शकतील. आणि जर त्यांना सोडून दिले तर त्यानां तर ते मारतीलच स्वत:ही मरतील.**(बुखारी-किताबुश-शहादत.)





## स्पष्टीकरण

हे एक उत्कृष्ट उदाहरण या गोष्टीचे की, दुष्कर्मापासून न रोखण्याचा परिणाम कशा पद्धतीने सामूहिक सर्वनाशाच्या स्वरुपात प्रकट होतो. आणि जर वेळेवरच दुष्कर्म करण्या पासून रोखले गेले तर लोक कशा पद्धतीने सामूहिक सर्वनाशा पासून सुरक्षित राहतात. होडीत जे लोक वरच्या मजल्यावर बसले आहेत. त्यांचे खालच्या मजल्यावाल्याना वर येऊन पाणी घेण्यावर त्रास होणे आणि त्यावर आक्षेप घेणे. खालच्या मजल्यावरील लोकानां चुकी च्या दिशेवर टाकण्यास कारणीभूत आहे. त्यानी खाल च्या मजल्यावरील लोकांच्या अडचणींचा विचार करुन आणि आनंदाने त्यांना पाणी द्यायला हवे.

जे लोक अल्लाहने घालून दिलेल्या हद्दीवर क़ायम राहतात. आणि त्याचबरोबर त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांचे हात धरतात ते लोक संपूर्ण समाजाला सर्वनाशा पासून वाचवतात. परंतु जेव्हा अल्लाह ने घालून दिलेल्या मर्यादानां तोडणाऱ्यांपासून रोखणारा कोणी नसावा तर परिणाम समाजाच्या सर्व नाशाच्या रुपाने दिसून येतो. यावरुन उघड आहे की, सत्कर्मा चे आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखणे हे किती महत्त्वाचे कर्तव्य आहे. आणि हे कर्तव्य पार न पाडल्यावर आखिरत मध्ये कशी सक्ती ने विचारणा होईल.

---

لَوُلَا يَنُهٰهُمُ الرَّبّٰنِيُّوُنَ وَالُاَحُبَارُ عَنُ قَوُلِهِمُ الُاِثُمَ وَ اَكُلِهِمُ السُّحُتَ. لَبِئُسَ مَا كَانُوُ يَصُنَعُوُنَ . (سورۃ المائدہ:٦٣)

**अर्थात- यांच्यातले धर्म पंडित, दरवेश आणि यांचे पीर फकीर लोक यांना अपराधाची बकवास करण्यापासून आणि हरामाचा माल खाण्यापासून मनाई का करीत नाही? (आणि मनाई कशी करु शकतात, ज्या अर्थी स्वत:च अशा वाईट हरकती करीत राहतात.)**

# रस्त्याच्या कडेला बसणे टाळले पाहिजे.

## हदीस

**عَنْ اَبِیْ سَعِیْدِ الْخُدْرِیِّ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ اِیَّاکُمْ وَ الْجُلُوْسَ عَلَی الطُّرُقَاتِ فَقَالُوْ مَالَنَا بُدٌّ اِنَّمَا هِیَ مَجَالِسُنَا نَتَحَدَّثُ فِیْهَا. (قَالَ) فَاِذَا اَبَیْتُمْ اِلَّا الْمَجَالِسَ فَاَعْطُوْا الطَّرِیْقَ حَقَّهَا قَالُوْا وَمَا حَقُّ الطَّرِیْقِ قَالَ غَضُّ الْبَصَرِ وَ کَفُّ الْاَذٰی وَرَدُّ السَّلَامِ وَاَمْرٌ بِالْمَعْرُوْفِ وَنَهْیٌ عَنِ الْمُنْکَرِ.** (البخاری کتاب المظالم)

## अनुवाद

**हज़रत अबु सईद खुदरी (रजि.) कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- रस्त्यांवर बसणे टाळावे. लोकानी सांगितले आम्हाला शक्य नाही. आम्ही तेथे बसून गप्पा गोष्टी करीत असतो. फर्मावले जर तुम्ही तेथे बसणे आवश्यक आहे तर रस्त्याचा हक्क अदा करा.लोकांनी विचारले.रस्त्याचा हक्क काय आहे ?फर्मावले-नज़रा खाली राखणे, हानीकारक गोष्टीना रोखणे,सलाम चे उत्तर देणे, सत्कर्माचे आदेश देणे आणि दुष्कर्मापासून रोखणे.**(बुखारी-किताबुल मजालिम)

## स्पष्टीकरण

रस्त्यांवर बसून गप्पा गोष्टी करणे उचित नाही. कारण त्यामुळे माणसाची प्रतिष्ठा ही प्रभावित होते. आणि रस्त्याच्या कडेला ज्या वाईट गोष्टी समोर येतात, त्याना तो आत्मसात करु लागतो. म्हणून प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी त्यास मनाई केली आहे. परंतु जर रस्त्यांवर बसणे आवश्यक असेल तर त्यानी रस्त्याचा हक्क अदा करण्याचा आदेश दिला आहे. आणि तो असा आहे की, माणसाने रस्त्यावरुन जाणाऱ्या स्त्रीयांकडे पाहू नये; तर आपली दृष्टी खाली राखावी. रस्त्यात एखादी वस्तु अशी जी लोकांना त्रास दायक असेल तर तिला दूर टाकणे. उदाहरणार्थ-खिळे, काटे केळीची साल वगैरे. जर दिसले तर ते दूर करावे. येणारे जाणाऱ्या लोकानी सलाम केला तर त्या कडे दुर्लक्ष करु नये; तर सलामला उत्तर द्यावे. चांगल्या गोष्टी चे आदेश करावे आणि जी वाईट गोष्ट दिसेल, त्या पासून लोकानां रोखण्याचा प्रयत्न करावे.

या हदीस मुळे हे तात्विक मार्गदर्शन मिळते की, एका मुसलमानाला एखाद्या जागी जावे





लागले जेथे दुष्कर्म होत आहेत; तर त्याने त्या दुष्कर्मा विरुद्ध आवाज उठविला पाहिजे. किंवा लोकानां त्यापासून मनाई केली पाहिजे.

# रस्त्यातून यातना देणाऱ्या वस्तु बाजूला सारणे

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ بَیْنَمَا رَجُلٌ یَّمْشِیْ بِطَرِیْقٍ وَّجَدَ غُصْنَ شَوْکٍ فَاَخَذَهٗ فَشَکَرَ اللّٰهُ لَهٗ فَغَفَرَ لَهٗ.** (البخاری کتاب المظالم)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा म्हणतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले, एक माणूस रस्त्याने चालत होता की, त्याने काटयानी भरलेली फांदी पाहिली. तिला उचलले. अल्लाहने त्याची कदर केली आणि त्याची क्षमा केली. (बुखारी, किताबुल मज़ालिम)**

## स्पष्टीकरण

या हदीसचा अर्थ असा नाही की, त्या माणसाने दुसरे कोणते ही पुण्य कर्म केलेच नव्हते; तर अर्थ असा आहे की, रस्त्यातून काटे बाजूला सारणे एक असे पुण्य कर्म आहे, जे शक्य आहे की लोक त्याकडे दुर्लक्ष करतील. परंतु अल्लाहपाशी ते कदर करण्याजोगे पुण्यकर्म आहे. आणि त्या पुण्यकर्माच्या बदल्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्या माणसाची ज्याने काटयानी भरलेली फांदी बाजूला केली होती, क्षमा करुन टाकली.

या मुळे हे स्पष्ट झाले की कोणत्या ही पुण्यकर्माला क्षुल्लक समजून त्याकडे कानाडोळे करणे योग्य नाही. शक्यता आहे की, त्याच्या बदल्यात मोक्ष प्राप्त व्हावे. हदीसच्या अर्था मध्ये हर प्रकारच्या त्रास देणाऱ्या त्या सर्व वस्तु रस्त्यातून बाजूला सारणे सामील आहे; मग तो काटा असो, टाचणी असो, ब्लेड असो दगड असो किंवा केळीची साल ज्यामुळे पाय निसटून हाड फ्रॅक्चर होऊ शकते. किती उच्च दर्ज्याची शिकवणुक आहे; जी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी मुसलमानांना दिली आहे. परंतु आधुनिक समाजाची अशी स्थिती आहे की त्रास देणाऱ्या वस्तु रस्त्यात फेकून देतात. आणि याची अजिबात पर्वा राहात नाही की या वस्तुमुळे लोकानां काय त्रास होईल. ते पुण्य कमावण्याऐवजी पाप कमावतात. ईश्वर करो, त्यानां याची जाणीव असावी.

# द्अवत आणि धर्मप्रचार





# ''द्अवत'' आणि धर्मप्रचाराचा मोबदला.

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ مَنْ دَعَا اِلٰی هُدًی کَانَ لَهٗ مِنَ الْأَجْرِ مِثْلُ اُجُوْرِ مَنْ تَبِعُهٗ لَا یَنْقُصُ ذٰلِکَ مِنْ اُجُوْرِهِمْ شَیْئًا. وَمَنْ دَعَا اِلٰی ضَلَالَةٍ کَانَ عَلَیْهِ مِنَ الْاِثْمِ مِثْلُ آثَامِ مَنْ تَبِعَهٗ، لَا یَنْقُصُ ذٰلِکَ مِنْ آثَامِهِمْ شَیْئًا.** (مسلم کتاب العلم)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रजि.) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्माविले ज्या माणसाने ''हिदायत'' (उपदेश) कडे आमंत्रण दिले; तर त्याला इतका मोबदला मिळेल जितका त्याचे पालन करणाऱ्याना मिळेल. त्यांच्या मोबदल्यात कोणतीही कमतरता केली जाणार नाही. आणि ज्याने मार्गभ्रष्टतेकडे आमंत्रण दिले; तर त्याला तेवढेच पाप मिळेल जेवढे त्यावर चालणाऱ्याना होईल. आणि त्या पापांमध्ये कोणतीही कमतरता केली जाणार नाही.** (मुस्लिम-किताबुल इल्म)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये ''दअवत'' आणि धर्मप्रचाराचे कार्य करणाऱ्याना प्रोत्साहन देण्यात आले आहे. हिदायतकडे आमंत्रण देणाऱ्या लोकानां इतका मोबदला मिळेल जितका ते कबूल करणारे आणि अमलात आणणाऱ्याना मिळेल. इतक्या मोठया मोबदल्याला जर एका आमंत्रकाने आणि धर्मप्रचारकाने आपल्या डोळ्यासमोर ठेवले तर तो जास्तीत जास्त त्या कार्यांत मशगूल होऊन बसेल. आजकालच्या वातावरणात जेथे चहुकडे मार्गभ्रष्टता पसरलेली आहे. दअवत आणि धर्मप्रचाराचे कार्य युद्ध पातळीवर पार पाडायची आवश्यकता आहे. परंतु हे सौभाग्य फारच कमी लोकानां प्राप्त होत असते.

उपरोक्त हदीस मध्ये या गोष्टीची देखील तंबी केली गेली आहे. की जो माणूस पदभ्रष्टतेचा प्रसार करतो. तो आपल्या पापांमध्ये तेवढीच वाढ करतो, जेवढे पाप ही मार्गभ्रष्टता कबूल करणाऱ्यांना होत असते.

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की हिदायत तीच आहे, जी पवित्र क़ुरआन आणि हदीस मध्ये सादर केली गेली आहे. आणि मोबदला केवळ त्याच हिदायत कडे आमंत्रण देणाऱ्यासाठी आहे. अणि हिलाच ''द्अवते इस्लामी'' म्हणतात. धर्मातील नवीन गोष्टी आणि भानगडी आणि बिनबुडाच्या हदीसींकडे दअवत देणे दअवते इस्लामी नाही; उलटपक्षी ती मार्गभ्रष्टता आहे.

# ''दअवत''
# मधील क्रमश: वाढ

## हदीस

عَنُ ابُنِ عَبَّاسٍ اَنَّ مُعَاذًا قَالَ :بَعَثَنِیُ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ قَالَ اِنَّکَ تَأتِیُ قَوُماً مِنُ اَهُلِ الُکِتَابِ فَادُعُهُمُ اِلٰی شَهَادَةِ اَنَّ لَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَ اَنِّیُ رَسُوُلُ اللّٰهِ. فَاِنُ هُمُ اَطَاعُوا لِذَلِکَ فَاَعُلِمُهُمُ اَنَّ اللّٰهَ افُتَرَضَ عَلَیُهِمُ خَمُسَ صَلَوَاتٍ فِی کُلِّ یَوُمٍ وَلَیُلَةٍ. فَاِنُ هُمُ اَطَاعُوُ لِذٰلِکَ فَاَعُلِمُهُمُ اَنَّ اللّٰهَ افُتَرَضَ عَلَیُهِمُ صَدَقَةً تُؤُخَذُ مِنُ اَغُنِیَائِهِمُ فَتُرَدُّ فِیُ فُقَرَائِهِمُ. فَاِنُ هُمُ اَطَاعُوا لِذٰلِکَ فَاِیَّاکَ وَ کَرَائِمَ اَمُوَالِهِمُ وَ اتَّقِ دَعُوَةَ الُمَظُلُوُمِ فَاِنَّهٗ لَیُسَ بَیُنَهَا وَبَیُنَ اللّٰهِ حِجَابٌ. (مسلم کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास (रजि.) कथन करतात की हज़रत मुआज़ (रजि.) यानी सांगितले की, अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी मला (येमेन) येथे रवाना केले तेव्हा फर्मावले-तुम्ही अशा लोकांकडे जाल, जे अहले ''किताब''(ग्रंथधारक) पैकी आहेत.तर त्यानां बोलवा या गोष्टीकडे की, त्यानी गवाही द्यावी की, अल्लाह शिवाय कोणीही परमेश्वर नाही. आणि मी अल्लाह चा प्रेषित आहे. मग जेव्हा ते हे मान्य करतील तर त्यांना सांगा की, त्यांच्यावर रात्र आणि दिवसात पाच नमाज़ अनिवार्य केल्या गेल्या आहेत. मग जेव्हा ते हे मान्य करतील तर त्यांना हे सांगा की, अल्लाह ने त्यांच्यावर ज़कात फर्ज़ (अनिवार्य) केले आहे; जी त्यांच्या श्रीमंताकडून घेण्यात येईल. आणि त्यांच्या गरजवंताना देण्यात येईल, मग जेव्हा ते हे मान्य करतील तर त्यांचा चांगले माल घेण्याचे टाळा आणि पिडीतांच्या श्रापांपासून सावध राहा. कारण त्याच्या आणि अल्लाहच्या दरम्यान कोणतेही आड राहात नाही.**

(मुस्लिम - किताबुल- ईमान)





# स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी हज़रत मुआज़ यांना येमेनचे अधिकारी बनवून पाठवले होते. त्यावेळी त्यांना ज्या सूचना दिल्या होत्या त्या मुस्लिमेतरानां इस्लाम कडे आमंत्रण देण्यासंबंधी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पहिली गोष्ट तर ही आहे की, मुस्लिमेतरानां या गोष्टीचे आमंत्रण दिले जावे की त्यानी अल्लाहला एक ईश्वर मानावे. आणि हज़रत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना त्याचे प्रेषित.ही इस्लाम स्वीकृती ची थेट दअवत आहे. आणि हीच दअवत ची खरी पद्धत आहे. आधुनिक युगात दअवत आणि धर्मप्रचाराची सेवा करणारे इस्लामचा परिचय करुन देण्यावरच संतुष्ट होतात. आणि इस्लाम स्वीकृतीची थेट दअवत देण्या कामी संकोच बाळगतात. त्यामुळे दअवत आणि धर्मप्रचाराचे कार्य अपूर्ण राहते. आणि त्याचे संभाव्य परिणाम दिसून येत नाहीत.

दुसरी गोष्ट अशी आहे की जे लोक इस्लामचा स्वीकार करतील त्यांच्या कडून शरीअतच्या आदेशाचे पालन करण्याचा तगादा करताना शक्यतो वर त्यात क्रमश! वाढ करावी.त्यात प्राथमिकता नमाज़ला दिली गेली पाहिजे. आणि त्यानंतर जकात ला.

तिसरी गोष्ट अशी की, नमाज़ पाच वेळा फर्ज़ (अनिवार्य) आहे.

चौथी गोष्ट अशी की, ज़कात च्या वापरात गरजूंची मदत करण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे.

पाचवी गोष्ट अशी की जकात त्या लोकांवर फर्ज आहे जे शरीअतच्या व्याख्येत श्रीमंत आहेत; म्हणजे जे गरजू नाहीत. दुसऱ्या शब्दात ''साहिबे निसाब'' (ज़कात देण्यास पात्र) आहेत.

सहावी गोष्ट अशी की, ज़कात श्रीमंतांकडून वसूल करणे आणि गरजवंतामध्ये वाटप करणे इस्लामी शासनाची जबाबदारी आहे.

सातवी गोष्ट अशी की, जकात वसूल करण्यासाठी ज्या लोकानां आदेश देण्यात आले आहे. त्यानी निवडून निवडून चांगला माल घेऊ नये. तर मधल्या दर्ज्याच्या मालाचा त्यानी विचार करावा.

आठवी गोष्ट अशी की, अधिकारी वर्गाने कोणावर अत्याचार करु नये कारण शोषिताचा सुसकारा थेट ''अर्श'' च्या स्वामी पर्यंत (अल्लाह पर्यंत) जाऊन पोहोचतो.

# व्यवस्था आणि संघटन





# संघटित व्यवस्था टिकवण्यासाठी ऐकणे व आज्ञापालन करणे आवश्यक.

## हदीस

عَنْ عَبْدِاللّٰهِ رَضِىَ اللّٰهُ عَنْهُ عَنِ النَّبِىِّ صلى الله عليه وسلم قَالَ اَلسَّمْعُ وَ
الطَّاعَةُ عَلَى الْمَرْءِ الْمُسْلِمِ فِيْمَا اَحَبَّ وَكَرِهَ مَالَمْ يُؤْمَرْ بِمَعْصِيَةٍ
فَاِذَا اُمِرَ بِمَعْصِيَةٍ فَلَا سَمْعَ وَلَا طَاعَةَ .(البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले, ऐकणे व आज्ञा पालन करणे मुसलमानावर बंधनकारक आहे. मग त्याला एखाद्यी आज्ञा पसंत असावी अगर नसावी; येथ पावेतो की जो पर्यंत पाप करण्याची आज्ञा केली न जावी. जर पाप करण्याची आज्ञा केली गेली तर ती ऐकणे नाही आणि पालन करणेही नाही.** (बुखारी-किताबुल अहकाम)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये ऐकणे व ''आज्ञापालन''या शब्दानी आपल्या अधिकाऱ्याची आज्ञा ऐकणे आणि त्याच्या आज्ञेचे पालन करेणे हा अर्थ अभिप्रेत आहे. क़ुरआनमध्ये**اولوالامر** ची आज्ञा पालन करण्याचा आदेश दिला गेला आहे. परंतु त्याच बरोबर ''मिनकुम'' (अर्थात तुमच्या पैकी) ची अटलावली गेली आहे. म्हणजे ते आज्ञा करणारे अधिकारी मुसलमानांपैकी असावेत. आणि ते अल्लाह आणि त्याचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या आज्ञापालना खाली मुसलमानाचे सामूहिक कामानां पार पाडीत असावेत.जसे की सूरह निसा ची आयत क्र.५९ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. संघटित व्यवस्था क़ायम टिकवण्याकरिता हे अत्यंत आवश्यक आहे की ''अमीर'' अर्थात अधिकारी जी आज्ञा करतो तिचे पालन केले जावे; मग ती आज्ञा पसंत असो वा नापसंत. जर प्रत्येक जण आपली पसंत आणि आपल्या मतासाठी आग्रह करु लागला तर कोणतेहि संघटन क़ायम राहूच शकत नाही. म्हणून आपल्या मताचा बळी देऊन शासकाच्या आज्ञेचे पालन केले गेले पाहिजे. परंतु जर अमीर एखादा असा आदेश देत असेल ज्यामुळे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा होत असेल तर मग अशा आदेशाचे पालन केले जाऊ नये. मग त्यामुळे संघटित व्यवस्था प्रभावित होत असावी. कारण संघटित व्यवस्था अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञापालना करिताच आहे. मग का म्हणून त्याची अवज्ञा केली जाऊ शकते?

# धर्म प्रमुखाच्या न आवडणाऱ्या गोष्टींवर संयम पाळणे.

## हदीस

عَنِ ا بْنِ عَبَّاسٍ يَرْوِيَهِ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ مَنْ رَّاٰى مِنْ اَمِيْرِهِ شَيْـئًا فَكَرِهَهٗ فَلْيَصْبِرْ فَاِنَّهٗ لَيْسَ اَحَدٌ يُّفَارِقُ الْجَمَاعَةَ شِبْرًا فَيَمُوْتُ اِلَّا مَاتَ مِيْتَةً جَاهِلِيَّةً. (البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास (रजि.) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-कोणी जर आपल्या धर्मप्रमुखा मध्ये एखादी नावडती गोष्ट पाहिली तर त्याने संयम पाळावे. कारण जो कोणी ही ''अल-जमाअत'' (संघटना) पासून एक वीत बरोबर ही वेगळा होईल आणि त्याच स्थितीत त्याला मरण आले तर त्याचे मरण हे जाहिलियत'' (अज्ञान) चे मरण होईल.** (बुखारी-किताबुल-अहकाम)

## स्पष्टीकरण

''अल जमाअत'' या संज्ञेशी मुसलमानाची ती संघटित व्यवस्था अभिप्रेत आहे, जिला सत्ता प्राप्त असावी. अशा जमात पासून बाहेर पडणे अगर त्या विरुद्ध बंड पुकारणे हे फार मोठया अफरातफरीला कारणीभूत होऊ शकते कारण एका स्थापित शासनाला मान्य न करणे किंवा त्याविरुद्ध बंड पुकारणे यामुळे आपसात युद्ध आणि फूट-फाट होण्याची स्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून सूचना देण्यात आली आहे की, मुसलमान ज्या अधिकारी किंवा खलीफा साठी संघटित व्हावेत त्यात जर एखादा दुर्गुण जरी असेल तर त्याच्या विरोधात एखादी लहान मोठी जमात उभी करण्यापेक्षा अशा स्थितति संयम पाळणे हे अधिक उचित आहे.

''जाहिलियत'' चे मरण या शब्दांशी कुफ्र अर्थात एकेश्वरवादाचा इन्कारच्या स्थितति मृत्यू नव्हे तर गैर इस्लामी पद्तीवर मृत्यू अभिप्रेत आहे. ''जाहिलियत'' हा शब्द इस्लामी पद्धतीच्या विरुद्ध शब्दासाठी बोलला जातो. आणि येथे त्याचा हाच अर्थ अभिप्रेत आहे. म्हणून ''बुखारी'' या ग्रंथाचे ''शारेह'' हाफिज़ इब्ने हज़र यानी स्पष्टीकरण केले आहे की,





याने हे अभिप्रेत नव्हे की, तो कुफ्रच्या स्थितीत मरण पत्करेल तर तो पापी असण्याच्या स्थितीत मरण पावेल.'' (फतहुलबारी-खंड १३,पृष्ठ क्र.५)

अल-जमाअत पासून वीत भर वेगळे होण्याचा अर्थ ही ''फतहुलबारी'' च्या लेखकाने हेच वर्णन केले आहे.

''हा इशारा आहे सुलतान (अधिकारी) ची अवज्ञा आणि त्याच्याशी युद्ध करण्याचा.'' त्यानी हेही लिहिले आहे की,इस्लामी तत्वेत्ते त्या सुलतान ची आज्ञा पालनच्या आवश्यकते वर ज्याला प्रभुत्व प्राप्त असेल आणि त्याच्या बरोबर जिहाद करण्यासंबंधी सहमत आहेत. आणि त्याचे आज्ञापालन बंड पुकारण्यापेक्षा बेहतर आहे. कारण त्यात रक्तपात आहे.'' आता हे स्पष्ट झाले की, उपरोक्त हदीस मध्ये अमीर संबंधी जी गोष्ट म्हटली गेली आहे; ती मुसलमानांमधील फूटाफाट आणि रक्तपात या पासून सुरक्षित राहण्याकरिता म्हटली गेली आहे. परंतु आधुनिक युगात ज्या ठिकाणी लोकशाही पद्धतीवर राज्यव्यवस्था कायम आहेत, तेथे शांतते च्या मार्गाने शासनकर्त्याना सुधारणेकडे लक्ष केंद्रित करणे आणि ते बदलण्याच्या संधी उपलब्ध असतात. म्हणजे बदलत्या परिस्थितीत सरकार आणि जबाबदार व्यक्तींच्या सुधारणे करिता शांततामय पद्धतीचा अवलंब केला जाऊ शकतो. आणि असे करणे उपरोक्त हदीसच्या उद्देशाविरुद्ध होणार नाही.

येथे हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की उपरोक्त हदीस मध्ये ज्या जमात चे वर्णन आलेले आहे; तिचा संबंध मुसलमानांच्या त्या लहान मोठ्या जमातीशी जोडणे उचित नाही; जे धर्माचा प्रचार व दअवत किंवा इस्लामी शासन व्यवस्था कायम करण्याकरिता उठल्या आहेत.अशा जमातींचे अस्तित्व फायदेशीर तर असू शकते. परंतु त्यांच्यावर ते सर्व आदेश लागू करणे उचित नाही जे हदीस मध्ये सत्ताधारी अल-जमात साठी वर्णन केले गेले आहे. म्हणून या जमाती पैकी एखाद्या जमात मधून एखादा माणूस मतभेदाच्या कारणामुळे बाहेर पडत असेल तर त्याचे हे बाहेर पडणे ''जाहिलियत'' म्हणून संबोधणे अजिबात उचित नाही.

---

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اَطِيْعُوا اللّٰهَ وَ اَطِيْعُوا الرَّسُوْلَ وَ اُولِى الْاَمْرِ مِنْكُمْ . (سورۂ نساء :۵۹)

**हे ईमान धारकानो ! अल्लाह ची आज्ञापालन करा प्रेषितांची आज्ञा पालन करा आणि त्या लोकांची जे तुमच्या पैकी ''साहिबे अम्र'' (अर्थात सत्ताधारी) असावेत'' (सूरह निसा-आयत क्र.५९)**

# खुर्चीची लालसा करु नका

## हदीस

عَنْ عَبْدِ الرَّحْمٰنِ بِنْ سُمُرَةَ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ يَا عَبْدَ الرَّحْمٰنِ لَاتَسْأَلِ الْإِمَارَةَ فَإِنَّكَ إِنْ أُعْطِيْتَهَا عَنْ مَّسْأَلَةٍ وُكِّلْتَ إِلَيْهَا وَإِنْ أُعْطِيْتَهَا عَنْ غَيْرِ مَسْأَلَةٍ أُعِنْتَ عَلَيْهَا وَإِذَا حَلَفْتَ عَلٰى يَمِيْنٍ فَرَأَيْتَ غَيْرَهَا خَيْرًا مِّنْهَا فَكَفِّرْ يَمِيْنَكَ وَأْتِ الَّذِىْ هُوَ خَيْرٌ. (البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**अब्दुर्रहमान बिन समरा कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-हे अब्दुर्रहमान !''अमारत''(सत्ता)मागू नका कारण जर मागण्यावर ती प्राप्त झाली तर तुम्हाला तिच्या (सत्तेच्या) सुपुर्द केले जाईल आणि जर न मागता प्राप्त झाली तर त्यात तुमचे सहाय्य केले जाईल. आणि जेव्हा तुम्ही एखाद्या वस्तु संबंधी शपथ घ्याल आणि त्यानंतर दुसरा मार्ग तुम्हाला उचित वाटला तर आपल्या शपथीचा कफ्फारा''(पापा चे प्रायश्चित) द्या. आणि जी वस्तु बेहतर आहे, तिचा अवलंब करा. (बुखारी -किताबुल अहकाम)**

## स्पष्टीकरण

अमारत म्हणजे सत्ता आणि शासन. ही एक फार मोठी जबाबदारी आहे. तिचे हुद्दे आणि अधिकार आपल्या बरोबर फार मोठ्या जबाबदाऱ्या आणतात. म्हणून ही वस्तु अशी नाही की, माणसाने त्याची इच्छा प्रकट करावी, किंवा त्याची याचना करावी. एक ईश-भय बाळगणारा माणूस त्या पासून लांब राहणेच पसंत करेल कारण जसे हदीस मध्ये नमूद आहे. जर मागणी केल्यावर एखादा हुद्दा किंवा अधिकार प्राप्त झाला, तर मग त्याला त्या हुद्याच्या ताब्यात दिले जाईल. म्हणजे अशा स्थितीत तो अल्लाहच्या सहाय्यते पासून वंचित राहील. परंतु जर मागणी न करता एखादा हुद्दा अगर अधिकार प्राप्त झाला तर सर्वश्रेष्ठ अल्लाह ती जबाबदारी नीटपणे पार पाडण्यासाठी त्याची मदत करेल.

वास्तविकता अशी आहे की, सत्ता आणि हुद्याची याचना आपसातील संघर्षाला कारणीभूत होते. असे लोक निस्पृह कसे होऊ शकतील. त्याचा उद्देश तर आपल्या वैभव





दाखवणे राहील. आजचे राजकरण जे घाणेरडे झाले आहे. त्याचे एक मोठे कारण हेच आहे. की लोक खुर्चीचे भुकलेले आहेत आणि तिच्याकडे धावत आहेत. त्यानां खुर्ची मिळून गेल्यानंतर ते आपल्या जबाबदाऱ्या विसरतात. ही वस्तुस्थिती धडा धेन्या सारखी आहे. आणि यामुळे हदीस ची सत्यता सिद्ध होते.

लक्षात असू द्यावे की, जर एक सच्चा मुसलमान एखाद्या सरकारी हुद्याचा इच्छुक नसावा आणि त्यापासून अलिप्त राहू इच्छित असेल, परंतु वस्तुस्थिती अशी असावी की, त्यासाठी लायक व्यक्ती नसावेत आणि धार्मिक सुधारणेसाठी याची आवश्यकता असावी की स्वत:ला या हुद्यासाठी पेश केले जावे तर अशा स्थितीत हुद्याची मागणी केली जाऊ शकते. म्हणून हज़रत यूसुफ अलैहिस्सलाम यानी महान उद्देश दृष्टीसमोर ठेवून इजिप्त च्या राजा पुढे ''खजाईनिल अर्द'' (राज्याचा खाजीनदार) म्हणून स्थानापन्न केले जाण्याची मागणी केली होती.

उपरोक्त हदीस मध्ये दुसरी गोष्ट शपथ संबंधी वर्णन केली गेली आहे. ती अशी की, कोणतीही गोष्ट न करण्याची शपथ घेतल्यानंतर जर दुसरा मार्ग उचित जाणवत असेल तर ही संधी आहे की शपथ मोडून त्या गोष्टीचे प्रायश्चित केले जावे. ही सावधगिरी या करिता सांगण्यात आली आहे की, माणसाने शपथ घेतल्यानंतर आणि त्यापेक्षा चांगला मार्ग समोर आल्यावर तो कठिण परिस्थितीत न सापडून जावा.

---

تِلْكَ الدَّارُ الْاٰخِرَةُ نَجْعَلُهَا لِلَّذِيْنَ لَا يُرِيْدُوْنَ عُلُوًّا فِى الْاَرْضِ وَلَا فَسَادًا. وَالْعَاقِبَةُ لِلْمُتَّقِيْنَ . (سورۃ قصص:۸۳)

**''हे आखिरत चे घर आम्ही त्या लोकांसाठी खास करुन टाकू जे धरती वर आपला मोठेपणा दाखवत नाही. आणि फसाद इच्छित नाही.चांगला परिणाम फक्त त्याच लोकांचा आहे; जे भय राखून कर्म करतात. (सूरह क़सस आयत क्र.८३)**

# इस्लामी संप्रदाय एकाशरीर प्रमाणे

## हदीस

عَنْ عَامِرٍ قَالَ سَمِعْتُهٗ يَقُوْلُ سَمِعْتُ النُّعْمَانَ ابْنِ بَشِيْرٍ يَقُوْلُ
قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : تَرَى الْمُؤْمِنِيْنَ فِى تَرَاحُمِهِمْ وَ
تَوَادِّهِمْ وَ تَعَاطُفِهِمْ كَمَثَلِ الْجَسَدِ اِذَا اشْتَكٰى عُضْواً تَدَاعٰى
لَهٗ سَائِرُجَسَدِهٖ بِالسَّهَرِ وَالْحُمّٰى . (البخاری کتاب الادب)

## अनुवाद

**हज़रत आमिर (रजि.) म्हणतात की, मी नुअमान इब्ने बशीर यांना म्हणताना ऐकले की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-तुम्ही ईमान धारकाना पाहाल की एकमेकांवर दयाळू आपसातील प्रेम आणि दयाभावच्या बतीत एक शरीर प्रमाणे आहेत; म्हणजे ते असे की, त्याचं एक भाग आजारी पडला तर संपूर्ण शरीर निद्रानाश आणि ताप यामध्ये अडकून जाते.** (बुखारी-किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

ईमान धारक मग ते कोणत्याही देशात आणि देशाच्या कोणत्या ही भागात राहात असो, एका धर्माचे श्रद्धाळू असल्यामुळे ''मिल्लते वाहेदा'' (एकच लोकसमूह अगर जमात) आहेत. आणि हदीस मध्ये त्यांचे हे वैशिष्ठ्य वर्णन करण्यात आलेले आहे की, ते एकमेकासांठी दयाळू असतात, आपसात प्रेम करतात, आणि एकमेकांवर मेहेरबानी करतात, त्याची उपमा एका शरीराने दिली गेली आहे; ज्याचा एक भाग आजारी पडला तर संपूर्ण शरीरात त्याचा परिणाम जाणवू लागतो. त्याचप्रमाणे ईमानधारकांची एक जमात जर एखाद्या संकटात सापडली तर दुसरे ईमानधारक त्याची वेदना आपल्या मध्ये जाणवू लागतात.

यामुळे हे स्पष्ट आहे की इस्लाम मुसलमानामध्ये कोणती गुणवैशिष्ठये पाहू इच्छित आहे. परंतु खेदाने नमूद करावेसे वाटते की, राजकीय चढाओढ आणि आपसातील भांडणं या सर्व कारणामुळे या वैशिष्ठयापासून दूर होत जात आहेत. ईश्वर करो, त्यानी या हदीसच्या प्रकाशात आपले आत्मपरिक्षण करावे.





# एका मुसलमानाची दुसऱ्या मुसलमानाशी वर्तणुक

## हदीस

عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ عُمَرَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ
اَلْمُسْلِمُ اَخُو الْمُسْلِمِ لَا يَظْلِمُهٗ وَلَا يُسْلِمُهٗ وَمَنْ كَانَ فِىْ
حَاجَةِ اَخِيْهِ كَانَ اللّٰهُ فِىْ حَاجَتِهٖ وَمَنْ فَرَّجَ عَنْ مُّسْلِمٍ
كُرْبَةً فَرَّجَ اللّٰهُ عَنْهُ كُرْبَةً مِنْ كُرُبَاتِ يَوْمِ الْقِيٰمَةِ وَمَنْ
سَتَرَ مُسْلِمًا سَتَرَهُ اللّٰهُ يَوْمَ الْقِيٰمَةِ. (البخاری کتاب المظالم)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन उमर कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-मुसलमान मुसलमानाचा भाऊ आहे.ना ही त्याच्या वर जुलूम करावा व ना ही जालिमाच्या हवाली करावा, जो माणूस आपल्या बांधवाची गरज पूर्ण करण्याकामी व्यस्त राहतो. आल्लाह त्याची गरज पूर्ण करतो, जो माणूस एखाद्या मुसलमानाचे त्रास दूर करतो अल्लाह क़ियामतीच्या दिवशी त्याचा त्रास दूर करेल. आणि जो कोणी एखाद्या मुसलमानाचा दोष लपवेल, अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याचे दोष लपवेल.** (बुखारी-किताबुल मुजालिम)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये मुसलमानानां या गोष्टीचे शिक्षण दिले गेले आहे की, त्यानी एकमेकांशी कशी वर्तणुक करायला हवी. मूळ गोष्ट अशी आहे की, मुसलमानांच्या दरम्यान आपसातील

संबंध हा धार्मिक बंधुत्वाचा आहे. ज्याचा तगादा असा आहे की, एक मुसलमानाने दुसऱ्या मुसलमानावर अत्याचार व अतिरेक करु नये.आणि ना ही त्याला ज़ालिमाच्या ताब्यात द्यावे; कारण त्यामुळे तो अत्याचार व अतिरेकाला बळी पडेल. एखाद्या मुसलमानाची गरज भागवणे फार मोठे व महान पुण्यकर्म आहे. ज्याचा मोबदला असा आहे की, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याची गरज भागवेल. त्याच प्रमाणे एखाद्या मुसलमानाला त्रासातून मुक्त करणे इतके महान पुण्यकर्म आहे की, सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याला त्रासा पासून मुक्त करेल.

एखाद्या मुसलमानाचे दोष वर्णन करणे ही फार वाईट गोष्ट आहे. आणि ती लपवणे हे उत्तम गुण आहे. आणि क़ियामतीच्या दिवशी अल्लाह त्याचे दोष लपवेल. तर कोणता असा माणूस आहे जो इच्छा करणार नाही की त्याचे दोष लपवले जावेत. मग तो दुसऱ्या चे दोष का शोधत बसतो; आणि का म्हणून त्याचे वर्णन दुसऱ्या समोर करत बसतो? कियामतीच्या दिवशी प्रत्येक कर्माचा मोबदला त्या कर्माचा मोबदला त्या कर्माच्या एवढेच देण्यात येईल. म्हणून ज्याने आपल्या मुसलमान बांधवाच्या दोषांवर पडदा टाकलेला असेल, क़ियामतीच्या दिवशी त्याच्याही दोषांवर पडदा टाकण्यात येईल.

एका मुसलमानाचे दुसऱ्या मुसलमानाशी वर्तवणुकी संबंधी ही एक उत्कृष्ट शिकवणुक आहे; जी या हदीस मध्ये देण्यात आली आहे. आणि त्याकडे कानाडोळा करण्याचाच हा परिणाम आहे की, मुसलमान समाज आपसातील ओढाताण आणि भांडणतंटयामध्ये गुंतून गेला आहे.





# चांगला संकल्प आणि ईश-प्रसन्नतेची आवड

# पुण्यकर्माच्या स्वीकृतीकरिता शुध्द इरादा असणे आवश्यक

## हदीस

**عَنْ اَبِیْ مُوْسیٰ قَالَ جَآءَ رَجُلٌ اِلَی النَّبِیِّ ﷺ فَقَالَ رَجُلٌ یُقَاتِلُ حَمِیَّةً وَ یُقَاتِلُ شُجَاعَةً وَ یُقَاتِلُ رِیَآءً فَاَیُّ ذٰلِکَ فِیْ سَبِیْلِ اللّٰهِ قَالَ مَنْ قَاتَلَ لِتَکُوْنَ کَلِمَةُ اللّٰهِ هِیَ الْعُلْیَا فَهُوَ فِیْ سَبِیْلِ اللّٰهِ .** (البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हज़रत अबु मूसा फर्मावतात की, एक माणूस प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या सेवेत हजर झाला आणि विचारले. एखादा माणूस लज्जेमुळे लढतो, आणि कोणी शौर्यासाठी आणि कोणी देखाव्यासाठी, तर यांच्या पैकी कोणाचे लढणे अल्लाह च्या मार्गात आहे? त्यानी फर्मावले. जो माणूस या कारणामुळे लढतो की, त्यामुळे अल्लाहचाच ''कलिमा''(धर्मसूत्र) बुलंद व्हावा तर त्याचेच लढणे अल्लाहच्या मार्गात आहे.**

**(बुखारी-किताबुत-तौहीद)**

## स्पष्टीकरण

प्रत्येक पुण्यकर्मासाठी इरादा शुद्ध असणे आवश्यक आहे. म्हणजे ते कर्म केवळ अल्लाहच्या प्रसन्नते साठी केले जावे; त्यात उद्देश तोच असावा जो अल्लाह ने निश्चित केलेला आहे. उदाहरणार्थ जिहाद-अल्लाह चा कलिमा (धर्मसूत्र) म्हणजे ऐकेश्वरवादाचे तत्त्व बुलंद करण्याच्या उद्देशाने केला जावा. जर इरादा आपल्या जमातच्या अब्रू आणि लज्जे साठी लढणे असेल तर त्यावर कोणताही मोबदला मिळणार नाही. आधुनिक युगात मुसलमानांमध्ये अशा लोकांची कमतरता नाही जे देश भक्त असतात आणि केवळ देशाच्या अब्रू आणि हिमायतीसाठी लढत असतात. अशा मुसलमानांनी या हदीस पासून घडा घेतला पाहिजे.





जर जिहाद साठी एखादी व्यक्तीगत गरज असेल उदाहरणार्थ स्वत:ला शूर म्हणविण्यासाठी जिवाची बाजी लावून टाकणे. किंवा लोकानां दाखविण्यासाठी लढणे तर इतके मोठे कर्म ही अल्लाह च्या ''मीज़ान''(तराजू) मध्ये कोणते ही वज़न राहणार नाही. त्याच्या ''मीज़ान'' मध्ये तर त्याचे तेच पुण्यकर्म वजनदार असेल जो केवळ अल्लाह साठी केला गेला असावा देखावा तर मग ते पुण्यकर्म किती ही महान का असेना नष्ट करुन टाकते.

या हदीस मुळे हे स्पष्ट होते की,इस्लाम मध्ये जिहाद चा उद्देश अल्लाहच्या ऐकेश्वरवादाच्या धर्मसूत्राला बुलंद करणे आहे. आणि हाच उद्देश मुजाहिदीनच्या दृष्टीसमोर असायला हवा. मुसलमानाचे आपसातील युद्धाचा समावेश अल्लाहच्या मार्गातील जिहाद मध्ये होत नाही.

# कर्म इराद्याशी संबंधित असतात

## हदीस

**قَالَ عُمَرُ بْنُ الْخَطَّابِ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ عَلَی الْمِنْبَرِ یَقُوْلُ سَمِعْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ یَقُوْلُ اِنَّمَا الْاَعْمَالُ بِالنِّیَّاتِ وَ اِنَّمَا لِکُلِّ امْرِیٍٔ مَّا نَوٰی فَمَنْ کَانَتْ هِجْرَتُهٗ اِلٰی دُنْیَا یُصِیْبُهَا اَوْ اِلَی امْرَاَةٍ یَّنْکِحُهَا فَهِجْرَتُهٗ اِلٰی هَاجَرَ اِلَیْهِ.** (البخاری بدء الوحی)

## अनुवाद

**उमर बिन खत्ताब रज़िअल्लाहु अन्हु यानी ''मिंबर'' (मशीदीत इमाम साठी बनवलेली पायऱ्यांची बैठक) वर (बसून) फर्मावले की, मी अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना फर्मावताना ऐकले कर्म हे इराद्यांशी संबंधीत आहेत. आणि प्रत्येक माणसासाठी तेच आहे. ज्याचा त्याने इरादा**

**केला. तर ज्याची ''हिज़रत'' (मुस्लिमेतरांच्या अत्याचारामुळे मुसलमानानी केलेला देशत्याग) जगप्राप्ती साठी केले, होते. किंवा एखाद्या स्त्रीशी निकाह करण्यासाठी केले होते. तर त्याची हिज़रत त्याच्याचकडे आहे. ज्याचा त्याने इरादा केला होता.**

(बुखारी-बिदऊल वहय)

## स्पष्टीकरण

सर्वश्रेष्ठ अल्लाह कोणत्याही कर्मांचे फक्त वरच्यावर दिसून येणारे स्वरुप पाहात नाही. तर त्याच्या पठिमागे जो इरादा, संकल्प असतो त्याकडेही पाहतो. जर पुण्यकर्म अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्या साठी केले गेले आहे तर सर्वश्रेष्ठ अल्लाह ते कबूल करतो. आणि त्याचा उत्तमोत्तम मोबदला प्रदान करतो. परंतु जर पुण्यकर्म हे एखाद्या जागातिक गरजे (स्वार्थ) साठी केले गेले असेल तर त्यावर मोबदल्यास पात्र राहात नाही.

या तात्त्वीक गोष्टीचे स्पष्टीकरण करण्यासाठी हिजरत चे उदाहरण दिले गेले आहे. ते असे की, हिजरत चे श्रेष्ठत्व देखील त्याच स्थितीत आहे जेव्हा ते केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी केले गेले असावे. जर एखाद्या स्त्रीशी निकाहच्या इराद्याने एखाद्या मुसलमानाने मक्का सोडून मदिन्याला हिजरत केली असेल तर त्याला त्या हिजरतचा मोबदला मिळणार नाही. आणि यावर अन्य हिजरतीही कयास केल्या जाऊ शकतात.

इमाम बुखारी यानी या हदीसनेच ''सहीह बुखारी'' या ग्रंथाचा आरंभ केलेला आहे. यामुळे शरीयतच्या आदेशांमध्ये इरादा आणि संकल्प जे महत्व आहे त्यावर दृष्टी केंद्रित असावी. लक्षात घेतले पाहिजे की ही हदीस पुराव्यांच्या दृष्टीकोनातून देखील अत्यंत बळकट आहे. कारण हे अत्यंत विश्वसनीय आणि प्रसिद्ध हदीसच्या कथन कारानी सांगितली आहे.





# आपल्या परिवारावर खर्च करण्यावर मोबदला

## हदीस

**عَنْ اَبِیْ مَسْعُوْدٍ الْاَنْصَارِیِّ فَقُلْتُ عَنِ النَّبِیِّ فَقَالَ عَنِ النَّبِیِّ صلی اللہ علیہ وسلم قَالَ : اِذَآ اَنْفَقَ الْمُسْلِمُ نَفَقَةً عَلٰی اَهْلِهٖ وَهُوَ یَحْتَسِبُهَا کَانَتْ لَهٗ صَدَقَةً .** (البخاری کتاب النفقات)

## अनुवाद

**अबु मसऊद अन्सारी म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-जेव्हा एक मुसलमान आपल्या परिवारावर खर्च करतो. आणि त्याला त्यावर मोबदल्याची आशा असते तर त्याच्यासाठी तो दान होत असतो.** (बुखारी-किताबुल नुफकात)

## स्पष्टीकरण

प्रत्येक माणूस आपल्या परिवारासाठी खर्च करीत असतो परंतु त्यावर तोच माणूस मोबदल्यास पात्र असतो ज्याला खरोखरच अल्लाहकडून मोबदला हवा असतो. आणि अल्लाह कडून मोबदल्याची आशा तोच माणूस करतो, ज्याची आखिरतवर श्रद्धा असते. आणि त्याच्या यशाला आपला उद्देश बनवतो: अशा माणसाचे आयुष्य अल्लाहच्या आज्ञापालनात व्यतीत होत असते. म्हणून ती आपली जबाबदारी पार पाडण्यावर येथ पोवेतो की, आपल्या परिवारावर खर्च करण्यावरही मोबदल्याला पात्र होत असतो.

# संकटात आपले पुण्यकर्म सादर करुन सुटकेसाठी प्रार्थना किंवा दुआ करणे.

## हदीस

عَنِ ابْنِ عُمَرَ رَضِيَ اللّٰهُ عَنْهُمَا عَنْ رَّسُوْلِ اللّٰهِ ﷺ قَالَ : بَيْنَمَا ثَلَاثَةُ نَفَرٍ
يَتَمَاشَوْنَ اَخَذَهُمُ الْمَطَرُ فَمَالُوْا اِلٰى غَارٍ فِى الْجَبَلِ فَانْحَطَّتْ عَلٰى فَمِ
غَارِهِمْ صَخْرَةٌ مِّنَ الْجَبَلِ فَاَطْبَقَتْ عَلَيْهِمْ فَقَالَ بَعْضُهُمْ لِبَعْضٍ اُنْظُرُوْا
اَعْمَالًا عَمِلْتُمُوْهَا لِلّٰهِ صَالِحَةً فَادْعُوا اللّٰهَ بِهَا لَعَلَّهٗ يَفْرُجُهَا، فَقَالَ اَحَدُهُمْ
اَللّٰهُمَّ اِنَّهٗ كَانَ لِىْ وَالِدَانِ شَيْخَانِ كَبِيْرَانِ وَلِىْ صِبْيَةٌ صِغَارٌ كُنْتَ اَرْعٰى
عَلَيْهِمْ فَاِذَا رُحْتُ عَلَيْهِمْ فَحَلَبْتُ بَدَأْتُ بِوَالِدَىَّ اَسْقِيْهِمَا قَبْلَ وَلَدِىْ
وَاِنَّهٗ نَاءَ بِىَ الشَّجَرُ فَمَا اَتَيْتُ حَتّٰى اَمْسَيْتُ فَوَجَدْتُّهُمَا قَدْ نَامَا فَحَلَبْتُ
كَمَا كُنْتُ اَحْلَبُ فَجِئْتُ بِالْحِلَابِ فَقُمْتُ عِنْدَ رُؤُسِهِمَا اَكْرَهُ اَنْ اَوْقِظَهُمَا
مِنْ نَّوْمِهِمَا وَ اَكْرَهُ اَنْ اَبْدَأَ بِالصِّبْيَةِ قَبْلَهُمَا وَالصِّبْيَةُ يَتَضَاغَوْنَ عِنْدَ قَدَمَىَّ
فَلَمْ يَزَلْ ذٰلِكَ دَاْبِىْ وَدَاْبَهُمْ حَتّٰى طَلَعَ الْفَجْرُ فَاِنْ كُنْتَ تَعْلَمُ اَنِّىْ
فَعَلْتُ ذٰلِكَ ابْتِغَآءَ وَجْهِكَ فَافْرُجْ لَنَا فُرْجَةً نَّرٰى مِنْهَا السَّمَآءَ فَفَرَجَ اللّٰهُ
لَهُمْ فُرْجَةً حَتّٰى يَرَوْنَ مِنْهَا السَّمَآءَ .وَقَالَ الثَّانِىْ : اَللّٰهُمَّ اِنَّهٗ كَانَتْ لِىْ
ابْنَةُ عَمٍّ اُحِبُّهَا كَأَشَدِّ مَا يُحِبُّ الرِّجَالُ النِّسَآءَ فَطَلَبْتُ اِلَيْهَا نَفْسَهَا فَاَبَتْ
حَتّٰى اٰتِيَهَا بِمِائَةِ دِيْنَارٍ فَسَعَيْتُ حَتّٰى جَمَعْتُ مِائَةَ دِيْنَارٍ فَلَقِيْتُهَا بِهَا فَلَمَّا
قَعَدْتُّ بَيْنَ رِجْلَيْهَا قَالَتْ يَا عَبْدَ اللّٰهِ اِتَّقِ اللّٰهَ وَلَا تَفْتَحِ الْخَاتَمَ فَقُمْتُ
عَنْهَا اَللّٰهُمَّ فَاِنْ كُنْتَ تَعْلَمُ اِنِّىْ قَدْ فَعَلْتُ ذٰلِكَ ابْتِغَآءِ وَجْهِكَ فَافْرُجْ لَنَا
مِنْهَا فَفَرَجَ لَهُمْ فُرْجَةً . وَّقَالَ الْاٰخَرُ ، اَللّٰهُمَّ اِنِّىْ كُنْتُ اسْتَأْجَرْتُ اَجِيْرًا
بِفَرَقٍ اَرُزٍّ فَلَمَّا قَضٰى عَمَلَهٗ قَالَ اَعْطِنِىْ حَقِّىْ فَعَرَضْتُ عَلَيْهِ حَقَّهٗ فَتَرَكَهٗ وَ





رَغِبَ عَنْهُ فَلَمْ اَزَلْ اَزْرَعُهٗ حَتّٰى جَمَعْتُ مِنْهُ بَقَرًا وَّ رَاعِيْهَافَجَآءَ نِىْ فَقَالَ
اتَّقِ اللّٰهَ وَلَا تَظْلِمْنِىْ وَ اَعْطِنِىْ حَقِّىْ فَقُلْتُ اذْهَبْ اِلٰى ذٰلِكَ الْبَقَرِ
وَرَاعِيْهَا فَقَالَ اتَّقِ اللّٰهَ وَلَا تَهْزَأْبِىْ فَقُلْتَ اِنِّىْ لَااَهْزَأُ بِكَ فَخُذْ ذٰلِكَ
الْبَقَرَ وَرَاعِيْهَا فَاَخَذَهٗ فَانْطَلَقَ بِهَا فَاِنْ كُنْتُ تَعْلَمُ اَنِّىْ فَعَلْتُ ذٰلِكَ ابْتِغَآءَ
وَجْهِكَ فَافْرُجْ مَا بَقِىَ فَفَرَجَ اللّٰهُ عَنْهُمْ .          (البخاری کتاب الادب)

## अनुवाद

इब्ने उमर (रज़ि.) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले तीन माणूस रस्त्याने चालत होते की त्याना पावसाने घेरले. त्यानी पर्वताच्या गुहेत जाऊन आसरा घेतला.(अचानक) एक मोठा दगड गुहेच्या तोंडावर येऊन पडला. आणि ते त्या गुहेत बंदिस्त होऊन पडले. (जेव्हा बाहेर निघण्याची कोणती ही युक्ती त्याना सुचली नाही, तेव्हा) ते एकमेकानां म्हणून लागले. आपापले पुण्य कर्म जे तुम्ही अल्लाहच्या प्रसन्नते साठी केला असेल ते तपासून पहा.आणि त्या पुण्यकर्मांच्या माध्यमाने अल्लाहपाशी प्रार्थना (दुआ) करा. आशा आहे की, तो मार्ग मोकळा करेल. म्हणून त्यांच्यातील एका माणसाने दुआ केली. हे अल्लाह ! माझे माता पिता वयोवृद्ध झाले होते.आणि माझी लहान लहान मुलंही होती; ज्यांचा मी पालक होतो. जेव्हा मी संध्याकाळी परत येत असे तेव्हा (जनावारचे) दुध काढत असे आणि आपल्या मुलांच्या अगोदर आपल्या माता पित्यानां पाजत असे. एक दिवशी जंगलात खूप दूर निघून गेलो; आणि संध्याकाळी उशीरा पोहोचलो. पाहिले तर दोन्ही झोपून गेले होते. मी रोजच्या सवयी प्रमाणे दूध काढले; आणि ते घेऊन त्यांच्या उशीपाशी उभा राहिलो. त्यांना झोपेतून उठवणे मला उचित वाटले नाही. आणि त्यांच्या अगोदर मुलानां पाजणेही उचित वाटले नाही. परिस्थिती अशी होती की मुल माझ्या पाया जवळ तडफडत होती. माझी आणि त्यांची अशीच स्थिती होती येथपावेतो पहाट झाली. तर (हे अल्लाह) तू हे जाणतोच की जर हे काम मी केवळ तुझ्या प्रसन्नते साठी केले होते तर हे दगड सरकून दे म्हणजे आम्ही आकाश पाहू शकू. अल्लाहने ते दगड इतके सरकून दिले की त्यानां आकाश दिसू

**लागले.**

**दुसरा बोलला हे अल्लाह ! माझी एक चुलत बहीण होती जितकें प्रेम पुरुष स्त्रियांशी करतात त्या पेक्षा जास्त प्रेम मी तिला करीत होतो. एके दिवशी मी तिच्या समोर माझी शरीरिक भूक भागविण्या ची इच्छा प्रकट केली तर तिनं नकार दिला, येथ पावेतो की मी तिला शंभर दीनार द्यावेत. खूप प्रयत्न करून मी शंभर दीनार गोळा केले. ती रक्कम घेऊन मी तिच्या जवळ गेलो. जेव्हा मी तिच्या पायाच्या दरम्यान बसलो. तर तिने सांगितले ''हे अल्लाह चे बंदे''! दास अल्लाह चे भय बाळग आणि मेहेरला तिच्या हक्काशिवाय तोडू नकोस.(अर्थात लग्नाशिवाय असे कृत्य करु नकोस) मी त्याच वेळी उठून उभा राहिलो; तर हे अल्लाह ! जर तुझ्या ज्ञानानुसार माझे हे कृत्य केवळ तुझ्या प्रसन्नतेसाठी होते. तर आमच्या साठी दगड आणखी सरकून दे.ते दगड आणखी सरकले.**

**तिसऱ्या ने सांगितले हे अल्लाह! मी एका मजुराला एक''फर्क'' (मोजण्या चे एक माप) तांदुळा च्या मोबदल्यावर आपल्या कामावर ठेवले. आपले काम पूर्ण केल्या नंतर त्याने मजूरी ची मागणी केली. त्याची मजूरी मी त्याच्या समोर ठेवली परंतु ती रक्कम नावडतेपणाने तो सोडून निघून गेला त्या रकमेने मी शेती करीत राहिलो. येथ पावेतो की त्या रकमेने मी गाई खरेदी केल्या; आणि गुरख्यांला नोकरींस ठेवले, त्या नंतर तो माझ्या कडे आला आणि बोलला; अल्लाह चे भय बाळग माझ्यावर अत्याचार करु नकोस, आणि माझा हक्क मला देऊन टाक मी त्याला सांगितले. जा, आणि या गाई घेऊन टाक आणि बरोबरच हा मेंढपाळ देखील आहे. त्याने सांगितले. अल्लाह चे भय बाळग. आणि माझी थट्टा करु नकोस. मी बालेलो मी तुझी थट्टा करीत नाही. या गाई आणि हा मेंढपाळ घेऊन जा तो ते सर्व घेऊन गेला. तर (हे अल्लाह). तू सर्व काही जाणणारा आहेस की,मी हे कार्य जर तुझ्या प्रसन्नते साठी केले होते तर दगडाचा जो भाग शिल्लक राहिला आहे तोही सरकून दे. अल्लाह ने त्यांच्या समोरुन ते दगड हटवून दिले.**

**(बुखारी - किताबुल अदब)**

# स्पष्टीकरण

या तीन्ही घटना,ज्यांचे वर्णन प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी केले आहे, हा धडा शिकवतात की जेव्हा एखादा माणूस एखाद्या असहय संकटात सापडलेला असेल





आणि वरच्यावर त्यापासून सुटकेचा कोणताही मार्ग नसावा तर अशा नाजूक स्थितीत आपल्या एखाद्या अशा पुण्यकर्माचे वर्णन करुन अल्लाहपाशी दुआ करावी; जे त्याने एखाद्या नाजूक समयी केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी केले असावे. तर अल्लाहपाशी ते फारच जास्त प्रतिष्ठेस पात्र असते. आणि ते पाहून सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या दासाला असामान्यपणे संकटांपासून मुक्ती देत असतो.

पहिल्या घटनेत माता पित्यांबरोबर चांगल्या वर्तणुकीचे उत्कृष्ट उदाहरण सादर करण्यात आले आहे. ते असे की, तो माणूस रात्रभर आपल्या मातापित्यांच्या उशीजवळ दुध घेऊन उभा राहिला, परंतु त्यानां झोपेतून उठवणे त्याला उचित वाटले नाही, तो आपल्या मुलानां दुध पाजून मोकळा होऊ शकला असता. आणि नंतर आपल्या आईवडिलानां पाजला असता आणि असे करण्यात शरीयतच्या दृष्टीकोनातून काही ही अडचण नव्हती. परंतु त्याला आपल्या समजूतीनुसार तसे करणे योग्य वाटले नाही. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह एखाद्या पुण्यकर्मामागे ज्या चांगल्या भावना असतात, त्यांची कदर करीत असतो. म्हणून त्याचे हे कर्म आपल्या मातापित्यांबरोबर चांगल्या वर्तणुकीच्या दृष्टीकोनातून उत्कृष्ट कर्म ठरवले गेले. आणि त्या कर्माच्या पुण्याईने संकटात सुटकेचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला.

दुसरा माणूस जो कामवासनेच्या भावनेने प्रभावित होता.परंतु जेव्हा त्याच्या चुलत बहिणीने, जेव्हा तिच्याशी तो व्यभिचार करणारच होता, त्याला अल्लाह चे भय बाळगायला सांगितले. तर तो चमकला.आणि आपली कामवासना तृप्त केल्याविनाच तेथून उठून निघून गेला.अशा नाजूक स्थितीत आपल्या कामातुरतेवर ताबा ठेवणे सोपे नव्हते. परंतु अल्लाहचे भयाने तो इतका भयभीत झाला की, त्यावर त्याने ताबा मिळवला. त्याचे हे कर्म केवळ अल्लाहसाठीच होते. म्हणून अल्लाह ने त्याची कदर केली. आणि त्याची दुआ कबूल करुन संकटापासून मुक्तीचा मार्ग मोकळा केला.

तिसऱ्या माणसाने आपल्या एका मजूराची मजूरी, जी तो सोडून निघून गेला होता. त्या मजूरीच्या रकमेने व्यापार सुरु केला. आणि ज्या पासून त्याला चांगला नफा झाला जेव्हा मजूर काही दिवसानंतर आपली मजूरी घेण्यासाठी आला तर तो त्याला त्याची मजूरीची रक्कम अदा करुन टाळू शकला असता. परंतु त्यापासून त्याने जो नफा मिळवला होता तो देखील त्याच्या हवाली करुन आपली ईमानदारी शाबित केली. आणि हे पुण्यकर्म त्याने केवळ अल्लाहच्या प्रसन्नते साठी केले होते. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याची कदर केली आणि त्याची दुआ कबूल करुन संकटापासून मुक्तीचा मार्ग पुर्णपणे मोकळा केला.

# सर्वोत्तम गुण





# अनामती ठेवणे हे एक आधारभूत गुण

## हदीस

عَنْ زَيْدِبْنِ وَهْبٍ سَمِعْتُ حُذَيْفَةَ يَقُوْلُ حَدَثَنَا رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ
اَنَّ الْاَمَانَةَ نَزَلَتْ مِنَ السَّمَآءِ فِىْ جَذْرِ قُلُوْبِ الرِّجَالِ وَنَزَلَ الْقُرْآنُ
فَقَرَؤُا الْقُرْآنَ وَ عَلِمُوا مِنَ السُّنَّةِ . (البخاری کتاب الاعتصام)

## अनुवाद

**ज़ैद बिन वहब कथन करतात की, मी हज़रत हुज़ैफा यानां म्हणताना ऐकले की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी आम्हाला सांगितले के अनामती आकाशातून लोकांच्या मनांच्या मुळात अवतरल्या गेल्या आणि क़ुरआन अवतरला तर क़ुरआनात ते वाचले आणि पैगंबरीय वचनांनी त्याचे ज्ञान त्यांना प्राप्त झाले.** (बुखारी-किताबुल एअतिसाम)

## स्पष्टीकरण

अनामत ही (कोणाला तरी) सुपूर्द केलेली वस्तु असते, जिचे संरक्षण करने, ती नष्ट होण्यापासून वाचवणे आणि ती तिच्या मालकाच्या मर्जीनुसार वापरणे, ही सर्व एक मोठी जबाबदारी असते. अनामत ठेवण्याची ही भावना मानवी स्वभावात भिनलेली असते. म्हणून प्रत्येक जण जाणतो की अनामत काय आहे आणि त्या संदर्भात त्याच्यावर कोणती जबाबदारी येऊन ठेपली आहे. म्हणून जरी माणसाची कृती त्या विरोधात असली तरीही त्या व्यावहारात सचोटीने वागणे याची जाणीव प्रत्येकाला असते.

उपरोक्त हदीस मध्ये अनामत ही आकाशातून अवतरली असल्याचे म्हटले गेले आहे. ज्यामुळे या गोष्टीचे स्पष्टीकरण होते की अनामत ही एक महान आणि आध्यात्मिक गुण आहे. जे मनात खोलवर रुजलेली असते; ज्यामुळे प्रत्येकाने अनामती संबंधी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवावी. आणि बेईमानी आणि अनामतीतील अपहार या गोष्टीवर त्याचा अंतरात्मा त्याला टोचत असावा.

अनामतदारी संबंधी चे अधिक ज्ञान क़ुरआन ने प्राप्त होते.
म्हणून क़ुरआन मध्ये म्हटले आहे.

وَالَّذِيْنَ هُمْ لِاَمٰنٰتِهِمْ وَعَهْدِهِمْ رٰعُوْنَ .(مومنون:٨)

''जे आपल्या अनामतींचे व वचन कराराचे खूप ध्यान राखतात.'' (मोमिनून - ८)

وَمِنْ اَهْلِ الْكِتَابِ مَنْ اِنْ تَاْمَنْهُ بِقِنْطَارٍ يُّؤَدِّهٖٓ اِلَيْکَ . (آل عمران. ٧٥)

''आणि ग्रंथ लाभलेल्या लोकपैकी काही असेही आहेत की सोन्या चांदीचे ढीग ही त्यांच्या जवळ अनामत म्हणून द्याल,तर तुम्हाला परत करतील.''(आले - इमरान - ७५)

اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُكُمْ اَنْ تُؤَدُّوا الْاَمَانَاتِ اِلٰى اَهْلِهَا. (نساء.٥٨)

अल्लाह तुम्हाला आज्ञा देतो की ''अनामत ठेवणाऱ्यांची अनामत त्याना व्यवस्थित परत करा.'' (निसा - ५८)

आणि सुन्नतने या संबंधी अधिक तपशीलाचे ज्ञान होते. उदाहरणार्थ एका हदीस मध्ये फर्मावले आहे.

اِذَا ضُيِّعَتِ الْاَمَانَةُ فَانْتَظِرُ السَّاعَةَ. (بخاری کتاب الرقاق)

''जेव्हा अनामती नष्ट केल्या जाऊ लागतील तर कियामतीची वाट पाहावी.''

या हदीस मध्ये सत्ता अपात्र लोकांच्या हाती सुपुर्द करण्याला अनामती नष्ट करण्यासारखे म्हटले गेले आहे. ज्यामुळे अनामतीचा हा विस्तीर्ण अर्थ लक्षात येतो. तो असा की सत्ता नालायक लोकांच्या हातात देणे किंवा हुद्दे अशा लोकानां देणे जे त्या हुद्दयानां पात्र नाहीत किंवा जे नौतिक दृष्टया त्या हुद्दयानां पात्र नसावेत. आपले मत आणि अधिकारांचा दुरुपयोग आहे जो अनामतदारीच्या विरुद्ध आहे. आणि ज्यामुळे मोठा बिघाड होऊ शकतो. आधारभूत गोष्ट ही आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह ने जे अधिकार मानवाला दिले आहेत. ते सर्व अनामती आहेत. म्हणून या अधिकारानां अल्लाहच्या मर्जीनुसार त्याच्या शरीअतचे पालन करुन उपयोग करायला हवे.

अनामतदारीचे हे महत्त्व डोळया समोर ठेवावे आणि आधुनिक समाजावर एक दृष्टीक्षेप टाकला तर अनामतदारी ची जाणीव ठेवणारे क्षुल्लक लोकच दिसून येतील. अप्रमाणिक, बेईमान आणि अपहार या गोष्टी सर्वसामान्य बाबी आहेत. ज्यामुळे बिघाडात वाढच होत चालली आहे. जेव्हा लोक आपल्या प्राकृतिक गुणांचे मार्गदर्शन कबूल करणार नाही तर सुधारणेचे कार्य कसे होऊ शकेल?





# ईमानधारक हा नखशिखात शुभ मंगल हदीस

عَنِ ابْنِ عُمَرَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِنَّ مِنَ الشَّجَرِ شَجَرَةً لَّا يَسْقُطُ وَ رَقُهَا وَ اِنَّهَا مَثَلُ الْمُسْلِمِ فَحَدِّثُوْنِىْ مَا هِىَ فَوَقَعَ النَّاسُ فِىْ شَجَرِ الْبَوَادِىْ قَالَ عَبْدُ اللّٰهِ وَ وَقَعَ فِىْ نَفْسِىْ اَنَّهَا النَّخْلَةُ فَاسْتَحْيَيْتُ ثُمَّ قَالُوْا حَدِّثْنَا مَا هِىَ يَا رَسُوْلَ اللّٰهِ قَالَ هِىَ النَّخْلَةُ . (البخاری کتاب العلم)

# अनुवाद

**हज़रत इब्ने उमर कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-झाडामध्ये एक झाड असे आहे, ज्याची पानं वाळत नसतात आणि त्याची उपमा मुस्लिम सारखी आहे. तर मग सांगा ते झाड कोणते आहे?लोकांचे लक्ष जंगलातील झाडांकडे केंद्रित झाले. परंतु माझ्या डोक्यात खजुरी च्या झाडाचा विचार आला परंतु मी सांगायला लाजलो. सहाबांनी सांगितले. हे अल्लाह चे प्रेषिता, ते आपणच सांगावे की ते कोणते झाड आहे. त्यांनी फर्माविले-ते खजुरीचेच झाड आहे.**

(अल-बुखारी किताबुल इल्म)

## स्पष्टीकरण

ईमान धारकाची उपमा खज़ुरीच्या झाडाशी दिली गेली आहे. ज्याची प्रत्येक वस्तु लाभदायक असते. खजुर तर एक गोड आणि चविष्ठ फळ आहे. त्याचे बी देखील जनावरानां खायला उपयोगी पडते खजुरीच्या झाडाची पानं छतावर टाकण्यासाठी उपयोगी पडतात. त्याच्या तंतुपासून गाद्या बनवल्या जातात. आणि त्याच्या फांद्या आणि खोडाचे लाकुड देखील उपयोगी पडते. एकंदरीत खजुरीच्या झाडाची कोणतीही वस्तु वाया जात नाही. त्याच प्रमाणे ईमानधारक देखील नखशिखात शुभमंगल असतो. तो जेथेही जात असतो आपल्या बरोबर चांगुलपणाच घेऊन जातो. संभाषण करतो तर त्याच्या तोंडून शुभ शब्दच बोलले जातात. कोणाला दिले तर चांगल्या बक्षिसीच देतो. आणि जे कर्मही तो करतो ते कल्याणकारी गोष्टालय कारणीभूत ठरते. हे आदर्श ईमानधारकाचे वैशिष्ठ्य आहे; नामधारी मुसलमानाचे नव्हे. किती भाग्यवान आहे ईमानधारकाचे अस्तित्व जे नखशिखात शुभमंगल असते.

# भौतिक दृष्ट्या जो आपल्यापेक्षा कमी दर्ज्याचा आहे त्याच्याकडे बघा

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ عَنْ رَّسُوْلِ اللّٰهِ ﷺ قَالَ اِذَا نَظَرَ اَحَدُكُمْ اِلٰی مَنْ هُوَ فُضِّلَ عَلَیْهِ فِی الْمَالِ وَ الْخَلْقِ فَلْیَنْظُرْ اِلٰی مَنْ هُوَ اَسْفَلَ مِنْهُ مِمَّنْ فُضِّلَ عَلَیْهِ .** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.) कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-जेव्हा तुम्हांपैकी एखाद्या माणसा कोणा अशा माणसाकडे पाहावे ज्याला संपत्तीत आणि लोकांमध्ये वर्चस्व दिले गेले आहे तर त्याने त्या माणसाकडे पाहावे जो या वर्चस्व प्राप्त असलेल्या माणसाच्या तुलनेत लहान आहे.** (बुखारी-किताबुर्रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

माणूस जेव्हा त्या लोकांकडे पाहतो ज्याना भरपूर धनसंपत्ती लाभलेली आहे.आणि जे आपल्या लोकांमध्येही चांगले आहेत.तर त्याला आपल्या मध्ये कमतरते ची भावना निर्माण होते.आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होत नाही. परंतु माणसाने जर अशा लोकांकडे पाहिले जे या वस्तुमध्ये त्यांच्यापेक्षा कमी दर्ज्याचे आहेत तर तो तुच्छतेच्या भावनेत सापडणार नाही आणि त्याच्या मध्ये कृतज्ञतेची भावना निर्माण होईल उदाहरणार्थ एका छोटयाशा घरात राहणाऱ्याने जर भव्य फॅलट मध्ये राहणाऱ्याकडे पाहिले तर आपल्या घराला कमी दर्ज्याचा समजू लागेल; जे त्याला त्रासदायक वाटेल परंतु जर त्याने झोपडपट्टीत राहणाऱ्याकडे पाहिले किंवा अशा लोकांकडे ज्यांना राहण्याचे ठिकाणी उपलब्ध नाही, तर आपल्या लहानशा घराला पाहून संतुष्ठ राहील. त्यामुळे त्याच्या मनात अल्पसंतुष्टची भावना निर्माण होईल. आणि तो त्याला अल्लाहने दिलेल्या वस्तुंवर समाधानी देखील राहील. त्याच प्रमाणे एक सावळा माणूस एका गोऱ्या माणसाकडे पाहून स्वत:ला लहान समजू लागतो. परंतु जर त्याने काळ्या कुट्ट निग्रो कडे पाहिले तर त्याला आपले रंगरुप बेहतर वाटू लागेल ज्यामुळे त्याच्यामध्ये अल्लाहशी कृतज्ञतेची भावना निर्माण होईल हदीस मध्ये या पैलूने आपल्या पेक्षा निकृष्ट दर्ज्याच्या लोकांवर दृष्टी टाकण्याची सूचना दिली गेली आहे.





# जे क्षमा करतात अल्लाह त्याना क्षमा करतो

## हदीस

**عَنْ عُبَیْدِ اللّٰهِ بْنِ عَبْدِاللّٰهِ اَنَّهٗ سَمِعَ اَبَا هُرَیْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ كَانَ تَاجِرٌ یُّدَا یِنُ النَّاسَ فَاِذَا رَاٰی مُعْسِرًاقَالَ لِفِتْیَانِهٖ تَجَاوَزُوْ اعَنْهُ لَعَلَّ اللّٰهَ اَنْ یَّتَجَاوَزَعَنَّا فَتَجَاوَزَ اللّٰهُ عَنْهُ .** (البخاری کتاب البیوع)

## अनुवाद

**उबैदुल्लाह बिन अब्दुल्लाह म्हणतात की मी अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो यांना म्हणताना ऐकले, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले एक व्यापारी होता जो लोकानां उधारी ने माल देण्याचा व्यवसाय करीत होता.जेव्हा तो कोणाला आर्थिक दुष्टया अडचणीत सापडलेला पाहात असे तर आपल्या सेवकानां म्हणत असे-त्याला माफ करा. अशा आहे की, अल्लाह आपल्याला क्षमा करेल. आणि म्हणूनच अल्लाह ने त्याला माफ केले.** (बुखारी-किताबुल बयूअ)

## स्पष्टीकरण

ज्या माणसाची इच्छा असेल की अल्लाह ने त्याला क्षमा करावे तर त्याने स्व: दुसऱ्यानां माफ केले पाहिजे. या संबंधीचे उत्कृष्ट उदाहरण उपरोक्त हदीस मध्ये एका व्यापाऱ्याचे सादर केले गेले आहे. जो अडचणीत सापडलेल्या लोकांबरोबर नरमाई ने वागत होता. आणि आपले घेणे रकमेबद्दल सक्ती करीत नव्हता. जो माणूस उसनवार घेतलेली रक्कम अदा करु शकत नव्हता त्याने मांडलेल्या सबबीकडे पाहून त्याला क्षमा करीत असे ते केवळ या आशेने की अल्लाह त्याला क्षमा करेल म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याची क्षमा केली.

या विरुद्ध त्या व्यापाऱ्यांचा मामला आहे. ते कोणाच्या सबबीचा विचार करीत नसतात आणि आपल्या हक्क वसुलीच्या बाबतीत कडक असतात.

१६२

# जीभेने अशा गोष्टी बोलणे ज्यामुळे उच्च स्थान प्राप्त होते.

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ : قَالَ اِنَّ الْعَبْدَ لَیَتَکَلَّمُ بِالْکَلِمَةِ مِنْ رِضْوَانِ اللّٰهِ لَا یُلْقِیْ لَهَا بَالًا یَّرْفَعُ اللّٰهُ بِهَا دَرَجَاتٍ وَّاِنَّ الْعَبْدَ لَیَتَکَلَّمُ بِالْکَلِمَةِ مِنْ سَخَطِ اللّٰهِ لَا یُلْقِیْ لَهَا بَالًا یَّهْوِیْ بِهَا فِیْ جَهَنَّمَ.** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले -''बन्दा'' (अल्लाह चा दास) अल्लाहच्या प्रसन्नतेची भाषा आपल्या जिभेने बोलतो;ज्याची त्याच्या नजरेत कदर नसते.परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याचा दर्जा बुलंद करतो आणि दास आपल्या जिभेने अल्लाहच्या नाराजी चे एखादा शब्द काढतो त्याच्या नजरेत ते क्षुल्लक असतात. परंतु त्या शब्दाबरोबर तो नरकात जाऊन पडतो.** (बुखारी-किताबुल रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

माणूस आपल्या जीभेने चांगल्या व वाईट दोन्ही गोष्टी करतो, परंतु काही वेळा त्याच्या तोंडून असे उत्कृष्ट शब्द बाहेर पडतात जे अल्लाहच्या प्रसन्नतेला कारणीभूत ठरतात. त्यावेळी अल्लाह त्याच्या मोबदल्यात त्याचे दर्जे बुलंद करतो. हे शब्द अल्लाहच्या कृतज्ञतेचे ही असू शकतात, त्याच्याशी असलेल्या अतिप्रेमाचाही आणि त्याच्या अतिउच्चतम दास्यत्वाचे ही जेव्हा त्याच्या तोंडात असे महान व उच्चतम शब्द बाहेर पडतात तर त्याला कल्पना नसते की सर्वश्रेष्ठ अल्लाह अशा पद्धतीने त्याची कदर करेल. त्या विरुद्ध माणूस अल्लाहची अकृतज्ञता त्याच्या कडे तक्रार व गाऱ्हाणे आणि त्याच्या व त्याच्या प्रेषितच्या प्रतिष्ठेबद्दल अनादराची एखादी गोष्ट आपल्या तोंडून काढतो,जे अल्लाहच्या नाराजीला कारणीभूत ठरतात.परंतु त्याला काहीही कल्पना नसते की,किती अवघड गोष्ट आहे जी त्याच्या तोंडून निघाली आहे. जिच्या परिणामस्वरुप तो नरकात जायला पात्र ठरतो.

ही वास्तविकता लक्षात घेता माणसाने आपल्या जीभेचा उपयोग अत्यंत जबाबदारीने केला पाहिजे.जे काही बोलावे ते विचारपूर्वक बोलावे आणि शुभ बोलावे.संभाषण करतानां कोणतीही अशी गोष्ट जी अल्लाहच्या नाराजीला कारणीभूत होईल असे करु नये व बोलताना दक्षता बाळगावी.



१६३

# शालीनतेमुळे उच्चस्थान प्राप्त होतात.

## हदीस

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ عَنْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ قَالَ مَانَقَصَتْ صَدَقَةٌ مِنْ مَالٍ وَمَازَادَ اللّٰهُ عَبْدًا بِعَفْوٍ اِلَّا عِزًّا وَمَا تَوَاضَعَ اَحَدٌ لِلّٰهِ اِلَّا رَفَعَهُ اللّٰهُ.** (مسلم کتاب البر)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले दानामुळे संपत्ती कमी होत नाही. आणि जो बन्दा (दास) क्षमा करतो अल्लाह त्याच्या प्रतिष्ठेत वृद्धी करतो. आणि जो माणूस अल्लाहसाठी नम्रता पत्करतो अल्लाह त्याला उच्चस्थान मिळवून देतो. (मुस्लिम - किताबुल बिर्र)**

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये तीन अशा गोष्टीचे वर्णन आलेले आहे. ज्याकडे लोक दुर्लक्ष करतात. कारण असे की त्यामुळे जे शुभपरिणाम प्राप्त होणारे असतात त्यावर त्याची नजर राहात नाही. पहिली गोष्ट दान आहे जे करायला माणूस यामुळे कानाडोळा करतो की, त्यामुळे वरच्यावर संपत्ती घटतानां दिसून येते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की दान केल्याने संपत्तीमध्ये वृद्धी होते; आणि अल्लाहपाशी दान केलेली संपत्ती सुरक्षित राहते. जे किती तरी पटीने वाढवून अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याला परत करेल. जणू ते अल्लाह कडे बँक शिल्लक आहे. म्हणून दान केल्याने संपत्ती घटण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

दुसऱ्याच्या चुका माफ करायला माणूस मुश्किलीने तयार होत असतो. कारण तो आपल्या क्रोधाला कमी करु इच्छित नाही. परंतु दुसऱ्याच्या चुका क्षमा केल्याने माणसाची इज्जत वाढते. आणि ही एक जाणीवेची गोष्ट आहे.

नम्रता पत्करण्यामध्येही माणसाला कमीपणा वाटतो. परंतु हे गुण त्याचे दर्जे बुलंद करणारी आहेत. परंतु त्याला अट अशी आहे की त्याने अल्लाह साठी नम्रता पत्करायला हवी, लोकांच्या देखाव्यासाठी नव्हे.

हे उत्कृष्ट गुण जे स्वत: मध्ये निर्माण करण्याचे प्रोत्साहन प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी दिले आहे.

# अजारपणात संयम

## हदीस

قَالَ عَطَاءُ بْنُ اَبِیْ رَبَاحٍ قَالَ لِی ابْنُ عَبَّاسٍ : اَلَا اُرِیْکَ امْرَأَةً مِّنْ اَهْلِ الْجَنَّةِ ؟ قُلْتُ بَلٰی قَالَ : هٰذِهِ الْمَرْأَةُ السَّوْدَاءُ اَتَتِ النَّبِیَّ ﷺ قَالَتْ : اِنِّیْ اُصْرَعُ وَاِنِّیْ اَتَکَشَّفُ . فَادْعُ اللّٰهَ لِیْ قَالَ اِنْ شِئْتِ صَبَرْتِ وَلَکِ الْجَنَّةُ . وَاِنْ شِئْتِ دَعَوْتُ اللّٰهَ اَنْ یُّعَافِیَکِ قَالَتْ: اَصْبِرُ قَالَتْ : فَاِنِّیْ اَتَکَشَّفُ . فَادْعُ اللّٰهَ اَنْ لَا اَتَکَشَّفَ ، فَدَعَا لَهَا . (مسلم کتاب البر)

## अनुवाद

**अता बिन अबी रबाह कथन करतात की मला हज़रत इब्ने अब्बास यानी म्हटले काय मी तुम्हाला ''जन्नती'' स्त्री (अर्थात स्वर्गात जाणारी) दाखवू नये? मी सांगितले. अवश्य. त्यानी सांगितले, ही काळया रंगाची स्त्री आहे जी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या सेवेत हजर झाली आणि म्हणाली - मला मिरगी चा आजार आहे. आणि अशा स्थितीत माझे शरीर उघडे पडते. म्हणून तुम्ही माझ्यासाठी दुआ (प्रार्थना )करा त्यानी फर्मावले जर तुला शक्य असेल तर संयम पाळ; आणि तुझ्यासाठी स्वर्ग आहे. आणि जर तुझी इच्छा असेल तर मी अल्लाहपाशी दुआ करावी की, त्याने तुला आरोग्य प्रदान करावे. तिने म्हटले मी संयम पाळेन. परंतु माझे शरीर जे उघड पडते त्यासाठी आपण अल्लाहपाशी प्रार्थना करावी की शरीर उघडे पडू नये. त्यांनी तिच्यासाठी प्रार्थना केली.** (मुस्लिम-किताबुल बिर्र)

## स्पष्टीकरण

ज्या स्त्रीचे वर्णन या हदीस मध्ये करण्यात आले आहे. तिचा रंग तर काळाकुट्ट होता परंतु ईमानचा रंग त्या रंगावर वरचढ होता. तिने प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचे म्हणणे ऐकून आजारात संयम पाळणे पसंत केले. जेणे करुन तिला स्वर्ग प्राप्ती व्हावी आणि या गोष्टीचा आग्रह धारला नाही की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी तिच्या आरोग्या साठी प्रार्थना करावी. किती संयमी ईमानधारक स्त्री होती ती! आजार ही निश्चितपणे एक त्रासदायक बाब आहे. परंतु त्यामागे अल्लाहचा महान दुरदर्शीपणा असतो. म्हणजे ईमानधारकाच्या संयमाची परिक्षा. जर तो संयम पाळतो तर त्या मोबदल्यात अल्लाह त्याला





स्वर्ग प्रदान करतो. काही वेळा एका रुगणाला असा भास होतो की खूप खूप दुआ करुन देखील त्याला आरोग्य लाभत नाही. अशा माणसाने निराश व्हायला नको उलट अल्लाह वर विश्वास ठेवायला पाहिजे. आणि त्याच्या पासून शुभ गोष्टीचीच आशा बाळगली पाहिजे. काय सांगता येते की अल्लाह त्याच्यासाठी स्वर्गात पोहोचण्याचा मार्ग मोकळा करीत असावा.

# संयम आणि कृतज्ञता

## हदीस

عَنْ صُهَیْبٍ قَالَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ عَجَباً لِّاَمْرِ الْمُؤْمِنِ اِنَّ اَمْرَهٗ کُلَّهٗ خَیْرٌ . وَلَیْسَ ذٰلِکَ لِاَحَدٍ اِلَّا لِلْمُؤْمِنِ . اِنْ اَصَابَتْهُ سَرَّاءُ شَکَرَ . فَکَانَ خَیْرًا لَّهٗ . وَاِنْ اَصَابَتْهُ ضَرَّاءُ صَبَرَ، فَکَانَ خَیْرًا لَّهٗ . (مسلم کتاب الزہد)

## अनुवाद

**हज़रत सुहैब म्हणतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- ईमानधारकचा मामला विचित्र आहे. त्याच्या प्रत्येक कामात भलाई आहे. आणि हे ईमान धारकाचेच वैशिष्ठ्य आहे. जर त्याला स्वास्थ प्राप्त असते तर तो कृतज्ञता व्यक्त करतो. आणि हे त्याच्यासाठी चांगुलपणाला कारणीभूत ठरते. आणि जर त्याला यातना पोहोचतात तर तो संयम पाळतो. आणि त्याच्यासाठी चांगुलपणाला कारणीभूत ठरते.**

(मुस्लिम-किताबुज़-ज़ुहद)

## स्पष्टीकरण

याचा अर्थ असा आहे की, ईमानधारक समाधानी असो अगर त्रास सहन करीत असो, तो मोबदल्यास पात्र असतो. त्यास अट अशी आहे की, त्याने समाधानी असतानां अल्लाह ची कृतज्ञता व्यक्त करावी. आणि संकटात असतानां संयम पाळावे दोन्ही स्थितीत त्याची परिक्षा असते. आणि मोबदला मिळत असल्यामुळे ते त्याच्यासाठी चांगुलपणाला कारणीभूत ठरतात. म्हणून ज्या स्थितीत ही असो त्यास आपल्या साठी पुण्याईच समजले पाहिजे.त्यामुळे मन समाधानी तर होतेच शिवाय विश्वासाची कैफियत ही प्राप्त होते.

# माणूस त्याच्या बरोबर असेल ज्याला तो प्रेम करतो.

## हदीस

قَالَ عَبْدُ اللّٰهِ بْنِ مَسْعُوْدٍ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ جَآءَ رَجُلٌ اِلٰی
رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ فَقَالَ یَا رَسُوْلَ اللّٰهِ کَیْفَ تَقُوْلُ فِیْ
رَجُلٍ اَحَبَّ قَوْماً وَّلَمْ یَلْحَقْ بِهِمْ ؟ فَقَالَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ :
اَلْمَرْءُ مَعَ مَنْ اَحَبَّ . (البخاری کتاب الادب)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन मसऊद रज़िअल्लाहु अन्हो म्हणतात की, एक माणूस अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या सेवेत हजर झाला आणि म्हणाला; हे अल्लाह चे प्रेषिता ! आपण अशा माणसाच्या बाबतीत काय म्हणता जो अशा लोकानां प्रेम करतो, ज्यानां तो भेटलेला नाही. अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. माणूस त्या माणसाबरोबर आहे ज्याला तो प्रेम करतो.** (बुखारी-किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

याचा अर्थ असा आहे की, जो माणूस कोणाला प्रेम करतो तर वास्तविकपणे त्या माणसाशी आपल्या घनिष्ट संबंधाचे जाहीर प्रकटन करतो. म्हणजे क़ियामतीच्या दिवशी त्याच्या बरोबरच असेल. ज्याच्या बरोबर त्याचा घनिष्ट संबंध होता. नेक लोकांशी प्रेम करणारा नेक लोकांबरोबर असेल; मग त्याची त्या लोकांशी भेट जरी झालेली नसली तरी चालेल. आणि वाईट लोकांशी प्रेम करणारा वाईट लोकांबरोबर असेल मग तो त्यानां भेटलेला नसेल तरी चालेल. हार्दिक संबंध आकर्षण आणि भावना या गोष्टी मानवाला चांगल्या आणि वाईट साच्यात रचून टाकतात आणि हे संबंध नेक लोकांकडे असण्याचा अर्थ हा आहे की, त्या ऱ्हदयात नेकी पोसली जात आहे. आणि वाईट लोकांकडे असण्याचा अर्थ असा आहे की, त्याच्या ऱ्हदयात वाईटपणा उपगळत आहे.





# चांगल्या आणि वाईट संगतीचा परिणाम

## हदीस

عَنْ اَبِیْ مُوْسیٰ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَثَلُ الْجَلِیْسِ الصَّالِحِ
وَالْجَلِیْسِ السُّوْءِ کَمَثَلِ صَاحِبِ الْمِسْکِ وَ کِیْرِ الْحَدَّادِ لَا یُعْدِمُکَ
مِنْ صَاحِبِ الْمِسْکِ اِمَّا تَشْتَرِیْهِ اَوْ تَجِدُ رِیْحَهٗ وَکِیْرُ الْحَدَّادِ یُحْرِقُ
بَدَنَکَ اَوْ ثَوْبَکَ اَوْتَجِدُ مِنْهُ رِیْحاً خَبِیْثَةً . (البخاری کتاب البیوع)

## अनुवाद

**अबु मूसा आपले वडील रज़िअल्लाहु अन्हो यांच्या कडून कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले नेक माणसा जवळ बसणारे आणि वाईट माणसा जवळ बसणाऱ्यांची उपमा अशी आहे जशी कस्तुरीवाला आणि लोहाराची भट्टी. कस्तुरीवाल्या कडून निश्चितपणे तुम्हाला लाभ प्राप्त होईल. एक तर कस्तुरी खरेदी कराल अगर तुम्हाला तिचे सुगंध प्राप्त होईल. परंतु लोहाराची भट्टी तुमच्या शरीराला अगर कपडयानां जाळून टाकेल; किंवा तुम्हाला तिचे दुर्गंध प्राप्त होईल.** (बुखारी-किताबुल-बयूअ)

## स्पष्टीकरण

कस्तुरी विक्रेता आणि लोहारचे उदाहरण सादर करुन नेक संगत आणि वाईट संगती चे परिणाम स्पष्ट केले गेले आहे. नेक माणसाच्या संगती ने माणसाला लाभच प्राप्त होत असतो. आणि वाईट माणसाच्या संगतीचा वाईटच परिणाम दिसून येईल. म्हणून माणसाने आपल्या मित्राची निवड करताना फार विचार केला पाहिजे. किती लोक आहेत जे वाईट संगतीचा अवलंब करुन वाईट बनले. आणि किती लोक आहेत, जे नेक लोकांच्या संगतीत नेक बनले. एका फारसी कवीने म्हटले आहे.

सोहबते स्वालेह कुनद स्वालेह तूरा
अर्थात - नेक माणसाची संगत तुला नेक बनवते.

ही गोष्ट देखील लक्षात घेतली पाहिजे की, नेकीचा मार्ग दाखविणारी पुस्तके आणि पवित्र साहित्य माणसाचे उत्तम मित्र आहेत. अशा पुस्तकामुळे माणूस घरी बसल्या लाभ मिळवू शकतो. आणि वाईट मार्ग दाखविणारी पुस्तक आणि हानीकारक साहित्य माणसाचे अत्यंत वाईट साथी आहेत जे त्याला चरित्रहीन बनवून टाकतात.

# न्याय करणाऱ्याचे उच्च स्थान

## हदीस

وَفِی حَدِیثِ زهیرٍ قَالَ : قَالَ رَسُولُ اللّٰهِ ﷺ اِنَّ الْمُقْسِطِیْنَ ، عِندَاللّٰهِ ، عَلٰی مَنَابِرَ مِنْ نُورٍ ، عَنْ یَمِیْنِ الرَّحْمٰنِ عَزَّوَجَلَّ وَکِلْتَا یَدَیْهِ یَمِیْنٌ، اَلَّذِیْنَ یَعْدِلُوْنَ فِی حُکْمِهِمْ وَ اَهْلِیْهِمْ وَمَا وَلَوا. (مسلم کتاب الامارات)

## अनुवाद

**ज़हीर च्या हदीस मध्ये आहे की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. न्याय करणारे अल्लाह जवळ नूर''(तेज, प्रकाश, ज्योती) च्या ''मिंबर'' (मशीदीत उंच चबूतरा ज्याच्या वर उभा राहून इमाम प्रवचन देतात.) वर असतील सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या उजव्या बाजूस आणि त्याचे दोन्ही हात उजवेच आहेत. हे ते लोक आहेत, जे आपले निर्णय न्यायपूर्वक देतात. आणि आपल्या परिवारात ही आणि ज्यांचे ते राजे आहेत त्यांचे ही.** (मुस्लिम-किताबुत अमारात)

## स्पष्टीकरण

न्यायाचे गुण माणसाला मधल्या मार्गावर कायम ठेवते. आणि त्याला अल्लाहच्या दासांचे हक्क अदा करणे आणि कोणावरही अतिरेक न करण्यावर उत्तेजित करतात. अल्लाहला न्याय करणारे लोक आवडतात. म्हणून क़ुरआन मध्ये म्हटले आहे.

اِنَّ اللّٰهَ یُحِبُّ الْمُقْسِطِیْنَ (حجرات:۹)

''अल्लाह न्याय करणाऱ्याला पसंत करतो.'' (सूरह हुजरात आयत क्र.९)

हे न्याय त्या स्थितीत देखील आवश्यक आहे जेव्हा एक मुसलमाना कडे शासकीय आणि न्यायालयीन अधिकार असावेत. म्हणून त्याचे सर्व निर्णय हे न्यायावरच अवलंबून असायला पहिजेत. त्याच प्रकार आपल्या परिवारा मध्ये देखील न्याय करायला हवे. म्हणजे त्यांचे हक्क व अधिकार योग्य तऱ्हेने अदा केले पाहिजेत. आणि त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे अन्याय व्हायला नको शिवाय आपल्या अखत्यारीत जे लोक आहेत, त्यांच्याशीही न्याय करायला हवे.

असा न्याय करणारे लोक आखिरत मध्ये अतिउच्च स्थानावर स्थानापन्न असतील ते नूर च्या मिंबरावर ''रहमान'' (अल्लाह) च्या उजव्या बाजूला असतील. म्हणजे त्यांना अतिमहान संधी प्राप्त होईल त्याच बरोबर हदीस मध्ये हे देखील स्पष्ट करण्यात आले आहेत की अल्लाह चे दोन्ही हात उजवेच आहेत. त्याच्या हाताना मानवाच्या हातांवर कयास केले जाऊ शकत नाही. आणि ना ही आम्ही त्याच्या कैफियती चे वर्णन करु शकतो.





# चारित्र्याची उच्चता

## हदीस

عَنْ اَبِی هُرَیْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ سَبْعَةٌ یُظِلُّهُمُ اللّٰهُ فِی ظِلِّهٖ یَوْمَ لَا ظِلَّ اِلَّا ظِلُّهُ الْاِمَامُ الْعَادِلُ وَشَآبٌّ نَّشَاَ فِی عِبَادَةِ رَبِّهٖ وَ رَجُلٌ قَلْبُهٗ مُعَلَّقٌ فِی الْمَسَاجِدِ وَ رَجُلَانِ تَحَآبَّا فِی اللّٰهِ اجْتَمَعَا عَلَیْهِ وَ تَفَرَّقَا عَلَیْهِ وَرَجُلٌ طَلَبَتْهُ ذَاتُ مَنْصَبٍ وَّجَمَالٍ فَقَالَ اِنِّیْٓ اَخَافُ اللّٰهَ وَ رَجُلٌ تَصَدَّقَ اِخْفَآءً حَتّٰی لَا تَعْلَمُ شِمَالُهٗ مَا تُنْفِقُ یَمِیْنُهٗ وَ رَجُلٌ ذَکَرَاللّٰهَ خَالِیاً فَفَاضَتْ عَیْنَاهُ. (البخاری کتاب صلوة الجماعة)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-सात माणसे अशी आहेत. ज्यांच्या वर अल्लाह च्या कृपेची छाया राहील. हे त्या दिवशी राहील ज्या दिवशी त्याच्या छाये शिवाय दुसरी कोणतीही छाया राहणार नाही. (एक) न्यायदान करणारा राजा (दुसरा) तो युवक जो आपल्या पालनकर्त्याच्या उपासनेत मोठा झाला. (तिसरा) तो ज्याचे मन मशीदीत अडकलेले राहते.(चौथा) ती दोन माणसं जी अल्लाहखातर एकमेकांशी प्रेम करतात. त्याच उद्देशाने एकत्र यावेत आणि त्याच उद्देशाने विभक्त व्हावेत. (पाचवा) तो माणूस ज्याला प्रतिष्ठित व रुपवान स्त्री ने बोलावले तर त्याने सांगितले की, मी अल्लाहला भितो. (सहावा) तो माणूस ज्याने गुप्तपणे दान केले येथ पावेतो की त्याच्या डाव्या हाताला कळले नाही की, त्याच्या उजव्या हाताने काय खर्च केले. आणि (सातवा) तो माणूस ज्याने एकान्तात अल्लाह चे स्मरण केले. तर त्याचे डोळे पाणावले.**

(बुखारी-किताब सलातुल जमाअत)

## स्पष्टीकरण

हदीस मध्ये ज्या सात माणसांचे वर्णन करण्यात आले आहेत. ते चारित्र्याच्या आणि उत्कृष्ट गुणांच्या लोकांचे उदाहरण आहेत.

न्यायदान करणारा राजा या संज्ञेशी इस्लामी शासनाचा प्रमुख अर्थात ''अमीर' अभिप्रेत आहे; जो न्यायाने शासन चालवतो. सत्ता हाती आल्यानंतर दुसऱ्यांना न्यायदान करणे, शासनाचा कारोभार न्यायवस्थेवर कायम करणे आणि न्यायबरहुकूम नियम जारी करणे ही साधी बाब नव्हे . परंतु जो इतक्या उच्च स्थानावर पोहोचल्यानंतर न्यायाच्या विरुद्ध वागत नाही; तो अशा गुणानी संपन्न आहे जे केवळ ईशभयानेच प्राप्त होऊ शकते.

तरुण वयात भक्ती व उपासनेची अशी गोडी जणू भक्ती मुळेच त्याचे पालनपोषण होत आहे. हे अल्लाहशी प्रेम आणि त्याच्याशी असलेल्या घनिष्ठ संबंधाचा उघड पुरावा आहे.

मशीदीमध्ये मन अडकून राहणे ही देखील फार चांगली गोष्ट आहे. हे या गोष्टी चा पुरावा आहे की तो नमाज़ वेळेवर अदा करणे आणि जमात बरोबर अदा करणे याची काळजी घेतो. शिवाय त्याला क़ुरआन पढणे व अल्लाहच्या नामस्मरणाची ही फार गोडी आहे. मशिदीत मन अडकून राहणे याचा अर्थ असा मुळीच नव्हे की माणूस आपल्या अन्य जबाबदाऱ्या कडे दुर्लक्ष करतो. तर त्याचा अर्थ असा आहे आपल्या सर्वच जबाबदाऱ्यांच्या दरम्यान राहुन ही त्याचे लक्ष मशिदीमध्ये केंद्रित राहते.

दोन माणसांचे अल्लाह साठी एकमेकांशी प्रेम करणे आणि हेच उद्देश घेऊन एकत्र येणे आणि याच उद्देशाला घेऊन एकमेकांशी विभक्त होणे हे त्यांच्या आपसातील निष्ठेची खूण आहे. त्यांचे आपसात भेटणे, धर्म समजणे व समजावणे; त्याची दअवत व धर्मप्रचार, अल्लाहच्या मार्गात प्रयत्न, आणि अन्य धार्मिक तगादे पूर्ण करण्यासाठी होत असते कोणताही स्वार्थ त्यांच्या नजरे पुढे राहात नाही, ज्या करिता त्यांनी एकमेकाशी प्रेम करावे. आणि जेव्हा ते एकमेकांपासून अलग होतात तर नेक भावना बरोबर अलग होतात. तिरस्काराची कोणतीही गोष्ट त्यांच्या दरम्यान राहात नाही. म्हणून हा गुण कदर करण्यासारखा आहे.

आपल्या भावनांवर अशा स्थितीत ताबा ठेवणे जेंव्हा आरंभ स्त्री कडून होत असावा आणि ती ही प्रतिष्ठित आणि रुपवान स्त्री असावी. हे फारच कठिण काम आहे. आणि केवळ अल्लाहचा भय हेच त्याला या कामापासून वाचवू शकते. याचे उत्कृष्ट उदाहरण हे हज़रत यूसुफ अलैहिसल्लाम यांचे आहे. जे ''अज़ीजे मिस्र '' (इजिप्त चे सरदार) च्या पत्नीच्या बहकावण्यात आले नाही. हे उच्च गुण चारित्र्यवान माणसामध्येच असू शकते.

उघडरित्या दान करणेही चांगले आहे. परंतु त्याला अट अशी आहे की त्या मागे देखाव्याची भावना नसावी. परंतु जर लपून दान दिले तर ते चांगले आहे. आणि जो माणूस अशा पद्धतीने लपवून दान देतो की कोणालाही त्याची खबर होत नाही तर त्याचे हे कर्म ते निस्पृह आणि केवळ अल्लाहच्या प्रसन्नते साठी केल्याचा पुरावा आहे. त्याच्या डाव्या





हाताला माहित नाही की त्याच्या उजव्या हाताने काय खर्च केला?'' अत्यंत अलंकारिकरित्या ही गोष्ट वर्णन करण्याची ही पद्धत आहे. ते असे की, तो आपल्या दानाला अशा पद्धतीने गुपित ठेवून खर्च करतो की कोणालाही त्यासंबंधी माहिती होत नाही. येथेपावेतो की त्याच्या नजिकच्या नातेवाईकानांहीस माहित होत नाही. एकान्तात अल्लाह चे नामस्मरण करणे आणि त्याच्या भयाने डोळे पाणावणे, ही या गोष्टी ची खूण आहे की मन अल्लाहच्या प्रेमाने परिपूर्ण आहे. आणि कृतज्ञतेच्या भावनेने त्याच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागल्या आहेत. आणि कारण असे की ही घटना एकान्तात घडत असते म्हणून त्या देखाव्याची कोणतीही शंका राहात नाही. त्याची ही निस्पृहता आणि त्याचे हे अफाट प्रेम कियमतीच्या दिवशी त्याला अल्लाहच्या कृपाछाये खाली जागा देईल.

# अनुभवाने धडा घेणे

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ رَضِیَ اللّٰهِ عَنْهُ عَنِ النَّبِیِّ صلی الله علیه وسلم اَنَّهٗ قَالَ لَا یُلْدَغُ الْمُؤْمِنُ مِنْ حُجْرٍ وَّاحِدٍ مَرَّتَیْنِ . (البخاری کتاب الادب)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. ईमानधारक एक छिद्रातून दोन वेळा चावला जात नाही.** (बुखारी-किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

ईमानधारक या शब्दाने केवळ नामधारी मुसलमान हा अर्थ अभिप्रेत नव्हे. तर सच्चा आणि खरा ईमानधारक अभिप्रेत आहे. त्याचे गुण हदीस मध्ये हे वर्णन केले गेले आहे की जर जमीनीच्या एखाद्या छिदावर त्याचा पाय पडला आणि त्यात लपलेल्या सर्पाने त्याला चावले तर तो त्या पासून धडा घेईल आणि सावध राहील; जेणे करुन पुन्हा त्या छिद्रावर किंवा बिळावर पाय पडू नये. या उदाहरणाचे वर्णन करण्याचा उद्देश असा आहे की, जर ईमानधारकाला ठोकर लागते तर तो सांभाळून चालण्याचा प्रयत्न करतो. आणि अनुभवाने लाभ उचलतो. धर्माच्या बाबी असो अगर दैनंदिन व्यवहाराच्या असो तो अत्यंत सावधगिरीने ते पार पाडतो.

# लोकांसाठी सुलभता निर्माण करणे

## हदीस

**عَنْ سَعِيْدِ ابْنِ اَبِىْ بُرْدَةَ قَالَ سَمِعْتُ اَبِىْ قَالَ بَعَثَ
النَّبِىُّ ﷺ اَبِىْ وَ مُعَاذَ بْنَ جَبَلٍ اِلَى الْيَمَنِ فَقَالَ : يَسِّرَا
وَلَا تُعَسِّرَا وَ بَشِّرَا وَلَا تُنَفِّرَا وَ تَطَاوَعَا.** (البخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**सईद बिन अबी बुर्दा म्हणतात की, मी आपल्या वडीलानां म्हणताना ऐकले की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी माझे वडील (अबू मूसा) आणि मुआज़ बिन जबल यांना येमेन येथे पाठवले, तेव्हा फर्मावले- सुलभता निर्माण करा, अडचण निर्माण करु नका, शुभवार्ता सांगा, घृणा व तिरस्कार निर्माण करु नका आणि दोघानी आपसात सहमत व्हा.**

(बुखारी-किताबुल अहकाम)

## स्पष्टीकरण

ही एक अत्यंत महत्वाची सूचना आहे जी शासकीय अधिकार असलेल्यांसाठीही आहे. आणि दअवत व धर्मप्रचार आणि सुधारणेचे काम करणाऱ्यांसाठी देखील आहे. धर्मात ज्या सुलभता आहेत, त्यानी त्यांचे अवलंब करावे. आणि त्यात अतिरेक व अडचणी निर्माण करु नयेत. अडचण ही धर्माच्या आदेशामध्ये बारीक सारीक गोष्टींचा अवलंब केल्याने निर्माण होतात. आणि ''बिदअत'' अर्थात नवनवीन गोष्टींची वाढ केल्यानेही धर्म अवघड होऊन जाते. एकेश्वरवादाची श्रद्धा इस्लाम ने अशा नैसर्गिक पुरव्यासहित सादर केले आहे. की, ते अत्यंत सहजतेने समजले जाऊ शकते. परंतु नंतरच्या काळात संभाषणा च्या वाद विवादाने वेगवेगळया समस्या निर्माण करुन दिल्या.

दुसरी सूचना त्यानी ही दिली की, शुभवार्ता ऐकवा, घृणा व तिरस्कार निर्माण करु नका. म्हणजे जे लोक धर्म स्वीकारतील त्यानां ईमान आणि शुभ कर्माच्या मोबदल्यात मिळणाऱ्या अनंत यशाची शुभवार्ता सांगा,म्हणजे त्यांच्या मध्ये अधिकाधिक आवड निर्माण व्हावी. कोणती ही अशी गोष्ट करु नका की, ज्यामुळे ते धर्मापासून तिरस्कृत व्हावेत.





तिसरी सूचना त्यानी ही दिली की, हज़रत अबू मूसा आणि हज़रत मुआज़ या (दोन्ही सद्गृहस्थानां) दोघानां येमेन येथे पाठवले जात आहे त्यानी आपसात सहमत व्हावे. आणि मतभेदापासून दूर राहावे. एकता व संघटन या शिवाय धर्माची सेवा उत्कृष्टपणे पार पाडणे शक्य नाही. येथे मतभेद या शब्दाशी ते मतभेद अभिप्रेत आहे, जिच्या परिणामस्वरुप आपसातील संघटन तुकडे तुकडे होऊन जाते. आणि एकमेकांपासून विभक्त होण्याची स्थिती निर्माण होते. म्हणून शक्यतोवर ऐक्याचे व एकतेचे प्रयत्न केले पाहिजेत.

# जितकी जास्त यातना तितका मोठा मोबदला

## हदीस

**عَنْ عَبْدِاللّٰهِ قَالَ دَخَلْتُ عَلٰى رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ وَهُوَ يُوْعَكُ
فَقُلْتَ يَا رَسُوْلَ اللّٰهِ اِنَّكَ تُوْعَكَ وَعْكاً شَدِيْداً. قَالَ اَجَلْ اِنِّىْ
اُوْعَكُ كَمَا يُوْعَكُ رَجُلَانِ مِنْكُمْ قُلْتُ ذٰلِكَ اِنَّ لَكَ اَجْرَيْنِ قَالَ
اَجَلْ ذٰلِكَ كَذٰلِكَ مَامِنْ مُسْلِمٍ يُصِيْبُهٗ اَذًى شَوْكَةٌ فَمَا فَوْقَهَا اِلَّا
كَفَّرَ اللّٰهُ بِهَا سَيِّاٰتِهٖ كَمَا تَحُطُّ الشَّجَرَةُ وَرَقَهَا.** (البخاری کتاب المرض)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद (रज़ि) म्हणतात की, मी अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या सेवेत हज़र झालो तर त्यानां ताप होता. मी बोललो; हे अल्लाह चे प्रेषित ! आपल्याला ताप आहे. फर्मावले. होय मला इतका ताप आहे जितका तुमच्या पैकी दोन लोकानां राहतो. मी सांगितले हे या करिता की आपल्याला दुहेरी मोबदला आहे. फर्मावले- होय -असेच आहे. त्याच प्रमाणे एका मुसलमानाला काटा टोचण्याची किंवा त्या पेक्षा अधिक जी ही यातना पोहोचते. त्यामुळे अल्लाह त्याचे पाप पाडून टाकतो. ज्या प्रमाणे वृक्ष आपली पानं पाडून टाकतो.**

(बुखारी -किताबुल मर्ज)

## स्पष्टीकरण

ही प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या मृत्यू समयीच्या आजार पणाची गोष्ट आहे. त्यानां त्या वेळी इतका जास्त ताप होता की, कोणीही माणूस ते सहन करु शकत नाही. दोन माणसानां जे जास्तीत जास्त ताप असू शकतो तेवढा ताप जेव्हा त्यांना झाला तर आपण समजू शकतो की तो ताप कोणत्या डिग्री चा असेल. इतके असूवन देखील ते शुध्दीवर होते. आणि अशा स्थितीतही त्यानी ही महत्त्वाची गोष्ट सांगितली की, एका मुसलमानाला यातना होते, ती यातना त्याचे पाप नष्ट करण्यास अर्थात पाडून टाकण्यास कारणीभूत होते. ही शुभवार्ता त्या मुसलमानाना ऐकविण्यात आली आहे. ज्याचे आयुष्य खरोखरच इस्लामी आहे. उरतात ते मुसलमान ज्यानां पापांची कोणतीच जाणीव नसते. आणि जे दुराचार आणि दुष्कृत्यात गुंतलेले असतात. त्यांचे पाप का म्हणून पडू लागलेत.

# दु:ख हे भल्या साठी

## हदीस

عَنْ اَبِى هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَنْ يُّرِدِ اللّٰهُ بِهٖ خَيْرًا يُصِبْ مِنْهُ . (البخاری کتاب المرض)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले अल्लाह ज्याचे भले करु इच्छितो त्याला दु:ख (यातना) देतो.** (बुखारी-किताबुल मर्ज)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये ज्या यातनेचे वर्णन करण्यात आले आहे. ती एका खऱ्या मुसलमानाला होणारी यातना आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला या करिता दु:खात टाकतो, म्हणजे त्याचे ईमान, संयम आणि श्रद्धा यामध्ये वृद्धी व्हावी. आणि तो उच्चत्तम मोबदल्यास पात्र ठरावा. हा फार मोठा लाभ आहे, जे दु:खात दडलेले आहे. परंतु नादान लोकानां यातील हित समजत नाही, आणि ते अल्लाहशी दुराग्रह करु लागतात.





# अल्पसंतुष्टता

## हदीस

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عَمْرِو بْنِ الْعَاصِ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ صَلَّى اللّٰهُ عَلَيْهِ وَسَلَّمَ قَالَ قَدْ اَفْلَحَ مَنْ اَسْلَمَ وَ رُزِقَ كَفَافاً وَقَنَّعَهُ اللّٰهُ بِمَا آتَاهُ . (مسلم کتاب الزکاۃ)

## अनुवाद

**हज़रत अब्दुल्लाह बिन अमरो बिन अलआस रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले - त्या माणसाचे कल्याण झाले. ज्याने इस्लाम स्वीकारला आणि ज्याला गरजेपुरती रोजी रोटी दिली गेली आणि अल्लाह ने त्याला त्यावर अल्पसंतुष्टता प्रदान केली.**

**(मुस्लिम - किताबुज़-ज़कात)**

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये अल्पसंतुष्टतेला प्रधान्य देण्यात आले आहे. गरजेपुरत्या रोजीरोटीवर जो मुसलमान संतुष्ट असतो. आणि जास्तीची लालसा करीत नाही त्याच्या साठी अखिरतच्या यशाची शुभवार्ता आहे. अल्पसंतुष्टता एका मुसलमानाला अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करणारा दास बनवते. त्याउलट धनसंपत्तीची हौस व लालसा संसारात गुरफटून टाकते.

# दु:खामुळे पाप नष्ट होतात.

## हदीस

**عَنْ عَائِشَةَ رَضِىَ اللّٰهُ عَنْهَا زَوْجَ النَّبِىِّ ﷺ قَالَتْ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَا مِنْ مُّصِيْبَةٍ تُصِيْبُ الْمُسْلِمَ اِلَّا كَفَّرَ اللّٰهُ بِهَا عَنْهُ حَتَّى الشَّوْكَةِ يُشَاكُهَا.** (البخاری کتاب المرض)

## अनुवाद

**हज़रत आयशा रज़ियल्लाहु अन्हा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या पवित्र पत्नी या म्हणतात की अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम फर्मावतात - मुसलमानाला ज्या यातना पोहोचतात. त्यामुळे अल्लाह त्यांचे पाप नष्ट करतो येथ पावेतो की काटा टोचण्याचे दु:ख देखील.**

(अल-बुखारी -किताबुल मर्ज)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये मुसलमान या शब्दाशी तो मुसलमान अभिप्रेत आहे, जो इस्लाममध्ये सच्चा असावा. म्हणजे ज्याने खरोखरच स्वत:ला अल्लाहच्या हवाली केलेला असावा. आणि त्याचे आज्ञापालन करण्यात आपले जीवन व्यतीत करीत असावा. अशा मुसलमानाला जेव्हा कोणतीही यातना होते, तर तो अल्लाहशी दुराग्रही होत नसतो. उलट परिक्षा समजून त्यावर संयम पाळतो. म्हणून ही यातना त्याचे पाप नष्ट करायला कारणीभूत ठरते. दु:ख लहान असो वा मोठे येथपावेतो की, काटा टोचण्याचा त्रास का असे ना, ते निष्परिणामी राहात नाही. उलट त्यामुळे त्याचे पाप नष्ट केले जातात. पाप नष्ट केल्या जाण्याची ही कल्पना दु:खात मनशांतीला कारणीभूत ठरते. आणि त्यामुळे त्रासाची व दु:खाची जाणीव देखील कमी होते.





# मुसलमान मुसलमानांसाठी सुरक्षिततेचे निमित्त असतो.

## हदीस

**عَنْ عَامِرٍ قَالَ سَمِعْتُ عَبْدَ اللّٰهِ بْنِ عَمْرٍو يَقُوْلُ قَالَ النَّبِىُّ ﷺ : اَلْمُسْلِمُ مَنْ سَلِمَ الْمُسْلِمُوْنَ مِنْ لِّسَانِهٖ وَيَدِهٖ وَالْمُهَاجِرُ مَنْ هَجَرَ مَا نَهَى اللّٰهُ عَنْهُ.** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत आमिर (रज़ि) म्हणतात की,मी अब्दुल्लाह बिन अमरो यांना म्हणताना ऐकले की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- मुसलमान तो आहे ज्याच्या जीभ आणि हाता पासून मुसलमान सुरक्षित असावेत. आणि मुहाजिर तो आहे जो त्या गोष्टीनां, ज्यानां अल्लाहने मनाई केली आहे, त्याग करावा.(अल किताबुर्रिक़ाक़)**

## स्पष्टीकरण

उपरोक्त हदीस मध्ये दोन परिभाषिक शब्दांच्या अर्थाकडे इशारा केला गेला आहे. मुस्लिम किंवा मुसलमान या शब्दाचा मूळ ''सलम'' हा शब्द आहे. म्हणजे सुरक्षेत राहणे. ही शाब्दीक तुलना या अर्थाच्या सत्यतेकडे इशारा करते की, मुसलमानाच्या जीभ आणि हातापासून मुसलमान सुरक्षित राहतील,तो ना कोणाशी बाचाबाची करेल,आणि ना ही कोणावर हात उचलेल. कारण की हे मुस्लिम होण्याचा उघड तगादा आहे.

दुसरा परिभाषिक शब्द मुहाजिर आहे. म्हणजे हिज़रत करणारा हा शब्द 'हिज्र' पासून आहे. ज्याचा अर्थ सोडणे असा आहे. शब्दाची ही वास्तविकता अर्थाच्या या सत्यतेकडे इशारा करते की मुहाजिर ने त्या सर्व गोष्टींचा त्याग करावा, ज्याना अल्लाह ने मनाई केली आहे. जर त्याने अल्लाहच्या आदेशाने आपला देशत्याग केलेला आहे तर ज्या गोष्टीनां अल्लाह ने मनाई केली आहे त्यांचा त्याग न करणे हिजरत च्या वास्तविकतेशी किती असंबंधित गोष्ट आहे.

१७८

# दुराग्रहाची संधी निर्माण न होऊ देणे

## हदीस

**عَنْ عَلِيِّ بْنِ حُسَيْنٍ اَنَّ النَّبِيَّ صلى الله عليه وسلم اَتَتْهُ صَفِيَّةُ بِنْتُ حُيَيٍّ فَلَمَّا رَجَعَتِ انْطَلَقَ مَعَهَا فَمَرَّ بِهٖ رَجُلَانِ مِنَ الْاَنْصَارِ فَدَعَا هُمَا فَقَالَ اِنَّهَا صَفِيَّةُ قَالَا سُبْحَانَ اللّٰهِ ؟ قَالَ : اِنَّ الشَّيْطَانَ يَجْرِىْ مِنِ ابْنِ اٰدَمَ مَجْرَى الدَّمِ.** (بخاری کتاب الاحکام)

## अनुवाद

**अली बिन हुसैन कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्याकडे सफिया बिन्ते हैय्य आल्या, आणि जेव्हा परतू लागल्या तर तेही त्यांच्या बरोबर निघाले. रस्त्यात अन्सार चे दोन लोक त्यांच्या जवळून गेले. तर त्यांनी त्यांना बोलवून सांगितले, या सफिया आहेत. त्यानी म्हटले. ''सुबहानल्लाह'' (अल्लाह पवित्र आहे) त्यानी फर्मावले. सैतान माणसाच्या आत रक्ताप्रमाणे धावत असतो.** (बुखारी किताबुल अहकाम)

## स्पष्टीकरण

प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या बाबतीत दुराग्रह निर्माण होण्याचा प्रश्नचा उद्‌भवत नाही. परंतु त्यांनी उम्मतला हा घडा शिकवण्या करिता की, त्यांनी दुराग्रह आणि आरोप याची कोणतीही संधी निर्माण होऊ देऊ नये. रस्त्याने जाणाऱ्या दोन अन्सारच्या लोकानां बोलावून सांगितले की या सफिया आहेत. ज्या माझ्या बरोबर आहेत. त्यानी सैतानाच्या ''वसवसा अंदाजी''(माणसाच्या मनात सैतानाकडून उत्पन्न केला जाणारा धर्मबाहय विचार) पासून सावध राहण्याची सूचना केली. कारण तो रक्ताप्रमाणे माणसाच्या आत धावत असतो. याचा अर्थ असा आहे की, माणसाच्या अंतरंगावर परिणाम करण्याचा तो पुरेपुर प्रयत्न करीत असतो. आणि त्याची एक युक्ती दुराग्रह निर्माण करणे देखील आहे. म्हणून प्रत्येक माणसाने सावध असले पाहिजे. आणि कोणतीही अशी संधी निर्माण होऊ देता कामा नये, ज्यामुळे लोकांच्या मनात त्याच्या बद्दल दुराग्रह निर्माण व्हावा. उदाहरणार्थ कोणाला अचानकपणे धनलाभ झाला तर लोकांनी त्याच्या संबंधी आपसात कुरबुर करण्या पूर्वीच आपल्या संबंधी सत्यस्थिती लोकांसमोर मांडून टाकावी.



१७९

# दुःख पोहोचल्यानंतर जर तर च्या गोष्टी न करणे

## हदीस

**عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وسلم اَلْمُؤْمِنُ الْقَوِىُّ خَيْرٌ وَاَحَبُّ اِلَى اللّٰهِ مِنَ الْمُؤْمِنِ الضَّعِيْفِ . وَفِىْ كُلٍّ خَيْرٌ . اَحْرِصْ عَلٰى مَا يَنْفَعُكَ وَاسْتَعِنْ بِاللّٰهِ . وَلَا تَعْجَزْ وَاِنْ اَصَابَكَ شَىْءٌ فَلَا تَقُلْ لَوْ اَنِّىْ فَعَلْتُ كَانَ كَذَا وَكَذَا . وَلٰكِنْ قُلْ قَدَرُ اللّٰهِ وَمَا شَاءَ فَعَلَ فَاِنَّ لَوْ تَفْتَحُ عَمَلَ الشَّيْطَانِ.** (مسلم کتاب القدر)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-अशक्त ईमानधारकाच्या तुलनेत सशक्त ईमानधारक बेहतर आहे; आणि अल्लाहला जास्त पसंत आहे. आणि दोघांमध्ये मांगल्य आहे. जी वस्तु तुमच्यासाठी लाभदायक आहे; त्याची आशा करा; आणि अल्लाह कडून सहाय्यता मागा. आणि धैर्य ढासळू देऊ नका. जर तुम्हाला दुखापत होत असेल तर असे म्हणू नका की जर मी हे केले असते तर असे झाले नसते. उलट म्हणा की, अल्लाह ने नशिबात लिहिले होते. आणि त्याने जी इच्छा केली त्या प्रमाणे घडले. जर तर सैताना साठी मार्ग मोकळा करतो.** (मुस्लिम-किताबुल क़द्र)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये तीन गोष्टीचे वर्णन करण्यात आले आहे.

एक हे सशक्त ईमानधारक हा अशक्त ईमानधारकापेक्षा बेहतर आहे. सशक्त या शब्दाशी शारीरिकदृष्टया आणि शस्त्र बाळगणारा ईमानधारक हे दोन्ही अर्थ अभिप्रेत आहेत. शस्त्रधारी असल्यामुळे तो शत्रूंशी मुकाबलाही करु शकतो. परंतु जर एखादा ईमानधारक शारीरिकदृष्टयाही अशक्त आहे, आणि त्याच्या जवळ शस्त्राचीही शक्ती नाही तर ही त्याची

लाचारी आहे. परंतु तो ईमानधारक असणे हे लाभदायकच आहे. या मुळे हे स्पष्ट होते की, जेथपावेतो शक्य आहे एका मुसलमानाने सशक्त बनून राहण्याला प्राधान्य द्यावे, अशक्त बनून राहण्यात नव्हे.

दुसरी गोष्ट ही फर्मावली आहे की, ज्या लाभदायक वस्तु प्राप्त नाहीत त्यासाठी धैर्य सोडून देऊ नका, उलट त्यांचे इच्छुक बनून अल्लाहपाशी सहाय्य मागावे. हे संकेत आहेत जिहाद साठी उपयुक्त वस्तु प्राप्त करण्याकडे. तिसरी गोष्ट ही फर्मावली आहे की, एखादे दु:ख पोहोचल्यावर हे म्हणू नये की, जर मी असे केले असते तर हे दु:ख पोहेचले नसते, उलट असे म्हणायला हवे की, अल्लाह ने जे नशिबात लिहीले होते आणि त्याची जी इच्छा होती त्या प्रमाणेच घडले. असे म्हटल्याने अल्लाहलिखित भाग्यावर श्रद्धा बळकट होते. परंतु जर तरच्या गोष्टी केल्याने सैतानाला मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टी मनात टाकण्याची संधी प्राप्त होते.

# कर्ज घेण्याचे टाळणे

## हदीस

**عَنْ عَآئِشَةَ اَخبَرَتْهُ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ كَانَ يَدْعُوْ فِی الصَّلٰوةِ وَ يَقُوْلُ اَللّٰهُمَّ اِنِّیْ اَعُوْذُبِکَ مِنَ الْمَأْثَمِ وَ الْمَغْرَمِ فَقَالَ لَهٗ قَائِلٌ مَّآ اَكْثَرُ مَا تَسْتَعِيْذُ يَا رَسُوْلَ اللّٰهِ مِنَ الْمَغْرَمِ قَالَ اِنَّ الرَّجُلَ اِذَا غَرِمَ حَدَّثَ فَكَذَبَ وَوَعَدَ فَاَخْلَفَ .** (البخاری کتاب الاستقراض)

## अनुवाद

**हज़रत आयशा (रज़ि) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम नमाज़ मध्य 'दुआ' (प्रार्थना) करीत आणि म्हणत असत. हे अल्लाह ! मी पाप आणि कर्ज या पासून तुझे संरक्षण मागतो. कोणी तरी विचारले. काय बात आहे तुम्ही बहुदा कर्जापासून संरक्षण मागता. फर्मावले, जेव्हा एखादा माणूस कर्जदार असतो तर तो खोटे बोलतो. आणि वचन देतो तर त्याच्या विरुद्ध वागतो.(बुखारी-किताबुल इस्तिक़राज़)**





# स्पष्टीकरण

कर्ज घेणे या गोष्टीला इस्लाम ने प्रोत्साहन दिलेले नाही. उलट आपल्या अत्यावश्यक गरजा भागवण्यासाठी मान्यता दिली आहे. कर्ज हा दुसऱ्याचा माल असतो ज्याचा उपयोग करण्याची तो परवानगी देतो. ठरलेल्या मुदतीत व केलेल्या वायद्यानुसार ते परत करणे आवश्यक आहे. विलंब याच स्थितीत आहे की अडचण असल्यामुळे माणूस वेळेवर ते अदा करु शकणार नाही आणि सवलत मिळाल्यावर त्याने परतफेडीस उशीर करावे. परंतु जो माणूस कर्ज घेऊन परतफेड करायला बेपर्वा होऊन बसतो तो उपकार विसरणारा असतो आणि दुर्व्यवहार करतो. मग कर्ज घेतल्यानंतर दोन वाईट गोष्टी कर्जदारामध्ये आपोआप निर्माण होतात. एक खोटे बोलणे आणि दुसरे वचनभंग करणे; जसे की उपरोक्त हदीस मध्ये वर्णन करण्यात आले आहे. म्हणून अल्लाहचे प्रेषित कर्ज घेण्यापासून अल्लाहचे संरक्षण मागत असत. हे जणू उम्मतला या गोष्टीची शिकवणुक आहे की जोपर्यंत शक्य आहे. तो पर्यंत त्यानी कर्ज घेण्यापासून स्वता:ला लांब ठेवावे. हदीस मध्ये असेही नमूद आहे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम त्या माणसाची नमाज़े ''जनाज़ा'' चे (एखाद्या माणसाच्या मृत्यु नंतर पठण केली जाणारी नमाज़) पठण करीत नव्हते; जो आपल्या मागे कर्ज सोडून जात असे. हे यामूळे की, लोकानी मृत्यु पूर्वीच आपल्याला देणे असलेल्या कर्जाच्या परतफेडीची व्यवस्था करावी. क़ुरआन मध्ये जेथे वारसा हक्काचे वर्णन करण्यात आले आहे, तेथे याचे देखील स्पष्टीकरण करण्यात आले आहे की, मयताच्या कर्ज फेडीनंतर त्याच्या मालमत्तेची वाटणी केली जावी. आज मात्र लोकांची विचित्र परिस्थिती आहे. चांगले सुखी व समृद्ध लोक देखील कोणती ही खरी गरज नसतानां कर्ज घेतात. आणि दुसऱ्याच्या पैश्याचा अनावशयक उपयोग करतात. आणि त्यांना परतफेडीची ही कोणती ही काळजी राहात नाही. असे लोक बेजबाबदारपणे आणि अनैतिकपणे तर वागतातच त्याच बरोबर एक वोझं आहे जे घेऊन ते या जगाचा निरोप घेतात.

# शेती आणि वृक्षारोपण हे चांगुलपणाचे निमित्त असते.

## हदीस

عَنْ اَنَسٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَا مِنْ مُسْلِمٍ يَغْرِسُ غَرْسًا اَوْ يَزْرَعُ زَرْعًا فَيَاْكُلُ مِنْهُ طَيْرٌ اَوْ اِنْسَانٌ اَوْ بَهِيْمَةٌ اِلَّا كَانَ لَهُ بِهٖ صَدَقَةٌ . (البخاری کتاب المزارعۃ)

## अनुवाद

**हज़रत अनस (रज़ी.) कथन करतात की, अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-जो मुसलमान ही रोपं लावतो अगर शेती करतो. आणि त्यातून पक्षी माणसं किंवा जनावरं खातात तर ते त्याच्या साठी दान होते.**(बुखारी-किताबुल-मुज़ारिअ)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये वृक्षारोपण आणि शेतीला चांगुलपणाचे कृत्य संबोधले गेले आहे. ते असे की, त्यामुळे पक्षीही तिच्या उत्पादना पासून लाभ उचलतात; आणि माणसं व जनावरं देखील. त्याच प्रमाणे ज्यांना या पासून अन्न प्राप्ती होते. ही सेवा पार पाडणाऱ्यासाठी मोबदल्याचे निमित्त असते. पक्षी आणि जनावरं तर आपला हक्क प्राप्त करुन घेतात, परंतु माणसांमध्ये गरजवंताना त्यांचा हक्क अदा केला जातो. म्हणून एका मुसलमानाने ही सेवा पार पाडणे शरीअतच्या दृष्टीकोनातून एक मनपसंत कृत्य आहे. दुसऱ्या शब्दात इस्लामने वृक्षारोपण, बागायती आणि शेती या व्यवसायनां प्रोत्साहन दिले आहे.

ही हदीस प्रमाणाच्या दृष्टीने देखील ''सहीह'' (बरोबर) आहे. आणि क़ुर्आनच्या या आयतींशी देखील जुळती आहे. ज्यामध्ये कृषी व्यवसायाला अल्लाह चा ''एहसान'' (उपकार) सांगितले गेले आहे. आणि ''हर्स'' (शेती) चे वर्णन अल्लाह ची ''नेअमत'' (देणगी) म्हणून केले आहे. म्हणून असे म्हणणे उचित नाही इस्लाम ने मुसलमानांसाठी शेती करण्याच्या बाबतीत निरुत्साहीत केले आहे. परंतु त्यात इतके व्यस्त राहणे की अल्लाहच्या मार्गात जिहाद करण्याला पाठीशी टाकून दिला जावा निश्चितपणे ही नावडती गोष्ट आहे.





# निकाह करण्यासाठी धार्मिक वृत्तीच्या स्त्री ची निवड

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ تُنْكَحُ الْمَرْأَةُ لِاَرْبَعٍ لِّمَا لِهَا وَلِحَسَبِهَا وَجَمَالِهَا وَلِدِيْنِهَا فَاظْفَرْ بِذَاتِ الدِّيْنِ تَرِبَتْ يَدَاكَ . (البخاری کتاب النکاح)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाह अन्हो कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले-एखाद्या स्त्रीशी निकाह चार गोष्टींमुळे केला जातो. तिच्या संपत्तीमुळे, तिच्या घराण्यामुळे, तिच्या सौंदर्यामुळे,आणि तिच्या धार्मिक वृत्ती मुळे, तर तुम्ही धार्मिक वृत्तींच्या स्त्रीशी निकाह करा व यशस्वी व्हा तुमचे हात धुळीत भरोत.(तुम्ही हे चुकीचे काम कराल.)**

(बुखारी-किताबुन-निकाह)

## स्पष्टीकरण

निकाह साठी जर खरी श्रध्दावान आणि नेक स्त्री ची निवड केली गेली आहे तर सदाचारी पुरुषासाठी या पेक्षा समाधानाची कोणतीही वस्तु असू शकत नाही. आणि हे त्याच्या साठी चांगुलपणाचे आणि बरकती चे लक्षण ही असू शकते. मुलांचे पालनपोषणही चांगल्या पद्धतीने होऊ शकेल. आणि घर देखील धर्माच्या ज्योतीने प्रकाशित होईल. म्हणून अन्य गोष्टींनां प्राधान्य देण्याच्या तुलनेत धार्मिकतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. परंतु त्याच बरोबर स्त्री मध्ये सौंदर्याची ही जोड असेल तर दुधात साखर असल्या सारखेच.

घराणे देखील ऐहिक दृष्टीकोनातून एक आकर्षक वस्तु आहे. परंतु धार्मिकतेच्या तुलनेत त्याचे कोणते ही मूल्य नव्हे; उरते संपत्ती, तर स्त्री च्या संपत्तीशी पुरुषाला काय देणे घेणे? स्त्री ची संपत्ती स्त्रीचीच आहे. मग पुरुषाने तिच्या संपत्तीकडे लालसेच्या नज़रे ने कां म्हणून पहावे? जर तो समजत असेल की, धनवान स्त्री आपल्या बरोबर खूप हुंडा आणेल तर हे त्यापेक्षाही अधिक गैर समज आहे. आणि असे विवाह यशस्वी होत नसतात. म्हणून त्यांनी फर्मावले-तुमचे हात धुळीत भरोत.म्हणजे जर तुम्ही धार्मिकते ऐवजी दुसऱ्या अन्य गोष्टींनां प्राधान्य देत असाल तर तुम्ही आपले हात धुळीत माखून टाकाल याचा अर्थ असा आहे की, तुम्ही एक चुकीचे काम कराल.)

# पाप, कृत्ये, आणि न आवडणाऱ्या गोष्टी





# मुसलमानाची हत्या अधर्मी कृत्य आहे.

## हदीस

**عَنِ ابْنِ عُمَرَ اَنَّهُ سَمِعَ النَّبِیَّ ﷺ يَقُوْلُ : لَا تَرْجِعُوْا**
**بَعْدِیْ كُفَّارًا يَّضْرِبُ بَعْضُكُمْ رِقَابَ بَعْضٍ .** (بخاری کتاب الفتن)

## अनुवाद

**हज़रत इब्ने उमर (रज़ि.) म्हणतात की, त्यानी प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानां फर्मावताना ऐकले, तुम्ही काफिर (अधर्मी) होऊ नका की, एकमेकांच्या हत्या करु लागा.** (बुखारी-किताबुल फितन)

## स्पष्टीकरण

ही हदीस जबरदस्त चेतावणी (Warning) आहे त्या मुसलमानांसाठी जे आपसात नाहक रक्तपात करतात. क़ुरआन मध्ये एका ईमानधारका ची जाणून बुजून हत्या करणाऱ्याला सदैव जहन्नमच्या शिक्षेची धमकी देण्यात आलेली आहे. आणि उपरोक्त हदीस अशा हत्येला अधर्मी कृत्य घोषित करीत आहे. या मुळे एका मुसलमानाच्या हत्येच्या कठोरतेची कल्पना येते.

या जबरदस्त चेतावणी नंतरही मुसलमान आपसातील रक्तपात आणि यादवी युध्दात गुंतलेले आहेत. आणि आधुनिक युगात तर रक्ताची किंमतच उरलेली नाही. ज्याचे निर्धृण रुप दहशतवाद आहे. ज्यात किती तरी निरपराध मुसलमानांचे रक्तपात केले गेले आहे. ईश्वर करो, त्यानां ही जाणीव व्हावी की त्यांचे हे कृत्य किती अधर्मी आहे आणि किती कठोर अज़ाब (शिक्षा) ला पात्र आहे.

**وَمَنْ يَّقْتُلْ مُؤْمِنًا مُّتَعَمِّدًا فَجَزَآؤُهٗ جَهَنَّمُ خٰلِدًا فِيْهَا**
**وَغَضِبَ اللّٰهُ عَلَيْهِ وَلَعَنَهٗ وَاَعَدَّ لَهٗ عَذَابًا عَظِيْمًا.** (سورہ نساء:۹۳)

"आणि जो कोणी एखाद्या ईमानधारका ला जाणून बुजून ठार करील त्याची सज़ा जहन्नम आहे, ज्यात तो सदा सर्वदा कैद राहील आणि त्याच्या वर अल्लाह चा प्रकोप झाला आणि अल्लाह ने अशा माणसावर धि:क्कारा चा मारा केला आणि त्याच्यासाठी मोठा जबरदस्त अज़ाब तयार करुन ठेवला आहे. (सूरह निसा आयत-९३)

१८६

# विना कारण रक्तपात

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ : قَالَ النَّبِیُّ ﷺ وَالَّذِیْ نَفْسِیْ بِیَدِهٖ لَیَأْتِیَنَّ عَلَی النَّاسِ زَمَانَ لَا یَدْرِیْ الْقَاتِلُ فِیْ اَیِّ شَیْءٍ قَتَلَ وَلَا یَدْرِی الْمَقْتُوْلُ عَلٰی اَیِّ شَیْءٍ قُتِلَ . (مسلم کتاب الفتن)

## अनुवाद

**हज़रत अबू हुरैरा (रज़ि) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- शपथ आहे त्या अल्लाह ची ज्याच्या हातात माझे प्राण आहे ! लोकांवर एक काळ निश्चितपणे येईल की, खुन्याला माहीत राहणार नाही की त्याने का खून केला आणि ज्याची हत्या झाली त्याला ही माहित राहणार नाही की, त्याची हत्या का केली गेली. (मुस्लिम-किताबुल फितन)**

## स्पष्टीकरण

या भविष्यावाणीच्या खुणा आधुनिक युगात प्रकट होऊ लागल्या आहेत. दररोज रक्तपाता च्या संख्येत वाढ होत जात आहे. त्या करणारे कोणाकडून ही ''सुपारी'' (हत्येचा मोबदला) घेऊन हत्या करीत आहेत. त्याना हे माहीत नसते की, या माणसाचा खरंच काही दोष होता का नाही. आणि ज्याची हत्या झाली त्याला देखील नाही माहीत की भाड्याच्या माणसांनी त्याला कोणत्या अपराधापाई ठार केले. दहशतवादातही कित्येक लोकं ठार मारले जातात. त्यानां हे देखील ठाऊक नसते की त्यांचा काय दोष आहे. आणि ना ही दहशतवादी हे सांगू शकतात की, त्यांचा काय दोष आहे. उलट ते आपला राजकीय हेतू साध्य करण्याकरिता निरपराध लोकांना लक्ष बनवतात. त्याचा खाजगी लाभ उचलण्यासाठी अपराधी लोक विमानांचे अपहरण करुन विनाकारण प्रवाश्यांची निर्दयतेने हत्या करतात.आणि आता तर असे ही जालीम लोक प्रकट होऊ लागले आहेत जे बाजारा मध्ये बेछुट गोळीबार करुन निरपराध लोकांची हत्या करुन टाकतात. किती क्रूरता आहे जी रोजच्या रोज वाढत जात आहे.



१८७

# आत्महत्येचा परिणाम

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ عَنِ النَّبِیَّ ﷺ قَالَ: مَنْ تَرَدّٰی مِنْ جَبَلٍ فَقَتَلَ نَفْسَهٗ فَهُوَ فِیْ نَارِ جَهَنَّمَ یَتَرَدّٰی فِیْهِ خَالِدًا مُخَلَّدًا فِیْهَا اَبُدًا وَمَنْ تَحَسّٰی سَمّاً فَقَتَلَ نَفْسَهٗ فَسَمُّهٗ فِی یَدِهٖ یَتَحَسَّاهُ فِیْ نَارِ جَهَنَّمَ خَالِداً مُّخَلَّداً فِیْهَا اَبَداً، وَمَنْ قَتَلَ نَفْسَهٗ بِحَدِیْدَةٍ فَحَدِیْدَتُهٗ فِیْ یَدِهٖ یُجَأُّبِهَا فِیْ بَطْنِهٖ فِیْ نَارِ جَهَنَّمَ خَالِداً مُّخَلَّداً فِیْهَا اَبَداً. (البخاری کتاب الطب)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-ज्यांने स्वत:ला पर्वतावरुन खाली पाडले आणि आपले प्राण घेऊन टाकले तर तो जहन्नमच्या अग्नीत स्वत:ला पाडून टाकतो. सदा सर्वदा तो त्याच स्थितीत राहील. आणि ज्याने विष प्राशन करुन स्वत:ला मारुन टाकले तर त्याचे विष त्याच्या हातात राहील आणि तो जहन्नमच्या अग्नीत सदैव पीत राहील. आणि ज्याने स्वत:ला लोखंडाच्या एखाद्या वस्तुने स्वत:चा जीव घेतला तर लोखंडाची ती वस्तु त्याच्या हातात राहील. जिच्या सहाय्याने तो जहन्नमच्या आगीत आपल्या पोटात मारत राहील. आणि सदा सर्वदा तो त्याच स्थितीत राहील.**

**(बुखारी-किताबुत-तिब)**

## स्पष्टीकरण

प्राण हे अल्लाह ची अनामत आहे. म्हणून आपले प्राण गमावणे कोणत्याही स्थितीत वैध नाही. एखाद्या त्रासाला सहन करता माणूस जर आत्महत्या करतो तर स्वयं हत्येचा अपराधी असतो; ज्याची शिक्षा जहन्नम आहे. आणि मग जहन्नम मध्ये शिक्षेचे वैशिष्ट्य हे असेल की, जी पद्धत त्याने आत्महत्येची अवलंबिली होती तीच पद्धत तो जहन्नम मध्ये वारंवार करीत राहील आणि ही शिक्षा त्याला सदा सर्वदा भोगावी लागेल.

आज कल आत्महत्या करणाऱ्याचे प्रमाण वाढलेले आहे. ज्यात स्त्रीया देखील सामील आहेत. जागातिक कष्टानां व त्रासानां कंटाळून ते आत्महत्या करुन टाकतात.ही असंयमता

आहे. आणि परिक्षा केंद्रातून पळ काढणे आहे. आणि जो कोणी परिक्षा केंद्रातून पळ काढतो तो नेहमी अपयशी व विफलच राहणार आहे. जर त्यानी आत्महत्येच्या अंतिम परिणामाला डोळ्यासमोर ठेवले असते तर जगातील त्रासांना सहन करायला तयार झाले असते. कारण ते त्रास तात्पुरते आहेत आणि जगातील त्रास हे आखिरतच्या तुलनेत काहीही नव्हेत.

# ईमानधारक जेव्हा पापकृत्ये करतो

## हदीस

قَالَ اَبُوهُرَيْرَةَ رَضِىَ اللّٰهُ عَنْهُ اَنَّ النَّبِىَّ صلى الله عليه وسلم قَالَ لَا يَزْنِى حِيْنَ يَزْنِىْ وَهُوَ مُؤْمِنٌ وَلَا يَشْرَبُ الْخَمْرَ حِيْنَ يَشْرَبُهَا وَهُوَ مُؤْمِنٌ وَلَا يَسْرِقُ السَّارِقُ حِيْنَ يَسْرِقُ وَهُوَ مُؤْمِنٌ . (البخاری کتاب الاشربۃ)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-व्यभिचार करणारा त्यावेळी ईमानधारक राहात नाही जेव्हा तो व्यभिचार करतो आणि ना ही दारु पिणारा त्यावेळी ईमानधारक असतो जेव्हा तो दारु पितो. आणि ना ही चोर त्यावेळी ईमानधारक असतो ज्या वेळी तो चोरी करतो.** (बुखारी-किताबुल अशरब)

## स्पष्टीकरण

हदीस मध्ये जे नाकारण्यात आले आहे, ती ईमानची कैफियत आहे. व्यभिचार, दारु आणि चोरी या सारखे पाप फार मोठे पाप आणि अपराध आहेत. जे करण्यापासून ईमान रोखत असते. तरी ही एक ईमानधारक जेव्हा असे पाप करुन टाकतो, तो आपल्या भावनानां बळी पडून तसे करतो ईमानची कैफियत त्या वेळी नष्ट होत असते. म्हणून एका ईमानधारका ने या पापांपासून दूर राहिलं पाहिजे. अन्यत:भिती आहे की दुराचार आणि दुष्कृत्यात लुप्त होऊन त्याने ईमान नष्ट न करुन टाकावे.





# डोळ्यांचा व्यभिचार

## हदीस

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ عَنِ النَّبِىِّ صلى الله عليه وسلم قَالَ كُتِبَ عَلَى اُبْنِ آدَمَ نَصِيْبُهٗ مِنَ الزِّنٰى. مُدْرِكٌ ذٰلِكَ لَا مَحَالَةَ ، فَالْعَيْنَانِ زِنَاهُمَا النَّظَرُ، وَالْاُذُنَانِ زِنَاهُمَا الْاِسْتِمَاعُ ، وَاللِّسَانِ زِنَاهُ الْكَلَامُ ، وَالْيَدُ زِنَاهَا الْبُطْشُ ، وَالرِّجْلُ زِنَاهَا الْخُطَاَ، وَالْقَلْبُ يَهْوٰى وَ يَتَمَنّٰى ، وَ يُصَدِّقُ ذٰلِكَ الْفَرْجُ وَيُكَذِّبُهٗ. (مسلم کتاب القدر)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.) कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले-माणसाने त्याने केलेल्या त्या वाट्याचा केलेला व्यभिचार लिहिला जातो. जो नाईलाजास्तव त्याला मिळणारच आहे. डोळ्यांचा व्यभिचार दृष्टी आहे. कानांचा व्यभिचार ऐकणे आहे. जिभेचा व्यभिचार गोष्टी करणे आहे. हातांचा व्यभिचार पकडणे आहे. पायांचा व्यभिचार चालणे आहे मन, इच्छा. आणि आकांक्षा करतो. आणि लज्जास्थाने त्या गोष्टींना खरे खोटे करुन दाखवतात.** (मुस्लिम-किताबुलक़द्र)

## स्पष्टीकरण

माणूस जर आपल्या पत्नीव्यतिरिक्त अन्य एखाद्या स्त्री कडे जी त्याच्यासाठी परकी आहे, कामवासनेच्या दृष्टीने पाहतो. तर हा डोळ्यांचा व्यभिचार आहे. त्याच प्रमाणे जर तो स्त्रीयांची कामवासना भडकवणारी गाणी ऐकतो तर हा कानाचा व्यभिचार आहे. प्रेमाच्या गोष्टी करणे हा जिभेचा व्यभिचार आहे. कामवासनेच्या भावनेने परक्या स्त्रीचा हात धरणे हाताचा व्यभिचार आहे. त्याच भावनेने प्रेमिकेच्या गल्लीत जाणे, पायांचा व्यभिचार आहे. आणि मनाचा परक्या स्त्रीयांच्या संबंधी वाईट इच्छा आणि आकांक्षा करणे आपल्या अंतर्मनाला पापाने माखून टाकणे आहे. पापांच्या या सर्व रुपानां हदीस मध्ये एक प्रकारे व्यभिचार म्हणून नमूद करण्यात आले आहे; ज्यावर निश्चितपणे पकड होणार आहे. केवळ पश्चा:ताप व्यक्त करुनच सुटका शक्य आहे.

وَاِنْ تُبْدُوْا مَا فِىْ اَنْفُسِكُمْ اَوْ تُخْفُوْهُ يُحَاسِبْكُمْ بِهِ اللّٰهُ .(بقرہ:۲۸۴)

''तुम्ही आपल्या मनातल्या गोष्टी जाहीर करा अगर लपवा, अल्लाह त्या गोष्टींचा हिशोब तुमच्या कडून घेईल.'' (सूरह बकर - आयत क्र . २८४)

وَلَا تَقْرَبُوا الْفَوَاحِشَ مَا ظَهَرَ مِنْهَا وَمَا بَطَنَ .(انعام : ۱۵۱)

“निर्लज्जतेच्या गोष्टींकडेही जाऊ नका मग ते उघड असो वा लपलेल्या.’’ (सूरह अनआम- आयत क्र. १५१)

उपरोक्त हदीस च्या शेवटी हे जे नमूद केले आहे की, लज्जास्थाने त्या गोष्टीनां खरे खोटे करुन दाखवतात’’ तर याचा अर्थ असा आहे की, जर लज्जास्थाने व्यभिचाराचे कृत्य करुन टाकतात तर ही व्यभिचारा ची पाऊले जी नमूद केली आहेत. त्याची पुष्टी होते. म्हणजे त्या प्रमाणे तो पूर्णपणे व्यभिचाराचा पुरावा देतो. आणि लज्जास्थाने व्यभिचारी कृत्य करीत नाही तर व्यभिचाराच्या पाऊलांना ते निष्फळ बनवून (सर्व सामान्ये) टाकतात.

आधुनिक युगात तर व्यभिचार ही आम गोष्ट झालेली आहे. कामवासना भडकवणारी गाणी, प्रेमाच्या कथा, स्त्रीयांची नग्न छायाचित्रे, सौंदर्यस्पर्धा, अर्धनग्न स्त्रीयांचे वावरणे,नृत्य व गाण्यांचे कार्यक्रम, व्याभिचाराची चालना मनात निर्माण करीत आहे. आणि विशेष करुन तरुणपिढीला निर्लज्जतेच्या खाईत ढकलत आहेत. ईश्वर करो, त्यानी या हदीस पासून धडा घ्यावा.

# भांडखोर व्यक्ति अल्लाहला अजिबात पसंत नाही

## हदीस

عَنْ عَائِشَةَ عَنِ النَّبِيِّ صلى الله عليه وسلم قَالَ اِنَّ اَبْغَضَ الرِّجَالِ
اِلَى اللّٰهِ الْاَلَدُّ الْخَصِمُ . (البخاری کتاب المظالم)

## अनुवाद

**हज़रत आयशा (रज़ि.) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले अल्लाहला तो माणूस सर्वाधिक नापसंत आहे जो फारच भांडखोर आहे.(अल किताबुल मज़ालिम)**

## स्पष्टीकरण

भांडखोर माणूस असहिष्णू असतो. आणि त्या दृष्टीने या गोष्टी वर राहात नाही की खरी आणि न्यायिक (न्यायपूर्ण) गोष्ट कोणती आहे. उलट तो भावनानी प्रभावित होऊन आणि रागाच्या भरात निरकुंश होऊन भांडण सुरु करतो आणि शिवीगाळ करु लागतो. म्हणून अल्लाहपाशी ही सवय अत्यंत वाईट आहे. एका मुसलमानाने तर अधिकाधिक गंभीर व्हायला हवे. आणि यातना देणाऱ्या गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे.





# अफरातफरीचा परिणाम

## हदीस

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ: قَامَ فِيْنَا رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وسلم ذَاتَ يَوْمٍ فَذَكَرَ الْغُلُوْلَ فَعَظَّمَهٗ وَعَظَّمَ اَمْرَهٗ، ثُمَّ قَالَ لَا اُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ، عَلٰى رَقَبَتِهٖ بَعِيْرٌ لَهٗ رُغَاءٌ يَقُوْلُ: يَارَسُوْلَ اللّٰهِ ! اَغِثْنِىْ. فَاَقُوْلُ : لَا اَمْلِكُ لَكَ شَيْئًا قَدْ اَبْلَغْتُكَ. لَا اُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ،عَلٰى رَقَبَتِهٖ فَرَسٌ لَهٗ حَمْحَمَةٌ فَيَقُوْلُ: يَا رَسُوْلَ اللّٰهِ اَغِثْنِىْ. فَاَقُوْلُ : لَا اَمْلِكُ شَيْئًا. قَدْ اَبْلَغْتُكَ. لَااُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ عَلٰى رَقَبَتِهٖ شَاةٌ لَهَا ثُغَاءٌ يَقُوْلُ: يَا رَسُوْلَ اللّٰهِ اَغِثْنِىْ. فَاَقُوْلُ : لَا اَمْلِكُ لَكَ شَيْئًا. قَدْ اَبْلَغْتُكَ. لَا اُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ، عَلٰى رَقَبَتِهٖ نَفْسٌ لَهَا صِيَاحٌ فَيَقُوْلُ : يَا رَسُوْلَ اللّٰهِ ! اَغِثْنِىْ فَاَقُوْلُ : لَا اَمْلِكُ لَكَ شَيْئًا قَدْ اَبْلَغْتُكَ، لَا اُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ عَلٰى رَقَبَتِهٖ رِقَاعٌ تَخْفِقُ فَيَقُوْلُ: يَا رَسُوْلَ اللّٰهِ اَغِثْنِىْ فَاَقُوْلُ: لَا اَمْلِكُ لَكَ شَيْئًا قَدْ اَبْلَغْتُكَ، لَا اُلْفِيَنَّ اَحَدَكُمْ يَجِيْٓئُ يَوْمَ الْقِيَامَةِ، عَلٰى رَقَبَتِهٖ صَامِتٌ فَيَقُوْلُ : يَا رَسُوْلَ اللّٰهِ اَغِثْنِىْ فَاَقُوْلُ : لَا اَمْلِكُ لَكَ شَيْئًا قَدْ اَبْلَغْتُكَ . (مسلم کتاب الامارات)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो म्हणतात की, एके दिवशी अल्लाहचे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आमच्या दरम्यान उभे राहिले, आणि अफरातफरी**

**चे वर्णन केले, आणि ते फार मोठे पाप असल्याचे संगितले. मग फर्मावले मी तुमच्या पैकी कोणालाही कियामतीच्या दिवशी या स्थितीत ना पाहावे की, त्याच्या मानेवर उंट असावा जो बडबडत असावा आणि तो माणूस म्हणत असावा की हे अल्लाह चे प्रेषित ! मला मदत करा. आणि मी म्हणावे की, तुमच्यासाठी मला काहीही अधिकार नाही. मी तुम्हास अल्लाहचा संदेश पोहोचवला होता. कियामतीच्या दिवशी मी तुमच्या पैकी कोणाला या स्थितीतही पाहू नये की त्याच्या मानेवर घोडा असावा. जो ओरडत असावा आणि त्या माणसाने म्हणावे की, हे अल्लाह च्या प्रेषिता ! माझी मदत करा. आणि मी त्याला उत्तर द्यावे. तुमच्यासाठी मला काहीही अधिकार नाही. मी तुम्हास अल्लाहचा संदेश पोहोचवला होता. कियामतीच्या दिवशी मी तुमच्या पैकी कोणाला या स्थितीत ही पाहू नये की त्याच्या मानेवर शेळी असावी जी मे मे करीत असावी. आणि त्या माणसाने म्हणावे की हे अल्लाहचे प्रेषिता ! माझी मदत करा. आणि मी त्याला उत्तर द्यावे की मला तुमच्यासाठी काहीही अधिकार नाही. मी तुम्हास अल्लाहचा संदेश पोहोचवला होता. कियामतीच्या दिवशी मी तुमच्या पैकी कोणाला या स्थितीत ही पाहू नये की त्याच्या मानेवर (हत्या झालेल्या माणसाचे) प्राण असावे. जो ओरडत असावा आणि त्या माणसाने म्हणावे की हे अल्लाहचे प्रेषित ! माझी मदत करा. आणि मी उत्तर द्यावे की, मला ! तुमच्यासाठी काहीही आधिकार नाही. मी तुम्हास अल्लाहचा संदेश पोहोचवून दिला होता. कियामतीच्या दिवशी मी तुमच्या पैकी कोणाला या स्थितीतही पाहू नये की त्याच्या मानेवर कापडांचा ढीग असावा जे उडत असावेत आणि त्या माणसाने म्हणावे की हे अल्लाहचे प्रेषिता, माझी मदत करा. आणि मी उत्तर द्यावे, की मला तुमच्या साठी काही ही अधिकार नाही. मी तुम्हास अल्लाहचा संदेश पोहोचवून दिला होता. कियामतीच्या दिवशी मी तुमच्या पैकी कोणाला या स्थितीतही पाहू नये की, त्याच्या मानेवर सोन्या चांदीचे ओझे असावे. आणि त्या माणसाने म्हणावे की हे अल्लाहच्या प्रेषिता ! मला मदत करा. आणि मी उत्तर द्यावे. की, मला तुमच्यासाठी काहीही अधिकार नाही. मी तुम्हाला अल्लाहचा संदेश पोहोचवून दिला होता.**

**(मुस्लिम - किताबुल अमारात)**





# स्पष्टीकरण

या हदीस मध्ये अफरातफरीच्या भयानक परिणामाचे वर्णन केले गेले आहे. विशेष करुन त्या अफरातफरीचे जे इस्लामी शासनाच्या संपत्तीमध्ये केली जावी. आणखी एका हदीस मध्ये प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैहि वसल्लम त्या अधिकाऱ्यानांही अशाच परिणामांपासून खबरदार केले आहे,जे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतानां लोकांकडून भेट वसूल करतात. कारण हे देखील लाच आहे आणि अफरातफर देखील आहे. अफरातफर मग ती उंट वगैरे जनावरांच्या स्वरुपात असावी अगर कापडाच्या स्वरुपात किंवा सोने चांदी अगर रुपये पैसेंच्या स्वरुपात असो सर्व हराम आहे. आणि कियामतीचा दिवशी अफरातफरी चा माल माने वर लादण्यात येईल. जर एखादा जनावर आहे ज्याची त्याने अफरातफर केली होती तर तो मानेवर सवार होऊन ओरडत असेल आणि जर विनाकारण कोणाची हत्या केली असेल तर वधित व्यक्ती मानेवर सवार होऊन ओरडत असेल. आणि जर सोने चांदी आणि रुपयेपैश्यांची अफरातफर केली होती तर त्याचे ढीग मानेला खोचत असेल. अल्लाह रक्षण करो किती यातनादायक शिक्षा आहे; जी कियामतीच्या दिवशी अफरातफर करणाऱ्याना होणार आहे.

आधुनिक युगात घोटाळ्याची संख्या खूप वाढलेली आहे. सार्वजनिक मालमत्तेत घोटाळा, संस्था येथ पावेतो की मशिदी, मदरसे, अनाथालये आणि धर्म प्रचार व प्रसारणाच्या संस्था जे अल्लाहसाठी अर्पण असतात त्यातही घोटाळा करणे आणि अफरातफर करायला लोक धजत नसतात. अशा लोकानी जर हदीसच्या आरश्यात आपली छाया पाहिली तर ते घाबरल्या शिवाय राहणार नाही.

या हदीस मुळे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या ''शफाअत''(पैगंबरा नी आपल्या अनुयायानां पापांपासून मुक्ती किंवा मोक्ष मिळावी म्हणून ईश्वराकडे केलेली शिफारस) संबंधी असलेल्या चुकीच्या कल्पनेचे ही खंडन होते. सर्व सामान्यपणे मुसलमानांची अशी कल्पना आहे की, आम्ही प्रेषितांच्या उम्मत मध्ये आहोत, म्हणून आमचे कर्म कसे ही असो आमची मुक्ती निश्चितपणे होणारच आहे. ''शफाअत'' च्या या चुकीच्या कल्पनेमुळे त्यांच्यात पाप करण्याचे धैर्य वाढवून दिले आहे. आणि ते आपल्या मुक्ती संबंधी अत्यंत निष्काळजी झालेले आहेत ''कर्मांचा मोबदला'' या श्रध्देला इस्लामला अत्यंत स्पष्टपणे मांडलेले आहे. त्या श्रध्देला ''शफाअत'' च्या या चुकीच्या कल्पने ने खोडून टाकले आहे. कुरआन मध्ये शफाअत संबंधी ही तात्वीक गोष्ट स्पष्टपणे वर्णन केली गेली आहे की, ''शफाअत'' ही अल्लाह च्या परवानगी वर अवलंबून राहणार आहे. तो ज्याला ''शफाअत'' ची परवानगी देईल आणि ज्यांच्यासाठी देईल त्याच्या करीताच तो शिफाअत करु शकेल.

**يَوۡمَئِذٍ لَا تَنۡفَعُ الشَّفَاعَةُ اِلَّا مَنۡ اَذِنَ لَهُ الرَّحۡمٰنُ وَرَضِیَ لَهٗ قَوۡلًا (طٰہٰ:١٠٩)**

''त्या दिवशी कोणाची शिफारस उपयोगी पडणार नाही मात्र ज्याला रहमान आपल्या

आदेशाने परवानगी देईल आणि ज्याच्याकरीता शिफारस कबूल करायला राजी होईल.'' (ताहा - १०९)

وَلَا تَنْفَعُ الشَّفَاعَةُ عِنْدَهٗٓ اِلَّا لِمَنْ اَذِنَ لَهٗ ‌.(سبا:۲۳)

''अल्लाहच्या येथे कोणाची शिफारस लाभ देणार नाही परंतु अल्लाह ज्याला अनुमती देईल.''(सबा-२३)

म्हणून प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानांही ज्या वेळी ''शफाअत'' ची परवानगी देण्यात येईल त्याचवेळी ते ''शफाअत'' करतील. आणि ज्यांच्यासंबंधी ती परवानगी असेल केवळ त्याचीच ''शफाअत'' ते करतील. तर काय जे मुसलमान त्यांच्या ''शफाअत'' वर विश्वास ठेवून बसून आहेत; ते या गोष्टीला तयार आहेत की ते आपल्या पापकृत्यांची शिक्षा एका मुदतीपर्यंत भोगत राहतील. आणि त्यानंतर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या ''शफाअत'' ने, ते ही जर अल्लाहने त्यांच्या बाबतीत त्याची परवानगी दिली तर मुक्त होतील? जेव्हा माणूस एक क्षणासाठी आगीत जळणे सहन करु शकत नाही. तर एका दीर्घ मुदतीकरिता अग्नीचा अज़ाब कसे सहन करु शकेल? त्यासाठीच क़ुरआन ने ईमान बरोबरच प्रत्यक्ष जीवन सदाचारी बनवण्याची ताकीद केली आहे आणि ''शफाअत'' एक अपवादात्मक स्थितीत पेश केले आहे.

# कपडे लोबंकळत चालणे

## हदीस

عَنْ سَالِمِ بْنِ عَبْدِ اللّٰهِ عَنْ اَبِيْهِ رَضِیَ اللّٰهِ عَنْهُ عَنِ النَّبِیِّ صلی اللہ علیہ وسلم قَالَ مَنْ جَرَّثَوْبَهٗ خُيَلَاءَ لَمْ يَنْظُرِ اللّٰهُ اِلَيْهِ يَوْمَ الْقِيَامَةِ قَالَ اَبُوْبَكْرٍ يَارَسُوْلَ اللّٰهِ اِنَّ اَحَدَ شِقَّیْ اِزَارِیْ يَسْتَرْخِیْ اِلَّااَنْ اَتَعَاهَدَ ذٰلِکَ مِنْهُ فَقَالَ النَّبِیُّ صلی اللہ علیہ وسلم : لَسْتَ مِمَّنْ يَصْنَعُهٗ خُيَلَاءَ . (البخاری کتاب اللباس)

## अनुवाद

**सालिम बिन अब्दुल्लाह आपले वडील (रज़ि.) तर्फे कथन करतात की**




**प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. जो माणूस आपले कपडे घमेंडीने (गर्वाने) लोंबकळत चालेल, क़ियामतीच्या दिवशी अल्लाह त्याच्या कडे पाहणार नाही. हज़रत अबू बकर यानी विचारले माझ्या लुंगीचा एक भाग ढीला होत असतो; परंतु हे की, मी त्या गोष्टीकडे विशेषकरुन लक्ष द्यावं. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फरमावले तुम्ही त्यांच्या पैकी नाहीत जे घमेंडीने असे करतात.**

**(बुखारी - किताबुल लिबास)**

## स्पष्टीकरण

कपडे लोंबकळत चालणे अल्लाहला सक्त नापसंत आहे. आणि त्याचे कारण घमेंड आहे; जसे हदीस मध्ये वर्णन केले गेले आहे. म्हणून अशा माणसाकडे सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी कृपेची दृष्टी टाकणार नाही. ही शिक्षा त्या माणसाची आहे जो आपले कपडे, चादर, कुडता, पायजामा किंवा पँट वगैरे जाणून बुजून इतके लांब ठेवतो की जमीन झाडतानां चालतो म्हणजे त्याचे घमेंडी वैभवाचे प्रदर्शन व्हावे. म्हणून मगरुर बादशहांची हीच पद्धत राहिली आहे की, ते आपल्या कपड्यानां ढिले सोडून देतात येथ पावेतो की, त्यांचे दास त्यांचे ते लोंबणारे कपडे मागे उचलून चालतात. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी घमेंडी लोकांच्या पद्धतींचा अवलंब करण्यापासून दूर राहण्याची सूचना केली आहे.

हज़रत अबू बकर (रज़ि.) यानी आपली जी शंका व्यक्त केली, आणि त्याचे जे उत्तर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी दिले आहे. त्याने हे स्पष्ट होते की, जर घमेंडीमुळे लुंगी पायजामा, पँट वगैरेला खाल पर्यंत लटकवले जात नाही. उलट पोट मोठे असल्या मुळे किंवा अन्य एखाद्या कारणा मुळे कपडे सैल होऊन जातात आणि खालपर्यंत उतरले जातात, तर त्यांच्यासाठी ही वाईट वार्ता नव्हे. ही वाईट वार्ता घमेंडामुळे असे करणाऱ्या लोंका साठीच आहे.

# पायाच्या घोटयाखाल पर्यंत कपडे ठेवणे

## हदीस

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ : مَا اَسْفَلَ مِنَ الْکَعْبَیْنِ مِنَ الْاِزَارِ فَفِی النَّارِ .(البخاری کتاب اللباس)

## अनुवाद

**अबु हुरैरा रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-जे लुंगी पायाच्या घोटयाखाल पर्यंत असेल तो जहन्नम मध्ये असेल.** (बुखारी-किताबुल-लिबास)

## स्पष्टीकरण

शरीअत ने कपडयाची सीमा पायाच्या घोटयांपर्यंत निश्चित करुन दिली आहे. म्हणजे लुंगी, पायजामा, पँट वगैरे पायांच्या घोटयांखाली नसावेत; कारण कपडे पायांच्या घोटयांखाली असणे आणि जमीन झाडतानां चालणे ही घमेंडी लोकांची पद्धत आहे. आणि जो माणूस घमेंडीमुळे असे करतो, त्याच्याकरिता जहन्नमची शिक्षा आहे; जसे दुसऱ्या हदीस मध्ये नमूद केले गेले आहे.

आजकाल पँट पायांच्या घोटयाखाली लटकवणे फॅशन मानले जाते. परंतु फॅशनवर शरीअत वरचढ आहे, म्हणून शरीअतने घातलेल्या पालनहद्दीचे करुन चाललेल्या फॅशन मध्ये दुरुस्ती केले पाहिजे.

हे लक्षात घेतले पाहिजे की, स्त्रीयांसाठी पायांच्या घोट्यांपर्यंत कपडे ठेवण्याची अट नाही ते आपले वस्त्र इतके लांब ठेवू शकतात की, पाऊलांचा दिसणारा भाग लपून जावा; त्यापेक्षा जास्त लांब वस्त्र परिधान करणे आणि जमीन झाडतानां चालणे, याची त्यानांही परवानगी नाही.





# अहंकाराचा परिणाम

## हदीस

حَدَّثَنَا مُحَمَّدُ بْنُ زِیَادٍ قَالَ سَمِعْتُ اَبَا هُرَیْرَةَ یَقُوْلُ:قَالَ النَّبِیُّ اَوْ قَالَ اَبُوالْقَاسِمِ ﷺ بَیْنَمَا رَجُلٌ یَّمْشِیْ فِی حُلَّةٍ تُعْجِبُهُ نَفْسُهُ مُرَجَّلٌ جُمَّتَهُ اِذْ خَسَفَ اللّٰهُ بِهٖ فَهُوَ یَتَجَلْجَلُ اِلٰی یَوْمِ الْقِیَامَةِ.(البخاری کتاب اللباس)

## अनुवाद

**मुहम्मद बिन ज़ियाद म्हणतात की मी अबु हुरैरा यानां म्हणताना ऐकले की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले, एक माणूस वस्त्र परिधान करुन आणि लांबलांब केसामध्ये कंगवा करुन अहंकाराने चालत होता. की अल्लाह ने त्याला (जमीनीत) खचवून दिले. तर तो कियामती पर्यंत खचतच जाणार आहे.** (बुखारी-किताबुल-लिबास)

## स्पष्टीकरण

ही अहंकाराची शिक्षा आहे; जी त्या माणसाला मिळाली. अहंकार हा आहे की माणसाने स्वत:ला काही तरी समजावे. घमेंड आणि गर्वाने त्याची मान उंचावी. आणि आपल्या सौंदर्यावर आणि वस्त्रावर घमेंड करावी. हदीस मध्ये त्या माणसाचा किती दु:खदायक परिणाम झाला ज्याच्या मनात अहंकार होता. हे त्याकरिता की, लोकानी त्यापासून धडा घ्यावा.

माणसाने वर वर दिसणाऱ्या रुपापेक्षा आपल्या अंतर्गांवर आपले दृष्टी टाकावी. म्हणजे माणसाचे खरे वैशिष्ट्य हे नाही की, त्याचे वरुन दिसणारे शरीर चांगले असावे. तर त्याचे खरे वैशिष्ठयं हे आहे त्याचे अंत: करण चांगले आहे. आणि त्याने आपल्यात चांगल्या सवयी निर्माण केल्या आहेत. अशा माणसामध्ये नम्रता व दीनते ची वौशिष्ठये असतात.

आपल्या वस्त्रांमध्ये सौंदर्य निर्माण करायला शरीअत मध्ये मनाई नाही तथापि ज्या गोष्टीची मनाई आहे तो अंहकार आहे.

# धनाचा गुलाम

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ :**
**تَعِسَ عَبْدُ الدِّیْنَارِ وَالدِّرْهَمِ وَالْقَطِیْفَةِ وَالْخَمِیْصَةِ اِنْ اُعْطِیَ**
**رَضِیَ وَ اِنْ لَمْ یُعْطَ لَمْ یَرْضَ .** (البخاری کتاب الرقاق)

## हदीस

**अबु हुरैरा रज़िअल्लाह अन्हो म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानीं फर्मावले-दीनार व दिरहम (नाणी) आणि मखमली चादर आणि कुडत्यांचा दास नष्ट झाला. त्याला मिळाले तर तो राजी झाला आणि जर मिळाले नाही तर राजी झाला नाही. (बुखारी-किताबुलर्रिक़ाक़)**

## स्पष्टीकरण

उपरोक्त हदीस मध्ये संपत्तीचा गुलाम बनण्यातील तिरस्काराचे वर्णन केले गेले आहे. अल्लाहचा खरा दास तर प्रत्येक स्थितीत अल्लाहशी राजी व खुश राहतो. मग त्याला संपत्तीची विपुलता प्राप्त असो अगर नसो. त्याची रोजी रोटी संकुचित असो अगर विस्तृत असो. कारण त्याला माहीत आहे की, दोन्ही स्थितीत परिक्षा आहे. आणि यश तर आखिरतचेच आहे. परंतु जो माणूस माल आणि संपत्तीचा लालसी असावा आणि त्याचाच गुलाम असावा. आणि चांगल्या वस्त्रांचा शौकीन असावा. जर त्याला विपुल संपत्ती प्राप्त झाली तर अल्लाहशी राजी असतो. आणि जर तंगी मध्ये टाकला गेला तर अल्लाहशी नाराज होऊन बसतो. अशा माणसाचा परिणाम मृत्यू आहे. कारण तो अल्लाहचा बंदा आणि दास बनून राहण्यात खरा नाही.





# निकृष्ठ समाज

## हदीस

**عَنْ مِرْدَاسٍ الْاَسْلَمِیِّ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ یَذْهَبُ**
**الصَّالِحُوْنَ الْاَوَّلُ فَالْاَوَّلُ وَیَبْقٰی حُفَالَةٌ کَحُفَالَةِ الشَّعِیْرِ**
**اَوِالتَّمْرِ لَایُبَالِیْهِمُ اللّٰهُ بَالَةً.** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत मिरदास असलमी म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-सदाचारी लोक एकामागून एक निघून जातील. आणि ते लोक उरतील जे जव किंवा खुजुरीच्या खराब भागासमान असतील. अल्लाहला त्यांची काहीही पर्वा नाही.**

**(बुखारी-किताबुर्रिकाक)**

## स्पष्टीकरण

आज काल अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. सदाचारी लोकांची संख्या कमी होत चालली आहे. आणि दुराचारी व बदमाश लोकांची संख्या वाढत आहे. कारण जगात सोने कमी आणि माती अधिक, हिऱ्यांचे अस्तित्व नाही इतके परंतु कोळश्याचे प्रमाण अधिक आहे. एंकदरीत मौल्यवान वस्तु कमीच असतात. सदाचारी लोक देखील प्रत्येक समाजात कमीच असतात. परंतु ज्या वाईट काळाकडे हदीस मध्ये ईशारा केला गेला आहे; त्यानुसार त्यात सदाचारी लोकांची संख्या जवळ जवळ दुर्मिळ राहील. आणि समाज अशा लोकानी भरलेला राहील. जे दुराचारी असतील. आणि कोणत्याही कदरीला पात्र राहणार नाहीत. अशाच तऱ्हेने ज्याप्रमाणे जव किंवा खजुरीचा खराब भाग निकामी असतो. अशा लोकांची अल्लाहला काही ही पर्वा राहणार नाही. ते बरबादीच्या ज्या खड्डयात पडणार असतील, त्यात ते निश्चितपणे पडतील. जगाच्या आज समाजाचे जे चित्र समोर येत आहे. त्यामुळे अनुमान काढता येते की, जग हे अगदी जलदगतीने त्या दिशेनेच जात आहे.

# वाईटातील वाईट काळ

## हदीस

عَنْ الزُّبَيْرِ بْنِ عَدِيٍّ قَالَ اَتَيْنَا اَنَسَ بْنَ مَالِكٍ فَشَكَوْنَا اِلَيْهِ مَا نَلْقٰى مِنَ الْحَجَّاجِ فَقَالَ : اصْبِرُوْا فَاِنَّهٗ لَا يَاتِيْ عَلَيْكُمْ زَمَانٌ اِلَّا الَّذِيْ بَعْدَهٗ شَرٌّ مِّنْهُ حَتّٰى تَلْقَوْا رَبَّكُمْ سَمِعْتَهٗ مِنْ نَبِيِّكُمْ ﷺ . (البخاری کتاب الفتن)

## अनुवाद

**जुबैर बिन अदी म्हणतात की, आम्ही अनस बिन मालिक यांच्याकडे आलो. आणि हज्जाज कडून आम्हाला ज्या यातना पोहचत होत्या त्यासंबंधी त्यानां तक्रार केली. त्यानी सांगितले संयम पाळा कारण तुम्ही ज्या काळात राहात, त्यानंतरचा काळ त्या पेक्षाही वाईट असेल; येथपावेतो की तुम्ही आपल्या पालनकर्त्याला जाऊन भेटावे. ही गोष्ट मी तुमच्या प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम कडून ऐकली आहे.** (अल-बुखारी किताबुल फितन)

## स्पष्टीकरण

''उमवी'' (घराण्याचे नांव) काळामध्ये हज्जाज बिन यूसुफ च्या अत्याचाराला फार प्रसिद्धी मिळाली आहे. त्यासंबंधीची तक्रार जेव्हा प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमचे सहाबी हज़रत अनस (रज़ि.) यांच्या कडे केली गेली तर त्यानी संयम पाळण्याची सूचना दिली. आणि म्हणाले - पुढे यापेक्षाही वाईट काळ येणार आहे. म्हणजे भविष्यकाळा संबंधी त्यानी पूर्वीच खबरदार करुन दिले होते. आणि इतिहास साक्ष आहे की, मुसलमानांच्या सत्तेत बदल होत राहिले. परंतु बहुतेक सत्ताधाऱ्यांकडून जुलूम आणि अत्याचारांमध्ये वाढच होत राहिले. येथपावेतो की ''चंगेजी '' काळ आला. काही अपवादात्मक स्थिती निश्चितपणे आहेत उदाहरणार्थ-हज़रत उमर बिन अब्दुल अज़ीज़ चा काळ,तो न्यायावर आधारित शासने काळ होता.

आधुनिक युगात मुस्लिम देशांमध्ये जुलूम व अत्याचाराची कमी नाही. परंतु त्यामुळे इस्लामचा कोणताच दोष नाही. कारण इस्लाम ने सामुहिक न्याय आणि न्यायावर आधारित शासनाचे जे आदेश दिले आहेत. हे त्या विरुद्ध आहे. भूतकाळात बादशाहानी जे अत्याचार केले; त्याची जबाबदारी इस्लाम वर नाही. उलट ती स्वयं त्यांच्यावर आणि त्या लोकांवर जे त्या आत्याचारांचे समर्थन करतात. ही गोष्ट देखील मान्य करावी लगेल की, इस्लामने ज्या शिष्ठमंडळावर आधारित शासनाची स्थापना केली होती; पुढील काळातील खलीफा,





बादशाह आणि शासकानी त्याची कायाच पालट करुन टाकली होती. वास्तविक पाहता खऱ्या लोकाशाहीची कल्पना या इस्लाम शिष्ठमंडळा च्या पद्धती मध्येच होते.

# काळाला बरे वाईट संबोधणे

## हदीस

عَنْ اَبِيْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ قَالَ اللّٰهُ تَعَالٰى يُؤْذِيْنِيْ اِبْنُ اٰدَمَ يَسُبُّ الدَّهْرَ وَاَنَا الدَّهْرُ بِيَدِي الْاَمْرُ اُقَلِّبُ اللَّيْلَ وَالنَّهَارَ .

(البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**अबु हुरैरा (रज़ि) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले. ''इब्ने आदम'' (आदम ची संतान) मला यातना देतो. तो ''दहर'' (काळ) ला बरे वाईट म्हणतो. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, मी काळ आहे. माझ्या हातात घटना आहे. मी दिवस आणि रात्रीचे फेरफार करीत असतो.** (अल-बुखारी-किताबुत-तौहीद).

## स्पष्टीकरण

लोकांचे वागणे विचित्र आहे. जेव्हा ते एखाद्या कष्टात किंवा दु:खात सापडतात. तर काळाला बरे वाईट म्हणू लागतात; की, हे काळाचेच चक्र आहे. आणि त्यानेच हे वाईट दिवस आणलेत. काळाचा ''बेमुर्वतखोरपणा'' ही देखील एक म्हण निर्माण झाली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, काळाला अल्लाह ने अस्तित्व प्रदान केले आहे. आणि ते अजिबात असमर्थ आहे. कोणाला हानी अगर लाभ पोहोचवणे काळाचे आणि वेळेचे कार्य नव्हे, उलट हे सर्वकाही अल्लाहच्या आदेशाने होत असते. म्हणून काळाला वाईट म्हणण्याचा अर्थ अल्लाहला बरे वाईट म्हणणे आहे. कारण सत्यता ही आहे की, संकटांचा निर्माणकर्ता केवळ अल्लाहच आहे. आणि अल्लाहला बरे वाईट बोलून माणूस त्याला दु:ख देतो अल्लाहला दु:ख पोहोचवण्याचा अर्थ त्याला नाराज करणे होय अन्य माणूस अल्लाहला कोणतीही हानी पोहोचवू शकत नाही.

लोक हवेलाही बरेवाईट म्हणू लागतात. वस्तुत: चांगली व वाईट हवा अल्लाहच्याच आदेशाने चालतात. म्हणून हवेला बरे वाईट म्हणणे निरर्थक आहे. आणि हे अल्लाहलाच बरे वाईट म्हणण्यासारखे आहे. जे एकेश्वरवादाच्या अगदी विरुद्ध आहे.

# वाहयात काव्यापासून अलिप्तता

## हदीस

عَنْ ابْنِ عُمَرَ رَضِیَ اللّٰہُ عَنْهُمَا عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ
لَاَنْ یَمْتَلِیٔ جَوْفُ اَحَدِکُمْ قَیْحاً خَیْرٌ لَّہٗ مِنْ اَنْ
یَمْتَلِیٔ شِعْرًا. (البخاری کتاب الادب)

## अनुवाद

**इब्ने उमर रज़िअल्लाहु अन्हुमा कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-तुमच्या पैकी कोणाचे पोट वान्तीने भरुन जावे, हे बेहतर आहे त्यापेक्षा की वाहयात काव्याने भरुन जावे.**

(बुखारी-किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

''अशआर'' या शब्दाशी वाहयात, गलिच्छ आणि निर्लज्जता पसरविणारे कामवासना, कल्पना, व विचार निर्माण करणारे, स्त्रीयांच्या सौंदर्यावर फिदा करणे आणि त्यांच्या प्रेमात पडणारे, शिवाय इन्कार,अनेकेश्वरवाद आणि धर्मात नवीन गोष्टीनी माखलेले काव्य आहेत. असे काव्य पाठांतर करण्यामध्ये असलेली घृणता व गलिच्छता हदीस मध्ये अशा तऱ्हेने वर्णन केली गेली आहे की, ही गोष्ट आपल्या पोटात वान्ती भरण्यापेक्षाही वाईट आहे. म्हणून अशा काव्यापासून दुर राहिले पाहिजे. प्रेषितां सल्लल्लाहु अलैहि वसल्लम च्या म्हणण्याचा हेतु हा आहे की, असे गलिच्छ काव्य न केवळ हे की ते पाठ व्हायला हवे उलट अशा काव्याची कोणतीही आवडही निर्माण व्हायला नको.आणि मनात याचा तिरस्कार असायला हवे.





# अघाशी पणे खाणे

## हदीस

عَنِ ابْنِ عُمَرَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ اَلْکَافِرُ یَأْکُلُ فِیْ سَبْعَةِ اَمْعَاءٍ
وَالْمُؤْمِنُ یَاْکُلُ فِیْ مِعًی وَاحِدٍ . (مسلم کتاب الاشربۃ)

## अनुवाद

**अब्दुल्लाह बिन उमर रज़िअल्लाहु अन्हो कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-काफिर (अश्रध्द) सात आतडयांमध्ये खातो आणि ईमानधारक एका आतडीत.**

(मुस्लिम-किताबुल अशरबत)

## स्पष्टीकरण

या उदाहरणाने हा मुद्दा ध्यानात आणावयाचा आहे की, एका ईमान धारकाच्या खाण्यात ही मध्यमार्ग असतो. आणि तो लालसी बनून खाण्यावर तुटून पडत नाही. परंतु एक काफिर अल्लाह चा कृतज्ञ राहात नाही.

प्रत्येक माणसाचे खाणे एकसारखे राहात नाही. तर आपल्या प्रकृती नुसार कमी जास्त राहते. परंतु खादाडपणा ही चांगली सवय नाही. आणि प्राकृतिकदृष्टया हानीकारक आहे. कुरआन मध्ये आदेश देण्यात आले आहे.

**وكلوا وشربوا ولا تسرفوا**.(اعراف : ۳۱)

''खा आणि प्या आणि वाया घालवू नका म्हणजे खाण्या पिण्याच्या बाबतीत अधिकता करु नका.'' (अअराफ-३१)

# पाण्यात फुंकर मारणे वाईट आहे.

## हदीस

عَـنِ ابُـنِ عَبَّاسٍ : اَنَّ الـنَّبِیَّ ﷺ نَهٰی اَنْ يُّتَنَفَّسَ
فِـی الْاِنَـاءِ اَوْيُـنْفَـخَ فِيْـهِ ـــــــــــ هٰذَاحَدِيْـثٌ
حَسَنٌ صَحِيحٌ . (الترمذی ابواب الشراب)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास म्हणतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी भांडयात श्वास घेणे किंवा त्यात फुंकर मारण्याची मनाई केली आहे----------ही हदीस हसन सहीह आहे.**

**(तिरमिझी अबवाबुल शराब)**

## स्पष्टीकरण

पिणे किंवा खाण्याच्या भांडयात श्वास घेणे किंवा फुंकर मारल्याने त्यातील घाण हवा त्यात सामील होते. जे निर्मलतेच्या विरुद्ध आहे. म्हणून खाण्यापिण्या च्या नियमांमध्ये असे नमूद आहे की भांडयात श्वास घेऊ नये आणि ना ही फूंकर मारावी.

प्रेषितच्या या कथनामुळे पाण्यावर दम करणे (फुंकर मारण्याची पद्धत)नाकारली जाते. जेव्हा पाण्यात फुंकर मारण्याची मनाई आहे तर आजार दूर करण्यासाठी काही खास शब्द उच्चारुन पाण्यावर दम करणे कां म्हणून वैध होऊ शकते? दम करण्याची ही पद्धत जी मुसलमानांमध्ये प्रचलित आहे, ताईत आणि गंडे करणाऱ्याचाच शोध आहे. प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लमच्या काळात ही पद्धत प्रचलित नव्हती.नाही तर त्यांचे असहाब (अनुयायी) पाण्याचे भांडे घेऊन पाण्यावर दम करण्यासाठी आपल्या सेवेत हजर होत राहिले असते. आणि रुग्णाच्या आरोग्यासाठी हा सिलसिला चालत राहिला असता.





# कियामतीच्या दिवशी घडणारी घटना

# प्रत्येक व्यक्तीशी अल्लाह संभाषण करेल

## हदीस

**عَنِ عَدِىّ بِنُ حَاتِمٍ قَالَ قَالَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ مَا مِنُكُمْ اِلَّا سَيُكَلِّمُهٗ رَبَّهٗ لَيُسَ بَيُنَهٗ وَبَيُنَهٗ تَرُجُمَانٌ فَيَنُظُرُ اَيُمَنَ مِنُهُ وَلَا يَرٰىٓ اِلَّا مَا قَدَّمَ مِنُ عَمَلِهٖ وَيَنُظُرُ اَشَامَ مِنُهُ فَلَا يَرٰىٓ اِلَّا مَا قَدَّمَ وَ يَنُظُرُ بَيُنَ يَدَيُهِ فَلَا يَرٰى اِلَّا النَّارِ تَلُقَآءَ وَجُهِهٖ فَاتَّقُوْا النَّارَ وَلَوُ بِسِقِّ تَمُرَةٍ.** (البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हज़रत अदी बिन हातिम कथन करतात की अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले -तुमच्यात कोणीही असा नाही; ज्याच्याशी त्याचा पालनकर्ता संभाषण करणार नाही. दोघांच्या दरम्यान कोणीही अनुवादक राहणार नाही. तो माणूस आपल्या उजव्या बाजूला पाहिल तर त्याला सर्व काहीही दिसणार नाही; केवळ त्या कर्माचे जे त्याने पुढे पाठवले असेल. तो आपल्या डाव्या बाजूला पाहिल तर त्याला तेच दिसेल जे त्याने पुढे पाठवले होते.तो आपल्या समोर पाहिल तर त्याला आगी व्यतिरिक्त काही ही दिसणार नाही म्हणून आगीपासून सावध रहा; जर खजुरीचा तुकडाही दान करुन वाचू शकत असाल तर तसे करण्याची तयारी ठेवा.**

**दुसऱ्या कथनात ولوبکلمۃ طیبۃ हे शब्द देखील आहेत. म्हणजे जर चांगले बोल बोलूनही आगीपासून आपला बचाव करु शकत असाल.**

(बुखारी-किताबुल तौहीद)

## स्पष्टीकरण

या हदीसमुळे ही माहीती मिळते की, प्रत्येक माणूस अल्लाह पुढे हजर होईल. आणि त्याच्याशी थेट संभाषण करेल. हा प्रसंग फार कठिण असेल. आणि त्या वेळी त्या माणसाला जे भय असेल त्याच्या कल्पनेमुळेच अंगावर काटे उभे राहतात. त्या वेळी





आपल्या उजव्या डाव्या बाजूला त्याचे स्वत: चे कर्म दिसून येतील. आणि हे ते कर्मच आहेत जे जगातून निघून येणाऱ्या जीवनात त्याच्या समोर आकार घेणार आहेत. समोर जहन्नम असेल,ज्यापासून मुक्ती मिळवून देणारी गोष्ट केवळ चांगले कर्मच राहतील. म्हणून प्रत्येक माणसाला या गोष्टीचा प्रयत्न करायला हवे की, त्याने जास्तीत जास्त चांगले कर्म करावे आणि कोणत्याही छोट्या कर्मालाही तुच्छ समजू नये. यामुळेच हदीस मध्ये दान करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. कारण दान करणे एक असे पुण्य कर्म आहे.जे जहन्नम पासून मुक्तीत कारणीभूत ठरते. म्हणून जर ऐपत नसेल आणि जर क्षुल्लक वस्तुच तो दान करु शकत असेल, तर त्याने ते अवश्य करायला हवे. खजूरीचा एक तुकडाही त्या माणसाकरिता जो भुकेलेला आहे; त्याच्या पोटाचा आश्रय बनू शकतो. आणि हे दान ही मुक्तीला उपयोगी पडू शकते. काहीही असो प्रत्येक माणसाने याची काळजी घेतली पाहिजे की, तो अल्लाह समोर हजेरीच्या दिवशी काय उत्तर देईल. आणि जहन्नमच्या आगीपासून बचावाचे काय प्रयत्न करीत आहे?

# अल्लाह समोर हजेरीची समस्या

## हदीस

عَنْ عَائِشَةَ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ مَنْ نُوقِشَ الْحِسَابَ عُذِّبَ قَالَتْ قُلْتُ اَلَيْسَ يَقُوْلُ اللّٰهُ تَعَالٰى فَسَوفَ يُحَاسَبُ حِسَاباً يَّسِيْرًا قَالَ ذٰلِكَ الْعَرْضُ . (بخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत आयशा (रज़ि) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले-ज्याचा हिशोब सखोल घेतला गेला. त्याला अज़ाब दिला जाईल. हज़रत आयशा (रज़ि) म्हणतात की काय सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे फर्मावले नाही की** فَسوفَ يُحَاسَبُ حِسَاباً يَّسِيْرًا (انشقاق:٨) **अर्थात त्याचा सोपा हिशोब घेतला जाईल. (इन्शेक़ाक़-८)**

**त्यानी फर्मावले- याच्याशी (आखिरतची) सुनावणी आभिप्रेत आहे.**

(बुखारी-किताबुर्रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

सुनावणी तर प्रत्येक माणसाची व्यक्तीशः होणार आहे. आणि त्याला आपल्या कर्मांचे उत्तर द्यावे लागेल, परंतु जसे सूरह इन्शेकाक ची आयत क्र ८ ने अभिप्रेत आहे. ज्याना आपले कर्मपत्रक उजव्या हातात दिले जाईल. (म्हणजे सदाचारी आणि ईशभय बाळगणारे) त्यांच्याकडून अगदी सोपा हिशोब घेतला जाईल.आणि उपरोक्त हदीस मध्ये स्पष्ट केले गेले आहे की, सोप्या हिशोबाने हिशोबची सुनावणी आभिप्रेत आहे. परंतु ज्याचा हिशोब सखोल घेतला गेला म्हणजे अत्यंत तपशीलवरपणे विचारपूस पूछताछ केली गेली, तर तो तोच माणूस असेल जो अज़ाबला पात्र ठरेल.

आपल्या कर्मांचा हिशोब सादर करणे फारच कठिण (स्थितीतून) जावे लागेल. आणि हा टप्पा सहज सोपा होऊ शकतो; हे त्याच वेळी की, ईशभयाने जीवन व्यतीत केले जावे.





# स्त्रीयांचे आपल्या पतीची किंवा आपल्या सहकाऱ्याशी अकृतघ्नता व्यक्त करणे

## हदीस

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ قَالَ النَّبِيُّ ﷺ اُرِيتُ النَّارَ اَكْثَرُ اَهْلِهَا النِّسَآءُ يَكْفُرْنَ قِيْلَ اَيَكْفُرْنَ بِاللّٰهِ قَالَ يَكْفُرْنَ الْعَشِيْرَ وَيَكْفُرْنَ الْاِحْسَانَ لَوْ اَحْسَنْتَ اِلٰى اِحْدٰهُنَّ الدَّهْرَ ثُمَّ رَأَتْ مِنْكَ شَيْئًا قَالَتْ مَا رَأَيْتُ مِنْكَ خَيْرًا قَطُّ . (البخاری کتاب الایمان)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले-मला जहन्नम दाखवण्यात आली. तर त्यात स्त्रीयांची संख्या जास्त होती, ज्या अकृज्ञता व्यक्त करतात. सहाबानी विचारले. काय अशा स्त्रीया होत्या ज्या अल्लाहची अकृतज्ञता व्यक्त करीत होत्या? त्यांनी फर्मावले-आपल्या सहकाऱ्याची अकृतज्ञता व्यक्त करतात आणि उपकार मानीत नाही. जर तुम्ही त्यांच्या पैकी नेहमी चांगली वर्तणुक करावी. परंतु जर तिने तुमच्यात एखादी न आवडणारी गोष्ट पहावी तर म्हणेल मी तर तुमच्यामध्ये कधी ही कोणतीही चांगुलपण पाहात नाही.**

(बुखारी - किताबुल ईमान)

## २१०
# स्पष्टीकरण

हदीस मध्ये शब्द 'अशीर' उपयोगात आणला आहे, जो पतीसाठी बोलला जातो. आणि आपल्या सहकाऱ्यांसाठीही, विशेष करुन तो जो स्त्रीचे सांभाळ करतो. स्त्रीयांमध्ये सर्व सामान्यपणे संकूचितपणा असतो. आणि लहानसहान गोष्टी बद्दल तक्रार करण्याची त्याना सवय असते. येथ पावेतोकी, बऱ्याच स्त्रीया आपली सवय तक्रार करणारी बनवून टाकतात. आणि जेव्हा आपल्या पती किंवा सहकाऱ्याबद्दल एखादी तक्रार निर्माण होते, मग ती कितीही क्षुल्लक गोष्टीची का असेना, त्या अत्यंत कडवट आणि दु:खदायक गोष्टी बोलू लागतात; मग तिच्या पती अगर सहकाऱ्याची वर्तणुक किती का चांगली असेना. पण त्या त्याची नाकदरी आणि अकृतज्ञता व्यक्त करतानां हे म्हणतानां देखील चुकत नाहीत की मी तुमच्यात कधी ही कोणताही चांगुलपणा पाहिलेला नाही. किंवा तुम्ही माझ्याशी नेहमी वाईट वर्तणुकच करतात. स्त्री बरोबर चांगली वर्तणुक करणारा पती किंवा साथी यांना जेव्हा ती मानसिक त्रास देते तर त्याचे पाप देखील फार मोठे आहे. आणि नेहमी अशीच वर्तणुक करण्याच्या परिणाम स्वरुप स्त्री अल्लाहच्या कोपाला बळी पडते आणि जहन्नमच्या आज़ाबाला पात्र ठरते: ही हदीस स्त्रीयाना चेतावणी आहे, की,त्यानी आपले पती आणि आपले सहकारी यांच्याशी चांगली वर्तणुक करावी त्यांच्या लहान सहान चुकांकडे कानाडोळा करावेत आणि आपल्या सदाचाराच्या विशालतेचा पुरावा द्यावा.



## २११
# प्रसिध्दी इच्छिणाऱ्यांशी वागणूक
## हदीस

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ ، قَالَ : قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مَنْ سَمَّعَ سَمَّعَ اللّٰهُ بِهٖ . وَمَنْ رَاءَى رَاءَى اللّٰهُ بِهٖ . (مسلم کتاب الزھد)

## अनुवाद

**हज़रत इब्ने अब्बास कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले ज्याने प्रसिद्धी साठी एखादे कर्म केले अल्लाह त्याच्याबरोबर तसाच व्यवहार करेल. आणि जो देखाव्यासाठी एखादे कर्म करेल, तर अल्लाह देखील त्याच्याबरोबर देखाव्याचा व्यवहार करेल.** (मुस्लिम-किताबुज़-ज़ुहद)

## स्पष्टीकरण

प्रसिद्ध आणि देखावा मोठ्यातले मोठ्या सत्कर्माला नष्ट करुन टाकतात. अल्लाह त्याच सत्कर्माला कबूल करतो, जो केवळ त्याच्या प्रसन्नतेसाठी केला गेला असावा. ज्या माणसाने प्रसिद्धीसाठी एखादे कर्म केले होते तर सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याच्याशी तसाच व्यवहार करेल. म्हणजे लोंकासमोर त्याला अपमानित करेल. आणि ज्याने देखाव्या साठी एखादे कर्म केले होते तर क़ियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला त्याच्या मोबदल्या पासून वंचित करुन टाकेल.

आज अशा मुसलमानांची संख्या कमी नाही. जे सार्वजानिक हिताची मोठमोठी कामं प्रसिद्धी आणि देखाव्यासाठी करतात; आणि अंतिम मोबदल्या पासून वंचित राहून जाण्याची आजिबात पर्वा करीत नाहीत. मग ते आखिरत मध्ये मोबदल्यास कसे पात्र ठरु शकतात! ते तर शिक्षेस पात्र होतील.

# ज्याच्यावर जुलूम करण्यात आले त्याला मोबदल्यात पुण्यकर्म द्यावे लागतील.

## हदीस

**عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ : مَنْ كَانَتْ عِنْدَهٗ مَظْلِمَةٌ لِاَخِيْهِ فَلْيَتَحَلَّلْهُ مِنْهَا فَاِنَّهٗ لَيْسَ ثَمَّ دِيْنَارٌ وَّلَا دِرْهَمٌ مِنْ قَبْلِ اَنْ يُّؤْخَذَ لِاَخِيْهِ مِنْ حَسَنَاتِهٖ فَاِنْ لَّمْ يَكُنْ لَّهٗ حَسَنَاتٌ اُخِذَ مِنْ سَيِّئَاتِ اَخِيْهِ فَطُرِحَتْ عَلَيْهِ .** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले ज्याने आपल्या बांधवावर अत्याचाराचा एखादा व्यवहार केला असावा तर त्याने ते ओझे आपल्यावरुन उतरून टाकावे. कारण तेथे (आखिरत मध्ये) ना दीनार असतील ना ही दिरहम. हे काम त्याने तो दिवस येण्यापूर्वीच करुन टाकायला हवे; जेव्हा की, मोबदल्या मध्ये त्याचे पुण्य कर्म त्याच्या बांधवाला जातील. जर पुण्यकर्म नसतील तर त्याच्या बांधवाचे दुष्कर्म घेऊन त्याच्यावर टाकून जातील.**

(बुखारी-किताबुलर्रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

दुष्कर्माचा बदला दुष्कर्मच आहे; ज्याचे स्वरुप काय असेल, ते क़ियामतीच्या दिवशी समोर येईल. या हदीस मध्ये मुसलमानाच्या आपसातील संबंधात जुलूम व अतिरेकाच्या बदल्याचे वर्णन आलेले आहेत.या प्रसंगी काफिर लोकांचा विषय विचाराधीन नाही. जर





एखाद्या मुसलमानाने दुसऱ्या मुसलमानाशी दुराचार केले आहे, तर क़ियामतीच्या दिवशी त्याच्या बदल्यात त्याला तेवढेच सत्कर्म द्यावे लागतील. जर देण्यासाठी सत्कर्म नाहीत, तर ज्याच्याशी दुर्व्यवहार केले गेले आहे; त्याच्या दुष्कर्मातून त्या दुर्व्यवहाराच्या बदल्यात तेवढेच दुष्कर्म घेऊन त्या दुर्व्यवहार करणाऱ्यावर टाकून जातील म्हणजे ज्याच्याशी दुर्व्यवहार केले गेले त्याचे दुष्कर्म बदल्या एवढयाच टाकून दिल्या जातील. आणि ज्याने दुर्व्यवहार केले आहे, त्याला त्या दुर्व्यवहाराएवढाच मोबदला मिळेल. म्हणून शहणपणाचा तगादा असा आहे की, तो दिवस उजाडण्यापूर्वी. जुलम आणि आतिरेकाला आपल्या डोक्यावरुन काढून टाकावे. जर अत्याचाराने कोणाचा माल हडप केले आहे; तर ते परत करुन द्यावे. आणि आणखी दुसऱ्या एखाद्या प्रकारचे अत्याचार केले आहे; ज्याचा मोबदला देणे शक्य आहे; तर मोबदला अदा करुन टाकावा.

# स्वर्ग हे ईमानधारकाचे ध्येय





# स्वर्ग देखील किती जवळ आहे आणि नरक देखील

## हदीस

عَنْ عَبْدِاللّٰهِ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ : اَلْجَنَّةُ اَقْرَبُ اِلٰی
اَحَدِکُمْ مِنْ شِرَاکِ نَعْلِهٖ وَ النَّارُ مِثْلُ ذٰلِکَ.

(البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**अब्दुल्लाह (बिन मसऊद) रज़िअल्लाह अन्हो म्हणतात की,प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले -तुमच्या पैकी कोणत्याही व्यक्तीसाठी स्वर्ग त्याच्या जोडयाच्या बंद पेक्षा ही अधिक जवळ आहे. आणि जहन्नम देखील त्याच प्रमाणे आहे.**

**(बुखारी-किताबुर्रिक़ाक़)**

## स्पष्टीकरण

आपल्या बुटा च्या बंदला कोणीही लांब समजत नाही. कारण ते पायात असते. कारण ती अगदी जवळ राहणारी वस्तु आहे. स्वर्ग आणि नरक जवळ असण्याला या उदाहरणाने समजवण्यात आले आहे. त्याचा अर्थ असा आहे की, स्वर्ग आणि नरकला लांब समजू नका की त्यापर्यंत पोहोचण्यासाठी खूप लांब अंतरापर्यंत जावे लागेल. आणि त्यासाठी खूप दीर्घ काळ लागणार असेल. नव्हे. कोणाच्याही बाजूने स्वर्गाचा निर्णय झाल्या बरोबर लगेच तो तेथे पोहचेल. आणि ज्याच्या बाजूने नरकाचा निर्णय होईल तो देखील लगेचच तेथे पोहोचेल या वास्तविकतेलाही डोळ्या समोर ठेवले पाहिजे की, जवळ आणि लांबची कल्पना जी आपल्या मनात या जगामध्ये आहे; ती आखिरत मध्ये राहणार नाही. कारण तेथील वेळ, काळ या जगापेक्षा अगदी वेगळे राहतील.

# संयमाचा मोबदला स्वर्ग

## हदीस

**عَنْ اَبِی هُرَیْرَةَ اَنَّ رَسُولَ اللّٰهِ ﷺ قَالَ یَقُولُ اللّٰهُ تَعَالٰی : مَا لِعَبْدِی الْمُؤْمِنِ عِنْدِی جَزَآءٌ اِذَا قَبَضْتُ صَفِیَّهٗ مِنْ اَهْلِ الدُّنْیَا ثُمَّ احْتَسَبَهٗ اِلَّا الْجَنَّةُ .** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि) कथन करतात की, अल्लाह चे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावतो माझ्या ईमानधारक दासाकडून जेव्हा मी त्याचे ते प्राण, जे जगातील लोकांना सर्वाधिक प्रिय होते, खेचून घेतो (त्याला मरण येते) आणि तो त्यावर माझ्या कडून मोबदल्याची आशा ठेवतो; तर माझ्या कडे त्याचा मोबदला स्वर्ग आहे.**

(बुखारी - किताबुर्रिकाक)

## स्पष्टीकरण

मानवाला जी वस्तु जितकी अधिक प्रिय असते ती त्याच्याकडून घेतली जाण्याचा त्याला तेवढेच दु:ख असते. विशेष करुन आपल्या प्रिय मुलाचे प्राण गेल्यावर. आणि ही एक मोठी परिक्षा असते; ज्यावर जर तो संयम पाळत असेल आणि अल्लाह कडून मोबदल्याची आशा ठेवत असेल, तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला त्याच्या मोबदल्यात स्वर्ग प्रदान करेल. ही शुभवार्ता त्याच्या करिता त्याच्या मन समाधानीला कारणीभूत आहे.





# स्वर्गाच्या महालाच्या उंचीची एक झलक

## हदीस

**عَنْ سَهْلٍ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ : اِنَّ اَهْلَ الْجَنَّةِ لَیَتَرَآءُوْنَ الْغُرَفَ فِی الْجَنَّةِ کَمَا تَتَرَآءُوْنَ الْکَوَاکِبَ فِی السَّمَآءِ.** (البخاری کتاب الرقاق)

## अनुवाद

**हज़रत सहल (रज़ि) कथन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यानी फर्मावले- स्वर्गाचे मालक स्वर्गाच्या महालाना अशा प्रकारे पाहतील ज्या प्रमाणे तुम्ही आकाशात ग्रहानां पाहता.**

(बुखारी - किताबुर्रिकाक)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये स्वर्गाच्या वर्गाच्या उंचींची एक झलक पाहिली जाऊ शकते. स्वर्गाची वेळ, काळ हे जगाच्या वेळकाळा पेक्षा वेगळे राहतील. आणि त्याची कोणतीही कल्पना आपण या जगात राहून करु शकत नाही. स्वर्गवासियांना ज्या महाली प्रदान केल्या जातील. ते त्यांच्या वर्गानुसार असतील आणि वर्ग हे सत्कर्मानुसार असतील.आकाशातील ताऱ्यानां ज्या प्रमाणे आपण अत्यंत उंची वर पाहतो. त्याच स्वर्गाच्या महाली उंचांवर दिसून येतील. यामुळे स्वर्गाच्या विस्ताराची कल्पना येते, परंतु हे विस्तार आणि ही उंची लांब अंतर पार पाडण्यात अडथळा निर्माण करणार नाहीत. उलट विजेच्या वेगाने किंबहुना त्या पेक्षाही अधिक वेगाने हे अंतर पार पाडले जाईल. आज हवाई प्रवासानेही अंतर फार कमी करुन टाकले आहे.

# अल्लाह ची सर्वोत्तम देणगी

## हदीस

عَنْ اَبِیْ سَعِیْدِ الْخُدْرِیِّ قَالَ قَالَ النَّبِیُّ ﷺ اِنَّ اللّٰهَ یَقُوْلُ لِاَهْلِ الْجَنَّةِ یَا اَهْلَ الْجَنَّةِ فَیَقُوْلُوْنَ لَبَّیْکَ رَبَّنَا وَسَعْدَیْکَ وَالْخَیْرُ فِیْ یَدَیْکَ فَیَقُوْلُ هَلْ رَضِیْتُمْ فَیَقُوْلُوْنَ وَمَا لَنَا لَا نَرْضٰی یَا رَبِّ وَقَدْ اَعْطَیْتَنَا مَالَمْ تُعْطِ اَحَدًا مِّنْ خَلْقِکَ فَیَقُوْلُ اَلَا اُعْطِیْتُکُمْ اَفْضَلَ مِنْ ذٰلِکَ فَیَقُوْلُوْنَ یَا رَبِّ وَاَیُّ شَیْءٍ اَفْضَلُ مِنْ ذٰلِکَ فَیَقُوْلُ اُحِلُّ عَلَیْکُمْ رِضْوَانِیْ فَلَا اَسْخَطُ عَلَیْکُمْ بَعْدَهٗ اَبَداً.

(البخاری کتاب التوحید)

## अनुवाद

**हज़रत अबु सईद खुदरी (रज़ि) म्हणतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्मावले अल्लाह स्वर्ग-वासियांना फर्मावेल हे स्वर्ग वासीयानो ! ते म्हणतील हजर आहोत आम्ही हे आमच्या पालनकर्त्या आणि तत्पर आहोत. आणि चांगुलपणा तुझ्याच हाती आहे. अल्लाह फर्मावेल काय तुम्ही राजी आहात. ते म्हणतील. आम्ही का म्हणून राजी नसावेत हे आमच्या पालनकर्त्या, जेव्हा की तू आम्हाला ते सर्वकाही प्रदान केले आहेस जे आपल्या निर्मिती पैकी कोणाला ही दिले नाहीस. अल्लाह फर्मावेल काय मी तुम्हाला त्यापेक्षाही उत्तम वस्तु देऊ नये ? ते म्हणतील कोणती वस्तु आहे जी यापेक्षा उत्तम असावी? अल्लाह फर्मावेल मी आपली प्रसन्नता तुम्हाला दिली. आता मी तुमच्याशी कधी ही नाराज होणार नाही.**

(अल-बुखारी - किताबुत्तौहीद)





# स्पष्टीकरण

सदा सर्वदासाठी अल्लाहची प्रसन्नता, त्याचा तो ईनाम आहे. ज्यापेक्षा चांगला कोणताही ईनाम होऊ शकत नाही. क़ुरआन मध्ये म्हटले आसे.

وَرِضْوَانٌ مِّنَ اللّٰهِ اَکْبَرُ (توبہ:۷۲)

''आणि अल्लाह ची प्रसन्नता सर्वात महान चीज आहे.''(तौबा-७२)

जेव्हा अल्लाह आपल्या दासांशी राजी असावा तर कोणती वस्तु आहे, जी मिळण्यावाचून राहिली? अल्लाहची प्रसन्नता मिळाल्यानंतर कोणत्याही भय, भिती आणि खतऱ्याची काळजी राहात नाही; आणि ना ही कोणत्याही प्रकारच्या दु:खाची सुरक्षितता, मनशान्ती, आनन्द व प्रसन्नता, ऐश व आराम सर्व काही अल्लाहच्या प्रसन्नते बरोबरच प्राप्त झाले; आणि ते सदा सर्वदासाठी आणि आता तो त्यांच्याशी कधी ही नाराज राहणार नाही.

زیر اہتمام: محمد صدیق قریشی
Pixel Arts
Mobile : 9820790615
Printed at: Fatima Printers
Tilak Nagar, Saki Naka Mumbai - 400070

# इदाऱ्याची मराठी

# प्राकाशने

## दअवतुल क़ुर्आन

(पवित्र क़ुर्आनाचे अनुवाद व भाष्य)

भाष्य ;

**शम्स पीरज़ादा (रह.)**

मराठी अनुवाद ;

**मुहम्मद यूसुफ अत्तार**

**मुहम्मद शफी अन्सारी**

**संपूर्ण तीन खंडात**

| | |
|---|---|
| खंड १ (पारा १ ते १०) सूरह फातिहा ते सूरह तौबा | १२०/- |
| खंड २ (पारा ११ ते २०) सूरह यूनुस ते सूरह अंकबूत | १२०/- |
| खंड ३ (पारा २१ ते ३०) सूरह रूम ते सूरह नास | १२०/- |
| काय क़ुर्आनास अर्थासह वाचणे आवश्यक नाही | ९/- |
| ऐका आपल्या पालनकर्त्याचे | ९/- |
| जवाहिरुल हदीस | ६५/- |
| तनवीरुल हदीस (दिव्य वचनें) | ७०/- |

वरीळ पुस्तकांची उर्दू , गुजराती, हिन्दी अणि
इंग्रेज़ी भाषांतरे उपलब्ध आहेत

## इदारा दअ्वतुल क़ुर्आन

५९-मुहम्मद अली रोड, मुंबई-४०० ००३
फोन ; 23465005